म. ग्रं. सं. ठाणें

विषय इतिहास

९६७

संग्रहालय क्रमांक

लेखक विनायक कोंडदेव ओक

सन

पुस्तकाचे नांव हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास

१६७

उती.

श्री आठ नवीन ९३

# हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास.

## भाग पहिला.

### प्राचीन काळच्या हिंदूंविषयीं माहिती.

१. **प्राचीन काळचे आर्य लोक**—निरनिराळ्या भाषांची तुलना करून पाहतां त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, हिंदु लोक, इंग्रज लोक, रोमन लोक, ग्रीक लोक, जर्मन लोक, व आर्य ह्या नांवाखालीं मोडणारे इतर सर्व लोक, ह्या सर्वांचे पूर्वज एकच असून ते फार प्राचीन काळीं मध्य आशियांत एकत्र राहत होते. वरील तुलनेवरून आणखी एक गोष्ट व्यक्त होते ती ही कीं, ह्या प्राचीन काळच्या आर्य लोकांस नांगरणें, रस्ते करणें, गलबतें बांधणें, कापड विणणें, शिवणें, घरें बांधणें, ह्या कला माहीत होत्या. तसेंच त्यांना निदान शंभरांपर्यंत अंक मोजतां येत असत. गाय, घोडा, मेंढरूं, व कुत्रा ह्रीं जीं माणसाच्या अत्यंत उपयोगीं पडणारीं जनावरें तीं प्रथम रानांत राहत असत; पण त्यांस त्यांनीं माणसाळविलें होतें, व तीं ते आपल्यापाशीं बाळगीत असत. माणसास अत्यंत उपयोगी अशा ज्या धातू त्यांची त्यास माहिती होती; आणि त्यांस कुऱ्हाडी करतां येत असून त्यांचा उपयोग ते लांकडें वगैरे तोडण्याच्या घरगुती कामीं, व प्रसंग पडल्यास लढाईच्याहि कामीं, करीत असत. आपल्या कुळांत जन्मास आलेल्या माणसांचें नीट पालनपोषण केलें पाहिजे, व स्त्रीपुरुषांनीं लग्नें करून राहून विवाहधर्म पाळिले पाहिजेत, ह्या गोष्टी

त्यांच्या लक्षांत येऊन चुकल्या होत्या. ते आपले नाईक व राजे ह्यांच्या धोरणानें वागत असत; आणि रूढी व कायदेकानू ह्यांस अनादी अनुसरून प्रत्येकानें वागलें पाहिजे, ते मोडल्यास अपराध होतो, अशी त्यांची पक्की समजूत बनलेली होती. जगाचा नियंता ईश्वर ह्मणून कोणी तरी आहे ही कल्पना त्यांच्या मनावर ठसलेली होती, व ते अनेक नांवें देऊन त्या नांवांनीं त्याची प्रार्थना करीत असत.

**२. आर्य लोकांचा पंजाबांत अंमल**—अमुकच वेळीं ह्मणून निश्चितपणें सांगतां येत नाहीं, तरी प्राचीन कालीं, एका वेळीं, आर्य लोक स्वारी करून सिंधुनद उतरून आलीकडे आले, व त्यांनीं पंजाब प्रांतावर आपला अंमल बसविला. त्यांच्याबद्दल आपणास जी कांहीं माहिती आहे ती सर्व ऋग्वेदाच्या सूक्तांवरून मिळालेली आहे; व ह्या सूक्तांपैकीं जुनीं जीं सूक्तें तीं सुमारें चार हजार वर्षांपूर्वीं रचलीं असावीं अशी कल्पना आहे. ह्या सूक्तांवरून पाहतां असें दिसतें कीं, ह्या देशांतील तेव्हांचे मूळचे रहिवाशी लोक काळ्या वर्णाचे असून त्यांच्याशीं आर्य लोकांनीं तुंबळ युद्ध केलें, ह्या युद्धात त्यांनीं मुख्यत्वेंकरून धनुष्य आणि बाण ह्या शस्त्रांचा उपयोग केला होता; व त्यांच्या धनुष्यांस चामड्याच्या दोऱ्या लाविलेल्या असून बाणाच्या टोंकांस लोखंडाचे किंवा शिंगाचे अणकुचीदार तुकडे बसविलेले असत. तसेंच रथ, घोडे, नगारे, व फडकणारीं निशाणें ह्यांचाहि उल्लेख त्या सूक्तांतून केलेला आहे. हे प्राचीन काळचे हिंदु योद्धे इंद्र, वरुण, उषा व अग्नि ह्या देवतांस भजत असत. सतीची चाल त्या कालीं मुळींच नव्हती; विधवांना पुनर्विवाह करण्याची तेव्हां परवानगी

असे; आणि हल्लीं जसें कित्येक ठिकाणीं बायकांना घराबाहेर जाऊं देत नाहींत, व जावयाचेंच असल्यास तोंडावर बुरखा घेऊन जावें लागतें, तशी चाल त्यावेळीं मुळींच नव्हती.

**३. आर्य लोक सर्व हिंदुस्थान जिंकून घेतात**–पंजाब प्रांतावर आपला अंमल बसविल्यावर आर्य लोकांनीं त्वऱ्या करून सर्व हिंदुस्थान देशावर आपला अंमल बसविला. सर्व हिंदुस्थान जिंकण्यासाठीं त्यांना जीं युद्धें व ज्या लढाया कराव्या लागल्या असतील त्यांजबद्दल कांहींच माहिती मिळत नाहीं. रामायणांत असें सांगितलें आहे कीं, वानरांची एक अत्यंत मोठी सेना घेऊन तिच्या साहाय्यानें रामानें रावणाचा पराजय करून लंका घेतली. त्या कथेवरून विद्वान् लोक असा तर्क बांधितात कीं, आर्य लोकांतील एका बलिष्ठ राजानें सीलोन बेटावर चालून जाऊन तें काबीज केलें असावें, व त्याचें कवीनें वरच्यासारखें वर्णन केलें असावें; आणि वानरांची सेना म्हणून जी रामायणांत सांगितली आहे तिजबद्दल ते असा तर्क करितात कीं, हिंदुस्थानांतील काळ्या वर्णाचे जे मूळचे रहिवाशी त्यांना आपल्या बरोबर मदतीस घेऊन तो राजा लंकेवर गेला असावा; व त्यांस कवीनें वानरांची उपमा दिलेली असावी. आतां विद्वानांचा हा तर्क बरोबर असो किंवा चुकीचा असो; निदान् एवढें खरें आहे कीं, हळूहळू आर्य लोकांनीं हिंदुस्थानच्या द्वीपकल्पापैकीं बहुतेक भाग जिंकून त्याजवर आपला अंमल बसविला.

**४. प्राचीन संस्कृत ग्रंथ**–अशा रीतीनें हिंदुस्थानावर आर्यांचा अंमल हळूहळू पसरत चालला असतां, त्या

काळांत त्यांच्यांत इतिहास खेरीजकरून इतर सर्व विषयांवर ग्रंथ रचण्याचें काम जारीनें चाललें होतें असें दिसतें. पण इतिहास ह्या विषयाची त्यांनीं हयगय केली ही मोठी दुर्दैवाची गोष्ट होय. असो. आतां इतर ग्रंथरचनेच्या संबंधानें पाहतां, महाभारत व रामायण हीं दोन महावीर-काव्यें त्या काळांतच त्यांनीं रचिलीं. ऋग्वेदाचें स्पष्टीकरण करण्यासाठीं बऱ्याच प्राचीन काळीं त्यांनीं धर्मग्रंथ रचिले; व त्यानंतर तात्त्विक विषयांवर ग्रंथरचना केली. भूमिति-शास्त्र व ज्योतिःशास्त्र ह्यांचें अध्ययन ते करीत असत; व धर्मग्रंथांत सांगितल्यावरहुकूम स्थंडिलांची रचना अगदीं बिनचूक करतां यावी, आणि प्रत्येक यज्ञ सांगितलेल्या तिथीस करण्याच्या कामांत चूक कधींहि होऊं नये, ह्या उद्देशानें ते ह्या दोन शास्त्रांचें अध्ययन करीत. व्याकरण-शास्त्रावर पाणिनीनें मुख्य ग्रंथ रचिला; हा पाणिनी ख्रिस्ती-शकापूर्वीं सुमारें अकराव्या शतकांत होऊन गेला अशी कांहींची कल्पना आहे. गणितशास्त्राचेंहि ते अध्ययन करीत असत; व दशांशाची गणितपद्धति हिंदूंतील गणितशास्त्रज्ञां-नींच शोधून काढिली. सारांश, शास्त्रीय ग्रंथरचना व सामान्य गद्यपद्य ग्रंथरचना ह्या दोन गोष्टींत प्राचीन काळच्या ह्या हिंदूंनीं इतकी मजल मारिलेली होती कीं, ज्ञानाच्या बाबतींत ते इतर सर्व राष्ट्रांच्या फारच पुढें गेलेले होते.

**९. इराणी लोकांनीं पंजाबावर मिळविलेला जय**—ख्रिस्ती शकापूर्वीं सहाव्या शतकाच्या शेवटापर्यंत हिंदु-स्थानाच्या इतिहासांतील कोणत्याहि गोष्टीची तारीख नक्की म्हणून करतां येत नाहीं. त्याच्यापुढें मात्र कांहीं कांहीं गोष्टींच्या तारखा निश्चितपणें सांगतां येतात. ह्या सहाव्या

शकाच्या शेवटास ग्रीक लोकांस हिंदुस्थानाविषयीं कांहीं माहिती प्रथम प्राप्त झाली. त्यांच्यांतील मोठा इतिहासज्ञ जो हिरोडोटस तो आपल्या ग्रंथांत असें लिहितो कीं; इराणचा राजा जो डरायस त्यानें हिंदुस्थानावर स्वारी करून पंजाबापर्यंतचा मुलुख आपल्या राज्यांत सामील केला. ही स्वारी बहुधा ख्रिस्ती शकापूर्वीं ५१९ व्या वर्षीं झालेली असावी. ह्या राजाचा अंमल पंजाबाच्या अलीकडे बसलेला होता असें दिसत नाहीं. डरायस राजानें हिंदुस्थानांतील आपल्या प्रजेपासून खंडणीदाखल सोन्याची खंडीगणति माती घेतली. पुढें त्याचा मुलगा झर्झीज ह्यानें जेव्हां अत्यंत मोठें सैन्य बरोबर घेऊन ख्रिस्ती शकापूर्वीं ४८० ह्या वर्षीं ग्रीस देशावर स्वारी केली, तेव्हां पंजाबांतील लोक त्या सैन्यांत मदतनीस ह्मणून घेतले होते. ह्या लोकांविषयीं हिरोडोटस असें लिहितो कीं, "हिंदुस्थानांतील शिपायांनीं कापसाचीं वस्त्रें परिधान केलेलीं होतीं, आणि त्यांच्या हातांत वेताचीं धनुष्यें व बाणहि वेताचेच होते आणि त्या बाणांच्या टोकांस लोखंड बसविलेलें होतें." ख्रिस्ती शकापूर्वीं ४७९ व्या वर्षीं 'प्लेटिआ' एथें जी लढाई झाली तींत ते हजर होते; आणि इराणी लोकांचा तळ हस्तगत करून ग्रीक लोकांनीं जी कत्तल तेथें उडविली तींत ते बहुधा सर्व ठार झाले असावे. असो; पण ह्यावरून एक गोष्ट सिद्ध होते; ती ही कीं, जे आपण हिंदुलोक व पार्शी लोक हिंदुस्थानची बादशाहीण महाराणी व्हिक्टोरिया इच्या अमलाखालीं सध्या एकत्र राहत आहों, त्या आपले पूर्वज चोवीस शतकांपूर्वीं ग्रीस देशांत खांद्यास खांदा लावून लढले व मेले.

६. शिकंदर बादशाहाची हिंदुस्थानावर स्वारी व पोरस राजाचा पराजय—ह्यानंतरच्या हिंदुस्थानच्या इतिहासांतील ज्या गोष्टीविषयीं तारीख नक्की करतां येते ती गोष्ट ह्मटली ह्मणजे शिकंदराची हिंदुस्थानावर स्वारी ही होय. ख्रिस्ती शकापूर्वीं ३२७ ह्या वर्षी मासिडोनिया देशांतील ह्या प्रसिद्ध विजयी राजानें प्रथम इराणच्या बादशाहाचा पाडाव केला, व नंतर गलबतांचा पूल बनवून सिंधुनदी उतरून त्यानें पंजाबांत प्रवेश केला. तेव्हां हिंदुस्थानांतील पोरस राजा एक मोठें सैन्य गोळा करून त्यांच्यावर चालून गेला, व शिकंदराचें सैन्य हिदास्पीस ही नदी उतरून आलीकडे येत असतां त्यास अडथळा करूं लागला. तथापि शिकंदरानें युक्तिप्रयुक्तीनें आपलें सैन्य ती नदी उतरून आलीकडे आणिलेंच. तेव्हां त्याच्या सैन्याचें व व पोरसाच्या सैन्याचें मोठें तुंबळ युद्ध झालें. पोरस राजापाशीं रथ, हत्ती वगैरे सैन्य होतें, व त्याचे शिपाई फार शूर होते; तथापि त्याचा पराजय व्हावयाचा चुकला नाहीं. त्याच्या सैन्यावर शिकंदराच्या घोडेस्वारांनीं दोन्ही बाजूंनीं व मागून हल्ला केला, आणि पुढून शिकंदराचे रणशूर शिपायांच्या रांगाच्या रांगा त्याजवर तुटून पडल्या, आणि अशा रीतीनें त्यांचा सर्वस्वी पराभव करून टाकिला. खुद्द पोरस राजास कैद करून शिकंदरापुढें आणिलें; तेव्हां खऱ्या शूरास शोभेल अशा रीतीचें त्याचें एकंदर बोलणेंचालणें पाहून शिकंदरास आश्चर्य वाटलें, व त्यानें खूष होऊन त्याचें राज्य त्यास परत दिलें इतकेंच नाहीं, तर त्यास आपाखी कांहीं मुलूख बक्षीस केला, व त्यानें ह्यापुढें मासिडोनियाच्या राजाचा सुभेदार ह्मणून त्या सर्व प्रांतावर राज्य करावें असें ठरवून टाकिलें.

**७. शिकंदर बादशहाचें हिंदुस्थानांतून प्रयाण**—नंतर बाकीचा सर्व हिंदुस्थान देश जिंकून टाकावा असें शिकंदराचे मनांत फार होतें; परंतु त्यांचे शिपाई थकून गेले होते, व त्यांना स्वदेशीं परत केव्हां जाऊं असें झालें होतें. ह्मणून तो जेव्हां त्यांस पंजाबांतून बंगाल प्रांतावर स्वारी करण्याच्या हेतूनें तिकडे नेऊं लागला, तेव्हां आह्मी तुजबरोबर तिकडे येत नाहीं असें त्यांनीं त्यास साफ सांगितलें. तेव्हां त्यास स्वेच्छेविरुद्ध आपल्या विजयी सेनेस घेऊन स्वदेशाकडे परतावें लागलें. सिंधुनदीच्या तोंडापर्यंत त्याचें कांहीं सैन्य खुष्कीच्या मार्गानें जाऊन पोहोंचलें, व कांहीं जलमार्गानें जाऊन पोहोंचलें. मार्गांत हिंदुलोकांशीं त्याच्या पुष्कळ ठिकाणीं झटापटी झाल्या, व माली नांवाच्या लोकांच्या किल्ल्यावर हल्ला करीत असतां शिकंदरास फार मोठी जखम लागली. ह्या टोळींतील लोकांनीं त्याच्या सैन्यास पुढें जाण्यास फारच निश्चयानें अटकाव करण्याचा यत्न केला. शेवटीं, पुष्कळ अडचणींतून पार पडून व पुष्कळ ठिकाणीं आलेलीं संकटें निवारण करून, हल्लीं जेथें कराची शहर वसलेलें आहे त्याच्या नजीक त्याच्या सैन्यानें कसा तरी समुद्र गांठला; आणि नंतर उत्तरेकडे मोर्चा फिरवून, बलुचिस्थान व अफगाणिस्थान ह्या देशांतून इराण देशांत तें जाऊन पोहोंचलें.

**८. चंद्रगुप्त व सेल्यूकस**—आपण जिंकलेल्या देशावर आपल्या नांवानें राज्य करण्यास ज्या पोरस व इतर हिंदुराजांस व ग्रीक कामगारांस शिकंदरानें निघते समयीं नेमिलें होतें, त्यांस तदनंतर आपली सत्ता फार दिवसपर्यंत संभाळतां आली नाहीं. राज्यांतले लोक त्यांच्यावर सर्व

उठले, व चंद्रगुप्त नामक एका पराक्रमी हिंदूनें बंडवाल्यांचें आधिपत्य स्वीकारून ग्रीक सुभेदार व त्यांचे दोस्त पोरसादि हिंदू राजे ह्यांजपासून पंजाबप्रांत जिंकून घेतला. अशा रीतीनें विजयी झाल्यावर चंद्रगुप्तानें प्राचीन काळापासून चालत आलेलें जें मगधराज्य तें जिंकून गंगानदीच्या सभोंवताळच्या सर्व प्रदेशावर आपला अंमल बसविला. ख्रिस्तीशकापूर्वी ३०५ ह्या वर्षाच्या सुमारास शिकंदराच्या मागून जे राजे गादीवर बसले त्यांपैकीं सेल्यूकस नामक राजानें हिंदुस्थानावर स्वारी केली; ह्यानें ह्याच्यापूर्वी सिरिया देशाचें राज्य जिंकून घेतलें होतें. तो हिंदुस्थानावर चालून आला त्याप्रसंगीं चंद्रगुप्त आपल्या बरोबर मोठें सैन्य घेऊन त्यास आडवा गेला. तेव्हां सेल्यूकस ह्यास पुढें येतां आलें किंवा नाहीं, आल्यास तो कोठपर्यंत पुढें आला, व असें करीत असतां त्यास लढाया कराव्या लागल्या किंवा काय, इत्यादि गोष्टींबद्दल कांहींच माहिती मिळत नाहीं. ह्या स्वारीचा शेवट असा झाला कीं सेल्यूकस ह्यास चंद्रगुप्ताशीं तह करावा लागला. व त्या तहांत त्यानें सिंधुनदीच्या पश्चिमेकडील प्रांतावरचा आपला सर्व हक्क सोडून दिला, आणि आपली मुलगी त्या हिंदुराजास बायको करून दिली. परत चंद्रगुप्तानें त्यास ५०० हत्ती दिले, व त्यांच्या सहाय्यानें त्यानें व त्याच्या दोस्त राजांनीं मिळून ख्रिस्तीशकापूर्वी ३०१ ह्या वर्षी इप्ससच्या लढाईंत जय मिळविला.

९. **चंद्रगुप्ताच्या काळचीं हिंदुस्थानची स्थिति**—हल्लीं जेथें पाटणा हें शहर वसलेलें आहे तेथेंच पाटलिपुत्र नामक चंद्रगुप्त राजाची राजधानी होती. त्या ठिकाणीं सेल्यू-

कस राजानें मेगास्थिनीस नामक ग्रीक ग्रंथकारास पाठविलें होतें. त्याच्या व चंद्रगुप्ताच्या एकत्र भेटी झाल्या; व त्यास हिंदुलोकांची राज्यपद्धति कशी आहे व त्यांच्या इतर रीतीभाती व चालीरुढी काय आहेत हें अवलोकन करण्यास पुष्कळ वेळ सांपडला. त्यावरून त्यानें पुढील आशयाचा मजकूर लिहून ठेविला आहे:—हिंदुस्थान देश फार सुपिक असून तेथें सोनेंरुपें इत्यादिकांच्या खाणी विपुल आहेत. लोकांस खावयास विपुल असल्यामुळें ते उंच व सुरेख दिसतात. ते कारागिरीच्या कामांत वाकबगार आहेत, व ह्याचें कारण त्यांच्या देशांत हवापाणी आहे हें होय असें मला वाटतें. ते सत्यवादी व प्रामाणिक आहेत ह्याबद्दल मला पुष्कळ पुरावा मिळालेला आहे. चंद्रगुप्ताचें सैन्य एवढें मोठें होतें तरी त्याच्या मानानें त्यांच्यांत एकंदर चोऱ्या फारच थोड्या होत; आणि हिंदुलोकांना आपलें द्रव्य आपल्या मित्रांच्या स्वाधीन करतांना सहीशिक्का करून घेण्याची किंवा साक्षीदार ठेवण्याची मुळींच जरूर वाटत नाहीं.

---

## प्रकरण २ रें.

## बुद्धाचा काळ.

१०. **बुद्ध**—ह्याचा जन्म ख्रिस्ती शकापूर्वी ५५० या वर्षाच्या सुमारास झाला. ह्याचा बाप एक लहानसा राजा होता, व त्याचें राज्य काशी व हिमालयाच्या पायथा यांच्या मधोमध पसरलेलें होतें. बुद्धाचें वास्तविक नांव सिद्धार्थ असें होतें, पण त्याच्या आडनांवावरून त्यास गौतम हेंच

नांव बहुधा सर्वत्र दिलेलें दिसतें. पुढें जेव्हां तो धर्मोपदेशक ह्मणून प्रसिद्धीस आला तेव्हां बुद्ध हें नांव त्यास प्राप्त झालें. त्याचें लग्न झाल्यावर १०. वर्षें पाहतों, हिंदुस्थानांतील राजे सामान्यतः ज्या रीतीनें आपलें आयुष्य क्रमण करितात त्या रीतीनेंच तो करीत होता असें दिसतें. पण त्या सुमारास, त्याच्या वाड्याला लागूनच क्रीडाभुवन होतें, त्याच्या बाहेरच्या बाजूसच, माणसास किती विपत्ति भोगाव्या लागतात ह्याचीं मनास लागण्यासारखीं, एक दोन उदाहरणें त्याच्या दृष्टीस पडलीं तीं त्याच्या हृदयास झोंबलीं; व सर्व मानवजातीबद्दल त्याच्या मनांत दया उत्पन्न होऊन त्यानें आपली बायको व नुक्ताच झालेला मुलगा ह्यांस सोडून दिलें, व पृथ्वीच्या पाठीवर रस्ता फुटेल तिकडे तो निघून गेला. नंतर ब्राह्मणांतील जे साधुपुरुष त्यांचा उपदेश त्यानें ऐकिला, हिंदुधर्मातील तत्त्वमीमांसेचें अध्ययन केलें, व सहा वर्षेंपर्यंत फार खडतर तप केलें; पण मानवजातीचें दुःख कमी करावयाचें हा जो त्याचा मुख्य हेतु तो कसा साधावा ह्याबद्दल त्यास कांहींच साधन सांपडलें नाहीं. सरते शेवटीं बुद्धगयेमध्यें पवित्र असा जो पिप्पलवृक्ष त्याचे छायेखालीं तो एकांतांत बसला असतां, ह्या प्रश्नाचें उत्तर त्याच्या मनास एकदम प्रेरणा होऊन स्पष्ट रीतीनें सुचलें, व तेव्हांपासून बुद्ध (ज्ञाता, ज्याच्या मनावर ज्ञानाचा प्रकाश पडला आहे असा) हें सार्थ नांव त्यास प्राप्त झालें.

११. **बुद्धाचें धर्ममत**—मानवजातीचें दुःख कमी कसें करावें ह्याबद्दल जें महातत्त्व त्यास सांपडलें तें हें कीं, माणूस पवित्र रीतीनें राहून आपल्या मनोविकारांचें दमन करील

तरच तो दुःखमुक्त होऊं शकेल. त्यानें आपल्या शिष्यांस पवित्र रीतीनें आयुष्यक्रमण करण्यास सांगितलें खरें; पण त्याचा अर्थ त्यांनीं खडतर अशीं व्रतें करावीं, किंवा नेम पाळावे, किंवा पुष्कळ द्रव्य खर्च करून यज्ञयाग करावे, असा नव्हता; तर त्याचा अर्थ इतकाच होता कीं, त्यांनीं इतर माणसांशीं ममतापूर्वक व दयार्द्र रीतीनें सर्वदा वागावें. आतां अर्थातूच, ही गोष्ट जशी एकाद्या सधन क्षत्रियास किंवा विद्वान् ब्राह्मणास करतां येण्यासारखी आहे, तशीच अगदीं हलक्या जातीच्या व अगदीं गरीब अशा शूद्रासहि करतां येण्यासारखी आहे. तात्पर्य, त्याचा जो हा नवीन धर्म तो असा होता कीं, तो सर्व लोकांस सारख्या रीतीनें पाळतां यावा; व त्यामुळें हिंदुधर्माचे जे अलंघ्य जातिनिर्बंध त्यांना तो अर्थात् अगदीं प्रतिकूळ होता. आपलें हें धर्ममत सर्व लोकांच्या कानीं पडावें एतदर्थ त्यानें असें ठरविलें कीं, विद्वानांनाच समजणारी अशी जी संस्कृत भाषा तिच्याद्वारा त्याचें निरूपण करावयाचें नाहीं, तर लोक घरींदारीं जी भाषा नेहमीं बोलत असतील त्या भाषेंत करावयाचें. नंतर त्या धर्माच्या साधूंचे निरनिराळे मठ स्थापन केले, व बुद्धानें सांगितल्याप्रमाणें पवित्राचरण आपणास उत्तम रीतीनें करतां यावें ह्मणून ह्या निरनिराळ्या मठांस जाऊन मिळणारे लोक संसारत्याग करूं लागले. तथापि मुक्ति प्राप्त होण्यास सर्वसंगपरित्याग कायमचाच केला पाहिजे असें त्याचें सांगणें नव्हतें; ह्मणून कांहीं काळपर्यंत संसारत्याग केल्यानंतर जोग्यास पुनः संसार करण्याची मोकळीक असे. असो. असें हें जें बुद्धाचें धर्ममत तें इतकें शुद्ध असल्यामुळें, व सर्वांवर दया करावी

असा त्याचा एकंदर रोख असल्यामुळें, सर्व लोकांस तें पसंत पडण्यासारखें होतें म्हणून पुष्कळ लोक त्याचे निःसीम शिष्य बनले, व त्यांनीं त्या धर्माचा प्रसार करण्याच्या कामीं बुद्धास फार मदत केली. ह्यामुळें पुढें जेव्हां तो ८० वर्षांचा होऊन निवर्तला, तेव्हां हिंदुस्थानांत बौद्धधर्माची कायमची स्थापना झालेली असावी असें दिसतें.

**१२. अशोक राजा बौद्धधर्माचा स्वीकार करितो**—बौद्धधर्माच्या इतिहासांतील ह्यानंतरची महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे चंद्रगुप्ताचा नातू जो अशोक त्यानें ख्रिस्ती शकापूर्वी २६० ह्या वर्षी हिंदूधर्म सोडून बौद्धधर्माचा स्वीकार केला ही होय. ह्या मोठ्या राजाच्या कारकीर्दीबद्दल आपणास जी कांहीं माहिती उपलब्ध आहे, तिजपैकीं बहुतेक त्याच्या शिलालेखांवरून प्राप्त झालेली आहे. त्यावरून पाहतां असें दिसतें कीं, कलिंग देश जिंकीत असतां असंख्य लोक ठार झालेले पाहून त्यास पश्चात्ताप झाला, व तेणेंकरून त्याचा बौद्धधर्म स्वीकारण्याविषयीं निश्चय झाला. त्यानें आपल्या तेराव्या आज्ञारूप शिलालेखांत स्पष्ट लिहून ठेविलें आहे कीं, ह्या स्वारींत एक लाख माणसें बळी पडलीं, व लाखों माणसांस गुलामगिरी प्राप्त झाली. इतकी गोष्ट नमूद करून तो त्या शिलालेखांत पुढें असें लिहितोः—"कलिंगाच्या स्वारीपासून देवांचा लाडका जो अशोक राजा त्यास इतका पश्चात्ताप झाला आहे कीं, त्याची वृत्ति आतां धर्माकडे वळली आहे, व धर्मप्रसाराकडे त्याचें तनमन लागलें आहे." ह्या हेतूनें त्यानें अशी व्यवस्था केली कीं, प्रत्येक पांच वर्षांनीं आपल्या राज्याच्या निरनि-

राज्या प्रांतांतून लोकांच्या सभा भरवाव्यां, व त्या ठिकाणीं त्यांस त्यांच्या धर्मविषयक कर्तव्यांबद्दल मनावर ठसेल अशा रीतीनें आठवण द्यावी. तद्वतच, आपल्या सर्व प्रकारच्या व सर्व स्थितींतील प्रजेशीं मोकळ्या मनानें मिसळून राहण्या-साठीं, व लोकांवर दुःखें येऊन पडलीं असतां त्यांचा समा-चार घेण्यासाठीं, व त्यांचें समाधान करण्यासाठीं त्यानें धर्मोपाध्याय नेमिले. ईजिप्त, सीरिया, इत्यादि देशांपर्यंत त्यानें आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठीं मुद्दाम धर्मप्रति-पादक लोक पाठवून दिले, व ते जेथें जेथें गेले तेथें तेथें त्यांचा बहुमान झाला. अशोक राजानें ह्या धर्माचा स्वीकार केला ही गोष्ट इतिहासदृष्ट्या किती महत्त्वाची आहे हें ह्या सर्व गोष्टींवरून व्यक्त होतें. त्यानें जें हें धर्मांतर केलें त्याचा परिणाम असा झाला कीं, जो बौद्धधर्म अगोदरच हिंदुस्थानांत दोन शतकेंपर्यंत सारखा पसरत चालला होता, त्याचा प्रसार आतां ह्या प्रबल राजाच्या प्रबल धर्माभिमा-नामुळें फार दूरच्या देशांतून होऊं लागला. कारण आपण जो धर्म स्वीकारिला त्याच्या प्रसारार्थ आपली एकंदर साम्राज्य-शक्ति खर्च करावयाची असा त्याचा निश्चय होता.

१२. **अशोकाच्या कारकीर्दीचें स्वरूप**—खडक व स्तंभ ह्यांवरून खोदलेले जे अशोकाचे आज्ञालेख आहेत त्यांत केवळ धर्मविषयक गोष्टींचाच उल्लेख सर्वत्र आहे असें नाहीं; तर इतर गोष्टींचाहि आहे; व त्यांवरून ख्रिस्ती शकापूर्वी तिसऱ्या शतकांत एक प्रबल बुद्धधर्मी राजा आपल्या राज्याचा कारभार कोणत्या तऱ्हेनें करीत असे, ह्याबद्दल आपणांस चांगली कल्पना होते. आपल्या प्रजेच्या सुखाची वृद्धि करणें हें राजाचें मुख्य कर्तव्य होय. ही गोष्ट त्यास स्पष्ट

रीतीनें कळलेली होती. त्यानें शिलालेखांतून असें स्पष्ट रीतीनें लिहून ठेविलें आहे कीं, "उपदेश व आज्ञा ह्यांच्या द्वारा लोकांचें हित साधणें हें माझें कर्तव्य आहे; आणि सतत चलाखी ठेवणें व न्यायदानाचें काम बरोबर रीतीनें करणें ह्यांत लोकहिताचें मूळ आहे." तो आपला राजकीय कारभार फार नियमित रीतीनें चालवीत असे, व आपल्या हाताखालच्या कामगारांनीं मिळवून आणलेली हकीकत स्वतः ऐकून घेण्यास तो नेहमीं तयार असे. त्याला बौद्धधर्माचा जरी फार अभिमान होता तरी त्यावरून त्यानें इतर धर्माच्या लोकांचा छळ कधीं केला नाहीं. दया व परोपकार हीं त्याच्या राज्यकारभाराचीं मुख्य तत्वें होतीं, व हीं तत्वें राष्ट्रांतील अगदीं हलक्या जातीच्या लोकांस, गुलामांस, व मनुष्येतर प्राण्यांसहि तो लावीत असे. माणूस व जनावर ह्यांच्या उपयोगासाठीं मोठमोठ्या सडकांच्या बाजूनीं त्यानें विहिरी खणल्या होत्या, व ज्यास ज्यास ह्मणून जरूरी लागेल त्या सर्वांच्या उपयोगासाठीं औषधांची योजना केलेली होती. शिवाय, आपल्या देशाची धनसंपत्ति वृद्धिंगत व्हावी एतदर्थ जें आपल्याच्यानें करवेल तें सर्व त्यानें केलें. कारण त्याच्या राज्याच्या ज्या भागांत ज्या ज्या उपयुक्त वनस्पतींची वाण होती तेथें तेथें त्यानें बाहेरून त्या त्या वनस्पती आणून त्यांची लागवड केली.

१४. **बौद्धधर्माच्या कालाचा शेवट**—अशोकाच्या कारकीर्दीनंतर पुष्कळ शतकांपर्यंतचा हिंदुस्थानचा इतिहास बरोबर रीतीनें मुळींच कळत नाहीं. ह्या कारकीर्दीच्या सुमारास अर्धवट ग्रीक व अर्धवट रानटी असें जें ब्याक्ट्रियाचें राज्य तें प्रबळ झालें, व त्या घराण्यांतील कांहीं

राजांनीं हिंदुस्थानच्या वायव्यप्रांतांत कांहीं स्वाऱ्या करून जय मिळविले. पुढें ब्याक्ट्रियाच्या राज्याचा अंत झाल्यावर चारपांच शतकेंपर्यंत मध्य आशियांतील रानटी लोकांच्या कांहीं टोळ्या हिंदुस्थानावर स्वाऱ्या करीत होत्या; व ह्या लोकांस हिंदुस्थानच्या इतिहासांत सिथियन लोकें असें नांव दिलेलें आढळतें. त्या लोकांना अटकाव करणारा जो अत्यंत जोरदार शत्रु भेटला तो प्रसिद्ध राजा विक्रमादित्य होय. त्याच्या कारकीर्दीस ख्रिस्तीशकापूर्वी ५७ व्या वर्षी सुरवात झाली, व तेव्हांपासूनच संवत् शकासहि आरंभ झाला. हिंदुस्थानांतील स्वदेशभक्त राजांनीं सिथियन लोकांस अटकाव करण्यास जरी फार प्रयत्न केले, तरी त्या लोकांनीं हिंदुस्थानाच्या उत्तर भागांतून प्रबल राज्यें स्थापन केलींच. त्यांच्यापैकीं कनिष्क नामक एक राजा काश्मीर देशावर राज्य करीत होता, त्यास बौद्धधर्माचा फारच अभिमान वाटे. ख्रिस्तीशकास सुरवात होण्याच्या सुमारास त्यानें एक मोठी सभा भरविली; व त्या सभेंत, चीन देशांतील व हिंदुस्थानच्या उत्तर भागांतील बौद्धधर्मी लोकांनीं त्या धर्माचीं कोणतीं मतें मुख्यत्वेंकरून पाळावयाचीं; ह्याबद्दल ठराव झाला. इकडे, हिंदुस्थानच्या इतिहासांतील हा जो सामान्यतः अंधःकाराचा काळ त्याचीं शतकें निघून जात असतां ब्राह्मणधर्माचा पगडा लोकांच्या मनावर पुनः बसत चालला, व बौद्धधर्माचा नाहींसा होत चालला. चीन देशांतील ह्युएन-शांग नामक एक बौद्धधर्मी यात्रेकरू ख्रिस्तीशकाच्या सातव्या शतकाच्या पहिल्या अर्धांत हिंदुस्थानांत आला होता; तेव्हां त्यास हे दोन्ही धर्म जिकडे तिकडे सारखेच चालू आहेत असें आढळून आलें, व त्यानें लिहून ठेविलेल्या वृत्तांतावरून,

ह्या दोन धर्मांपैकीं कोणत्या धर्माचे लोक हिंदुस्थानांत त्यावेळीं ज्यास्त होते, हें निश्चयपूर्वक सांगतां येत नाहीं. परंतु तेव्हांपासून पुढें हिंदुस्थानांत बौद्धधर्माचा ऱ्हास फार झपाट्यानें होत गेला असला पाहिजे; कारण पुढें मुसलमान लोकांनीं जेव्हां हिंदुस्थान जिंकलें, तेव्हां त्या धर्माचा मागमोस हिंदुस्थानांतून बहुतेक अगदींच नष्ट झाला होता.

---

## भाग तिसरा.

## मुसलमानांचा प्रारंभींचा काळ.

१५. **अरब लोक सिंधप्रांत जिंकितात**—आरबस्थानांत महमदीयधर्माचा जो उदय झाला, त्याचा परिणाम हिंदुस्थानच्या इतिहासावर पुष्कळ व्हावा अशी योजना होतीसें दिसतें. महमदाचा जन्म इ० स० ५७० या वर्षी होऊन मृत्यु इ० स० ६३२ या सालीं झाला होता. त्यानें आपल्या धर्माचा प्रसार केवळ मनवळवणी करून करण्याचा प्रयत्न बरींच वर्षे केल्यानंतर, स्वधर्मप्रसाराची नवीच रीति सुरू केली. ह्मणजे, तो असा उपदेश करूं लागला कीं, परधर्मीयांस (ज्यांस तो नास्तिक ह्मणून ह्मणे त्यांस) तरवारीच्या बळावर आपला धर्म घ्यावयास लावावें. आरब लोक जात्याच पराक्रमी असल्यामुळें मुसलमानी धर्माचें हें नवीन तत्व त्यांस फारच रुचलें. महमदाच्या मरणानंतर लवकरच ते आरबस्थानांतून बाहेर पडले, व सीरिया, ईजिप्त, स्पेन, व इराण, हे देश त्यांनीं जिंकिले. हिंदुस्थान देश संपत्तिमान्, प्रसिद्ध, व मूर्तिपूजक लोकांनीं भरलेला, असा असल्यामुळें आरबांच्या त्रासांतून तो पुष्कळ दिवस मुक्त राहील

असा संभक्च नव्हता. इसवी सनाच्या आठव्या शतकाच्या आरंभीं कासीम नामक एका हुशार तरुण [illegible] ७१० फौजेनिशीं इराणांतून निघून सिंधप्रांतावर चाल केली. दाहीर नामक हिंदुस्थानांतील राजानें सिंधु नदीवर वसलेलें जें आपलें आलोर नामक राजधानीचें शहर त्याच्या संरक्षणासाठीं मोठें सैन्य गोळा केलें. पुढें लढाई सुरू होऊन ती अत्यंत निकरानें चालली असतां त्याच्या हत्तीस गोळा लागल्यामुळें तो त्यास घेऊन समरांगणांतून निसटला, व सिंधु नदींत त्यानें उडी घातली. राजा कांहीं मेला नाहीं, पण तो समरांगणांत नाहीं एवढ्यावर लढाईचा निकाल लागला. तो पुनः समरांगणांत आला, व जरी त्यास बाण लागला होता तरी त्यानें अश्वारूढ होऊन आपल्या सैन्याचा पराभव होऊं नये ह्मणून शिकस्तीचे प्रयत्न केले; पण ते सर्व फुकट गेले, व तो शौर्यानें लढत असतांच समरांगणांत पडला. नंतर त्याच्या विधवा राणीनें आलोर शहराचें रक्षण करवेल तितका वेळ केलें. जेव्हां अन्नपाण्याची वाण पडूं लागली, व शहराचें संरक्षण करणें अशक्य झालें, तेव्हां त्या रजपूत शिपायांच्या बायकामुलांनीं एक मोठी चिता रचून तिजवर प्रथम आपला देह ठेविला, व नंतर त्या शिपायांनीं जिवावर उदार होऊन शहरास वेढा घालणाऱ्या शत्रूच्या सैन्यावर शेवटची चाल केली, व मरेपर्यंत ते सर्व लढले. अशा रीतीनें सिंधप्रांत जिंकला जाऊन त्याजवर मुसलमानी खलिफांचा अंमल बसला. तेथील जी हिंदु प्रजा तिच्या जमिनीवर त्यांनीं फार मोठा कर बसविला, व जेझिआ नामक जो पाखंडी लोकांपैकीं प्रत्येकानें द्यावयाचा कर तोहि त्यांजवर त्यांनीं बसविला. इकडे जय मिळेवि-

णारे जे खलिफांचे जातभाई त्यांस त्यांनीं मोठमोठाल्या जमिनी लावून दिल्या; व फक्त एवढी अट ठेविली कीं त्यांनीं लढाईंत खलिफांस मदत करावी. ते न्यायाच्या कचेऱ्यांतून न्याय कुराणास अनुसरून करीत असत. हिंदुस्थानावरचे हे जे पहिले मुसलमान राज्यकर्ते त्यांस, सिंधुनदीच्या आलीकडे आपल्या राज्याचा विस्तार करतां आला नाहीं, व शेवटीं रजपुतांनीं त्यांस देशाबाहेर हांकून लाविलें.

१६. **सबक्तगिन व जयपाळ**—मुसलमानांच्या स्वारीची ह्यापुढें जी लाट हिंदुस्थानावर आली ती सरासरी ह्यानंतर दोनशें वर्षांनीं आली, व निराळ्याच दिशेनें आली. मध्य आशियांतील जे तार्तार लोक त्यांनीं हळूहळू महमदीय धर्म स्वीकारिला होता, व शूर राजांच्या हाताखालीं लढाया करून प्रबल राज्यें स्थापन केलीं होतीं. त्या तार्तार लोकांनीं हिंदुस्थानच्या वायव्य सीमेवर हल्ला करण्याची भीति घातली. लाहोरचा राजा जयपाळ त्यांचा हल्ला येण्याची वाट न पाहतां ९७७ सालीं आपलें सैन्य घेऊन पेशावरच्या पलीकडे काबुलाकडे चालून गेला. ह्या ठिकाणीं त्यास मुसलमान लोक आडवे आले. त्यांचा सेनापति सबक्तगिन हा होता. तो पूर्वी गुलाम असून हल्लीं आपल्यास गिझनीचा सुभेदार ह्मणून ह्मणवून घेत असे; पण वास्तविकरीत्या तो तेथील राजाच होता. लढाई कांहीं झाली नाहीं. एक भयंकर वादळ झालें. तेणेंकरून हिंदु लोक इतके घाबरून गेले कीं, त्यांनीं मुकाट्यानें ५० हत्ती मुसलमानांच्या हवालीं केले, व पुष्कळ द्रव्य देतों ह्मणून वचन दिलें. पण पुढें हें वचन त्यांनीं पाळण्याचें नाकारिल्यावरून सबक्तगिन एका महा सैन्यानिशीं हिंदुस्थानावर स्वारी करून आला. दिल्ली, अजमीर, व शेजारचे

इतर प्रांत येथील राजांस आपणास सहाय्य करण्याविषयीं जयपाळानें विनंती केली, कारण त्यांसहि ह्या स्वारीपासून भीति होतीच. अशा रीतीनें त्यानें दहा हजार शिपायांचें प्रचंड सैन्य गोळा करून तो ह्या सर्व हिंदूंच्या शत्रूवर चालून गेला. पण मुसलमानांचें धैर्य व आवेश ह्यांजपुढें हिंदूंच्या केवळ संख्येनें मोठ्या सैन्याचें कांहीं चाललें नाहीं. मुसलमानांनीं त्यांचा पराभव करून फार कत्तल उडविली, व सिंधुनदीपर्यंत त्यांस परत हांकून काढिलें. ह्या लढाईचा परिणाम असा झाला कीं, सबक्तगिनानें त्या नदीपर्यंतचा मुलूख काबीज करून तो आपल्या राज्यास जोडिला.

**१७. सुलतान महमुदाची हिंदुस्थानावर स्वारी**– इ० स० ९९७ ह्या वर्षी सबक्तगिन मरण पावला, व त्याच्यामागून त्याचा मुलगा महमूद हा गादीवर बसला. त्यानें आपल्या केवळ नामधारी वरिष्ठ राजाच्या वर्चस्वाचें जूं फेंकून देऊन सुलतान ही पदवी धारण केली. महमुदाचा अमल मध्य आशियेंत कायमचा बसल्यानंतर त्यानें आपले शूर प्रजेस हिंदुस्थानावर स्वारी करण्यास न्यावें असा निश्चय केला. इ० स० १००१ ह्या वर्षी त्यानें पहिली स्वारी करून तींत आपल्या बापाचा जुना शत्रू जो जयपाळ त्याचा पराजय केला, व त्यास कैद केलें. नंतर तो दक्षिण दिशेस चालून येऊन ज्या पांच नद्यांवरून पंजाब हें नांव पडलें आहे त्यांपैकीं अगदीं दक्षिणेची जी सतलज नदी ती उतरून आलीकडे आला, व भटिंडा नामक किल्ल्यावर त्यानें अकस्मात् छापा घातला. नंतर तो गिझनीस परत गेला, व जातांना कैद केलेल्या जयपाळ राजास आपला मांडलिक ह्या नात्यानें त्यानें पंजाबावर राज्य करण्यास नेमून ठेविलें.

१८. **अनंगपाळाचें बंड**—बंदींतून सुटून परत आल्यावर जयपाळानें चितेवर आपणास दहन करून घेतलें. त्याच्यामागून त्याचा मुलगा अनंगपाळ पंजाबचा कारभार पाहूं लागला, पण कांहीं वर्षांनीं त्यानें बंड केलें, व उज्जनी, ग्वाल्हेर, कलिंजर, कनोज व अजमीर एथील राजांची मनवळवणी करून त्यांसि बंडांत सामील करून घेतलें. हिंदुलोकांस ह्यावेळीं इतका हुरूप आला होता कीं, आपल्या प्रचंड सैन्यास द्रव्याचा पुरवठा करण्यासाठीं हिंदुस्त्रियांनीं आपले दागिने आटवावयास काढून दिले. हें भयंकर बंड मोडण्यासाठीं महमूद इ० स० १००८ वर्षाच्या वसंत ऋतूंन हिंदुस्थानांत येण्यास निघाला. पेशावरानजीक त्यानें छावणी दिली असतां तेथें रानटी लोकांच्या टोळ्यांनीं त्याजवर हल्ला केला. त्यांच्या हातांतून लांब सुरे असत त्या सुऱ्यांनीं त्यांनीं महमुदाचे तीनचार हजार शिपाई व घोडे कापिले. तें पाहून हिंदुलोकांचें मुख्य सैन्य धिटाईनें त्याच्यावर चालून गेलें. कढाई ऐन भरांत आली असतां अनंगपाळाचा हत्ती आंगावर येणाऱ्या अस्त्रांनीं घाबरून जाऊन राजासहित समरांगणाबाहेर पळून गेला. राजा दिसत नाहींसें पाहून हिंदुलोकांची हिंमत इतकी खचली कीं, त्यांचें धैर्य सुटलें, व महमुदानें ऐनप्रसंगीं त्यांजवर जेव्हां ६०,००० लोकांस पाठविलें तेव्हां तेवढ्या सैन्यापुढें देखील त्यांस टिकाव धरितां आला नाहीं. अशा रीतीनें मोठा जय मिळविल्यावर महमुदानें हिमालयानजीकचें नगरकोटचें संपन्न देवालय लुटलें, आणि त्या ठिकाणीं हिंदूंच्या कित्येक पिढ्यांनीं जे अमोप सोनें, व रुपें, व असंख्य मोत्यें, हिरे, व माणकें देवास दिलेलीं होतीं तें सर्व द्रव्य घेऊन तो गिझनीस परत गेला.

१९. **सोमनाथावर स्वारी**–असें ह्मणतात कीं महमुदानें हिंदुस्थानावर एकंदर १६ स्वाऱ्या केल्या. प्रत्येक स्वारींत त्यानें पुष्कळ धन नेलें, व अनेक लोकांस गुलाम करून नेऊन मध्य आशियांतील गुलामांच्या बाजारांत विकलें. त्यांपैकीं अत्यंत प्रसिद्ध व बहुतेकांशीं शेवटची स्वारी ह्मटली ह्मणजे इ० स० १०२४ त गुजराथेंतील सोमनाथाच्या देवळावर जी केली ती होय. ह्या इतिहासप्रसिद्ध व धनसंपन्न देवळास जाऊन पोंहोंचण्यासाठीं त्यास २०,००० उंटांवरून राजपुतान्यांतील वाळूचीं अरण्यें ओलांडावीं लागलीं. त्या पवित्र स्थानाच्या संरक्षणार्थ तेथील रजपूत सैन्य जिवावर उदार होऊन लढलें, व महमुदाच्या सैन्यानें घातलेला वेढा उठविण्यास हिंदूंची मोठी फौज जमा होऊन आली. पण त्यांचे सर्व यत्न निष्फळ झाले. पुष्कळ वेळपर्यंत निकराची लढाई होऊन शेवटीं महमुदाच्या सैन्यानें तें देवालय छापा घालून घेतलें. फेरिस्ता नामक ग्रंथकार असें लिहितो कीं, ह्या प्रसंगीं ब्राह्मणांनीं महमुदास अशी विनंती केली कीं, सोमनाथाची मूर्ति जर आपण फोडिली नाहीं, तर आह्मी आपल्यास मोठी खंडणी देऊं. पण त्यांच्या विनंतीस न जुमानतां त्यानें ती मूर्ति आपल्या हातांतील सोटा त्या मूर्तीवर मारून फोडिली, त्याबरोबर तिच्या पोटांतून अमोल्य किंमतीचीं रत्नें व माणकें खळ्कन् बाहेर पडलीं. आतां ही गोष्ट खरी असो किंवा खोटी असो, महमुदानें सोमनाथाहून गिझनीस अपरिमित द्रव्य लुटून नेलें, व त्यानें अगोदर मिळविलेल्या सर्व जयांपेक्षां ह्या सोमनाथावरील जयानें हिंदुलोक ज्यास्त दरारून गेले, ह्या गोष्टी निःसंशय खऱ्या आहेत.

**२०. महमुदाचें मरण व स्वभावस्वरूप**—महमुदाचें बाकीचें आयुष्य मध्य आशिया खंडांत लढाया करण्यांत व इराण देश जिंकण्यांत बहुतेक खर्च झालें; तेणेंकरून त्याचा अधिकार व कीर्ति हीं दोन्हीं अत्यंत वाढलीं. इराणांतून गिझनीस परत येऊन तो १०३० त मरण पावला. पुष्कळ देश जिंकून टाकणाऱ्या इतर पराक्रमी पुरुषांप्रमाणें ह्याच्याकडूनहि सहस्त्रावधि लोक मारिले गेले. तथापि कांहीं व्यक्तींशीं त्याचें वर्तन सदयपणाचें होतें असें दिसतें. उदाहरणार्थ, त्याच्या भावानें बंड केलें असतां त्याजवर त्यानें दया केली, व हिंदुस्थानांतील ज्या राजांस त्यानें जिंकिलें होतें त्यांनाहि त्यानें सदयपणानें वागविलेंसें दिसतें. हिंदुस्थानांत आपलें साम्राज्य स्थापन करावें असा त्याचा उद्देश होतासें दिसत नाहीं. त्याच्या स्वाऱ्यांचा मुख्य उद्देश पुष्कळ लूट मिळवावी व रणकीर्ति संपादन करावी हा होता. उदाहरणार्थ, पंजाबप्रांत जिंकल्यानंतर २० वर्षेपर्यंत तेथल्याच राजांच्या द्वारा त्यावर त्यानें अंमल चालवून पाहिला, व शेवटीं निरुपायास्तव तो प्रांत त्यानें आपल्या राज्यांत सामील केला. जरी इतर बाबतींत तो फार लोभी असे, तरी ग्रंथ व ग्रंथकार ह्यांस त्याचा उदार आश्रय असे. शाहानामा नामक पर्शियन भाषेंतील वीरकाव्य प्रसिद्ध कवि फरदोसी ह्यानें जें रचिलें, तें ह्याच्याच आज्ञेवरून रचिलें. गिझनी येथें विश्वविद्यालय स्थापन करून त्याच्या खर्चाकरितां त्यानें मोठी रकम लावून दिली, व त्यास एक सुंदर पदार्थसंग्रहालय जोडून दिलें. त्याला शिल्पविद्येचीहि फार आवड होती; आणि संगमरवरी व ग्रानाईट नामक टिकाऊ दगडांचीं सुंदर गृहें स्वतः बांधून

व शक्त्यनुसार तसलीं घरें बांधण्यास आपल्या प्रजेसहि उत्तेजन देऊन, त्यानें आपली राजधानी सुशोभित केली.

२१. घोर घराण्यांतील महमद—दीड शतकांहूनहि ज्यास्त वर्षेपर्यंत पंजाबप्रांत गिझनीच्या महमुदाचे वंशजांच्या अंमलांत होता. पण इ० स० ११८६ ह्या वर्षीं त्या घराण्यांतील शेवटच्या राजानें महमद घोर ह्याच्या स्वाधीन लाहोर शहर केलें. त्यानें सर्व पंजाबप्रांत काबीज करून पुढें हिंदुस्थानांतील कांहीं इतर मुलुखहि जिंकून टाकिले. ह्या शूर सेनापतीस हिंदुस्थानांत केलेल्या युद्धांत नेहमींच जय मिळालासें नाहीं. दिल्ली व अजमीर यांजवर राज्य करीत असलेला जो पृथ्वीराज नामक राजा त्यानें त्याचा थानेश्वर येथील लढाईंत ११९१ ह्या वर्षीं पूर्ण पराभव करून टाकिला. ह्या पराजयाचा सूड यानें ११९३ सालीं उगविला. त्यावेळीं पृथ्वीराज पुनः मोठें सैन्य घेऊन याच्याशीं लढण्यास आला. इ० स० १०६६ ह्या सालीं इंग्लंदांत विजयी विलियम ह्यानें पळण्याचें मिष करून आपले शत्रू जे साक्सन लोक त्यांस जसें त्यांच्या खंदकांतून युक्तीनें बाहेर काढिलें होतें, तद्वत्‌च, महमदानें याप्रसंगीं समरांगणांतून पळून जाण्याचें मिष केलें. ही युक्ति साधली तर उत्तम आहे, न साधली तर भयंकर आहे. पण ती त्यास यावेळीं पूर्णपणें साधली. आपले शत्रूंचा पराजय होऊन ते पळून जात आहेत असा पृथ्वीराजाचे सैन्यास भास होऊन तें त्यांच्यामागें मोठ्या विजयश्रीनें लागलें; पण अशा रीतीनें जी धांवलढाई सुरू झाली तींत, मुसलमान लोक हिंदूंपेक्षां कवाईत ज्यास्त चांगली शिकलेले असल्यामुळें, त्यानीं आपल्या रांगांत हिंदूंइतकी फुटाफूट होऊं दिली नाहीं.

शेवटीं महमदानें १२,०००, तरवारबहादूर स्वारांनिशीं हिंदूंच्या सैन्यावर तुटून पडून लढाई जिंकिली. तींत त्यानें पृथ्वीराजास कैद करून ठार मारिलें. ह्या जयाचा तात्कालिक परिणाम झाला तो असा कीं, अजमीरचें राज्य रसातळास गेलें; व नंतर लवकरच दिल्ली, कनोज व बनारस उर्फ काशी हीं राज्यें महमदानें काबीज केलीं. ११९५ सालीं त्यानें ग्वाल्हेरचा बळकट किल्ला हल्ला करून घेतला, व नंतरच्या एका स्वारींत गुजराथप्रांतांत प्रवेश करून अन्हलवाडा नामक तेथील राजधानी काबीज करून तिच्या बंदोबस्तासाठीं आपलें सैन्य नेऊन ठेविलें. त्याच्या सरदारांपैकीं एकानें इ० स० ११९२ त बहारप्रांत जिंकून व इ० स० १२०३ त बंगालप्रांत जिंकून मुसलमानांचा अंमल पूर्वहिंदुस्थानांत स्थापन केला; व अशा रीतीनें हिंदुस्थानांतील मुसलमानी राज्यास दोन सुपीक व भरपूर लोकवस्तीचे प्रांत जोडून दिले.

२२. **गुलाम राजांचें घराणें**–इ० स० १२०६ त महंमद घोर हा निवर्तला; तेव्हां त्याच्या विस्तीर्ण राज्याचा हिंदुस्थानांतील जो भाग तो कुतुबुद्दिन नामक त्याच्या एका सरदाराच्या वांट्यास आला; तो त्यावेळीं प्रांताचा सुभेदार ह्या नात्यानें हिंदुस्थानचा राज्यकारभार पाहत होता. कुतुबुद्दिन हा मूळचा गुलाम असल्यामुळें त्याच्या घराण्यास, व त्या घराण्यामागून बल्बन नामक दुसऱ्या एका तुर्की गुलामाचें घराणें राज्य करूं लागलें त्यास, दोघांसहि गुलाम राजे हें नांव इतिहासांत प्राप्त झालेलें आहे. कुतुबुद्दिनच्या मागून त्याचा जांवई आल्तम्श् ह्यानें इ० स० १२११ पासून १२३६ पर्यंत राज्य केलें; कुतुबमिनार नामक दग-

डाचा एक उंच स्तंभ उभारण्यास कुतुबुद्दिनच्या कारकीर्दींत सुरवात झाली होती, तो ह्यानें पुरा केला, व अशा रीतीनें आपलें व आपल्या सासऱ्याचें नांव कायम करून ठेविलें. त्याच्यामागून त्यांची मुलगी सुलताना रेझिया ही गादीवर बसली; तिच्या अंगीं प्रत्येक सद्गुण वसत होता असें फेरिस्ता यांचें ह्मणणें आहे. तात्पर्य, पडद्याच्या बाहेर कधीं न पडलेल्या अशा देखील कांहीं स्त्रियांनीं हिंदुस्थानांत शौर्यानें व शहाणपणानें राज्यें केलेलीं दृष्टीस पडतात त्या स्त्रियांपैकीं ही एक मुख्य स्त्री होती. इ० स० १२८९ या सालीं गुलाम घराण्यांतील शेवटच्या राजाचा वध झाला, व त्याची गादी खिलजी नामक घराण्याच्या हातांत गेली.

२३. **अल्लाउद्दिनाची कारकीर्द**—खिलजी घराण्यांतील अत्यंत प्रसिद्ध राजा ह्मटला ह्मणजे अल्लाउद्दीन हा होय; त्यानें त्या घराण्यांतील पहिला राजा जो त्याचा चुलता त्याचा वध करून गादी बळकाविली. हा एक मोठा योद्धा होऊन गेला, व ह्यानें गिझनीचा महमुद व घोरचा महमद ह्यांच्यासारखी कीर्ति संपादन केली; कदाचित् त्यांच्यापेक्षांहि कांकणभर ज्यास्त संपादिली असें ह्मणतां येईल. गादीवर बसण्याच्या पूर्वी ह्यानें दक्षिणेंत स्वारी करून जय मिळविला होता; व तेथून पुष्कळ लूट घेऊन, व मोठी कीर्ति संपादन करून तो दिल्लीस परत आला होता. त्याच्या कारकीर्दीच्या प्रारंभींच मोगलांच्या एका मोठ्या सैन्यानें मध्य आशियांतून येऊन हिंदुस्थानावर स्वारी केली होती, व राजधानीचें शहर जें दिल्ली त्यासच वेढा घालण्याची भीति घातली होती. परंतु त्यानें त्या सैन्याचा अगदीं पराभव करून टाकिला. इ० स० १२९७ त गुजराथप्रांत

जिंकून त्यानें मुसलमानी राज्यास एक मोठी जोड करून दिली. १३०० त त्यानें रतिंबर शहर काबीज केलें, व १३०३ या सालीं मेवाड प्रांतांतील चितूर नामक प्रसिद्ध डोंगरी किल्ला सर करून घेतला. हिंदूंचा मुसलमान झालेला मालिक काफर नामक त्याचा एक सरदार होता, त्यानेंहि असेच, मोठाले जय बरेच मिळविले. त्यानें दक्षिणेंत स्वारी करून देवगिरीचा राजा रामदास ह्यास पूर्वीची खंडणी पुनः सुरू करावयास लाविलें, आणि इ० स० १३१० या सालीं कर्नाटकांतील बल्लाल नामक रजपुत घराण्याचा पाडाव करून, हिंदुस्थान व सीलोन ह्यांजमधील सामुद्रधुनीपर्यंत पूर्वकिनाऱ्यावरचा सर्व प्रांत काबीज करून घेतला.

२४. **अल्लाउद्दिनाचें मरण व स्वभावस्वरूप**— इ० स० १३१६ त अल्लाउद्दीन मरण पावला; त्यास कदाचित् त्याचा अत्यंत बलिष्ठ सरदार जो मालिक काफर त्यानें विष घातलें असावें. त्यानें कपटानें चुलत्याचा वध करून त्याची गादी बळकाविली होती व त्याची कारकीर्द जुलमी व क्रूर अशी होती. मोगलांचा दिल्लीनजीक पूर्ण पराजय झाल्यानंतर ते अल्लाउद्दिनाच्या सैन्यांत शिपाई होऊन राहूं लागले, व त्यांची संख्या हळूहळू इतकी वाढली कीं, सैन्यांत तेच अत्यंत प्रबल होतात कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. ह्मणून त्यानें त्या सर्वांस फौजेंतून एकदम काढून टाकिलें, व त्यांनीं आपल्याविरुद्ध गुप्त कट केला आहे, ह्या संशयावरून त्यांच्यापैकीं १५,००० लोकांस ठार केलें. अल्लाउद्दिनाचा स्वभाव फारच संशयखोर असल्यामुळें ज्या ज्या सरदाराच्या राजनिष्ठेबद्दल ह्मणून त्यास शंका आली

त्या प्रत्येकास त्यानें क्रूरपणानें मारिलें. त्याच्या सरदारांस राजकीय विषयांची चर्चा करण्याची देखील मनाई असे, व त्यांस एकादें लग्नकार्य करावयाचें असलें, तरी त्याची परवानगी घ्यावी लागे. प्रजेवरही त्याचा अंमल अगदीं कडवा असे. प्रत्येक शेतकऱ्यानें किती जमिनीची लागवड करावयाची व त्यानें गुरंमेंढरांचे केवढाले कळप बाळगावयाचे, ह्या सर्व गोष्टींबद्दल कायद्याचा निर्बंध असे. जिनसांच्याही किंमती कायद्यानें ठरविलेल्या होत्या, व ठोक व्यापार करण्याची बंदी असे. पण लोकांचा हात आंखडणारे इतके सर्व निर्बंध असतांहि त्याच्या प्रजेची भरभराटी असे; कारण सरकारचा बंदोबस्त चांगला असल्यामुळें राज्यांत सर्वत्र शांतता असे, व इतर देशांशीं लढाया करून त्यांत विजय मिळाल्यामुळें देशांत खंडणी व लूट ह्यांच्या रूपानें संपत्तीचा प्रवाह सारखा सुरू असे.

२९. **महमद तघलकाची कारकीर्द**—हा हलक्या जातीचा खुशरू नामक एक हिंदु बाटून मुसलमान झालेला होता, व तो मलबार प्रांत जिंकून प्रसिद्धीस आलेला होता; त्यानें खिलजी घराण्यांतील शेवटच्या राजाचा खून केला. पण ह्या खुशरूलाच गाझीखान तघलक नामक पंजाबच्या सुभेदारानें १३२१ त ठार मारिलें, व खिलजी घराण्याचा निर्वंश झालेला असल्यामुळें त्यास गादीवर बसण्यास प्रतिबंध कोणीच केला नाहीं. त्याच्यामागून त्याचा मुलगा महमद तघलक हा गादीवर बसला. त्याच्या अंगीं चांगल्या व वाईट गुणांचें विलक्षण तऱ्हेनें मिश्रण झालेलें होतें. त्याच्या ठायीं बरीच विद्वत्ता वसत होती, व गणित, भौतिकशास्त्रें, व तत्वज्ञान, ह्या विद्यांत तो प्रवीण होता. त्याचें खासगी

वर्तन पाहतां, तो नीतिमान् व धर्मनिष्ठ असा होता; व त्याची सार्वजनिक कारकीर्द पाहतां, तो शूर व कर्तबगार होता. पण हे सर्व सद्गुण त्याच्या अंगीं वसत असूनहि त्याच्या कारकीर्दीपासून लोकांस फार दुःख झालें; ह्याचें कारण त्याच्या कित्येक वेडेपणाच्या मसलती हें होय. इराण देश जिंकण्याच्या इराद्यानें त्यानें एक मोठी फौज जमा केली, पण पाहतो तो त्याचा पगार देण्यास आपल्यापाशीं साधन कांहीं नाहीं; तेव्हां अर्थात् त्या फौजेनें यथेष्ट लुटालूट मांडिली. दुसरी एक लाख माणसांची फौज तयार करून चीन देश जिंकून घेण्याच्या इराद्यानें त्यानें हिमालयाच्या पलीकडे पाठवून दिली; पण तीस परतावें लागल्यामुळें वाटेंत अशीं कांहीं भयंकर संकटें सोसावीं लागलीं कीं, एवढ्या प्रचंड सेनेपैकीं फारच थोडे असामी स्वदेशीं जिवंत येऊन पोहोंचले. महमदाची आणखी एक वेडी मसलत अशी होती कीं, दिल्लीहून निघून दक्षिणेंत देवगिरी येथें नवीन राजधानी स्थापन करावी; व त्यानें त्याप्रमाणें यत्नहि केला. त्यानें त्या शहराचें नांव बदलून दौलताबाद असें ठेविलें; व तेथील खडकाळ डोंगराच्या माथ्यावर हल्लीं जो भयंकर किल्ला दृष्टीस पडतो तो त्यानेंच बांधिला. पण ही सर्व खटपट अगदीं फुकट गेली; व दिल्लीच्या लोकांस त्यानें दिल्ली व दौलताबाद यांचे मध्यें इकडून तिकडे व तिकडून इकडे असे जे धक्के खावयास लाविले, त्यांत त्यांचे फार हाल झाले असावे ह्यांत बिलकूल संशय नाहीं. त्याच्या गैरव्यवस्थेमुळें जेव्हां देश उध्वस्त झाला, तेव्हां आपल्या राज्यव्यवस्थेंत सुधारणा करण्याच्या ऐवजीं त्यानें आपल्या शेतकरी लोकांची सारखी शिकार मांडिली, कारण

त्यांच्यापैकीं पुष्कळ जणांनीं अत्यंत दारिद्र्यानें पीडित होऊन पोटासाठीं देशांत "पुंडावा" माजविला होता. ह्या वेड्या राजाच्या असल्या कारभारामुळें अनेक बंडें उद्भवलीं; त्यांपैकीं अत्यंत जोराचें बंड झालें ह्मणजे कर्नाटकच्या हिंदुराजानें जें उभारिलें तें होय. ह्या राजानें विजयनगर नामक राज्य स्थापन केलें; व त्या राज्यानें मुसलमानांस न जुमानतां आपलें स्वातंत्र्य अडीचशें वर्षेंपावेतों कायम राखिलें. आणि आपल्या अमदानीच्या दिवसांत तें राज्य किती द्रव्य-संपन्न असलें पाहिजे, व त्याचा थाटमाट केवढा मोठा असला पाहिजे, ह्याची कल्पना कोणास करणें असल्यास त्याच्या राजधानीचे तट व त्यांतील वाडे ह्यांचे जे कांहीं अत्यंत मोडकळीस आलेले पण विस्तीर्ण असे भाग अद्यापि दृष्टीस पडतात त्यांजकडे पहावें.

**२६. तैमुर्लंगाची स्वारी**—तघलेक घराण्यांतील अगदीं शेवटच्या राजाच्या अगोदरचा राजा राज्य करीत असतां तैमुर्लंगानें हिंदुस्थानावर स्वारी केली. सर्व मानव जातीचा हा जो अत्यंत भयंकर शत्रू तो इराण देश जिंकून व मध्य आणि पश्चिम आशियाच्या बहुतेक भागाचा सप्पा उडवून, सिंधुनदी उतरून खालीकडे आला, व त्याचा नातू अगोदरच येऊन मुलतान काबीज करून बसला होता त्यास येऊन मिळाला. तो जसजसा पुढें येत चालला, तस-तसे त्याच्या मार्गांतील शहरांतले व खेड्यापाड्यांतले लोक आपली कत्तल होऊं नये ह्मणून गांव सोडून चालते झाले. सरतेशेवटीं इ० स० १३९८ सालच्या अखेरीस तो दिल्लीस येऊन पोहोंचला, त्या ठिकाणीं १९ वर्षांवरचे कैद करून आणिलेले सर्व लोक त्याला राग येण्यास कांहीं कारण

नसतां त्यानें ठार केले, व अशा रीतीनें एक लाख लोकांची कत्तल उडविली, असें सांगतात. दिल्लीचा सप्पा उडविणार नाहीं असें तैमुर्लंगानें वचन दिलें, व त्या ठिकाणीं हिंदुस्थानचा बादशाह अशी आपल्या नांवानें द्वाही फिरविली. पण नंतर वचन एकीकडे गुंडाळून ठेवून त्यानें तें शहर लुटलें, व जाळून खाक केलें. दिल्ली लुटल्यावर तो गंगानदी उतरून आलीकडे आला; व नंतर हिमालयाच्या पायथ्याच्या बाजूबाजूनें आपलें सैन्य चालवून मध्यआशियेंत परत आला, व रस्त्यांत सर्व उत्तर हिंदुस्थान उध्वस्त करून सोडिलें.

२७. **सय्यदांचें घराणें व लोदीचें घराणें**—तघलक घराण्यांतील शेवटचा राजा इ० स० १४१४ त निवर्तल्यानंतर मुसलमानी धर्माचा स्थापक जो महमद त्याचे सय्यद नामक वंशज दिल्लीवर राज्य करूं लागले, पण त्यांची सत्ता त्या शहराच्या तटाच्या पलीकडे फारशी पसरली नाहीं. या घराण्यांतील शेवटच्या राजानें इ० स० १४५० या सालीं बाहलुल लोदी नामक एका अफगाणाच्या हवालीं आपलें राज्य केलें. लोदी घराण्याच्या कारकीर्दींत दिल्लीच्या राज्यास त्याचा पूर्वीचा विस्तार पुनः हळूहळू येऊं लागला. बाहलुल लोदीनें जानपूर जिंकून घेतलें, व त्याच्या नंतर गादीवर बसलेल्या शिकंदर लोदीनें बहारप्रांत परत मिळविला. शिकंदराचा मुलगा इब्राहिम हा या घराण्यांतला शेवटचा राजा होय. त्याच्या कारकीर्दींत एका बंडखोर सुभेदारानें, तैमुर्लंगाचा बाबर नामक एक शूर व महत्वाकांक्षी वंशज काबुलावर राज्य करीत होता त्यास आपल्या मदतीस बोलाविलें. हिंदुस्थानावर स्वारी करण्याची आयतीच संधि आलेकी पाहून बाबरानें ती अर्थात् एकदम साधून घेतली.

इब्राहिमच्या सैन्याचा त्यानें लाहोर येथें १५२४ त पराभव केला, व त्याच्या पुढच्या वर्षाच्या अखेरीस हिंदुस्थानावर पुनः स्वारी केली.

२८. पानिपतची लढाई–१५२६ च्या एप्रिल-महिन्यांत पानिपतच्या प्रसिद्ध समरांगणावर इब्राहिम लोदी प्रचंड सेना बरोबर घेऊन बाबरास आडवा आला. बाबराच्या सैन्यांत कायते १२,००० च लोक होते; ह्मणून त्यांस कांहीं वेळ केवळ बचाव करूनच राहवें लागलें. बाबरानें इकडून तिकडे हालवतां येतील असे छाती इतके उंच मेंढे कोट तयार करवून त्यांच्यामागें आपलें पायदळ उभें केलें; व घोडेस्वारांचे हल्ले चालूं नयेत ह्मणून बैलाच्या चामड्याच्या वाद्यांनीं आपल्या तोफा एकमेकींस बांधून आपल्या तळा-पुढें रांगेनें उभ्या केल्या. थोडे दिवस वाट पाहून इब्राहिम ह्या चांगल्या बंदोबस्ताच्या ठिकाणावर हल्ला करण्यास चाल करून आला. बाबरानें लागलाच त्याच्या सैन्याच्या तोंडावर तोफांचा भडीमार सुरू केला; व दोहों बाजूंनीं सैन्याच्या दोन्ही पार्श्वभागांवर बाणांचा सारखा वर्षाव सुरू करून त्यांस अगदीं नकोनकोसें करून टाकिलें. अशा रीतीनें इब्राहि-माचे सैन्यांत बाबरानें इतका घोंटाळा उडवून दिला कीं, त्याच्या एवढ्या विशाळ संख्येचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं; व शेवटीं जेव्हां बाबरानें आपल्या सैन्याचा मुख्य भाग शत्रूच्या सैन्याच्या डळमळणाऱ्या रांगांवर घातला, तेव्हां त्यांची अगदींच दाणादाण होऊन गेली. इब्राहिम स्वतः मारला गेला, आणि बाबराच्या अदमासाप्रमाणें त्याचे १५,००० लोक समरांगणावर पडले. हा जय मिळविल्यावर बाबरानें लवकरच दिल्ली व आग्रा हीं शहरें सर करून

घेतली. आणि इब्राहिमाचा सर्व मुलूख काबीज करून घेण्यास बाबरास जरी पुढें बरीच खटपट करावी लागली, तरी बाबराची कारकीर्द व हिंदुस्थानांतील मोगलांची बादशाई या दोन्हींस १५२६ या साली आरंभ झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

---

## भाग ४ था.

## मोगल बादशाई.

२९. **हिंदुस्थानांत बाबराची सत्ता**—बाबरास जरी तुर्की लोकांचें शिक्षण मिळालेलें होतें, व त्याचा सर्व कल जरी त्या लोकांकडे होता, तरी त्याची आई मोगलांच्या जातीची होती; व त्याच्या बापाच्या बाजूनें पाहतांहि त्याच्या अंगांत मोगलांचेंच रक्त खेळत होतें. ह्यावरून त्यास व त्याच्यामागून दिल्लीच्या गादीवर जे बसले त्यांस मोगल बादशाह असें नांव इतिहासांत दिलें आहे. पूर्वी इंग्लंदांत विजयी विलियम् हेस्तिंग्सच्या जयामुळें जेव्हां लंदन व दक्षिण इंग्लंद यांचा मालक झाला तेव्हां जी त्याची स्थिति होती, तशीच बहुतेक बाबर जेव्हां पानिपतच्या जयामुळें दिल्ली व आग्रा यांचा धनी झाला, तेव्हां त्याची होती. म्हणजे, त्याचें पुढें जें एवढें साम्राज्य वाढलें त्यापैकीं बहुतेक भाग त्यास अद्यापि जिंकावयाचाच होता. त्याच्या हातीं यावेळीं काय तो पंजाबप्रांत आलेला होता, व त्याच्या आलीकडे दिल्ली व आग्रा एथपर्यंतचाच मुलूख त्यास मिळालेला होता. ह्या आकुंचित प्रदेशाच्या पलीकडे तो जिकडे म्हणून वळेल तिकडे, ही आपल्या स्वातंत्र्यावर एक गदाच आली आहे

असें समजून हिंदू व मुसलमान राजे त्यास निश्चयानें अडथळा करण्यास तयार होते. शिवाय, ज्या अडचणीमुळें शिकंदरास सर्व हिंदुस्थान जिकतां आलें नाहीं, ती अडचण ह्यालाहि होतीच. त्यावेळीं उन्हाळा होता, व त्याचें लोक जन्मापासून थंड हवेंत वाढलेले असल्यामुळें त्यांस एथील उष्णतेपासून इतकी बाधा होऊं लागली कीं, आपण काबुलास परत जाणार असा ते हट्ट धरून बसले. बाबरानें त्यांच्या ओरडीस दाद दिली नाहीं. तो म्हणाला कीं, "ज्यांस परत जावयाचें असेल त्यांनीं खुशाल जावें. माझी ना नाहीं; मी मात्र एथून हालणार नाहीं. तर इतक्या शौर्यानें जें राज्य आपण मिळविलें आहे, त्याच्या रक्षणार्थ मी एथें राहीन." हें त्याचें हिंमतीचें भाषण ऐकून त्याच्याबरोबर आलेल्या लोकांस लाज वाटून त्यांपैकीं बहुतेक एथेंच राहिले.

**३०. बाबराच्या सत्तेची वाढ. राणा संग ह्याशीं युद्ध.**—बाबराचा सर्वांत वडील मुलगा हुमायून ह्यानें जानपूर, ग्वाल्हेर वगैरे लोदी घराण्याचा बाकीचा सर्व मुलूख जिंकून घेण्याच्या कामीं बापास मदत केली. पुढल्या, म्हणजे १५२७ या सालीं, रजपूत व मुसलमान मिळून एक प्रचंड सैन्य घेऊन बाबराशीं सामना करावयास आले. या संयुक्त सैन्याचा नायक चितूरचा राणा संग हा होता. त्याची सत्ता अजमीर व माळव्याचा कांहीं भाग एथपर्यंत पसरलेली होती. त्याचे मुसलमान दोस्त ह्मटले ह्मणजे, लोदी घराण्यांतील एक राजपुत्र, व मेवाडचा हिंदूचा मुसलमान बनलेला राजा हसनखान, हे होते. पैकीं पहिल्यानें आपल्याबरोबर १०,००० अफगाण लोक आणिले होते. हें संयुक्त सैन्य आग्र्यावर चाल करून गेलें; आणि बाब-

राच्या सैन्याचा पुढचा भाग जेव्हां त्याच्या अंगावर आला, तेव्हां त्याचा पराभव करून त्यांच्यापैकीं इतके लोक त्यांनीं ठार केले कीं आग्र्यापासून सुमारें वीस मैलांवर शिक्री म्हणून शहर आहे, तेथें बाबराच्या सैन्यास खंदक खणून बंदोबस्तानें तळ देऊन राहणें भाग पडलें. काबूलच्या एका ज्योतिष्यानें चिन्ह बरें नाहीं म्हणून भविष्य केलें; तें ऐकून बाबराचे कांहीं शिपाई घाबरून सैन्य सोडून चालते झाले. असा भयंकर प्रसंग आलेला पाहून बाबरहि स्वतः घाबरला, व त्यानें अल्लास असा नवस केला कीं, तूं जर ह्या प्रसंगीं यश देशील तर मी दाढी वाढवीन, व मद्यप्राशन करण्याचें टाकून देईन. नंतर त्यानें आपल्या लोकांच्या निष्ठेस चेव आणून त्यांजकडून मारूं किंवा मरूं अशी कुराणावर शपथ वाहविली. अशा रीतीनें सैन्याचा सुटलेला धीर परत आणल्यावर त्यानें शत्रूस आपल्या छावणीच्या समोर युद्धास निमंत्रण केलें; त्यांत त्यास जय मिळून शत्रूकडील हसनखान व दुसरे पुष्कळ सरदार मारले गेले. या शिक्रीच्या लढाईचा परिणाम असा झाला कीं, अयोध्या, बहार व बंगाल हे प्रांत खेरीजकरून हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या बाकीच्या बहुतेक सर्व मुलखावर बाबराचा अंमल मजबूत बसला. आपल्या कारकीर्दीच्या शेवटच्या एकदोन वर्षांत अयोध्या व बहार हे प्रांत जिंकून त्यानें आपली सत्ता गंगानदीच्या बाजूनें वृद्धिंगत केली. जय मिळवीत तो पुढें चालला, असतां बंगालच्या राजानें त्यास आडवें येण्याची खटपट केली, त्यांत त्याचा पराभव झाला. तथापि अकबराच्या कारकीर्दीपावेतों बंगालप्रांत मोगलांना आपल्या राज्यात सामील करतां आला नाहीं.

३१. बाबराचें मरण व स्वभावस्वरूप—बाबराच्या वयाच्या ४९ व्या वर्षी त्याचा पुत्र हुमायून इतका आजारी पडला कीं, तो त्या आजारांतून निभावेल अशी कोणास आशा नव्हती. हें पाहून बाबराच्या मनास फारच वाईट वाटलें, व त्यानें आपल्या लाडक्या पुत्राच्या बचावासाठीं आपण मरावयाचें असा निश्चय केला. हुमायुनाच्या बिछान्या-सभोंवती तीनदां प्रदक्षिणा करून व ईश्वराची प्रार्थना करून तो मोठ्यानें ओरडून असें ह्मणाला कीं, 'झालं, माझें काम झालें; हुमायून आतां खचीत वांचतो.' ह्या विधीनंतर हुमायून बरा झाला व त्याच्या ऐवजीं बाबर निवर्तला (दिजंबर १५३०). मरतांना त्यानें हुमायुनास व आपल्या प्रधानांस असें निक्षून सांगितलें कीं, 'न्यायानें व दयेनें वागत जा.' ह्या त्याच्या मरणवृत्तांतावरून असें दिसतें कीं, तो जरी सारखा युद्धें करण्यांत गुंतलेला होता, तरी तेणेंकरून त्याच्या अंतःकरणाची जी स्वाभाविक कोमलता ती नष्ट झाली नाहीं. त्यानें आपल्या चरित्रांत आपल्या मित्रांस व नातेवाईकांस पुष्कळ ठिकाणीं दयाळु-पणानें उद्देशून लिहिलेलें आहे. त्याच्या ज्या अत्यंत ममतेच्या गोष्टी होत्या त्यांपैकीं मध्य आशियांतील त्याची जन्मभूमी ही एक होय. हिंदुस्थानांत आपण आहों ह्मणजे निवळ वनवासांत आहों, असें त्यास वाटे. त्याला मरण आग्रा मुक्कामीं आलें, तरी त्यानें मुद्दाम सांगून ठेविलें असल्यामुळें त्याचें शव काबूल येथें नेऊन पुरिलें. उत्तरे-कडील शीत प्रदेशांत त्याचा जन्म व वाढ हीं झालेलीं असल्यामुळें त्याच्या अंगीं जी साहजिक हिंमत किंवा क्रिया-शक्ति आलेली होती, ती तो हिंदुस्थानांत आला तरी

जशीच्या तशीच कायम होती. सैन्याचें आधिपत्य करणें व राज्याचा कारभार पाहणें एवढ्यानेंच त्याची तृप्ति होत नसे; तर शिकार करणें व कुस्ती करणें ह्यांत त्यास फार आनंद वाटे; तद्वतच घोड्यावर बसून फारच लांबच्या मुजला तो मारी, व अत्यंत रुंद पात्रांच्या नद्यांतून पोंहून पलीकडे जाई. शिवाय, गद्य व पद्य यांची फारच सुंदर रचना त्यास करतां येत होती, आणि त्यानें जें आत्मचरित्र लिहून ठेविलें आहे, त्याच्यांत आपल्या कारकीर्दीची अत्यंत मनोरंजक हकीकत दिलेली आहे. सारांश, एकंदर प्राच्य राजांमध्यें ह्याच्याबद्दल वाचणाराच्या मनांत अत्यंत आदर उत्पन्न होते.

**३२. हुमायुनाच्या कारकीर्दीला आरंभ**—आपल्या कारकीर्दीच्या आरंभींच हुमायुनानें कामरान नामक आपल्या बंडखोर भावास अफगाणिस्थान व पंजाब हे प्रांत देऊन आपली सत्ता लंगडी करून टाकिली. तथापि गुजराथचा प्रबल राजा बहादुरशाह, ज्यानें माळवा प्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडून टाकिला होता, त्याच्याशीं युद्ध करून त्यांत त्यानें जय मिळविला. मंदेश्वर मुक्कामीं खंदक खणून बहादुरशाह आपल्या सैन्यानिशीं तळ देऊन राहिला; व छावणीच्या रक्षणार्थ मोठाल्या तोफा लावून त्या चालविण्याचें काम पोर्तुगीज लोक त्याजपाशीं कैद करून आणिलेले होते त्यांजकडे सोंपविलें. तथापि इतक्या बंदोबस्ताच्या ठिकाणांतून हुमायुनानें त्यास हुसकून लाविलें; तेव्हां आपल्या तोफांस सरबत्ती देऊन व सैन्यास एकटें टाकून तो समुद्रकिनाऱ्यावरें द्वित्र बंदरीं पळून गेला. तदनंतर हुमायुनानें चंपानीरच्या डोंगरी किल्यावर तीनशें निवडक

शिपायांनिशीं पोलादाचे खिळे भिंतींत रोंवून त्यांजवरून किल्ल्यांत जाऊन तो सर करून घेतला. तथापि अशा रीतीनें हुमायुनानें गुजराथप्रांत जरी जिंकून घेतला, तरी तो त्याजकडे फार दिवस टिकला नाहीं. त्याच्या राज्याच्या अगदीं मध्यभागींच बंड उद्भवल्यामुळें त्यास दिल्लीस परत जावें लागलें, तेव्हां आपला भाऊ मिरझा अस्करी ह्यास त्यानें आपल्या मागें गुजराथेंत ठेविलें; पण त्यास तो प्रांत आपल्या ताब्यांत राखतां आला नाहीं.

**३३. शीरशाह हुमायुनास हिंदुस्थानांतून हांकून लावितो**–गुजराथेंतून परत आल्यावर हुमायुनास शीरशाहावर चालून जावें लागलें. कारण त्यानें बहारप्रांत काबीज करून घेऊन बंगालची राजधानी जी गौर तीस वेढा घातला होता. घोर घराण्यांतील राजांचा मी वंशज आहें असें प्रसिद्ध करून, बाबरानें हिंदुस्थानावर स्वारी करण्याच्या पूर्वीपासूनच जे अफगाण व इतर मुसलमान लोक हिंदुस्थानांत येऊन वस्ती करून राहिले होते, त्यांस ह्या पराक्रमी बंडवाल्यानें आपल्या सैन्यांत ओढून घेतलें. हुमायुनानें बंगाल प्रांताच्या अगदीं मध्यभागापर्यंत चालून जाऊन गौर शहर हस्तगत करून घेतलें. पावसाळा, सुरू होई तोंपर्यंत शीरशाह युद्धास येईना; तें पाहून हुमायुनाचें सैन्य निरुत्साह झालें. तेव्हां शीरशाहानें त्यांचा परत जाण्याचा मार्ग अडवून टाकून, ते गंगानदी उतरण्याच्या खटपटींत असतां त्यांजवर अकस्मात् हल्ला केला. हुमायुनाचे बहुतेक लोक मारले गेले, व तो स्वतः गंगानदींत बुडून मरतच होता; पण मोठ्या शर्तीनें बचावला, व थोड्या लोकांनिशीं आग्रा मुक्कामीं पळून गेला. पुढल्या (१५४०)

साली शीरशाहानें हुमायुनाचा पुनः पराभव केला, व हुमायून गंगेंत बुडतां बुडतां पुनः मोठ्या संकटानें वांचला. ह्या दुसऱ्या पराजयानें त्यांच्या कलहाचा निकाल तितक्यापुरता तरी कायमचा लागला. हुमायून लाहोर मुक्कामीं आपला भाऊ कामरान याजकडे आश्रय मागण्यासाठीं निघून गेला, पण कामरानानें त्यास मदत करण्याचें बाजूलाच ठेवून पंजाबप्रांत शीरशाहाच्या हवालीं केला. ह्मणून शीरशाह हा ह्या (१५४०) सालापासून मरे तोंपर्यंत हिंदुस्थानांतील एकंदर मुसलमानी राज्याचा मुख्य अधिकारी होऊन राहिला होता असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

३४. **शीरशाहाची बादशाही कारकीर्द**—ह्याप्रमाणें युद्धामध्यें शीरशाहानें जसें चांगलें यश संपादिलें, तसेंच पुढें शांततेच्या कृत्यांमध्येंहि त्यानें चांगलें यश संपादिलें. बंगालप्रांतांत बंड झालें होतें तें त्यानें प्रथम मोडिलें, व त्या प्रांताची व्यवस्था लावून १५४२ त त्यानें माळवाप्रांत जिंकिला, आणि १५४४ व १५४५ या सालीं मारवाड व मेवाड येथील राजांस आपल्या कबजांत आणून टाकिलें. त्याच्या कारकीर्दींत राज्याचा कारभार चांगला चालला होता. प्रवाशीं लोकांस त्रास होऊं नये म्हणून ज्या ज्या खेड्यांत एकाद्या प्रवाशास लुटलें जाईल त्या त्या खेड्यांतील लोकांकडून तो दंड घेत असे. शिवाय त्यानें दोन मोठे रस्ते बांधिले, एक बंगालपासून सिंधुनदीपर्यंत, व दुसरा आग्र्यापासून माण्डूपर्यंत. ह्या रस्त्यांच्या बाजूनें थोडथोड्या अंतरांवर त्यानें विहिरी खणिल्या, व धर्मशाळा बांधून त्या ठिकाणीं हिंदू व मुसलमान ह्या दोन्ही जातींच्या गरीब प्रवाशांस शिधासामग्री देण्याची व्यवस्था केली. प्रवाशांनीं मुक्काम कर-

ण्याच्या मुख्य मुख्य ठिकाणीं त्यानें मशिदी बांधिल्या, आणि आंबे व इतर फळझाडें रस्त्यांच्या दोन्ही बाजूंनीं लावून दिलीं. शीरशहास न्यायाची फार आवड असे; व कायद्याचें ज्ञानहि त्यास चांगलें होतें, अशी त्याची प्रसिद्धि आहे. पण १५४५ सालीं कालिंजर किल्ल्यास त्यानें वेढा घातला असतांना दारूखान्यास आग लागून तो उडून गेला व त्यांत तो मेला. त्यामुळें राज्याच्या कारभारांत सुधारणा करण्यासाठीं त्यानें जे मोठाले बेत केले होते ते सर्व तसेच राहिले.

३९. हुमायुनाचें परत येणें व मृत्यु—शीरशाहाच्या मागून त्याचा मुलगा सेलिम हा गादीवर बसला. त्यानें नऊ वर्षें राज्य केलें. तो आपल्या बापासारखाच हुशार होता. तो जेव्हां १५५३ सालीं निवर्तला, तेव्हां त्याच्या बायकोचा भाऊ महमद अदिलशाह ह्यानें त्याच्या पुत्रास ठार मारून त्याची गादी पटकाविली. आदिल हा मूर्ख असल्यामुळें अदाली म्हणजे मूर्ख ही संज्ञा त्यास प्राप्त झाली होती. त्याच्या राज्यांतील अत्यंत विलक्षण माणूस म्हटला म्हणजे हेमू हा होय. हेमू हा हलक्या जातीचा हिंदू असून त्याचा चेहरा देखील तसाच दिसत असे. तो राज्याचा सर्व कारभार पाहत असे, व लढाईचें कामहि तोच करी. हा त्याचा प्रधान जरी हुशार होता, व त्यानें त्याच्याकरितां जरी पुष्कळ लढायांत जय मिळविला, तरी तेणेंकरून अदिलच्या गादीस कायमची मजबुती कधींच आली नाहीं. राज्यांतील एक बंड मोडावें तों दुसरें उत्पन्न होई. सरते शेवटीं १५५५ या सालीं हुमायून १५,००० फौजेनिशीं काबुलाहून निघून हिंदुस्थानावर स्वारी करून आला, आणि

पंजाब प्रांत जिंकून दिल्ली व आग्रा हीं बादशाही शहरें काबीज करून घेतलीं. पण अशा रीतीनें परत मिळविलेल्या राज्याचा उपभोग घेण्यास तो फार दिवस जगला नाहीं. दिल्लीस परत आल्यावर सहा महिन्यांनीं लाल महालाच्या संगमरवरी जिन्यावरून त्याचा पाय घसरून वरबडीवरून तो जमिनीवर जाऊन आदळला. तेव्हां त्यास जो धक्का बसला तेणेंकरून तो बेशुद्ध होऊन पुढें थोडक्याच दिवसांनीं मरण पावला.

३६. पानिपतची लढाई ( १५५६ )—हुमायुनाच्या मरणसमयीं त्याचा पुत्र जो अकबर त्याचें वय केवळ तेरा वर्षांचें होतें. तो जेव्हां गादीवर बसला तेव्हां त्याची सत्ता फार डळमळीत होती. महंमद अदिलशाहाचा प्रधान व सेनाधिपति जो हेमू त्यानें ३०,००० सैन्यानिशीं मोगलांच्या सरदारांचा पराजय करून दिल्ली व आग्रा हीं शहरें काबीज करून घेतलीं. तेव्हां त्या तरुण बादशाहाच्या मंत्र्यांपैकीं बहुतेकांनीं असा सल्ला दिला कीं आपण हिंदुस्थान सोडून काबुलास परत जावें हें फार चांगलें. परंतु बैराम नांवाच्या सरदारानें ह्यापेक्षां ज्यास्त हिंमतीचा सल्ला दिला; तो अकबरास पसंत पडून, त्याचें सैन्य जरी कमी होतें तरी त्यानिशीं तो हेमूवर चालून गेला. दोघां सैन्यांची लढाई दिल्लीजवळ पानिपतच्या मैदानांत झाली. ह्यांच ठिकाणीं ३० वर्षांपूर्वीं बाबरानें लोदी घराण्याचा मोड केला होता. अकबराच्या सैन्याचा अधिपति बैरामखान हा होता. हत्तीवर आरूढ होऊन हेमूनें प्रथम मोगलांच्या सैन्याच्या बाजूंवर व नंतर मध्यभागावर मोठ्या निश्चयानें हल्ले केले, व त्यास जय मिळण्याचा ऐन रंग दिसत होता. इतक्यांत

त्याच्या डोळ्यास एक बाण लागून तो ज़खमी होऊन हौद्यांत पडला. त्याच्या फौजेनें तो पडलेला पाहून हातपाय गाळिले, व अशा रीतीनें मोगलांस जय मिळाला. लढाई आटोपल्यावर घायाळ झालेल्या हेमूस विजयी राजाच्या तंबूंत आणिलें. हेमूस आपल्या हातानें मारण्याविषयीं बैरामखानानें अकबरास विनंती केली. तो त्यास ह्मणाला, "हें तुझें पहिलेंच युद्ध आहे; ह्मणून ह्या पाखंड्यावर आपली तरवार चालीव ह्मणजे तुला मोठें पुण्य लागेल." पण त्या उदार मनाच्या तरुण बादशाहानें उत्तर केलें, "तो आतां मेल्यासारखाच आहे. तर मृत माणसावर मी आघात कसा करूं? जर त्याच्या अंगीं अक्कल व सामर्थ्य हीं असतीं, तर मी आपली तरवार त्याजवर चालवून पाहिली असती." हें ऐकून बैरामखानास शिरच्छेदकाचें काम स्वतःच करावें लागलें.

**२७. बंडांचा मोड**—पानिपतच्या लढाईनंतर कांहीं दिवसपर्यंत बैरामखान हाच मोगलांच्या मुलखाचा वास्तविक राज्यकर्ता होता. त्याचा कारभार कांहीं अंशीं जुलमी असे; ह्मणून अकबरानें आपल्या वयाच्या अठराव्या वर्षी राज्याचा कारभार आपल्या हातीं घेतल्याबद्दल जेव्हां अकस्मात् द्वाही फिरविली, तेव्हां बहुतेक लोकांस तें त्याचें करणें पसंत पडलें. आपल्या हातांतील अधिकार निघून गेला हें पाहून बैरामखान स्वस्थ बसला नाहीं. त्यानें बंड उभारण्याची पोकळ खटपट केली; पण त्यानें आजपर्यंत गादीची मोठी नोकरी बजाविलेली ध्यानांत आणून त्यास अकबरानें त्याबद्दल माफी केली. शेवटीं तो यात्रेसाठीं मक्केस चालला असतां वाटेंत एकानें खासगी द्वेषावरून त्याचा वध केला. अकबराच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं

ह्याशिवाय आणखीं कांहीं बंडें उद्भवलीं होतीं; त्यांजपैकीं कांहीं त्याच्याच जातीच्या सरदारांनीं उभारिलीं होतीं, व कांहीं अफगाण सरदारांनीं उभारिलीं होतीं.

३८. **रजपुतांशीं युद्ध**—ह्या बंडखोर मुसलमान सरदारांस मोठ्या मारामारीनें वठणीस आणिल्यानंतर अकबरानें बाह्य शत्रूंचे मुलूख जिंकून घेण्याचें काम हातीं घेतलें. ज्या संगराण्यानें हिंदुस्थानाचें वर्चस्व मिळविण्यासाठीं बाबराशीं युद्ध केलें होतें त्याचा पुत्र जो उदेसिंग त्याच्यावर तो इ०स० १५६७ सालीं चालून गेला. उदेसिंग माघार खाऊन डोंगरांत निघून गेला, तरी त्याचा सेनापति जो जयमल्ल तो चितोरच्या तटाचें रक्षण करण्यासाठीं निश्चयानें लढत राहिला. शेवटीं एके रात्रीं तटावरून लढत असतां अकबराच्या बंदुकीची गोळी लागून तो मरण पावला. आपला अधिपति मेलासें पाहून संरक्षक फौजेनें लढण्याचें सोडून दिलें. रजपुतांच्या जुन्या काळच्या चालीस अनुसरून त्यांनीं जयमल्लाच्या चितेवर आपल्या बायकांमुलांस जाळून टाकिलें; व नंतर मुसलमानांस तटाच्या भिंतींवर चढूं देऊन आपण ८,००० लोकांस लढतां लढतां मारून घेतलें. अशा रीतीनें चितोरचा पाडाव झाला. व १५७० सालीं अकबरानें रतिंबर व कलिंजर हेहि बळकट डोंगरी किल्ले हस्तगत करून घेतले.

३९. **गुजराथप्रांताचा पाडाव**—१५७२ सालीं अकबरानें गुजराथेवर स्वारी केली. तेव्हां तेथील नामधारी राजा जो मुजफरशाह तो शरण आला, व अकबरानें त्यास जहागीर करून दिली. पण तैमुरलंगाचे मिरझा नांवाचे कोणी वंशज तेथें होते त्यांनीं अकबराच्या अधिकारास अडथळा केला. पुरतेस वेढा घालीत असतां त्या मिरझांचे १,०००

लोक तेथून मस्ती करून बाहेर पडले. अकबर केवळ १५६ शिपायांनिशीं त्यांचा पाठलाग करीत झपाट्यानें निघाला, व त्यांस त्यानें जाऊन पकडिलें. दंगेखोरांची संख्या मोठी असल्यामुळें त्यांनीं अकबरास केव्हांच चीत करून टाकिलें असतें; पण त्या १५६ लोकांत जयपूरचा राजा भगवानसिंग व त्याचा पुतण्या मानसिंग हे होते; ते दोघे स्वतः अकबरासारखेच रणशूर होते; त्यांनीं ह्या धोक्याच्या प्रसंगीं मृत्यु व अपयश ह्या दोहोंतून अकबरास बचाविलें. मुझफरशाह १५८१ पर्यंत आपल्या जाहागिरीवर स्वस्थ राहिला; पण त्यावर्षीं आपलें गेलेलें राज्य परत मिळविण्याची त्यानें खटपट सुरू केली. त्यानें पुष्कळ वर्षेंपर्यंत गुजराथच्या दूरदूरच्या भागांत अकबराच्या सत्तेस अडथळा केला; व त्याचें हें बंड १५९२ सालापर्यंत संपलें नाहीं. त्यावर्षीं तो पकडला गेला, व त्यानें आत्महत्या करून घेतली.

४०. **बंगालप्रांताचा पाडाव,** १५७६–१५७५ सालीं बहार प्रांताचा जेवढा भाग अद्यापि स्वतंत्र राहिलेला होता तेवढा अकबरानें जिंकून घेतला; व पुढल्या सालीं बंगालचा शेवटचा अफगाण राजा जो दाऊद त्याचा पराभव होऊन तो मरण पावल्यामुळें तो सुसंपन्न प्रांत देखील मोगलांच्या राज्यांत सामील झाला.

४१. **काश्मीरचा पाडाव**—सगळ्या संस्कृत ग्रंथभांडारांत (राजतरंगिणी?) जो एकच ऐतिहासिक ग्रंथ आढळला आहे त्यांत अशी माहिती सांपडते कीं, ख्रिस्तीशकाच्या प्रारंभीं तार्तार घराण्यांतील बौद्धधर्मी राजे काश्मीर प्रांतावर राज्य करीत होते. त्या ठिकाणीं १३२६ पासून अकबराच्या वेळापर्यंत एक मुसलमान घराणें राज्य करीत होतें.

१५८६ व १५८७ ह्या दोन सालीं काश्मीरावर स्वारी करण्यासाठीं अकबरानें दोन फौजा पाठवून दिल्या. पैकीं दुसऱ्या फौजेस पूर्ण यश आलें. अशा रीतीनें काश्मीर प्रांत मोगलांच्या मुलखास जोडला गेला, व तेथील राजा अकबराचा सरदार बनून त्यास त्यानें बहारप्रांतांत जहागीर करून दिली.

**४२. नर्मदेपर्यंत उत्तर हिंदुस्थानावर अकबराचें आधिपत्य**–१५९१ व १५९२ या सालीं अकबरानें सिंध प्रांत काबीज करून घेतला, आणि अशा रीतीनें रजपुताना खेरीजकरून इतर सर्व उत्तरहिंदुस्थानचा तो अधिपति झाला. शिवाय, रजपुतान्यांतील बहुतेक राजे त्याचे निःसीम मित्र व दोस्त बनलेलेच होते. १५९४ सालीं कंदाहार प्रांत इराणी लोकांपासून परत मिळवून हिंदुस्थानच्या उत्तरेकडे त्यानें आपल्या राज्याची सीमा बरीच पुढें ढकलिली.

**४३. दक्षिणेंतील मुसलमानी राज्यें**–महंमद तघलकाच्या कारकीर्दीत बहामणी घराण्यानें दक्षिणेंत दिल्लीच्या बादशाईपासून स्वतंत्र असें एक मुसलमानी राज्य स्थापन केलें, व १५० वर्षेपावेतों विजयनगरच्या हिंदुराजाशीं लढाई चालविली. पुढें बहामणी राज्याचा विनाश होऊन त्यापासून पांच लहानलहान मुसलमानी राज्यें उत्पन्न झालीं. अकबराच्या कारकीर्दीच्या आरंभीं त्यांपैकीं तीन बलिष्ठ मुसलमान घराणीं दक्षिणेंत राज्य करीत होतीं, व तेव्हां त्यांस राज्य करावयास लागून सरासरी शंभर वर्षें होऊन गेलेलीं होतीं. तीं तीन घराणीं हीं:–(१) अहमदनगरचें निजामशाई घराणें; (२) गोवळकोंड्याचें कुतबशाई घराणें; व (३) विजापूरचें अदिलशाई घराणें. इ० स० १५६५ सालीं हीं तीन घराणीं विजयनगरच्या राज्यावर जूट करून

उठली, व अखेरीस तालिकोटच्या मोठ्या लढाईंत विजयनगरच्या राज्याचा विनाश झाला. पुढें जेव्हां अकबरानें आपलें राज्य नर्मदेच्या आलीकडे वाढवावयाचा निश्चय केला, तेव्हां वरील तीन राज्यांपैकीं अहमदनगरचें राज्य अगदीं उत्तरेकडील असल्यामुळें त्याजवर सहजच प्रथम हल्ला आला.

४४. **अहमदनगराशीं युद्ध.**—इ. स. १५९५ सालीं अकबरानें आपला द्वितीय पुत्र मुराद यास अहमदनगरच्या मुलखावर स्वारी करण्यास पाठवून दिलें. त्या शहरांत त्या वेळीं अनेक तट झालेले होते; व तेथील मुख्य सत्ता चांदबिबी हिच्या हातीं असून ती आपल्या तान्ह्या पुतण्याच्या नांवानें राज्य करीत होती. याप्रसंगीं अहमदनगरचें संरक्षण करण्याच्या कामीं हिनेंच सर्वांत पुढारीपण घेऊन जिवापाड मेहनत केली. संरक्षक फौज तटबंदी बांधण्याचे कामांत गुंतलेली असो, वा शत्रूशीं लढण्याचे कामांत गुंतलेली असो; सर्वत्र ती हजर आहे असें पाहून फौजेस जोर येई. शत्रूंनीं जेव्हां शहराच्या भिंतीस खिडार पाडिलें, व तिचे शिपाई पळून गेले, तेव्हां तिनें स्वतः हातांत तरवार धारण करून त्यांना तटबंदीच्या रक्षणार्थ परत आणिलें. अशा रीतीनें तिनें शौर्यानें शहराचें संरक्षण केल्यामुळें व इतक्यांत विजापुराहून कांहीं सैन्य तिच्या मदतीसाठीं नजीक येऊन पोंहोचल्यामुळें मोंगलांच्या सैन्यास इतकी भीति उत्पन्न झाली कीं, वऱ्हाडचा सुसमृद्ध प्रांत अहमदनगरच्या राजानें आपल्यास लावून द्यावा ह्या शर्तीवर मुराद तो वेढा उठवून परत जाण्यास कबूल झाला. पण ह्या प्रसंगीं जो तह त्यांनीं केला तो फारच थोडे दिवस टिकण्यासारखा होता.

पुढल्या वर्षी गोवळकोंडा व विजापूर येथील राजांनीं अहमदनगरास मिळून मोगलांस दक्षिणेंतून हांकून लावण्याची खटपट केली. त्यांचें त्यांचें तुंबळ युद्ध झालें, व त्यांत जयापजय कोणास मिळाला ही गोष्ट इतकी संशयित राहिली कीं, अकबरास दक्षिणेंत स्वतः यावें लागलें. त्यानें बऱ्हाणपुरीं तळ देऊन आपला कनिष्ठ पुत्र दानियल यास अहमदनगरास वेढा घालण्यास पाठविलें. या प्रसंगीं चांदबिबीस शहराचें संरक्षण करतां आलें नाहीं. कांहीं शिपायांनीं तिचा खून केला, व तिच्या मरणानंतर थोड्याच दिवसांनीं मोगलांनीं छापा घालून शहर घेतलें. अशा रीतीनें जरी राजधानीचें शहर शत्रूंचे हातीं गेलें, व तेथील अल्पवयस्क राजा कैद झाला, तरी अहमदनगरचें जें राज्य तें कांहीं अकबराच्या कारकीर्दींत मोगलांच्या कबजांत पुर्तेपणीं कधींच आलें नाहीं.

४९. **अकबराच्या कारकीर्दीची अखेर**—अकबराच्या कारकीर्दीच्या शेवटच्या शेवटच्या वर्षांत त्याचा मित्र अबुल फाझल व कनिष्ठ पुत्र दानियल हे मृत्यु पावल्यामुळें, व त्यांच्यामागून गादीचा मालक ह्मणून ठरविलेला त्याचा ज्येष्ठ पुत्र सेलिम ह्यानें अकबर दक्षिणेंत गेला असतां, मागें बहार प्रांताचा वसूल बळकावून बादशाहा ही पदवी स्वतःच धारण केल्यामुळें, तीं वर्षें त्यास दुःखाचीं गेलीं. आपल्या मुलाशीं युद्ध करण्याचा प्रसंग टाळेल तितका टाळावा अशी अकबराची फार इच्छा असल्यामुळें बंगाल व ओरिसा या प्रांतांचा कारभार त्यानें त्यास देऊन टाकिला. सेलिमानें ह्याबद्दल उपकार मानण्याचें एकीकडेसच गुंडाळून ठेवून उलट अबुल फाझलचा खून करण्याच्या कामीं चढ देण्यास

तो प्रवृत्त झाला, व अशा रीतीनें त्यानें अकबराचें मन अत्यंत अस्वस्थ करून टाकिलें. अबुल फाझलच्या मृत्यूनंतर देखील अकबरानें आपल्या ह्या बंडखोर मुलाशीं समेट करण्यासाठीं अत्यंत खटपट केली, व शेवटीं सेलीम आग्र्यास परत येऊन त्यास अकबरानें आपल्या मर्जीत पुनः घेतलें, व त्यास तो राज्याचा वारस या नात्यानें पुनः वागवूं लागला.

४६. **अकबराचा मृत्यु, (१६०५.)**–१६०५ च्या एप्रिलांत अतिशय मद्य प्राशनाचा दुष्परिणाम होऊन राजपुत्र दानियल हा निवर्तला; त्याच्यापूर्वीं त्याचा भाऊ मुराद ह्याच कारणानें मरण पावला होता. अकबराची प्रकृति आधींच क्षीण होत चालली होती. ती ह्या नवीन कारणामुळें, आणि सेलिमाचें दुर्वर्तन व अबुल फाझलचा मृत्यु हीं कारणें अगोदरच झालेलीं असल्यामुळें, ज्यास्तच बिघडली; व सप्टेंबर महिन्यांत, हा आतां थोडेच दिवसांचा सोबती आहे असें चिन्ह स्पष्टपणें दिसूं लागलें. नंतर तो पुढच्या महिन्यांत, आपल्या वयाच्या ६३ व्या वर्षीं निवर्तला. मरणापूर्वीं, मुसलमानी धर्मावर आपला पूर्ण विश्वास आहे असें त्यानें कबूल केलें, व 'माझ्या जुन्या मित्रांस दयार्द्र बुद्धीनें वागवीत जा,' असा सेलिमास उपदेश केला.

४७. **अकबराचें शरीरस्वरूप**–जहांगीर आपल्या बखरींत असें लिहितो कीं, "माझा बाप मध्यम उंचीचा होता, पण त्याच्या शरीराच्या काठीचा कल जरा उंचीकडेसच होता. त्याचा अंगवर्ण गव्हाच्या रंगाचा होता, व गोरेपणापेक्षां काळेपणाचीच झांक त्यांत जास्त भारत होती; डोळे व भिवया हीं दोन्हीं काळीं होती; शरीर बळकट होतें;

कपाळ व छाती दोन्ही रुंद होतीं; हात व बाहू लांब होते."
तो इतका शक्तिमान् होता कीं, त्यानें एकदां एका माणसास केवळ ठोसा मारून जमिनीवर मूर्छित करून पाडिलें; व ह्या संबंधानें अबुल फाझल असें लिहितो कीं, त्या दुर्दैवी माणसाच्या तोंडावर त्याची अशी कांहीं खूण राहिली कीं, सोडग्यानें मारिल्याचीच ही खूण असावी असा पाहणारास भ्रम होई.

४८. **अकबराची दयार्द्रबुद्धि**—अकबराचें अंतःकरण फार कोमळ असे. त्याचा पुत्र सेलीम ह्याचीं क्रूरपणाचीं कृत्यें जेव्हां ह्याच्या कानावर आलीं तेव्हां त्यानें असे उद्गार काढिले कीं, "मेलेल्या जनावराचें कातडें फाडून काढतांना पाहिल्यास ज्या माणसास दुःख होतें, त्याच्याच मुलानें जीवंत माणसांच्या अंगावरची कातडी सोलून काढण्यास हुकूम करावे, ह्या गोष्टीचें मला आश्चर्य वाटतें. यात्रेकरूवरचा कर व जेझिया नामक पाखंडी लोकांवरचा कर हे दोन्ही त्यानें काढून टाकिले; कारण ह्या करांचें आपल्या हिंदु प्रजेला विशेष ओझें वाटतें, ही गोष्ट त्याच्या ध्यानांत येऊन चुकली होती. इच्छेविरुद्ध सती जावयास लावण्याची चाल त्यानें बंद केली, व पराजित केलेल्या शत्रूंच्या बायकामुलांस गुलाम करण्यास त्यानें कधींहि परवानगी दिली नाहीं.

४९. **अकबराचीं धर्मसंबंधी मतें**—अबुल फाझल व त्याचा वडील भाऊ फैझी हे दोघेजण अकबराच्या धर्मसंबंधी मतांत अत्यंत फेरबदल होण्यास कारणीभूत झाले. फैझी, हा कवि व वैद्य असून, अकबराच्या मुलांचा शिक्षक या नात्यानें एकांतवासांत राहत असे; पण अबुल फाझल हा केवळ ग्रंथकार ह्या नात्यानेंच आपल्या धन्यास

उपयोगी पडत असे असें नाहीं, तर त्याच्या अंगीं इतर प्रकारची कर्तृत्वशक्तिहि वसत होती. ते जातीचे आरब होते, व त्यांस त्यांच्या बापापासून मुसलमानी धर्मापैकीं शिया पंथाची आवड वंशपरंपरेनें आलेली होती. अकबराला धर्मसंबंधी प्रश्नांची चर्चा करण्याची उत्सुकता फारच असे; म्हणून त्यानें वादविवादासाठीं एक सभास्थान मुद्दाम तयार करविलें; त्या ठिकाणीं अबुल फाझल, मुसलमानांचे मौलवी, आणि पारशी व ख्रिस्ती धर्मोपदेशक, ह्यांचे परस्परांविरुद्ध कोटिक्रम चालत असत. अबुल फाझलाच्या प्रोत्साहनावरून तो धर्माच्या बाबतींत इतका पुढें गेला कीं, त्यानें एक नवा धर्म स्थापन केला; त्या धर्माचें मुख्य तत्व असे होतें कीं, "एका ईश्वराव्यतिरिक्त दुसरा देव मुळींच नाहीं; व त्याचा खलीफ अकबर होय." त्याच्या अत्यंत निःसीम अनुयायांपैकीं थोडेसे लोक तेवढेच बादशाहाचा हा धर्म स्वीकारिते झाले; व त्याच्या मरणानंतर त्याचा लवकरच लय झाला.

९०. **अकबराच्या अंगचे गुण**—अकबर हा स्वतः जरी विद्वान् नव्हता, तरी विद्वानांस तो आश्रय देई, व त्यांच्या सहवासांत त्यास आनंद वाटे. तो गानवादनाचा फार शोकी असे, व त्याला ती विद्या थोडीबहुत येत असे. त्याच्या अंगीं नूतन शोध करण्याचें चातुर्यहि वसत होतें, व तोफखान्याच्या संबंधानें कांहीं सुधारणा करावयाच्या होत्या त्यांची पूर्व योजना त्यानें स्वतः करून दिली, तेव्हां तें चांगल्या रीतीनें व्यक्त झालें. त्याची आवडीची राहण्याची जागा जी फत्तेपुर शिक्री, तेथें जे कांहीं मोडकळीस आलेले वाडे वगैरे आहेत त्यांचें सौंदर्य, व त्याच्या कारकीर्दीत आग्रा मुक्कामीं बांधलेला

मोठा किल्ला आणि महाल व मशिदी, हीं सर्व शिल्पकामाच
अभिरुचि त्यास होती ह्या गोष्टीची चांगली साक्ष देतात.

५१. **अकबराची राजनीति**—त्याच्या राजनीती
धोरण खरोखरचं बादशाईकः योग्य असें होतें. मोगलां
हिंदुस्थान जिंकिलें, व तेवढ्याच लोकांच्या जातीचे काद
आपण नायक आहों, तेव्हां इतरांच्या हिताहिताची काळज
करण्याची कांहीं एक जरूरी नाहीं, असली आकुंचित बुद्धि
धरतां, आपण आपल्या सर्व प्रजेस—मग ते हिंदू असोत व
मुसलमान असोत—पोटच्या लेंकरांप्रमाणें लेखावयाचें अस
त्याचा निश्चय होता. बादशाही नोकरींतील दिवाणी व लष्कर
खात्यांपैकीं अत्यंत उंच दर्जाच्या देखील जागा हिंदूंना कांहं
एक प्रतिबंध न होतां त्याच्या कारकीर्दींत मिळत असत; फक्
देशांतील एकंदर कायदा कुराणाच्या आधारावर रचलेल
असल्यामुळें त्यांना न्यायाधीश मात्र होतां येत नसे. त्याच
बोलण्याचालण्याची ढब फार मोहक असे; आणि मुत्सद्द
व सेनापति ह्या दोन्ही नात्यांनीं त्याच्या अंगीं जें धैर्य
सामर्थ्य दृष्टीस पडे तें खूप वाखाणण्यासारखें असे. ह्या दो
कारणांमुळें रजपुतांचें मन त्यानें आपल्याकडे इतकें आकर्षू
घेतलें कीं, त्यांच्याशीं शत्रुत्व करावयाचें सोडून ते उल
त्याच्या राज्याचे आधारस्तंभ होऊन राहिले. शिवाय, त्यांच्य
पैकीं जे अत्यंत मानी राजे होते त्यांच्या मुलींशीं लग्नें करू
त्यानें त्यांचें प्रेम आपल्याकडे ज्यास्तच घट्ट करून घेतलें.

५२. **अकबराची जमावंदीची पद्धति**—अकबराच्य
कारकीर्दींत ज्या अत्यंत प्रशंसनीय गोष्टी घडून आल्य
त्यांच्याशीं रजपूत राजांपैकीं एकाचा संबंध अत्यंत निकट
होता. तो कोण ह्मणाल, तर तोडरमल्ल होय. त्या

बादशाही जमाबंदीचा वसूल करण्याच्या शिस्तींत फार सुधारणा केली. ह्या नव्या शिस्तीप्रमाणें प्रथम सर्व जमिनीची काळजीपूर्वक मोजणी केली, व तिच्यीं उत्पन्नाच्या किंमतीचें एक अंदाजपत्रक तयार करविलें. नंतर असें ठरवून टाकिलें कीं शेतकऱ्यानें उत्पन्नाच्या किंमतीचा एक तृतीयांश, पैशाच्या रूपानें किंवा धान्याच्याच रूपानें, सरकारास द्यावा. ह्या नव्या पद्धतीपासून फायदा असा झाला कीं रयतेस एकच साधा कर द्यावयाचा असल्यामुळें, जमाबंदी करून देणाऱ्या लोभी मक्तेदारांकडून किंवा सरकारी कामदारांकडून रयत लुबाडली जाण्याचा संभव पहिल्यापेक्षां कमी झाला.

**५३. जहांगिराच्या कारकीर्दीचा आरंभ**—राजपुत्र सेलीम हा जेव्हां अकबराच्या मागून तक्तावर बसला, तेव्हां जहांगीर ( जगज्जेता ) अशी मोठ्या अहंकाराची पदवी त्यानें धारण केली. त्यानें आपल्या कारकीर्दीच्या आरंभीं कांहीं लोकहिताचे कायदे करून आपलें नांव प्रसिद्ध केलें. आग्र्याच्या किल्ल्यास साठ घंटांची एक सोन्याची सांखळी त्यानें बांधिली; असें कीं त्याच्या प्रजेंपैकीं ज्यास म्हणून बादशाहाकडे दाद मागावयाची असेल त्यानें त्या घंटा वाजवाव्यी. दवाखाने चालावे म्हणून त्यांचा खर्च सरकारी तिजोरींतून करण्याचें ठरविलें. गुन्हेगाराचे नाककान कापण्याची चाल बंद करून टाकिली; आणि तो स्वतः जरी दारूबाज होता तरी मद्य तयार करणें व विकणें ह्या दोन्ही गोष्टी त्यानें मना केल्या.

**५४. राजपुत्र खुशरू ह्याचें बंड, १६०५**—खुशरू हा जहांगिराचा पुत्र असून, रजपूत राजा मानसिंग

ह्याच्या बहिणीच्या पोटीं उत्पन्न झालेला होता. अकब-राच्या मागून त्यास गादी मिळावी म्हणून त्याचा मामा मानसिंग ह्यानें अकबर मरण्याच्या पूर्वींच गुप्त कट चालविला होता; पण अकबरानें जहांगिरास मदत केल्यामुळें तो फुकट गेला; व जहांगिरानें गादीवर बसल्यावर त्यास कैद करून ठेविलें. थोडक्या महिन्यांनीं तो तेथून पळाला, आणि बंड उभारून त्यानें लाहोरास वेढा दिला. तेथें बादशा-हाच्या सैन्यानें त्याचा पराजय केला, व त्यास लागलेंच पकडून बिड्या ठोकून बापासमोर आणिलें. त्याच्या अनुया-यांपैकीं कांहींस सुळावर चढविलें, व इतरांस इतर प्रकारच्या क्रूर शिक्षा केल्या. स्वतः खुशरूचे डोळे काढण्याबद्दल हुकूम सुटला होता; पण तो प्रयोग बरोबर रीतीनें झाला नाहीं, तेव्हां त्याची दृष्टि कायम राहू दिली.

५९. **नूरजहान हिची गोष्ट**—आपल्या कारकीर्दीच्या सहाव्या वर्षाच्या आरंभीं जहांगिरानें हिंदुस्थानच्या इतिहा-सांत अत्यंत प्रसिद्ध स्त्री जी नूरजहान तिशीं लग्न केलें. जरी तिचा जन्म कुलीन घराण्यांत झाला होता, तरी तिचीं आईबापें इतकीं गरीब होतीं कीं, त्यांनीं तीस लहान अर्भक असतांच कंदाहार नजीक रस्त्यावर टाकून दिलें. त्या निराश्रित मुलीची एका श्रीमान् सावकारास दया येऊन त्यानें तीस पोटच्या लेंकराप्रमाणें वाढविलें. अकबर जीवंत असतांनाच तिजवर जहांगिराचें प्रेम जडलें, व पुढें जेव्हां तो गादीवर बसला, तेव्हां त्यानें तिला बंगाल प्रांतांतून आणावयास पाठविलें. त्यावेळीं तेथें ती एका तरुण इराणी सरदाराशीं लग्न करून राहिलेली होती. तिचा नवरा तीस सोडीना; तेव्हां त्यास ठार मारिलें, व नंतर तीस दिल्लीस

आणिलें. पुष्कळ दिवसपर्यंत जहांगिराशीं लग्न करण्यास ती कबूल नव्हती; पण पुढें तिचा मानस बदलून ती बादशाहीण बनली.

५६. **नूरजहानची बादशाहीण ह्या नात्यानें कारकीर्द**—जहांगीर आपल्या तरुण राणीचा अगदीं दास बनून गेला. प्रथम त्यानें तीस नूरमहाल ( अंतःपुराची प्रभा ) ही पदवी दिली, पण पुढें त्याचें तिजविषयींचें कौतुक जेव्हां वाढत चाललें, तेव्हां तो तिला नूरजहान ( सर्व जगाची प्रभा ) असें ह्मणूं लागला; व त्याच नांवानें ती इतिहासांत प्रसिद्ध आहे. जहांगिरास मोहून टाकण्यास तिचें लावण्य जितकें कारण होतें तितकेंच तिचें चातुर्य व मोठें धैर्य हीं होतीं. एकदां जहांगीर शिकारीसाठीं बाहेर पडला असतां त्यानें तिच्या हातांत आपली बंदूक दिली; ती घेऊन तिनें वाघास मारिलें. शत्रूंनीं रचिलेल्या गुप्त कारस्थानापासून ती आपलें व जहांगिराचें रक्षण असेंच धैर्यानें करीत असे. कांहीं अंशीं आळसामुळें, व कांहीं अंशीं ती आपल्यांपेक्षां जास्त हुशार आहे हें तो जाणून असल्यामुळें, त्यानें आपल्या सर्व राज्याचा कारभार तिजकडे संपविला होता. तिच्या नांवानें नाणें देखील पाडिलें, व बादशाही आज्ञापत्रकांवर सहीहि तीच करी. स्त्रीनें आपल्यावर अंमल करावा ह्या गोष्टीची त्याच्या बलिष्ठ सरदारांपैकीं पुष्कळांस फार चीड येत असे; तथापि मुख्य सत्ता तिच्या हातीं होती हें देशाचें भाग्यच होय; कारण जहांगिरासारख्या माणसाच्या हातून राज्याचा कारभार चांगल्या रीतीनें चालण्याची आशा फारच थोडी होती.

५७. **शहाजहान ह्याची दक्षिणेंत स्वारी**—अहमद-

नगरच्या राजाचा मलिकंबर नामें अबिसीनियन जातीचा एक प्रधान होता, त्यानें १६१० त अहमदनगर हें राजधानीचें शहर मोगलांपासून परत मिळविलें. ह्याच्यावर पाठविलेल्या मोगल सरदारांस यश मिळेना; तेव्हां शेवटीं, जहांगिराचा द्वितीय पुत्र शहाजहान ह्यास राजा ही पदवी देऊन दक्षिणेंत पाठविलें; त्यानें मलिकंबरास अहमदनगर शहर स्वाधीन करण्यास भाग पाडिलें. ह्या जहांगिरानें १६१४ त उदेपूरच्या राण्यास जिंकून टाकून आपलें नांव अगोदरच प्रसिद्धीस आणिलें होतें. अशा रीतीनें अहमदनगराचा पाडाव केल्यावर पुढल्या वर्षी त्यास गुजराथचा सुभेदार नेमिलें. १६२१ त त्यानें मलिकंबराचा पुनः पराजय केला; व अशा रीतीनें बापाच्या राज्यास दक्षिणेंतील आणखी कांहीं मुलूख सामील करून दिला.

**५८. शहाजहानाचें बंड**–१६२१ सालीं जहांगिराचा कनिष्ठ पुत्र शहारियर ह्याशीं नूरजहानच्या पहिल्या घरच्या मुलीचें लग्न झालें. तेव्हांपासून, जहांगिराच्या मागून गादीवर आपण बसावें, असा हक्क जो तो सांगत होता, त्यास नूरजहानचा पाठिंबा मिळूं लागला; व ती शहाजहानाशीं इतकें शत्रुत्व करूं लागली कीं, त्यानें चिडून बंड केलें. बंड करून त्यानें बंगालच्या सुभेदाराचा पराजय केला, व कांहीं दिवसपर्यंत बंगाल व बहार ह्या प्रांतांचा तो मालक होऊन राहिला. त्याला तेथून हांकून काविल्यावर त्याचा दक्षिणेंतील पूर्वीचा शत्रु जो मलिकंबर त्यांस तो जाऊन मिळाला. अखेरीस त्यास बापास शरण जावें लागलें. तेव्हां त्यानें आपले दोन पुत्र, दारा व अवरंगजेब, ह्यांस आपलें वर्तन पुढें चांगलें ठेवण्याबद्दल

जामीन ह्मणून पाठवावे ह्या शर्तीवर जहांगिरानें त्यास माफीचें वचन दिलें.

५९. **महाबतखान बादशाहास कैद करितो**—ह्या प्रसंगीं शहाजहानाच्या विरुद्ध जें सैन्य पाठविलें होतें त्याचा मुख्य महाबतखान हा होता. हा पराक्रमी सरदार ह्या वेळीं इतका बलिष्ठ झाला होता कीं, त्याच्याबद्दल बादशाह व बादशाहीण ह्या दोघांस संशय उत्पन्न होऊं लागला. बादशाहानें त्यास दरबारीं बोलाविलें तेव्हां ५,००० रजपुतांच्या लवाजम्यानिशीं तो तेथें आला. जहांगीर आणि नूरजहान हीं त्या समयीं काबुलास चाललेलीं असून बियास नदीच्या कांठीं बहुतेक एकटींच तळ देऊन राहिलेलीं होतीं. बादशाहास कैद करण्यास ही संधि फारच उत्तम आहे असें पाहून महाबतखानानें अर्थात् ती साधून घेतली. आपल्या जवळच्या २,००० रजपुतांस पुलावर उभे करून तो सरळ बादशाहाच्या छावणींत गेला, व त्यास त्यानें पकडिलें. नूरजहान नदी उतरून पळून गेली, व पलीकडच्या तीरावर सैन्य होतें त्यास जाऊन मिळाली. दुसऱ्या दिवशीं जबरीनें नदी ओलांडून बादशाहास सोडविण्याचा तिनें यत्न केला, पण तिच्या सैन्यास हांकून मागें लाविलें, व ज्या हत्तीवर ती बसली होती त्यास जखमी केलें.

६०. **जहांगिराची सुटका**—जबरीनें जहांगिराची सुटका करतां येत नाहीं असें पाहून नूरजहान त्याच्या बरोबर कैदेंत राहण्यासाठीं व युक्तीनें कांहीं साधतें कीं काय हें पाहण्यासाठीं, नदी उतरून पलीकडे गेली. महाबतखानाशीं आपला आतां समेट झाला असें जहांगिरानें

ढोंग केलें, व त्यामुळें फसून जाऊन महाबतखान गैरसावध-पणानें राहूं लागला. इकडे नूरजहान बक्षिसें व वचनें देऊन बऱ्याच शिपायांना आपलेसे करून घेतच होती. शेवटीं, एके दिवशीं, कवाईत चालली असतां, जहांगिरानें आपल्या सभोंवतीं नूरजहानच्या शिपायांचा गराडा घालून घेतला, व अशा युक्तीनें तो पूर्ववत् स्वतंत्र झाला. जहांगिरास पुनः जबरीनें कैद करण्यास यत्न करण्याचें सामर्थ्य आपल्या-पाशीं नाहीं असें पाहून, महाबतखान तेथून आपल्या अनुयायांनिशीं निघून दक्षिणेंत शहाजानास जाऊन मिळाला.

६१. जहांगिराचा मृत्यु, १६२७—जहांगिराची सुटका झाल्यावर तो फार दिवस जगला नाहीं. पुढील सालांत एके दिवशीं तो शिकार करीत असतां त्याच्या बरो-बरच्या माणसांपैकीं एकजण कड्यावरून खालीं पडला आणि मेला. हा अपघात त्याच्या मनास इतका लागला कीं तो आजारी पडला, व त्यास झोंप येईनाशी झाली. पुढें कांहीं दिवसांनीं तो मेला ( १६२७ ). त्यावेळीं त्याच्या कारकीर्दीस बाविसावें वर्ष चाललेलें असून वयास ६० वें चाललें होतें.

६२. जहांगिराचें स्वभावस्वरूप—बाबराप्रमाणें त्याचा पणतु जो जहांगीर त्याच्या स्वभावाचें एकंदर धोरण त्यानें लिहून ठेविलेल्या बखरीवरून स्पष्टपणें दिसून येतें. तो दारूबाज आहे हें जगप्रसिद्ध होतें. वास्तविकरीत्या पाहतां मद्यपान करणें हें मुसलमानी धर्माप्रमाणें अगदीं निषिद्ध मानिलेलें आहे. तथापि तो त्या गोष्टीबद्दल इतका बेशरम असे कीं, त्यानें पाडिलेल्या नाण्यांपैकीं एकावर त्यानें हातांत मद्याचा पेला घेतला आहे असें

दाखविलेलें आढळतें. त्याचा दुसरा मोठा दुर्गुण ह्मटला ह्मणजे त्याचें क्रौर्य. शत्रूंना शिक्षा करावयाची असली ह्मणजे तो त्यांस हत्तीच्या पायांखालीं देई, सुळावर चढवी, किंवा त्यांचें आंग सोलून काढी. खरोखरच पुसाल तर, जहांगिरास चांगलें ह्मणून ह्मणण्यासारखें त्याच्या वर्तनांत कांहींच नव्हतें. कांहीं तरी शोधूनच काढावयाचें असलें तर इतकेंच ह्मणतां येईल कीं, तो जेव्हां चिडलेला नसेल तेव्हां त्याचा स्वभाव चांगला असे, व आपल्या विस्तृत राज्याचा कारभार आपल्या हुशार बायकोच्या हातीं द्यावा इतकी त्यास अक्कल होती. त्याच्या बापाप्रमाणें त्यालाहि शिकारीचा नाद फार असे. आपल्या कारकीर्दीच्या ११ व्या वर्षी त्यानें गणना करून पाहिलें, तींत असें निष्पन्न झालें कीं, आपल्या आजपर्यंतच्या सर्व शिकारींत २८,५३२ पशु व पक्षी मारिले गेले आहेत. पण त्याच्या अंगीं त्याच्या बापाचें मोठें धैर्य, किंवा शिपाईगिरी ह्यांपैकीं कांहीं नव्हतें. तेव्हांच्या इतिहासाकडे पाहतां असें आढळून येतें कीं, त्याच्या कारकीर्दींतील स्वाऱ्यांतून तो बहुतेक पिछाडीस असे, व प्रत्यक्ष लढण्याचें काम आपल्या सेनापतींवर सोंपवून देई.

**६३. सर टामस रो याचें इंग्लंदचा वकील या नात्यानें आगमन**—इंग्लंदचा राजा पहिला जेम्स ह्याचा वकील ह्मणून सर टामस रो हा गृहस्थ इकडे आला होता ही जहांगिराच्या कारकीर्दींतील फार लक्षांत ठेवण्यासारखी एक गोष्ट होय. हा गृहस्थ १६१५ च्या सपटंबर महिन्यांत सुरतेस उतरला. तो बादशाहाच्या स्वारीबरोबर विंध्याद्रीवरील मांडू शहरापर्यंत गेला होता, व १६१८ सालापर्यंत

तो बादशाहाबरोबर सतत होता. त्यामुळें मोगलांच्या राज्याची स्थिति आणि बादशाह व त्याचे सरदार ह्यांचे स्वभाव, ह्यांबद्दल चांगली माहिती करून घेण्यास त्यास हवी तितकी संधि सांपडली. ही माहिती त्यानें आपल्या रोजनिशींत लिहून ठेविली आहे. तिजवरून पाहतां असें दिसतें कीं, जहांगीर हा एकंदरींत आपल्या पाहुण्यांस फार सभ्यपणानें वागवीत असे, आणि मद्यप्राशन वगैरे करावयाचें तर चार चौघे संवगडी बरोबर घेऊन मोठ्या आनंदानें करीत असे. तथापि त्याच्या एकंदर वर्तनास कलंक लावणारी जी भयंकर क्रूरता त्याचे अंगीं होती तिचींहि एकदोन उदाहरणें त्यानें तींत सांगितलीं आहेत. आतां त्याच्या पुत्रांपैकीं पारविज हा त्याच्या प्रमाणेंच दारूबाज निघण्याचा रंग दिसत होता; शहाजहान हा कावेबाज व महत्वाकांक्षी असून बहुतेक सरदार त्याचा द्वेष करीत असत, व खुशरूवर प्रेम करीत. ही सरदार मंडळी बहुतेक लांच खाण्यास तयार असे; पण हे जे परकी इंग्रज गृहस्थ त्यांच्याशीं ते चांगल्या रीतीनें वागत, व त्यांचें आदरातिथ्य चांगलें करीत. सर टामस रो ह्याच्यावर जरी जहांगीर खुष होता, तरी जेम्स राजानें पाठविलेल्या नजराण्यानें त्याची मुळींच तृप्ति झाली नाहीं; एवढ्या मोठ्या राजास तो अगदींच शोभण्यासारखा नाहीं असें त्यास वाटलें. हिंदुस्थानांत येऊन सर टामस रो ह्यास आपल्या देशासाठीं कोणतेही महात्वाचे विशेष हक्क संपादन करतां आले नाहींत ह्यास कारण हीं अगदीं क्षुद्र भेटच कदाचित् असावी. ' आपल्या राज्यांत इंग्रजांना व्यापार करण्यास मीं मोकळीक देईन असें जहांगिरानें वचन दिलें, पण तशा अर्थाचें करारपत्रक करून देण्यास तो मुळींच तयार नव्हता.

**६४. शहाजहानच्या कारकीर्दीस आरंभ, १६२७–** जहांगीर मरण पावतांच त्याच्यामागें त्याचा कनिष्ठ पुत्र शहारियर ह्यास गादी मिळावी म्हणून नूरजहान हिनें आपलें सर्व सामर्थ्य खर्च करून पाहिलें; पण तिला तिचा भाऊ असफखान हाच आडवा आला, कारण त्याचा जांवई जो शहाजहान त्याचा पक्ष त्यानें सहजच उचलिला. शहारियारचा पराजय झाला, व शहाजहानच्या हुकमानें त्यास जिवें मारिलें. ह्यापुढें नूरजहान हिचा राजकीय कामांतून संबंध अगदीं तुटला. नंतर ती अठरा वर्षेंपर्यंत जगली; पण नवरा मेला म्हणून नेहमी सुतकी पोषाक करीत असे. पण शहाजहानचा नाश करण्यासाठीं तिनें इतकी जारीची खटपट केली असतांहि, त्यानें तें मनांत न आणतां, तीस मोठें वर्षासन करून दिलें.

**६५. दक्षिणेंतील युद्ध. अहमदनगरच्या राज्याचा शेवट**–शहाजहानच्या राज्याच्या आरंभीं खानजहान नामक एक इलक्या जातीचा अफगाण दक्षिणेंत एका मोठ्या फौजेचा मुख्य होता, त्यानें बंड केलें, व आपले सैन्यानिशीं तो अहमदनगरच्या राज्यास जाऊन मिळाला. तेव्हां शहाजहान बऱ्हाणपुरापर्यंत स्वतः चालून गेला; व तेथून अहमदनगरच्या राज्यावर त्यानें तीन मोठालीं सैन्यें पाठविलीं. बादशहाची फौज पुढें येईल त्याप्रमाणें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं ह्याप्रमाणें खानजहानास पिछेहाट करावी लागली; जेथें जेथें संधि येईल तेथें तेथें निश्चयपूर्वक प्रतिरोध करण्यास त्यानें कमी केलें नाहीं. शेवटीं तो दक्षिणेंतून निघाला, पण १६३० सालीं माळव्यांत त्याचा पराजय होऊन तो मरण पावला. इकडे अहमदनगरच्या

राजाचा दौलताबाद येथें पराभव झाला. व यावेळीं त्याचें राज्य केवळ लढायांमुळेंच नव्हे तर गांठीचा ताप (प्लेग) व दुष्काळ ह्यांमुळेंहि उध्वस्त होऊन गेलें होतें. तथापि स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठीं त्यानें खटपट चालविलीच होती. कांहीं वेळपर्यंत विजापूरचा राजा त्याच्या मदतीस आला होता, व यासाठीं त्याच्या राजधानीस मोगलांनीं दोनदां वेढा दिला, पण कांहीं साधलें नाहीं. सरते शेवटीं १६३७ सालीं तो खंडणी देण्यास कबूल झाला, व त्याबद्दल त्यास अहमदनगरच्या राज्यांत पूर्वीं सामील असलेला कांहीं मुलूख तोडून दिला. तेव्हां अहमदनगरच्या राजाला एकट्यानेंच मोगलांशीं कलह चालू ठेवण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं. त्यामुळें त्या राज्यांतील बाकीचा मुलूखहि मोगलांच्या राज्यांत सामील झाला.

६६. **अफगाणिस्थानांतील युद्ध**—त्याच (१६३७) सालीं कंदाहार प्रांत परत मिळून मोगलांच्या राज्यास उत्तरेकडे आणखी भर पडली. तो प्रांत माजी बादशहाच्या कारकीर्दींत पर्शियन लोकांनीं घेतला होता, पण आतां तेथील सुभेदारानें तो मोगलांच्या स्वाधीन केला. नंतर अफगाणिस्थानच्या उत्तरेकडील बदकशान व बाल्ख हे दोन देश मोगलांनीं आपल्या राज्यांत सामील करून घेण्याबद्दल प्रयत्न केले. ह्या दोन देशांवर केलेल्या स्वाऱ्यांस कांहीं काळपर्यंत यश आलें. पण १६४७ त शहाजहानाचा तिसरा पुत्र औरंगजेब त्या मुलखाचा बंदोबस्त करण्यासाठीं तेथें राहिला होता त्याचा अगदीं पराभव होऊन त्यास मोठ्या संकटांतून काबुलास परत यावें लागलें. पुढील सालीं पर्शियन लोकांनीं कंदाहार शहर पुनः काबीज करून

घेतलें, व नंतर त्यास औरंगजेबानें दोनदां, व शहाजहानाचा ज्येष्ठ पुत्र दारा यानें एकदां, वेढा देऊन पाहिला; पण कांहीं निष्पन्न झालें नाहीं. शेवटीं १६५३ सालीं दारा हा कंदाहारास वेढा घातलेल्या सैन्यापैकीं जीवंत राहिलेल्या शिपायांनिशीं जेव्हां काबुलास परतून आला, तेव्हां शहाजहानानें शहाणपणानें असा निश्चय केला कीं, अफगाणिस्थानांत आणखी मुलूख जिंकण्याच्या भरीस इतःपर पडावयाचें नाहीं.

**६७. विजापूर व गोवळकोंडा ह्यांच्याशीं कुरापत काढून भांडण**—गोवळकोंड्याचा राजा अबदुल्ला कुतुबशाह ह्याच्या एका प्रधानास अधिकारावरून हांकून लाविलें होतें; त्यानें दक्षिणेवर नेमलेला सुभेदार औरंगजेब ह्याची मदतीसाठीं विनवणी केली; तेव्हां त्या राज्याच्या कारभारांत हात घालण्यास ही उत्तम संधि आलेली पाहून औरंगजेबानें ती मोठ्या आनंदानें साधून घेतली. पुढें अबदुल्ला जेव्हां औरंगजेबानें सांगितल्याप्रमाणें ऐकेना, तेव्हां औरंगजेबाचा ज्येष्ठ पुत्र महमद सुलतान यानें, त्याची राजधानी हैदराबाद हिजवर एकदम छापा घातला; व तो जेव्हां घाईघाईनें गोवळकोंड्याच्या डोंगरी किल्ल्यावर पळून गेला तेव्हां त्यास औरंगजेबानें स्वतः घेरून टाकिलें. वेढा उठविण्यास केलेले सर्व यत्न फुकट गेल्यामुळें त्यास मोठी खंडणी देण्यास कबूल व्हावें लागलें. पुढें विजापुरावर पाळी आली. तेथील राजा मरण पावल्यामुळें त्याच्या मागून जो गादीवर बसला त्यास तूं कायदेशिर वारस आहेस किंवा नाहींस ह्याचा आह्मास संशय आहे असें सांगण्यास शहाजहानास कोणी भर घातली; आणि त्या प्रश्नाचा निकाल करण्यासाठीं औरंगजेब बळकट

सैन्यानिशीं १६५७ त त्या राज्यावर चालून गेला, व बेदरच्या मजबूत किल्ल्यास त्यानें वेढा घातला. वेढा घातल्यावर थोडक्याच दिवसांनीं किल्ल्यांतील दारूगोळ्यास एकदम आग लागून तो उडून गेला, व त्यामुळें तो किल्ला सर झाला. तेव्हां विजापुरचा राजा नम्र होऊन तह करण्याबद्दल विनंती करूं लागला, पण ती मान्य झाली नाहीं. अशी स्थिति आली असतां, बादशाह दिल्लीस आजारी पडल्यामुळें सर्वांची नजर एकाएकीं राजधानीकडे वळली.

१८. **गादीवर हक्क सांगणारे प्रतिस्पर्धी**—शहाजहान आजारी पडतांच राज्यांत मोठा गोंधळ उडून गेला. त्याचा ज्येष्ठ पुत्र दारा ह्यास त्यानें आपल्या मागें गादीचा वारस म्हणून ठरविलेलें असून तो ह्यावेळीं दिल्लीसच होता. त्याचे बाकीचे तीन पुत्र—सुजा, औरंगजेब व मुराद—हे त्याच्यापासून दूर असून ते अनुक्रमें बंगाल, दक्षिण व गुजराथ ह्या प्रांतांचे सुभेदार होते. या चौघा भावांचे स्वभाव एकमेकांपासून फारच भिन्न होते. दाराची चालचलणूक मोठेपणाची असून जराशी फाजील अहंकाराची असे. त्याचा आजा अकबर ह्याच्या प्रमाणेंच याच्याहि अंगीं धर्मौदार्य वसत होतें. सुफी पंथाकडे, व हिंदुधर्माकडेहि त्याचा कल आहे असा लोकांस संशय होता; व त्यामुळें निःसीम मुसलमान लोक त्याच्या पक्षाला प्रतिकूल झाले होते. सुजा हा शिया पंथाचा अभिमानी असल्यामुळें, व शिवाय दारूबाज असल्यामुळें, धर्मनिष्ठ मुसलमान त्याचा द्वेषच करीत. इकडे मुराद ह्याला जरी ग्राम्य चैनींचा पुरा नाद लागलेला होता तरी तो शूर म्हणून प्रसिद्धीस आलेला होता.

१९. **बंधूबंधूंमध्यें कलह**—दारा हा कायदेशीर वारस

असूनहि त्याच्या धाकट्या भावांपैकीं कोणीहि त्याच्या अधिकारास जुमानीना. सुजा हा बंगाल्यांतून निघून राजधानीवर चालून आला, पण दारानें आपल्या मुलास त्याच्यावर पाठवून त्याचा पराजय केला. तद्वतच औरंगजेब व मुराद हे काय हालचाल करितात हें पाहण्यासाठीं बरोबर सैन्य देऊन त्यानें जसवंतसिंगास पाठविलें. औरंगजेबानें असें ढोंग केलें कीं, आपली इच्छा मुरादानें गादीवर बसावें अशी आहे. म्हणून धर्मभ्रष्ट असा जो दारा त्यानें गर्विष्ठ आणि विधर्मी जो जसवंतसिंग त्याच्या हाताखालीं देऊन जी फौज पाठविली आहे तिचा मोड करण्यास मुरादास साहाय्य करून नंतर आपण संसारत्याग करून जाणार. हें बोलणें मुरादास खरें वाटून दोघांनीं आपलीं सैन्यें माळव्यांत एकत्र केलीं, व उज्जनी नजीक लढाई होऊन तींत जसवंतसिंगाबरोबरचे रजपुत शिपाई जरी फार शौर्यानें लढले तरी त्याचा पराजय करून टाकिला.

७०. **समुगडची लढाई**—जसवंतसिंगाचा पराभव केल्यावर औरंगजेब मुरादासमवेत दारावर चालून गेला. दारा हा आग्र्यापासून एक दिवसाच्या वाटेवर समुगड ( शंभुगड? ) येथें तळ देऊन राहिला होता. तेथें दोघांची लढाई झाली. दाराचें सैन्य संख्येनें वरचढ होतें. त्याच्या फौजेंतील मुसलमान शिपाई बहुधा बिथरलेले असावे; पण रजपूत शिपायांची त्याजवर पूर्ण निष्ठा होती, व ते जिवावर उदार होऊन मोठ्या शौर्यानें लढले. औरंगजेबाच्या बाजूस सर्वांत जास्त प्रताप मुरादानें गाजविला. त्या प्रसंगीं त्याच्या हौद्यास कैंकोगणती बाण येऊन लागले होते, ह्यासाठीं बादशाही कुळांतील शौर्याचें स्मारक ह्मणून तो हौदा पुढें पुष्कळ वर्षें

राखून ठेविला होता. दाराच्या अंगीं इतकें धैर्य दिसून आलें नाहीं. आपले अत्यंत शूर शिपाई आपल्या सभोंवतीं रणांगणावर पडलेले जेव्हां त्यानें पाहिले तेव्हां तो आपल्या हत्तीवरून खालीं उतरला, आणि घोड्यावर बसून रणांगणांतून पळून गेला. त्याचा हौदा रिकामा झालेला पाहून त्याच्या सैन्याची हिंमत खचली, व सगळें सैन्य पळावयास लागलें. याप्रमाणें जय मिळाल्यावर औरंगजेबानें मुरादाची त्याच्या शौर्याबद्दल फार वाखाणणी केली, व तुझा बादशाही तक्तावर आरूढ होण्याचा समय जवळच आला आहे ह्याचा मला फार आनंद वाटतो अशा शब्दांनीं त्याचें अभिनंदन केलें.

७१. **गादीबद्दलच्या युद्धाचा शेवट**—समुगडच्या लढाईनंतर औरंगजेबानें आग्रा शहर काबीज केलें, व बादशाही सत्ता बळकाविली. तथापि शहाजहानाचा मान मरातब तो पूर्णपणें राखीत असे. दारा लाहोरास पळून गेला होता; त्याच्या पाठीस नंतर तो लागला; व हा पाठलाग चालला असतां त्यानें मुरादास फसविण्यासाठीं एवढा वेळ तोंडावर ओढलेलें ढोंगाचें कातडें काढून टाकिलें. त्याच्या बोलण्यावर फसून गेलेल्या त्या राजपुत्रास मेजवानीस बोलावून त्यानें त्यास मनमुराद दारू पाजिली; व तेणेंकरून तो बेहोष झाला असतां त्या स्थितींत त्याच्या पायांत बिड्या ठोकून त्यास कैद करून दिल्लीस पाठविलें. पण इकडे दाराचा पाठलाग सोडून धावा लागला. कारण इतक्यांत असें वर्तमान येऊन पोहोंचलें कीं, सुजा हा बळकट सैन्य घेऊन बंगाल्यांतून चालून येत आहे. तेव्हां औरंगजेब त्यास अडवा जाण्यासाठीं लागलाच मागें वळला, व दोघां

सैन्यांची गांठ अलाहाबादेनजीक कजवा मुक्कामीं पडली. जसवंतसिंग ऐन प्रसंगीं फितूर होऊन गेला; तथापि औरंगजेबानें प्रसंगावधान राखून भावावर पूर्ण जय मिळविला, व त्याच्या ११४ तोफा व तितकेच हत्ती हस्तगत करून घेतले. आतां औरंगजेबास दाराशिवाय दुसरा कोणी शत्रु राहिला नसल्यामुळें त्याच्याकडेच सर्व लक्ष्य त्यास द्यावयास सांपडलें; तेव्हां त्यानें त्याचा पुनः पराजय करून त्यास पळावयास लाविलें. पुढें लवकरच दारा सिंधप्रांतांत पकडला गेला, व औरंगजेबाच्या हुकुमावरून त्यास बेड्या घालून दिल्लीस आणिलें. तेथें त्याजवर मुसलमानी धर्मापासून भ्रष्ट झाल्याचा आरोप ठेवून त्यास फांशीं दिलें (१६५९). इकडे मुराद हा ग्वाल्हेर मुक्कामीं कैदेंत होता तेथून पळून जाण्याचा त्यानें प्रयत्न केला (१६६०), पण तो सिद्धीस गेला नाहीं. तो गुजराथचा सुभेदार असतांना त्यानें एकास जिवें मारिलें होतें. तेव्हां त्याच्या मुलांनीं तो आरोप त्याजवर आणिल्यावरून पुढें त्याची चवकशी केली, व त्याजवर खुनाची शाबिती होऊन त्याला तुरुंगांत फांशीं दिलें (१६६०).

**७२. शहाजहानाची सुंदर कारकीर्द**—शहाजहानास पुढें मरेपर्यंत नजरकैदेंत राहवें लागलें; व १६६६ च्या आरंभीं तो निवर्तला. हिंदुस्थानांतील एकंदर बादशाहांमध्यें ह्याच्या सारखा थाटमाट कोणाचाच नव्हता. युरोपांतील जे जे प्रवासी दिल्लीस येत ते ते सर्व ह्याच्या दरबारांतील भपकेदार व थाटामाटाच्या एकंदर चालीरीती, सुवर्णाचीं पात्रें, व अमूल्य रत्नखचित मयूरासन हीं पाहून चकित होऊन जात असत. पण शहाजहानाच्या एकंदर कार-

कीर्दीच्या बडेजावपणाची वरच्यापेक्षां जास्त काळपर्यंत साक्ष देईल अशी गोष्ट ह्मटली ह्मणजे त्याच्या कारकीर्दींत उभारलेल्या सुंदर इमारती ह्या होत; त्यांमध्यें दिल्ली व आग्रा येथील मशिदी, दिल्लीचा मोठा महाल, व विशेषतः त्यानें आपल्या राणीच्या सन्मानार्थ आंग्र्यानजीक बांधिलेला ताजमहाल, ह्या इमारती मोडतात. त्याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानची भरभराट इतकी होती कीं, हा सर्व थाट सिद्ध होण्यास लागणारा खर्च करण्याचें सामर्थ्य देशाच्या अंगीं त्यावेळीं वसत होतें.

**७३. हिंदुस्थानच्या इतिहासाच्या स्वरूपांत बदल**—औरंगजेब बादशाही तक्तावर १६५८ सालीं आरूढ झाला; पण पुढील सालापर्यंत त्याच्या नांवची शिरस्त्याप्रमाणें द्वाही फिरली नव्हती. त्याच्या कारकीर्दींच्या आरंभापासून हिंदुस्थानच्या इतिहासाच्या स्वरूपांत बदल झाला. हिंदुस्थानचा इतिहास ह्मटला ह्मणजे केवळ दिल्लीच्या बादशाईचा इतिहास होय, अशी तेव्हांपर्यंतची स्थिति होती; पण ती आतां बदलली. त्याच्या एकंदर बादशाही सत्तेसाठीं मोगल व मराठे ह्यांच्यामध्यें सारखा कलह चालला होता, व त्याच्या मरणानंतर पश्चिम हिंदुस्थान, व मराठ्यांच्या संयुक्त राज्याचें आदिपीठ जें पुणें त्यांस इतिहासाच्या दृष्टीनें पाहतां दिल्ली, आग्रा व हिंदुस्थान* ह्यांच्या इतकेंच महत्व प्राप्त झालें.

**७४. मराठ्यांचा उगम व उदय**—मराठे हे मूळ कोठचे कोण ह्याबद्दल बहुतेक मुळींच माहिती उपलब्ध

* नर्मदेच्या उत्तरेकडील हिंदुस्थानच्या सर्व भागास केवळ 'हिंदुस्थान' अशी संज्ञा आहे.

नाहीं. जहांगिराच्या कारकीर्दींत ते एका जातीचे हिंदू-मुसलमानांकडून हिंदूंच्या मुख्य चार जातींपैकीं कनिष्ठ जातीचे हिंदू-ह्या नात्यानें इतिहासांत प्रसिद्धीस आले. त्या सर्वांची भाषा एकच असून ते नर्मदेपासून तों कृष्णेपर्यंत पश्चिम घांटाच्या ( सह्याद्रीच्या ) खालीं व वर राहत असत. रजपुतांप्रमाणें ते जातीचे कढवय्ये नव्हते; तर शेती, व्यापार, व इतर सर्व प्रकारचे उद्योगधंदे करणारे ते लोक होते. तथापि लढाईमध्यें जीं संकटें व दुःखें अवश्यमेव सोसावीं लागतात त्यांच्याबद्दल योग्य मोबदला ह्मणून जर लूट मिळण्याचा संभव असेल, तर शिपायांचा धंदा करण्यास ते तयार होते. त्यांचा स्वभाव व स्वरूप हीं रजपुतांपासून फार भिन्न होतीं. रजपुत लोक उंच व ऐटदार ( धिमे ) असत; पण मराठे ठेंगणे व चलाख होते. रजपुताचा 'खुणेचा शब्द अब्रू होय, व त्याचें वेतन कीर्ति होय;' पण मराठा हा कीर्तीपेक्षां लुटीकरितांच विशेषतः लढत असे, व हा उद्देश साधण्यासाठीं पाहिजे त्या साधनाचा उपयोग करण्याची कला त्यास चांगली येत असे, व त्याबद्दल त्यास दिक्कतहि वाटत नसे.

७९. **शिवाजीच्या कारकीर्दीचा आरंभ**-मराठ्यांच्या मोठेपणाचा पाया घालणारा जो शिवाजी तो त्याचा बाप शहाजी ह्याची जहागीर पुणें येथें होती, त्या ठिकाणीं ल्हानाचा मोठा झाला. शहाजीचें उपनांव भोंसले हें असून तो विजापूरच्या दरबारापैकीं एक बलिष्ठ सरदार होता. शिवाजी हा सर्व प्रकारच्या शिपाईगिरीच्या कलांत लवकरच प्रवीण झाला; आणि शेजारच्या डोंगरांतून लूट करण्याच्या उद्देशानें स्वाऱ्या करून डोंगरांतून राहणारे जे दणक लोक

कीर्दीच्या बडेजावपणाची वरच्यापेक्षां जास्त काळपर्यंत साक्ष देईल अशी गोष्ट ह्मटली ह्मणजे त्याच्या कारकीर्दींत उभारलेल्या सुंदर इमारती ह्या होत; त्यांमध्यें दिल्ली व आग्रा येथील मशिदी, दिल्लीचा मोठा महाल, व विशेषतः त्यानें आपल्या राणीच्या सन्मानार्थ आग्र्यानजीक बांधिलेला ताजमहाल, ह्या इमारती मोडतात. त्याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानची भरभराट इतकी होती कीं, हा सर्व थाट सिद्ध होण्यास लागणारा खर्च करण्याचें सामर्थ्य देशाच्या अंगीं त्यावेळीं वसत होतें.

**७३. हिंदुस्थानच्या इतिहासाच्या स्वरूपांत बदल**—औरंगजेब बादशाही तक्तावर १६५८ सालीं आरूढ झाला; पण पुढील सालापर्यंत त्याच्या नांवची शिरस्त्याप्रमाणें द्वाही फिरली नव्हती. त्याच्या कारकीर्दीच्या आरंभापासून हिंदुस्थानच्या इतिहासाच्या स्वरूपांत बदल झाला. हिंदुस्थानचा इतिहास ह्मटला ह्मणजे केवळ दिल्लीच्या बादशाईचा इतिहास होय, अशी तेव्हांपर्यंतची स्थिति होती; पण ती आतां बदलली. त्याच्या एकंदर बादशाही सत्तेसाठीं मोगल व मराठे ह्यांच्यामध्यें सारखा कलह चालला होता, व त्याच्या मरणानंतर पश्चिम हिंदुस्थान, व मराठ्यांच्या संयुक्त राज्याचें आदिपीठ जें पुणें त्यांस इतिहासाच्या दृष्टीनें पाहतां दिल्ली, आग्रा व हिंदुस्थान* ह्यांच्या इतकेंच महत्व प्राप्त झालें.

**७४. मराठ्यांचा उगम व उदय**—मराठे हे मूळ कोठचे कोण ह्याबद्दल बहुतेक मुळींच माहिती उपलब्ध

* नर्मदेच्या उत्तरेकडील हिंदुस्थानच्या सर्व भागास केवळ 'हिंदुस्थान' अशी संज्ञा आहे.

नाहीं. जहांगिराच्या कारकीर्दीत ते एका जातीचे हिंदू—मुख्यत्वेंकरून हिंदूंच्या मुख्य चार जातींपैकीं कनिष्ठ जातीचे हिंदू—ह्या नात्यानें इतिहासांत प्रसिद्धीस आले. त्या सर्वांची भाषा एकच असून ते नर्मदेपासून तों कृष्णे-पर्यंत पश्चिम घांटाच्या ( सह्याद्रीच्या ) खालीं व वर राहत असत. रजपुतांप्रमाणें ते जातीचे लढवय्ये नव्हते; तर शेती, व्यापार, व इतर सर्व प्रकारचे उद्योगधंदे करणारे ते लोक होते. तथापि लढाईमध्यें जीं संकटें व दुःखें अवश्यमेव सोसावीं लागतात त्यांच्याबद्दल योग्य मोबदला ह्मणून जर लूट मिळण्याचा संभव असेल, तर शिपायांचा धंदा करण्यास ते तयार होते. त्यांचा स्वभाव व स्वरूप हीं रजपुतांपासून फार भिन्न होतीं. रजपुत लोक उंच व ऐटदार ( धिमे ) असत; पण मराठे ठेंगणे व चलाख होते. रजपुताचा ‘ खुणेचा शब्द अब्रू होय, व त्याचें वेतन कीर्ति होय; ’ पण मराठा हा कीर्तीपेक्षां लुटीकरितांच विशेषतः लढत असे, व हा उद्देश साधण्यासाठीं पाहिजे त्या साधनाचा उपयोग करण्याची कला त्यास चांगली येत असे, व त्याबद्दल त्यास दिक्कतहि वाटत नसे.

७९. **शिवाजीच्या कारकीर्दीचा आरंभ**—मराठ्यांच्या मोठेपणाचा पाया घालणारा जो शिवाजी तो त्याचा बाप शहाजी ह्याची जहागीर पुणें येथें होती, त्या ठिकाणीं लहानाचा मोठा झाला. शहाजीचें उपनांव भोसले हें असून तो विजापूरच्या दरबारापैकीं एक बलिष्ठ सरदार होता. शिवाजी हा सर्व प्रकारच्या शिपाईगिरीच्या कलांत लवकरच प्रवीण झाला; आणि शेजारच्या डोंगरांतून लूट करण्याच्या उद्देशानें स्वाऱ्या करून डोंगरांतून राहणारे जे टणक लोक

( मावळे ) त्यांची मर्जी त्यानें संपादन केली. पुण्याच्या आसपासचे तोरणा, सिंहगड, व पुरंदर हे मजबूत डोंगरी किल्ले त्यानें प्रथम घेतले, व अशा रीतीनें त्यानें आपल्या सत्तेचा पाया घातला. त्यावेळीं पुणेंप्रांत विजापूर सरकारच्या अमलाखालीं होता; पण त्यांनीं प्रथम त्यास सांगण्यासारखा प्रतिरोध केला नाहीं. शेवटीं कांहीं सरकारी माल घेऊन जाणाऱ्या शिपायांच्या टोळीस त्यानें लुटिलें, आणि घांटाखालीं उतरून उत्तरकोंकण काबीज केलें. ह्या गोष्टी जेव्हां घडून आल्या, तेव्हां शिवाजीच्या बापास विश्वासघातानें पुण्यास पकडिलें; व ह्याप्रमाणें त्यास ओलीस धरिलें असतां शिवाजीस अर्थात् ज्यास्त हालचाल करण्यास शंका वाटूं लागली.

७१. **शिवाजीचें विजापुरशीं युद्ध**—पुढें तीनचार वर्षांनीं ( १६५३ त ) जेव्हां शहाजीस मोकळें केलें, तेव्हां शिवाजीनें विजापुर सरकारच्या मुलखावर हल्ले पुनः सुरू केले. सरते शेवटीं १६५९ सालीं त्या सरकारानें शिवाजीस चिरडून टाकण्याचा निश्चय केला. अफजुल नामक त्यांचा एक अत्यंत प्रसिद्ध सरदार महाबळेश्वरानजीक प्रतापगड नामक किल्ला आहे तेथपर्यंत चालून आला. तेथपर्यंत त्यास कोणी आडवें आलें नाहीं. पण या ठिकाणीं शिवाजीनें भेटीचा लाभ व्हावा अशी त्या सरदाराची नम्रतापूर्वक विनवणी केली, व तीस तो मान्य झाला. ते दोघेहि एकेक हुजऱ्या बरोबर घेऊन आपल्या दोघांच्याहि सैन्यांपासून दूर अशा जागीं एकमेकांस भेटले; व त्यांनीं एकमेकांस आलिंगन दिलें असतां, शिवाजीनें वाघनख नामक एक शस्त्र मुठींत लपवून आणिलें होतें त्याचीं तीक्ष्ण

टोंक अफझुलखानाच्या बरगड्यांत खुपसलीं. अशा रीतीनें तो मुसलमान सरदार मेल्याबरोबर मराठे चोहोंकडे छपून बसले होते ते एकदम मुसलमानांवर घुसले. विजापूरच्या सैन्यापैकीं पुष्कळ लोक मारले गेले; मेलेल्यांपेक्षांहि ज्यास्त लोक कैद झाले, आणि हत्ती, घोडे, खजिना व सामानसुमान शिवाजीच्या हातीं लागलें. पुढच्या दोन सालांत विजापुरचीं आणखी दोन सैन्यें स्वारी करून घांटावर आलीं. शेवटीं १६६२ त दोघांचा तह झाला, व त्या तहांत कल्याणापासून तों गोव्यापर्यंत सर्व कोंकणप्रांत, आणि पुण्यापासून तों कृष्णेपर्यंत सर्व घाटमाथा व दक्षिणचा भाग इतका मुलूख शिवाजीचा होय ही गोष्ट विजापूर सरकारानें कबूल केली. ह्या मुलखांतून त्याला ७,००० घोडेस्वार व ५०,००० पायदळ इतकी फौज प्राप्त झाली.

७७. **सरदार शाइस्तेखान. सुरत शहराची लूट**—नंतर दोनतीन वर्षेपर्यंत (१६६२–६५) शिवाजीनें मोगलांशीं युद्ध चालविलें होतें असें आढळून येतें. दिल्लीच्या बादशाहाचा दक्षिणेंतील सुभेदार शाइस्तेखान हा जेव्हां जबरदस्ती करून १६६२ त पुण्यांत शिरला, तेव्हां शिवाजी सिंहगडच्या किल्ल्यांतून पाळत राखीत होता, तेथून त्यानें थोडे लोकांनिशीं येऊन त्याच्या वाड्यांत एकदम शिरून त्याच्या पुत्रास ठार केलें. शाइस्तेखानानें त्वरित पळ काढून आपला जीव बचाविला, पण त्या घाईंत त्याचीं दोन बोटें छाटलीं गेलीं. १६६४ सालीं मोगल सरदारांचा डोळा चुकवून शिवाजी एकाएकीं सुरतेवर चालून गेला. तेथील मोगल सुभेदार किल्ल्याचे दरवाजे बंद करून लपून बसला, व सहा दिवसपर्यंत मराठ्यांनीं तें

संपत्तिमान् शहर लुटलें. त्या शहरांत इंग्लिश व डच ह्यांच्या वखारी होत्या त्या मात्र मराठ्यांस लुटावयास सांपडल्या नाहींत. इंग्लिशांच्या वखारीचा मुख्य सर जॉर्ज आक्सिंडेन ह्यानें सुरतेंतील इंग्रजांचेंच केवळ रक्षण केलें असें नाहीं, तर पुष्कळ एतद्देशीय लोकांचेंहि संरक्षण केलें, व ह्या कामगिरीबद्दल औरंगजेबानें इंग्रजांस त्यांच्या मालावरच्या जकातीचा कांहीं भाग माफ केला. सांपडलेली लूट शिवाजीनें आपली नवी राजधानी रायगड एथें नेली; त्या ठिकाणीं त्यानें आतां राजा ही पदवी विधिपूर्वक धारण केली, व आपल्या नांवचें नाणें पाडण्यास सुरवात केली.

७८. **शिवाजीचें दिल्लीस गमन**—१६६५ त मोगलांचीं सैन्यें इतकीं बलिष्ठ झालीं कीं तीं शिवाजीस आवरेनात. तेव्हां त्यानें वाऱ्यास मान देऊन आपल्या किल्ल्यांपैकीं पुष्कळ किल्ले मोगलांस दिले, आणि विजापुरावर औरंगजेबाची फौज जात होती तिच्या सहाय्यास १०,००० लोक पाठविले. ह्या मराठे लोकांनीं ह्या प्रसंगीं आपलें काम इतकें उत्तम बजाविलें कीं, औरंगजेबानें खुष होऊन शिवाजीस दिल्लीस निमंत्रण केलें. सांगण्यास चमत्कार वाटतो कीं, शिवाजीनें तें निमंत्रण स्वीकारिलें, व ५०० घोडेस्वार व १००० पायदळ ह्यांनिशीं तो दिल्लीस गेला. तेव्हां त्याला एकाद्या सन्मान्य पाहुण्याप्रमाणें वागविण्याच्या ऐवजीं त्याचा औरंगजेबानें केवळ नांवाचा सत्कार केला. आपण येथें येऊन संकटांत पडलों हें शिवाजीच्या लक्ष्यांत आलें, व त्यांतून निसटून जाण्याचा त्यानें निश्चय केला. दिल्लीची हवा आपल्या बरोबरच्या लोकांस मानवत नाहीं ह्या मिषानें त्यांस त्यानें प्रथम स्वदेशीं पाठविलें. ह्याप्रमाणें आपल्या

कवाजम्याच्या सुरक्षितपणाची तजवीज केल्यानंतर तो मोगल पाहरेकऱ्यांच्या डोळ्यांदेखत एका हाऱ्यांत बसून पळूनच गेला; त्या हाऱ्यांत मिठाई भरलेली आहे अशी त्या पाहरेकऱ्यांची समजूत होऊन त्यांनीं प्रतिबंध केला नाहीं. नंतर वाटेंत अनेक प्रकारचीं सोंगें घेऊन तो रायगडास जाऊन पोहोंचला (१६६६); तेथें जाण्यास त्यास नऊ महिने लागले.

७९. **शिवाजीच्या सत्तेची वाढ**—शिवाजी दिल्लीहून सुटून आल्यानंतरच्या सालीं मोगलांनीं विजापुरावर स्वारी केली, पण त्यांत त्यांस यश आलें नाहीं, व त्यामुळें त्यांच्या दक्षिणेंतील सत्तेस जरासा धक्का बसला. ही संधि साधून शिवाजीनें १६६९ त मोगलांस दिलेले किल्ले व प्रांत परत घेतले. शेवटीं तह झाला तेव्हां शिवाजीला राजा ही पदवी धारण करण्याचा हक्क आहे ही गोष्ट औरंगजेबास मान्य करावी लागली. नंतर शिवाजीनें गोवळकोंडा व विजापूर येथील राजांकडून वार्षिक खंडणी देऊं अशी कबुली करून घेऊन त्यांच्याशीं चालविलेली लढाई बंद केली. १६७० सालीं मोगल व मराठे यांच्यामध्यें पुनः युद्ध सुरू झालें. त्या युद्धांत शिवाजीचा सरदार तानाजी मालुसरे हा रात्रीची वेळ साधून सिंहगडाचे खडकाळ तट हातापायांनीं चढून गेला, व शत्रूंवर हल्ला करीत असतां ठार झाला. हें वर्तमान जेव्हां शिवाजीस समजलें तेव्हां त्यानें असे उद्गार काढिले:—"गुहा हातीं आली, पण सिंह मारला गेला, आह्मांस किल्ला मिळाला, पण अरेरे! आमचा तानाजी मालुसरे गमावला." ह्या पराक्रमाच्या कृत्यानें मराठ्यांना विशेष जयश्री आली, आणि १६७२ सालीं मोगलांच्या २०,००० सैन्यावर भर

समरांगणांत त्यांनीं जय मिळविल्यामुळें त्यांची हिम्मत विशेषच वाढली.

८०. **हिंदूंचा छळ**—औरंगजेब जसजसा वृद्ध होत चालला तसतसें त्याचें धर्मवेड वाढत चाललें. जत्रा भरणें, वाद्यें वाजविणें, नाच करणें, वगैरे हिंदुधर्माचा निकट संबंध असणाऱ्या ज्या चालीरीती त्या बंद करण्यासाठीं त्यानें पुष्कळ कायदे केले. प्रांतांच्या सुभेदारांस त्याचा असा हुकूम असे कीं, सरकारी अधिकाराच्या जागा फक्त मुसलमानांसच द्याव्या. ह्या सर्व कायद्यांमुळें हिंदूंच्या मनांत फार असंतोष उत्पन्न झाला, व १६७७ सालीं तो ज्यास्तच वाढला. कारण प्रत्येक पाखंड्यानें द्यावयाचा जो जेझिया नामक कर, जो अकबरानें काढून टाकिला होता, तो औरंगजेबानें ह्या सालीं पुनः बसविला. तेव्हां हिंदु लोकांनीं दिल्लीच्या रस्त्यांतून सर्वत्र गोळा होऊन हा कर बंद करण्याविषयीं बादशाहाची विनवणी केली, पण त्यांच्या प्रार्थनेकडे त्यानें मुळींच लक्ष्य दिलें नाहीं.

८१. **रजपुतांशीं युद्ध. राजकुमार अकबर ह्याचें बंड**—१६७९ सालीं जोधपुर व उदेपुर येथील रजपुतांशीं जें युद्ध सुरू झालें त्याचें मुख्य कारण ह्या जुलमी कायद्यांनीं त्यांच्या मनांत उत्पन्न केलेला असंतोष हें होय. १६८० सालीं औरंगजेबाच्या तीन पुत्रांनीं तीन फौजा बरोबर घेऊन रजपुतांवर एकोप्यानें हल्ला केला, व त्यामुळें त्यांस आश्रयासाठीं डोंगरांतून रहावयास जावें लागलें. पण इकडे राजपुत्र अकबर हा आपल्याबरोबर सर्व सैन्यानिशीं जेव्हां फितूर होऊन रजपुतांस जाऊन मिळाला, व त्यांनीं जेव्हां बादशाह म्हणून त्याच्या नांवची द्वाही फिरविली, तेव्हां

एकाएकीं पारडें अगदीं फिरून गेलें. त्याची व त्याच्या रजपूत सेन्यांची मिळून एकंदर ७०,००० फौज ह्या वेळीं त्याच्या हाताखालीं होती. एवढें प्रबळ सैन्य बरोबर घेऊन तो आपल्या बापावर चालून गेला; त्यासमयीं त्याच्या-(औरंगजेबाच्या) पाशीं फारच थोडे लोक होते; आणि इतक्यांत त्याचा पुत्र मोअज्जिम १०,००० घोडेस्वारांनिशीं जरी त्यास येऊन मिळाला, तरी त्याच्या जिवावरचें संकट निवारण झालें असें वाटेना. असें होतें तरी औरंगजेब निराश झाला नाहीं. अकबराच्या सैन्यांत जे मोगल होते त्यांस त्यानें विनवून पाहिलें; तेव्हां ते जसे प्रथम थोड-क्याश्या चिथवणीवरून फितूर होऊन त्याच्या पक्षास सोडून गेले होते, तसेच, आतां थोडक्याशा आर्जवानें त्याच्या पक्षास परत येऊन मिळाले. असें झालें तेव्हां अकबरापाशीं काय ते रजपुतच शिल्लक राहिले; व पुनः एकत्र झालेल्या मोगल सैन्याशीं सामना करण्याइतकें सामर्थ्य त्यांच्या अंगीं नव्हतें. तेव्हां अकबर मराठ्यांकडे पळून गेला, पण रज-पुत मोगलांशीं लढतच राहिले. नंतर लवकरच त्यांचा व औरंगजेबाचा तह झाला, व त्यामध्यें असें ठरलें कीं, उदेपु-रच्या राण्यानें जेझिया कर देण्याच्या ऐवजीं कांहीं मुलूख तोडून द्यावा. पण हा तह तत्पुरताच होता; रजपुत लोक औरंग-जेब मरेपर्यंत त्याच्यावर असंतुष्टच राहिले, व त्यांच्या मनांतील वैरभाव नाहींसा झाला नाहीं.

८२. शिवाजीच्या कारकीर्दीचा शेवट—१६८० सालीं घोड्यावर बसून जाऊन अत्यंत कष्ट केल्यामुळें आजारी पडून शिवाजी निवर्तला. मरणसमयीं त्याचें वय ५३ वर्षांचें होतें. त्याच्या कारकीर्दीच्या शेवटच्या शेव-

टच्या वर्षांत त्याची सत्ता आणि वैभव हीं दोन्ही पूर्वीपेक्षांहि वृद्धिंगत झालीं होतीं. १६७४ सालीं रायगड किल्ल्यावर त्याला पुन: मोठ्या थाटानें राज्याभिषेक झाला. मोगल बादशाहांच्या चालीचें अनुकरण करून त्यानें आपली सुवर्ण-तुला केली, व तें सोनें गरीबगुरीबांस वांटून दिलें. आपला राज्यकारभार हिंदुपद्धतीचा आहे हें व्यक्त व्हावें ह्मणून त्यानें आपल्या कामदारांचे पर्शियन किताब काढून टाकून त्यांस त्यांच्या ऐवजीं संस्कृत किताब दिले. द्वितीय राज्याभिषेकाच्या समयीं, मुंबई इलाख्याचा वकील या नात्यानें हेन्री आक्सिडेन नांवाचा एक साहेब तेथें हजर होता; त्यानें इंग्रजांना मराठ्यांच्या मुलखांत व्यापार करण्याची परवानगी शिवाजीपासून मिळवून दिली. १६७६ सालीं ३०,००० घोडेस्वार व ४०,००० पायदळ इतक्या फौजेनिशीं शिवाजी कर्नाटकांत गेला, तेथें त्यानें जिंजी व वेलोर हे किल्ले घेतले, व आपला धाकटा भाऊ व्यंकोजी याजपासून आपल्या बापाची जहागीर परत मिळविली. १६७९ त त्यानें मोगलांस विजापुरचा वेढा उठविण्यास भाग पाडिलें, व असें सहाय्य केल्याबद्दल कृष्णेच्या पलीकडचा आणखी कांहीं मुलूख विजापुर सरकारापासून प्राप्त करून घेतला. पुढच्या सालीं त्यानें देह ठेविला.

८३. **शिवाजीचें स्वभावस्वरूप, व त्याच्या राजनीतीचें धोरण**–शिवाजी हा एक बलिष्ठ राजा कसा होऊन बसला, व त्यानें हिंदुस्थानांत एका नव्या राष्ट्राची स्थापना कशी केली; ह्या प्रश्नांचा विचार आतां आपण केला पाहिजे. आपल्या कारकीर्दीच्या अगदीं आरंभापासून त्यानें स्वतःच्या शौर्यानें, मोहक वर्तनानें, आणि पुढारीपणाचें

काम मोठ्या चतुराईनें करून, आपल्या अनुयायांचीं मनें इतकीं वश करून घेतलीं होतीं कीं, ते त्याच्यासाठीं जीव देण्यास तैयार असत. शिवाजी जसजसा मोठा मोठा होत चालला, व मराठ्यांच्या राष्ट्राचा मुख्य स्तंभ व धर्मसंरक्षक ह्मणून पुढें येत चालला, तसतशी ही त्यांची भक्ति जास्तच दृढ होत चालली. त्यानें युद्धांतून जे जय मिळविले ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं आपले लोक फार चलाखीनें नेऊन, अगोदर बरोबर वेत ठरवून त्याप्रमाणें एकदम छापे घालून, आणि शत्रूंना अन्नाचा वगैरे पुरवठा होण्याचे मार्ग वरचेवर बंद करून टाकून मिळविले. तो भर समरांगणांत मोठी फौज उभी करून शत्रूशीं लढाई करण्याचें टाळीत असे, कारण मराठे हे लहान लहान टोळ्या करून आकस्मिक घाले वगैरे घालण्याच्या कामास जास्त योग्य आहेत हें त्यास पक्कें माहीत होतें. आपल्या लष्करांतील शिपायांना तो मोठाले पगार देई, पण जी जी मोलाची चीज लुटींत सांपडेल ती प्रत्येक सरकारी खजिन्यांत आणून जमा केली पाहिजे असा त्याचा कायदा असे. त्याची परराज्याशीं व्यवहार करण्याची पद्धतिहि फार चतुराईची होती, ह्मणून चांगल्या व्यवस्थेनें ठेविलेलें जें हें त्याचें सैन्य त्याच्या बळाचा अपव्यय निरर्थक अशा साहसी कृत्यांतून कधींच झाला नाहीं. जरी त्यानें मोगलांना पुष्कळ वेळां चांगलाच हात दाखविला होता, तरी होईल तितकें करून तो त्यांच्याशीं निकरानें लढण्याची पाळी टाळीत असे. त्याच्यापेक्षां, आंतल्या आंत अनेक फाटाफुटी झाल्यामुळें, व मोगलाच्या वैरामुळें निर्बल झालेलें जें विजापुरचें राज्य, त्याच्यावर हल्ले करून

मुलूख संपादन करणें त्यास पसंत पडे. आतां हें आपलें धोरण साधण्याच्या कामीं त्यास कावेबाजपणा करावा लागत असे, व दिक्कतखोरपणा एकीकडे गुंडाळून ठेवावा लागे हें खरें आहे. अफ़ुजुल्खानाचा मृत्यु हा एक त्याच्या कारकीर्दीवर मोठा डाग आहे, पण त्या प्रसंगीं देखील त्यानें स्वदेश व स्वधर्म यांजकरितां आपला जीव निःशंकपणें धोक्यांत घातला होता. आपल्या शत्रूंच्या बायकांमुलां- वर तो नेहमींच दया करीत असे. त्याची स्वधर्मावर जरी भक्ति होती तरी त्यामुळें तो दुसऱ्यांच्या धर्माचा अपमान करीत नसे. मशिदींचा तो मान राखी, व कुराणाचीं पुस्तकें हल्ल्यांत हातीं आल्यास परत देई. आतां आपलें राजनीतीचें धोरण संभाळण्यासाठींच तो असें करीत असे हें कांहीं अंशीं खरें असेल, पण त्याचें अंतःकरण कोमल व दयाळू असलेंच पाहिजे; एरवीं तो जितका प्रिय झाला होता तितका झाला नसता. त्याचा द्वेष करणारा एक इतिहासकार त्याच्याविषयीं एक मनोरंजक गोष्ट सांगतो, ती अशी कीं, त्यानें एकाद्या विहिरीनजीक एकाद्या बांका- वर बसून पाणी काढावयास बायका येतील त्यांच्याशीं त्या आपल्या जणूं काय आयाबहिणीच आहेत अशा रीतीनें गप्पा गोष्टी करीत बसावें, व त्यांच्या मुलांस खावयास फळफळावळ द्यावी. हा जो मोठा मराठा वीर त्याच्या- विषयीं जेव्हां आपण विचार करावयास लागतों तेव्हां राय- गडावरील विहिरीनजीक बायकांमुलांशीं तो गप्पा मारीत बसला आहे, अशी त्याची प्रतीमा मनापुढें आपण कधीं कधीं आणूं या; व अफ़ुजुलखानाचा जीव घेण्यासाठीं त्यानें त्यास मिठी मारिली आहे, अशाच प्रकारची नेहमी नको.

**८४. संभाजीचें राज्यारोहण**—शिवाजीच्या मागून त्याचा ज्येष्ठ पुत्र संभाजी हा गादीवर बसला. तो शूर माणूस होता; पण तो दुराचारी व क्रूर आहे ही गोष्ट इतकी महशूर झालेली होती कीं, त्यास एकीकडे ठेवून त्याचा कनिष्ठ बंधु राजाराम ह्यास गादी द्यावी अशाबद्दल खटपट झाली. पण ती फसली, व त्या कटांत सामील असलेल्या लोकांची त्यानें मुळींच दया केली नाहीं. बापाचा खजिना संभाजीनें जंजिऱ्याबरोबर निष्फळ युद्ध करण्यांत व प्रत्येक प्रकारच्या कुकर्मांत ओतन टाकिला. लवकरच आपल्या मराठा फौजेला पगार देण्याची त्याला पंचाईत पडूं लागली, शिवाजीनें लष्करांत स्थापन केलेली शासनपद्धति ढील पडूं लागली, आणि राज्यकारभारांत पुष्कळ प्रकारची अव्यवस्था होऊं लागली. १६८३ सालीं अशा थरास गोष्ट आली असतां औरंगजेबानें उदेपूरशीं तह करून, मोठ्या फौजेनिशीं दक्षिणेंत प्रवेश केला.

**८५. विजापुर व गोवळकोंडा ह्यांचा पाडाव**—दक्षिण जिंकून टाकण्याच्या औरंगजेबाच्या यत्नास कांहीं दिवसपर्यंत यश आलें नाहीं. राजपुत्र मोअज्जिम यानें १६८४ सालीं कोंकणावर केलेली स्वारी, व राजपुत्र अझम यानें १६८५ सालीं विजापुरावर केलेली स्वारी ह्या दोन्हींस सारखेंच अपयश आलें, पण यांपैकीं दुसऱ्या सालीं मराठ्यांनीं बऱ्हाणपुर हें मोठें शहर जाळिलें. शेवटीं, १६८६ च्या अखेरीच्या सुमारास औरंगजेबानें विजापुर शहर घेतलें, आणि अशा रीतीनें त्या राज्यांत एकदां भगदाड पाडिल्यावर, जो जय मिळवीत सुटला तो तेथील गादीचा मालक होऊन थांबला. तेथील तरुण राजा शिकंदर

अदिलशाह ह्यास दौलताबादेस नेऊन ठेविलें. तदनंतर यात्रेच्या मिषानें औरंगजेब गोवळकोंड्याच्या मुलखांत शिरला. गोवळकोंड्याचा राजा अबुल हसन यानें आपली फौज फितूर होऊन आपणास सोडून गेली असतांहि सात महिने पर्यंत आपल्या डोंगरी किल्ल्याचा बचाव मोठ्या शौर्यानें केला. शेवटीं किल्ला मोगलांनीं सर करून घेतला, व अबुल हसन-यास कैदी करून दौलताबादेस शिकंदर अदिलशाहाच्या सोबतीस पाठवून दिलें, (१६८७).

**८६. विजापुर व गोवळकोंडा यांच्या पाडावाचे परिणाम**—आजपर्यंत सरासरी दोनशें वर्षेपर्यंत टिकाव धरून राहिलेल्या दोन प्रसिद्ध राज्यांचा मागोमाग दोन सालांत औरंगजेबानें याप्रमाणें समूळ पाडाव केल्यामुळें आतां त्याची सत्ता व वैभव हीं दोन्ही कळसास जाऊन पोहोंचलीं आहेत असा भास होऊं लागला. तो आतां हिंदुस्थानांतील सर्व मुसलमानी मुलखाचा मालक होऊन बसला होता. पण वरील दोन राज्यांच्या राजधान्या जरी काबीज झाल्या होत्या, तरी त्यांच्या इतर मुलखांतील सर्व लोकांत एक प्रकारची बेबंदशाही व असंतोष हीं शिरलेलीं होतीं; त्यामुळें त्यांच्यापासून मोगल बादशाईची बळकटी किंवा संपत्ति ह्यांच्यांत वास्तविक भर कांहींच पडली नाहीं. त्या राज्यांतील फौजांतल्या लोकांस नोकरीवरून आतां फांटा मिळाल्यामुळें मुसलमानांचें शत्रु जे मराठे त्यांजकडे ते गेले, व त्यांनीं त्यांस आपल्या सैन्यांत ठेवून घेतलें. ह्या दोन राज्यांच्या पाडावापासून दुसरा एक कुपरिणाम असा झाला कीं, राजपुत्र मोअज्जिम हा तेथील बंदिस्थ राजांची कींव करितो असें पाहून औरंगजेबास त्याच्याबद्दल संशय

उत्पन्न होऊन त्यानें त्यास सरासरी सात वर्षेंपर्यंत कैदेंत ठेविलें.

८७. **संभाजीचा मृत्यु. राजारामाचा कारभार**–१६८९ सालीं संभाजीस मुसलमान घोडेस्वारांच्या एका ल्हानशा टोळीनें पकडिलें. त्यास जेव्हां औरंगजेबापुढें धरून नेलें तेव्हां त्यानें असें कांहीं दांडगाईचें भाषण केलें कीं औरंगजेबास चीड येऊन, रानटी माणसास शोभेल अशा क्रूर रीतीनें त्यानें त्यास ठार मारविलें. त्याचा मुलगा शाहू यास याच वेळीं मोगलांनीं पकडिलें होतें, पण संभाजीच्या मागें तोंच गादीचा मालक असें मराठ्यांनीं ठरवून त्याचा चुलता राजाराम यास राज्याचा कारभार पाहण्यास त्याचा प्रतिनिधि ह्मणून नेमिलें. पण फंदफितूर होऊन रायगड जेव्हां मोगलांच्या ताब्यांत गेला, तेव्हां राजाराम दूरचा कर्नाटकांतील जो जिंजी किल्ला तेथें निघून गेला. पुढें पुष्कळ वर्षें युद्ध चाललें, पण मराठ्यांनीं शत्रूसमोर समरांगणांत उभें राहून लढाईचा प्रसंग आणिला नाहीं. शेवटीं १६९८ त जिंजीचा किल्ला मोगलांनीं घेतला, पण राजाराम त्यांच्या हातीं सांपडला नाहीं.

८८. **औरंगजेबाच्या कारकीर्दीचीं अखेरचीं वर्षें**–१६८८ सालापासून मरे तोंपर्यंत औरंगजेब मराठ्यांशीं लढाया करीत दक्षिणेंतच राहिला. पैकीं बरींच वर्षें भीमेच्या कांठीं ब्रह्मपुरी येथील तळासारखे सैन्याचे विशाळ तळ देऊन त्यांतच त्यानें काढिलीं. ह्या ब्रह्मपुरीच्या तळावर एकदां असें झालें कीं, भीमेस मोठा पूर येऊन त्यासरशीं १२,००० माणसें, आणि अगणित घोडे व गुरेंढोरें वाहून गेलीं. मराठ्यांस चेंगरून टाकण्यासाठीं

शेवटचा महा प्रयत्न करण्याच्या उद्देशानें जेव्हां तो ही छावणी सोडून निघाला, तेव्हां त्याचे सरदार तेथें कित्येक वर्षे घराप्रमाणें राहिले असल्यामुळें तें सोडून लढाईचे कष्ट सोसण्यास निघण्याचें त्यांच्या जिवावर आलें. औरंगजेबानें नवी युक्ति अशी काढिली होती कीं, आपल्या सैन्याचे दोन भाग करावयाचे; व त्यांपैकीं एकास डोंगरी किल्ल्यांवर हल्ले करावयास पाठवावयाचें, व दुसऱ्यानें मैदानांतच लढाया करीत रहावयाचें. कांहीं वेळपर्यंत त्याच्या ह्या खटपटीस यश येत गेलें. त्यानें राजारामाची राजधानी सातारा १७०० सालीं घेतली, व मराठ्यांचे दुसरे डोंगरी किल्ले पुढच्या दोन तीन सालांत सर केले. पण जसजशीं जास्त वर्षे लोटत गेलीं, तसतसें त्यांचें सैन्य थकत चाललें, व खजिनाही रिकामा होत गेला. जेव्हां राजाराम मेला तेव्हां त्याची बायको ताराबाई ही आपला तान्हा पुत्र दुसरा शिवाजी ह्याच्या नांवानें कारभार पाहूं लागली, व तिनें तो शहाणपणानें चालविला. इतक्यांत दैवाची लाट उलटूं लागली, मराठ्यांचे पुष्कळ किल्ले त्यांच्या हातीं परत आले, आणि मोगलांच्या फौजेची हिम्मत ज्यास्त ज्यास्त खचत चालली. शेवटीं औरंगजेबास मोठ्या लाजिरवाण्या रीतीनें परत अहमदनगरास पळ काढावा लागला, तेथें तो १७०७ सालीं आपल्या वयाच्या ८९ व्या वर्षी मरण पावला.

**८९. औरंगजेब आणि अकबर यांच्यामधील तफावत**—स्वभावस्वरूप व राजनीतीचें धोरण ह्या दोन्ही बाबतींत ह्या दोन बादशाहांमध्यें विलक्षण तफावत दिसून येते. अकबरानें राज्य केलें तें हिंदु व मुसलमान ह्या दोघां-च्याहि कल्याणासाठीं ह्मणून केलें. पण हिंदू हे मुसलमानां-

पेक्षां हलके असल्यामुळें ते सरकारी हुद्यांचीं कामें करण्यास नालायक होत; तर, उलट राज्यकर्ते जे मुसलमान त्यांच्या फायद्यासाठीं त्यांच्यावर मोठाले कर लादणें हेंच योग्य होय; असें औरंगजेबाचें मत व वर्तन होतें. अकबराची परधर्मसहिष्णुता इतकी होती कीं, त्यानें मुसलमानी धर्म सोडिला आहे कीं काय अशी शंका लोकांस उत्पन्न झाली होती. औरंगजेबास असें वाटे कीं, हिंदुधर्म ह्मणजे निव्वळ मूर्तिपूजेचा एक हानिकारक प्रकार होय; व याकरितां आपल्या हातीं असेल त्या प्रत्येक साधनाची योजना करून त्याचें निर्मूलन केलें पाहिजे. शिवाय, ज्या ज्या बाबतींत त्याची महत्वाकांक्षा आड न येईल त्या त्या बाबतींत तो आपलें खाजगी व सार्वजनिक वर्तन कुराणांतील वचनांस अनुसरून ठेवीत असे. तो दांभिक होता असा त्याच्यावर आरोप आणितात, आणि खरोखरच पुसाल तर त्याची धर्मश्रद्धेच्या संबंधाची बढाई व बंधूशीं क्रूर वर्तन ह्या दोहोंमधील तफावत पाहून मनास उद्वेग उत्पन्न होतो. त्याचें अंतःकरण मायाविहीन होतें; आणि जरी त्याचा धर्मावर विश्वास असला, तरी महत्वाकांक्षेच्या भरांत त्यानें निष्कारण असे कांहीं गुन्हे केले कीं त्यांपासून त्यास अलिप्त ठेवण्यास पुरेसा दृढ तो नव्हता, व तसल्या अपराधांचा अकबराच्या मायाळू अंतःकरणास खरोखर अत्यंत तिटकारा आला असता. ह्या सर्व गोष्टी जरी खऱ्या आहेत तरी औरंगजेब हाडाचाच दुष्ट नव्हता. पुष्कळ वेळां योग्य शिक्षा करण्यास देखील तो नाखुष असे, आणि संभाजीच्या उद्धटपणामुळें त्याला चीड येऊन जरी त्यानें त्याच्याशीं क्रूरपणानें वर्तन केलें, तरी त्याच्या मुलास त्यानें दयाळूपणानें वाग-

विलें. औरंगजेब कावेबाज व आंतल्या गांठीचा होता, पण अकबर निष्कपटी व मोकळ्या मनाचा होता. अकबराचे पुष्कळ विश्वासू मित्र असून ते त्याच्या चांगल्या उपयोगी पडले होते, पण औरंगजेब इतका संशयी असे कीं, त्याचा पूर्ण विश्वास कोणावरच नव्हता; व यामुळें त्याच्या विस्तृत राज्याची व्यवस्था त्याला बहुतेकांशीं एकट्यालाच पहावी लागे. अकबर व औरंगजेब दोघेहि शूर पुरुष होते. पैकीं औरंगजेबाचें शौर्य मन घट्ट ठेवणें, स्थिर प्रसंगावधान राखणें, व संकटें आणि अडचणी हीं आलीं असतां न डगमगतां निश्चयानें वागणें इत्यादि रूपांनीं व्यक्त होत असे, पण अकबरास खुद्द संकटाचीच आवड वाटे, आणि त्याची पराक्रमेच्छा कधीं कधीं इतकी बलवत्तर होई कीं, त्यास अविचारी ह्मणावें कीं काय असा पाहणारास संशय उत्पन्न होई.

---

## भाग ५ वा.

## मोगल बादशाईची अवनति व लय.

९०. **मोगल बादशाईची फाटाफूट. बहादुरशाह**—औरंगजेब निवर्तल्यावर राजपुत्र मोअज्जिम, बाहादुरशाह असा किताब धारण करून दिल्लीच्या तक्तावर बसला. त्याचे दोघे बंधू गादीवर हक्क सांगूं लागले म्हणून त्यानें त्यांच्याशीं लढाई करून त्यांस ठार मारून टाकिलें. पण अशा रीतीनें तो आपल्या भावांशीं युद्ध करण्यांत गुंतला असतां जयपुर व जोधपुर येथील राजे सख्य करून त्याजवर उठले. इतक्यांत सरहिंद प्रांत शीक लोकांनीं घेतल्याची बातमी येऊन

थडकली. तेव्हां ह्या नवीन व भयंकर शत्रूशीं लढाई करण्यास आपले हात मोकळे असावे एतदर्थ रजपुतांना बहुतेक पूर्ण स्वातंत्र्य देणें त्यास भाग पडलें.

९१. **शीक लोकांचा अभ्युदय**—अकबर बादशाह राज्य करीत असतां पंजाब प्रांतांत नानक नामक एक धर्मगुरु उत्पन्न झाला. तो असा उपदेश करूं लागला कीं, धर्मसंबंधी विधी व संस्कार ह्यांचें कांहींच महत्व समजूं नये, व सर्व धर्मांकडे उदार दृष्टि असावी. अशा रीतीनें त्यानें स्थापन केलेला जो हा नवा पंथ त्याचा मुसल्मान लोक छळ करूं लागले, व नानक हा जहांगिराच्या कारकीर्दीच्या आरंभीं मारला गेला. १६७५ सालीं नानकाचा पणतू गुरुगोविंद हा त्या धर्माचा मुख्य नायक झाला. त्यानें शीक लोकांस नीलवस्त्रें धारण करण्यास, केंस व दाढी वाढविण्यास, व शिपाईगिरीचें शिक्षण ग्रहण करून त्याबरहुकूम वागण्यास उपदेश केला. बाहादुरशाहाच्या कारकीर्दींत त्यांनीं सरहिंद प्रांत काबीज केला, आणि लाहोर व दिल्ली एथपर्यंतचा सर्व मुलूख लुटून उध्वस्त केला. शेवटीं बादशाह सैन्यानिशीं त्यांजवर चालून गेला, व त्यांचा नायक बंड यास डोंगरांत हांकून लाविलें. हा बादशाह १७१२ त मरण पावला.

९२. **बाहदुरशाहाच्या मागून दिल्लीच्या गादीवर बसलेले राजे**—बाहदुरशाहाच्या मागून त्याचा ज्येष्ठ पुत्र जहांदरशाह हा गादीवर बसला. त्याला अक्कल फारच थोडी होती; म्हणून त्यानें एक वर्ष राज्य केलें नाहीं तोंच त्याचा पुतण्या फिरुक्शिअर यानें त्याचा पराभव करून त्यास ठार केलें, व गादी पटकाविली. फिरुक्शिअरच्या कारकीर्दींत शीक लोकांनीं मोगलांचा मुलूख सप्पा करण्याचें काम पुनः

सुरू केलें, आणि बंड व त्याचे मुख्य अनुयायी यांस पकडून मोगलांनीं ठार केलें तेव्हां ते थांबले. महमदाच्या वंशजांस सय्यद म्हणतात; त्या कुळापैकीं दोघां बंधूंच्या साहाय्यानें फिरुक्शिअरास गादी प्राप्त झाली होती. त्या बंधूंनीं अखेरीस त्यास पदच्युत केलें, व नंतर एक दोन पोरें गादीवर बसवून शेवटीं महमदशाह यास नांवाचा बादशाह करून तेच राज्याचे वास्तविक अधिकारी होऊन बसले. त्यांच्या कारकीर्दीत जेझिया कर वसूल होईनासा झाला, तेव्हां तो दुष्ट कर त्यांनीं बंद केला. पुढें १७२० सालीं महमदशाहानें त्यांच्या वर्चस्वाचें जूं आपल्या खांद्यावरून काढून टाकिलें. सय्यदबंधूंनीं जोधपूरचा राजा आजितसिंग ह्यास गुजराथचा अधिकार दिला होता; त्याची मदत मिळावी म्हणून महमदशाहानें त्यास आणखी अजमीर प्रांत देऊन टाकिला. पुढें सय्यदांचा जेव्हां पाडाव झाला तेव्हां हे दोन प्रांत त्याजपासून परत घेण्याची खटपट बादशाह करूं लागला. थोडके दिवस युद्ध केल्यावर अजमीर प्रांत तेवढा आपल्याकडे ठेवून गुजराथप्रांत परत देण्यास अजितसिंग कबूल झाला. अशा रीतीनें अजमीर प्रांत मुसलमानांकडे ५०० वर्षांपेक्षांहि ज्यास्त वर्षें राहून शेवटीं रजपुतांचा रजपुतांस पुनः परत मिळाला.

**९३. असफजाह उर्फ निजाम उल्मुल्क**—दक्षिणेंतील मोगलांच्या मुलखाचा लचका निघून दक्षिणहैदराबादचें राज्य कसें बनलें गेलें हें आतां आह्मास निवेदन करावयाचें आहे. दक्षिणचा सुभेदार असफजाह, उर्फ निजाम उल्मुल्क, ह्यानें सय्यदांविरुद्ध १७२० सालीं बंड केलें, व अशा रीतीनें त्यांचा पाडाव करण्यास महमदशाहास साहाय्य केलें. पुढच्या वर्षी त्यास बादशाहानें आपला

मुख्य प्रधान किंवा वजीर नेमिलें, परंतु बादशाह चैनी व आळशी असल्यामुळें त्याचें ग्राचें जुळलें नाहीं, व निजाम उलमुल्कानें त्याचा नाश करण्याच्या उद्देशानें गुप्त कट रचिला. शेवटीं त्यानें आपल्या वजिरीचा राजीनामा दिला, आणि बादशाही राज्याचा मुतालिक हा किताब धारण करून दक्षिणेंत निघून गेला. त्या ठिकाणीं १७२४ सालीं हैदराबादच्या सुभेदाराचा पराभव करून त्यास ठार मारिलें. कारण बादशहानें विश्वासघात करून त्याचा पाडाव करण्यासाठीं त्या सुभेदारास चिथविलें होतें. त्यास ठार मारिल्यावर निजाम उल्मुल्क हा हैदराबाद येथें वस्तुतः स्वतंत्र राजाच होऊन बसला. त्या ठिकाणीं त्याचे वंशज 'निजाम' या नांवानें अद्यापि राज्य करीत आहेत.

९४. **मराठ्यांच्या सत्तेची अभिवृद्धि**—इकडे मराठे ज्यास्त ज्यास्त प्रबल होत चाललेच होते. मराठी राज्यांत त्यावेळीं पेशवा नामक दुसऱ्या प्रतीचा हुद्दा होता; त्या हुद्या-वर त्यावेळीं बाळाजी विश्वनाथ नामक एक ब्राह्मण असून त्यानें मराठ्यांच्या गादीचा हक्कदार शाहू आहे ही गोष्ट स्थापन करण्याच्या कामीं मदत केली होती, व त्यांत त्यास यशाहि आलें होतें. त्याच्या सल्लयावरून १७२० सालीं मराठ्यांनीं महमदशाहाशीं तह करून त्याजपासून दक्षिणेंत, कर्नाटकांत, तंजावर प्रांतांत, व त्रिचनापल्ली आणि म्हैसूर या मुलखांत चौथ किंवा वसुलाचा चवथा हिस्सा, व शिवाय सरदेशमुखी किंवा वसुलाचा दहावा हिस्सा, हे वसूल करून घेण्याचा हक्क संपादिला; व त्याच्या ऐवजीं त्यांनीं बादशा-हास खंडणी देण्याचा, बादशाहाच्या निशाणाबरोबर लढण्या-साठीं १५,००० घोडेस्वार नेहमी आपल्या खर्चानें तयार

ठेवण्याचा, व ज्या प्रांतांतून चौथ वसूल होईल त्या प्रांतांत कोणासहि लूट करूं न देण्याचा, बादशाहास करार करून दिला. ह्या एकंदर तहांत भानगडी फार होत्या, पण, ती गोष्ट मराठ्यांना इष्टच होती. कारण, त्यामुळें अनेक तंटे सहजच उत्पन्न झाले ह्मणजे बादशाहापेक्षां बलवत्तर जे मराठे त्यांच्याप्रमाणें प्रत्येक तंट्याचा निकाल नेहमी व्हावयाचाच.

९५. **बाजीराव पेशवे**–१७२० सालीं. बाळाजी विश्वनाथ मृत्यु पावला, व त्याच्यामागून त्याचा पुत्र बाजीराव हा पेशवा झाला. हा नूतन पेशवा मुत्सद्दीपणाच्या कामांत बापाच्या अगदीं तोडीचा होता, व शिपाईगिरीच्या कामांत तर त्याच्यापेक्षांहि श्रेष्ठ होता. मोगलांचें राज्य दुर्बल झालें आहे ही गोष्ट त्याच्या पूर्णपणें लक्ष्यांत येऊन चुकली होती; ह्मणून त्यांच्या सत्तेचें मुख्य ठिकाण जें हिंदुस्थान (उत्तरहिंदुस्थान) तेथें जाऊन मोगलांवर हल्ला करण्याचा त्यानें निश्चय केला. शाहू राजास तो मोठ्या उत्साहानें ह्मणाला, "वृक्ष सुकावयास लागला आहे, त्याच्या मुख्य खोडावर आपण घाव घालूं या; फांद्या आपोआप पडल्याच पाहिजेत."

९६. **मराठे व निजाम यांच्यामधील युद्ध**–बाजीरावाच्या ह्या बेतांस असफजाह ह्यांजकडून प्रतिरोध होण्याचा जितका संभव होता, तितका आधींच क्षय लागलेल्या मोगल बादशाईपासून होण्याचा संभव मुळींच नव्हता. कारण त्याचें राज्य मराठ्यांच्या मुलखाच्या अगदीं सीमेवर असल्यामुळें ते जर हिंदुस्थानचे मालक झाले, तर त्याची सत्ता कायम राहण्याची आशा फारशी नव्हती. ह्या गोष्टी लक्ष्यांत आणून असफजाहानें राजारामाचा पुत्र व शाहूचा प्रतिस्पर्धी जो संभाजी त्याच्याशीं १७२७ सालीं

सख्य केलें. तेव्हां बाजीरावानें त्याच्या मुलखावर स्वारी करून त्यास संभाजीशीं केलेलें सख्य तोडण्यास भाग पाडिलें. बाजीराव ह्याप्रमाणें इकडे गुंतला असतां शाहूचा नांवाचा मुख्य प्रधान जो प्रतिनिधि त्यानें संभाजीचा पराजय केला, तेव्हां संभाजी हा 'कोल्हापूरचा राजा' एवढीच पदवी मला पुरे असें ह्मणण्यास कबूल झाला. पुढें १७३१ सालीं असफजाहानें वंशपरंपरेनें मराठ्यांच्या सैन्याचा मुख्य अधिपति जो दाभाडे त्याच्याशीं सख्य केलें, कारण पेशव्याची इतकी सत्ता चालते हें पाहून दाभाडे त्याचा मत्सर करीत असे. पण दाभाडे आपली फौज घेऊन दक्षिणेंत निजामाकडे पुढें जाणार तों त्याच्या अगोदरच बाजीरावानें बडोद्यानजीक त्याचा पराभव करून त्यास ठार मारिलें. सारांश, अशा रीतीनें मराठ्यांमध्यें कलह उत्पन्न करण्यास असफजाहानें जे प्रयत्न केले त्यांचा परिणाम इतकाच झाला कीं ते सर्व पेशव्याच्या छत्राखालीं राहून पूर्वीपेक्षां ज्यास्तच जुटीनें वागावयास लागले, व पेशव्यास आपल्या सर्व राष्ट्राचा नायक समजून चालावयाचें असें त्यांनीं ठरवून टाकिलें.

९७. **मराठ्यांचा गुजराथ व माळवा ह्या प्रांतांत प्रवेश**—१७३१ सालीं बडोदें येथील गायकवाडांचा मूळ पुरुष जो पिलाजी गायकवाड त्याला गुजराथेंतील चौथ व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क देऊन टाकिला. पुढें जेव्हां त्याचा वध झाला तेव्हां त्याचा पुत्र व बंधु ह्यांनीं हे दोन हक्क संभाळून ठेविले. ह्याच सुमारास बाजीरावानें माळव्यावर स्वारी केली, व बुंदेलखंडाच्या राजास मदत केली; त्याबद्दल त्यास यमुनेच्या कांठचें झांशी

शहर बक्षीस ह्मणून मिळालें. उत्तरहिंदुस्थानांत मराठ्यांनीं पहिला मुलूख मिळविला तो हाच होय. पुढें १७३४ सालीं बादशाहाचा प्रतिनिधि राजा जयसिंग ह्यानें बादशाहाच्या अनुमतानें माळवा प्रांत पेशव्यांच्या हवालीं करता झाला.

**९८. डळमळणाऱ्या मोगलबादशाईस असफजाह सांवरून धरितो**–एवढ्या देणग्यांनीं संतुष्ट न होऊन बाजीराव १७३७ सालीं आग्र्याच्या शेजारील मुलखापर्यंत चाल करून गेला, व इंदूरच्या होळकरांचा मूळपुरुष मल्हारराव ह्यानें यमुनेच्या पलीकडील प्रांत लुटिला. पुढें अयोध्येच्या सुभेदारानें मल्हाररावास जेव्हां तेथून पिटाळून लाविलें तेव्हां बाजीराव दिल्लीस चाल करून गेला; आणि त्या बादशाही राजधानीच्या सभोंवतालील मैदानांत तळ देऊन, व हल्ला करावयास आलेल्या लोकांस मागें पिटाळून लावून, दक्षिणेंत परत आला. इतक्यांत असफजाहास मोगलाईचें तारण करण्यास बोलाविलें होतें तो दिल्लीस येऊन दाखल झाला; तेव्हां बादशाहानें आपलें सर्व सैन्य त्याच्या हवालीं केलें. अशा रीतीनें ३४,००० फौज बरोबर घेऊन तो मराठ्यांशीं लढावयास निघाला. भोपाळ मुक्कामीं मराठ्यांनीं त्यास ८०,००० सैन्यानिशीं वेढून टाकिलें, व त्याला अन्नाचा वगैरे पुरवठा बाहेरून होण्याचा मार्ग बंद करून टाकिला. शेवटीं त्यास परत फिरणें भाग पडलें, व मराठे त्याच्या पाठीस लागले. ह्या मोहिमीचा परिणाम असा झाला कीं, मराठ्यांस नर्मदा व चंबळा ह्या नद्यांमधील मुलूख देऊन तह करणें मोगलांस भाग पडलें.

**९९. नादिरशाहाची हिंदुस्थानावर स्वारी**–ह्या वेळीं नादिरशाहानें स्वारी केल्यामुळें हिंदुस्थानच्या एकंदर

स्थितींत भयंकर घोंटाळा उडून गेला. इराण देशांतील ह्या महाविजेत्यानें १७३८ च्या वसंत ऋतूंत काबुल शहर घेतलें, व त्या वर्षाच्या अखेरीस पंजाबांत प्रवेश केला. यमुनेच्या शेजारीं कर्नाळ येथें महमदशाहाचा त्यानें सहज पराभव करून टाकिला, व त्यास घेऊन दिल्लीस निघून आला. दिल्लीस कोणी लुटालुट करूं नये असा त्यानें प्रथम बंदोबस्त केला होता; पण दुर्दैवानें असें घडलें कीं दिल्लीचे लोक त्याच्या सैन्यावर उठले, व पुढें त्यांचा दंगा मोडी तोंपर्यंत त्यांनीं त्यांच्यापैकीं बरेच लोक ठार केले. ह्या कृत्याबद्दल त्यांच्यावर नादिरशाहानें भयंकर सूड उगविला. दुसऱ्या दिवशीं बहुतेक सर्व वेळ दिल्लीची लुटालुट करविली, आणि अजमासें ३०,००० लोकांस तरवारींनीं कापून काढिलें. दिल्लीच्या श्रीमान् सरदारांपासून नादिरशाहानें पुष्कळ द्रव्य बळजबरीनें घेतलें, आणि बादशाहाचा खजिना व प्रसिद्ध मयूरासन हीं बळकाविलीं. परंतु हिंदुस्थान कायमचें जिंकून टाकण्याचा त्याचा विचार नव्हता. ह्मणून सिंधुनदीच्या पलीकडील मुलूख खेरीजकरून बाकीचें सर्व राज्य महमदशाहास परत देऊन तो स्वदेशीं परतून गेला.

१००. **बाजीराव पेशव्याचा मृत्यु**—मोगलांशीं मिळून नादिरशाहास आड जावें असें बाजीरावाच्या मनांत होतें. त्यानें असें लिहून पाठविलें कीं, "सध्यां आपल्या घरगुती तंट्यांचें कांहींच महत्व नाहीं. सगळ्या हिंदुस्थानांत हल्लीं एकच शत्रु आहे." पण ह्या वेळीं पेशव्याचा भाऊ चिमणाजी आप्पा ह्यानें मराठ्यांच्या मोठ्या सैन्यानिशीं पोर्तुगीज लोकांच्या वसई नामक शहरास वेढा दिलेला होता; व

पुढें वसई शहर जों मराठ्यांच्या हातीं येतें तों नादिरशाह हिंदुस्थानांतून मागें परतला. हें जाणून, बाजीरावानें हिंदुस्थानांतील मुसलमानांविरुद्ध आपला पूर्व क्रम पुनः सुरू केला. असफजाहाचा पुत्र नासिरजंग ह्यास त्याच्या १०,००० सैन्यानिशीं मराठ्यांनीं घेरून टाकिलें; पण तो युक्तीनें त्यांच्या जाळ्यांतून सुटला; व पुढें कांहीं महिनेपर्यंत लढाई चालली खरी, पण तींत कोणत्याच पक्षास निखालस जय आला नाहीं. शेवटीं सारख्याच अटींवर दोघांचा तह झाला. ह्या युद्धांत आपणास बरोबर यश आलें नाहीं ही गोष्ट बाजीरावांच्या मनास फार लागून राहिली; शिवाय कर्ज फार झाल्यामुळें व पुण्यास त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनीं त्याच्या विरुद्ध कट उभारिले असल्यामुळें त्याचें मन अगोदर उद्विग्न झालेंच होतें. म्हणून पुणें व सातारा इकडे परत येण्याच्या ऐवजीं त्यानें आपल्या सैन्याचा मोर्चा (उत्तर) हिंदुस्थानाकडे वळविला, व १७४० च्या एप्रिलांत नर्मदेच्या कांठीं त्यानें देह ठेविला. त्याच्या मागून त्याचा पुत्र बाळाजी बाजीराव ह्यास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं.

१०१. **अहमदशाह अबदालीची पहिली स्वारी**—१७४७ सालीं नादिरशाह मरण पावल्यावर अबदाली लोकांचा मुख्य नायक अहमदशाह ह्यास कंदाहारचा राजा केलें. त्यानें प्रथम आपले राज्याचा विस्तार सिंधुनदीपर्यंत वाढविला. पुढें सिंधु उतरून तो जेव्हां आलीकडे आला, तेव्हां मोगल बादशाईचा वारस राजपुत्र अहमद ह्यानें त्यास मागें फिरविलें, व तो सिंधुनदीकडे परतून जाऊं लागला. इतक्यांत बाप वारल्याची बातमी येऊन पोहोंचल्यामुळें राजपुत्र अहमद यास दिल्लीस परत जावें लागलें; त्यावरून अहमदशाह

पंजाबांतच मुक्काम करून राहिला; व शेवटीं नव्या बादशाहानें नेमिलेल्या सुभेदारानें खंडणी देण्याचें वचन दिलें तेव्हां त्यानें तेथून पाय काढिला.

१०२. **मोंगल बादशाह अहमदशाह ह्याची कारकीर्द. अहमदशाह अबदालीची दुसरी स्वारी**—राजपुत्र अहमद यानें गादीवर बसते वेळीं अहमदशाह हें नांव धारण केलें. अयोध्येचा सुभेदार त्याचा वजीर सफ्दरजंग ह्यानें मल्हारराव होळकर व शिंदे ह्यांचें साहाय्य घेऊन, रोहिले नामक कांहीं अफगाण लोक अयोध्या प्रांतांत येऊन वस्ती करून राहिले होते, त्यांस डोंगराकडे पिटाळून लाविलें. अशा रीतीनें रोहिल्यांशीं युद्ध चाललें असतां अहमदशाह अबदालीनें हिंदुस्थानावर दुसरी स्वारी केली, व पंजाब प्रांत काबीज केला. सफ्दरजंग दिल्लीस परत येऊन पाहतो तों बादशाहानें असफजाहाचा नातू गाझी उद्दिन ह्यास आपला मुख्य मंत्री केलें आहे. पुढें कांहीं महिनेपर्यंत सफ्दरजंग व गाझी उद्दिन ह्यांचे पक्षांचे लोकांमध्यें दिल्लीच्या रस्त्यांतून सारखी लढाई चालली होती. शेवटीं गाझीउद्दीन आपल्या धन्यावर उठला. त्यास पदच्युत करून त्यानें त्याचे डोळे फोडिले; व बादशाही वंशांतील एका कुमारास तक्तावर बसवून दुसरा* अलमगीर, ह्या नांवानें त्याची द्वाही फिरविली.

१०३. **अहमद अबदालीची तिसरी व चवथी स्वारी**—१७५७ सालीं अहमदशाहानें हिंदुस्थानावर तिसरी स्वारी केली, व दिल्ली शहर लुटलें. पुढें जेव्हां तो स्वदेशीं परत गेला तेव्हां पेशव्याचा भाऊ राघोबा दादा ह्यास त्याच्या फौजेनिशीं गाझी उद्दिनानें साहाय्यार्थ निमंत्रण केलें. त्यावरून

* औरंगजेब हा पहिला अलमगिर होय.

त्यानें येऊन केवळ दिल्लीच नव्हे, तर पंजाब प्रांतहि हस्तगत करून घेतला. १७५९ सालीं अहमदशाहानें हिंदुस्थानावर चवथी व शेवटची स्वारी केली. तो जों पुढें चाल करून येतो तों इकडे गाझी उद्दिनानें बादशाहाचा वध करविला. ह्या वेळीं गादीचा वारस जो शाहाअलम तो दूर बंगाल्यांत होता.

१०४. **अहमदशाह अबदाली व मराठे यांजमधील युद्ध**—हिंदुस्थानावर स्वाऱ्या करणाऱ्या या अफगाण लोकांस हाकलून लावण्यासाठीं मोठा प्रयत्न करावयाचा असा मराठ्यांनीं ह्या वेळीं निश्चय केला. चिमणाजीचा पुत्र सदाशिवराव भाऊ ह्यानें दक्षिणेंत अहमदनगर, दौलताबाद, विजापूर व आशिरगड ह्यांची जोड मराठ्यांच्या मुलखास करून देऊन मोठें नांव मिळविलें होतें, त्याच्या हाताखालीं मोठी फौज देऊन त्यास ह्या मोहिमेवर पेशव्यानें पाठविलें. त्याच्याबरोबर पेशव्याचा वारस विश्वासराव, व सर्व मुख्य मुख्य मराठे सरदार हजर होते. सुराजमल्ल हा पुष्कळ जाट लोक घेऊन मराठ्यांच्या मदतीस आला होता, त्यानें सदाशिवराव भाऊस असें सुचविलें कीं, आपण आपला तोफखाना व पायदळ मार्गेच राहूं द्यावें व शत्रूसमोर मोठ्या सैन्यानिशीं उभें राहून लढाई देण्याच्या भरीस पडूं नये. पण भाऊस आपल्या तोफखान्याचा व इब्राहिमखान गारदी ह्याच्या हाताखालीं दिलेल्या आपल्या नऊ हजार पायदळाचा फारच अभिमान होता, म्हणून त्यानें ही मसलत ऐकिली नाहीं. कांहीं दिवसपर्यंत मराठ्यांच्या ह्या विशाल सैन्यास यश येत गेलें. त्यांनीं दिल्ली काबीज करून लुटून टाकिली, आणि यमुनेच्या कांठीं एका किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेविलेल्या कांहीं अफगाण शिपायांस कापून काढिलें. तें

पाहून अहमदशाह यमुना उतरून अलीकडे आला, व मराठे परतून पानिपत मुक्कामीं आले. त्या ठिकाणीं ते मजबूत छावणी करून व सभोंवार खंदक खणून तळ देऊन राहिले. पुढें सुमारें दोन महिने पर्यंत दोघां सैन्यांच्या लहानसहान चकमकी उडतां उडतां शेवटीं १७६१ च्या जानेवारी महिन्यांत आपली उपासमार होणार अशी मराठ्यांस भीति पडली; व म्हणून त्यांस बाहेर येऊन शत्रूंस लढाईस निमंत्रण करणें भाग पडलें.

१०९. **पानिपतची लढाई, १७६१.**–४१,८०० घोडेस्वार, ३८,००० पायदळ, व ७० तोफा इतकें मुसलमानांचें सैन्य होतें; व ५५,००० घोडेस्वार, १५,००० पायदळ, व २०० तोफा इतकें मराठ्यांचें सैन्य असून शिवाय बाजारबुणगें पुष्कळच होतें. लढाईचा अखेर निकाल कसा काय होतो ह्याजबद्दल पुष्कळ वेळपर्यंत संशयच होता. प्रारंभीं इब्राहिमखान ह्यानें आपलें चांगली कवाईत शिकलेलें पायदळ बरोबर घेऊन अफगाण सैन्याचा मुख्य भाग फोडून त्याची दाणादाण करून टाकिली. तेव्हां अहमदशाहानें पिछाडीस निवडक फौज ठेविली होती तीं पुढें पाठवून दिली, व लढाई पुष्कळ वेळ चालल्यामुळें शेवटीं अफगाण लोकांना त्यांचीं धिप्पाड शरीरें व मोठें शरीरसामर्थ्य ह्यांचा फायदा मिळूं लागला. दोन प्रहरानंतर दोन वाजल्यावर विश्वासराव अखेरची जखम लागून पडला. तेव्हां होळकर समरांगणांतून चालता झाला, व त्याच्या मागोमाग दुसरे मुख्य मुख्य मराठे सरदार व त्यांचे लोक रण सोडून निघाले. नंतर लवकरच सर्वच सैन्य पळूं लागलें. त्यांच्या पाठीस अबदालीचे लोक लागले, व

त्यांनीं हजारों मराठ्यांस ठार केलें; व जे मराठे शत्रूच्या हातांतून सुटले त्यांची शेतकरी लोकांनीं कत्तल उडविली. दुसरे दिवशीं सकाळीं कैद केलेल्या मराठ्यांस निष्कारण ठार मारिलें. एकंदरींत असा अंदाज केलेला आहे कीं, पानिपतच्या लढाईंत व मागून, मिळून, पराजित सैन्यापैकीं २,००,००० माणसें प्राणास मुकलीं.

१०६. **पानिपतच्या लढाईचे परिणाम**–ह्या भयंकर पराजयाचें वर्तमान जेव्हां पेशव्याच्या कानीं जाऊन पडलें तेव्हां तो पुण्यास परतून गेला, व पुढील जून महिन्यांत पर्वतीच्या देवालयांत त्यानें देह ठेविला. अहमदशाहानें दिल्लीच्या गादीवर दुसऱ्या अलमगीरचा ज्येष्ठ पुत्र दुसरा शाहाअलम ह्यास बसविलें, व नंतर तो स्वदेशीं परत निघून गेला. एवंच पानिपतच्या लढाईमुळें हिंदुस्थानांत मुसलमानांचें एकादें नवें घराणें राज्यावर स्थापन झालें असें नाहीं; तर या लढाईचा मुख्य परिणाम असा झाला कीं, जे मराठे ह्या लढाईच्या पूर्वीं लागोपाठ तीन पराक्रमी पेशव्यांच्या अमलाखालीं हिंदुस्थानांत मुख्य सत्ताधीश होऊन बसले होते, व हिंदुस्थानच्या एकंदर द्वीपकल्पावर आपलें राज्य पसरूं अशी ज्यांस आशा उत्पन्न झाली होती, त्या मराठ्यांच्या भरभराटीस धक्का बसला. पानपतच्या समरांगणांत ही त्यांची आशेची इमारत जमीनदोस्त होऊन गेली. आतां मराठ्यांस हा जो धक्का बसला त्यांतून त्यांनीं कांहींअंशीं पुढें डोकें वर काढिलें. ही गोष्ट खरी आहे, पण तेव्हांपासून पेशव्यांची सत्ता इतकी क्षीण होऊन गेली कीं, निरनिराळे मराठे सरदार त्यांच्या तंत्रानें वागण्याचें सोडून उलट त्यांच्याशीं भांडावयास लागले, व कधीं कधीं त्यांस

भारी होऊं लागले. अशा रीतीनें मराठ्यांमध्यें फाटाफुट होऊन गेली होती; तरी हैदराबाद व म्हैसूर येथील जीं मुसलमानी राज्यें तीं जर सर्व हिंदुस्थानांत वर्चस्व मिळविण्याची खटपट करण्याच्या भरीस पडलीं असतीं, तर त्यांच्याशीं मराठे टक्कर देऊं शकले असते, व त्यांत त्यांस यशहि आलें असतें. पण ह्यावेळीं महा मोगलांच्या हातांतून भ्रष्ट झालेला राजदंड उचलण्यासाठीं परस्परांशीं प्रतिस्पर्धा करणारीं यूरोपांतील दोन मोठीं राष्ट्रें हिंदुस्थानांत येऊन दाखल झालीं होतीं; व त्यांपैकीं कोणाशींहि टक्कर देण्याचें सामर्थ्य मात्र मराठ्यांच्या अंगीं राहिलें नव्हतें.

---

## भाग ६ वा.

## यूरोपस्थ लोकांचा हिंदुस्थानांत प्रवेश.

**१०७. पोर्तुगीज लोक हिंस्दुथानांत येतात—** प्राचीनकाळीं मलमल, कापूस, मोत्यें व मसाल्याचे पदार्थ हे जिन्नस हिंदुस्थानांतून खुष्कीच्या मार्गानें भूमध्यसमुद्रापावेतों जात असत, व तेथून जलमार्गानें व्हेनिस व जिनोआ ह्या शहरीं जात. पण १४९८ सालीं वास्को दि गामा ह्यानें केप् ऑव् गुड होप् ह्यास वळसा घालून हिंदुस्थानास येण्याचा जलमार्ग शोधून काढिला, व अशा रीतीनें यूरोपखंडाशीं हिंदुस्थानच्या व्यापाराचा जो वहनमार्ग त्यांत अगदीं बदल करून टाकिला. ह्या शोधामुळे हिंदुस्थानचा व्यापार पोर्तुगीज लोकांच्या हातीं आला, व तो त्यांनीं सरासरी १०० वर्षेंपर्यंत आपल्याच हातीं राखून

ठेविला. १४९८ च्या मे महिन्यांत पोर्तुगीज लोकांची पहिली स्वारी हिंदुस्थानांत येऊन पोहोंचली, तिजबरोबर येऊन वास्को दि गामा कालिकत मुक्कामीं दाखल झाली. पोर्तुगीज लोकांचें दुसरें आरमार जें हिंदुस्थानांत आलें त्याचा मुख्य अधिकारी काब्राल हा होता; त्यानें येतां येतां वाटेंत ब्राझिल देश शोधून काढिला. ह्याच्यामागून त्यांच्या आणखी स्वाऱ्या या देशीं येऊन गेल्या; शेवटीं १५०७ त पोर्तुगीज राजाचा पहिला व्हाइसराय किंवा प्रतिनिधी आलमीडा हा २० जहाजें व १,५०० शिपाई इतक्यांनिशीं हिंदुस्थानांत आला ह्या प्रसंगीं कालिकतचा मुख्य, ज्यास झामोरिन ह्मणत तो, व गुजराथचा राजा, हे दोघे दूरचा जो ईजिप्त ( मिसर ) देशाचा सुलतान त्याच्याशीं मिळून पोर्तुगीज लोकांवर उठले. चौलानजीक पोर्तुगीज लोकांचा त्यांनीं पराभव केला, व त्यांचें निशाणाचें जहाज पकडून नेलें. पण पुढें जेव्हां पोर्तुगाल देशाहून जास्त मदत आली तेव्हां आलमीडानें इजिप्शन् जहाजांच्या अधिपतीवर मोठा जय मिळविला, ( १५०९ ).

१०८. **अलबूकर्क**—हिंदुस्थानांतील पोर्तुगीज लोकांच्या मुलखावर अंमल करण्यास नेमिलेल्या सुभेदारांपैकीं सर्वांत पराक्रमी ह्मटला ह्मणजे अलबूकर्क हा होय; त्याची आलमीडाच्या मागून १५०९ त नेमणूक झाली. त्यानें विजापूरच्या राजापासून गोवें शहर घेतलें; व पोर्तुगीज लोकांची इकडील मुलखाची ती राजधानी करून टाकिली. सहा मैल घेराच्या भिंती त्या शहरासभोंवती त्यानें चढविल्या, व पुढें त्या शहराचें जेव्हां वैभव अत्यंत वाढलें तेव्हां त्याच्यांत २,००,००० लोकांची वस्ती झाली होती. अलबूकर्कनें

आपल्या कारकीर्दींत एडन बंदरापासून मलाका बेटापर्यंत दरम्यानच्या सर्व समुद्राची मालकी पोर्तुगीज देशाकडे आणून दिली, व आरब लोकांचा व्यापार बहुतेक नाहींसाच करून टाकिला. पण ज्या माणसानें यांप्रमाणें स्वदेशाची एवढी कामगिरी बजाविली होती, त्यास शेवटीं त्याच्या कृतघ्न राजानें अधिकारावरून दूर केलें; तेव्हां त्याच्या मनास झुरणी लागून १५१५ त गोवें मुक्कामीं तो मरण पावला.

**१०९. अलबूकर्कच्या मरणानंतर हिंदुस्थानांतील पोर्तुगीज राज्याची स्थिति**–१५३५ सालीं गुजराथचा राजा बहादुरशाह ह्यानें हुमायून आपल्या अंगावर अगदीं येऊन पडला असें पाहून पोर्तुगीज लोकांस वसई व दीव हीं देऊन त्यांचें सख्य संपादन केलें. पुढें १५३८ सालीं समुद्रांतून तुर्क लोकांच्या एका आरमारानें व किनाऱ्यावरून एतद्देशीय लोकांच्या २०,००० फौजेनें दीव शहर घेण्याचा प्रयत्न केला, पण तो फुकट गेला. नंतर विजापूरच्या राजानें गोवें शहर परत घेण्यासाठीं खटपट केली, पण तीहि अशीच फुकट गेली. १५७० सालीं त्यानें एक मोठें सैन्य घेऊन येऊन त्या शहरास वेढा घातला, पण दहा महिने वेढा राहिल्यावर पोर्तुगीज लोकांनीं त्यास पिटाळून लाविलें, व त्यांत त्याचे १२,००० लोक व २०० हत्ती गमावले. पुढें पोर्तुगीज लोकांच्या सत्तेस जी उतरती कळा लागली ती एतद्देशीय राजांनीं त्यांच्यावर वारंवार हल्ले केले म्हणून नव्हे, तर डच लोक त्यांची प्रतिस्पर्धा करूं लागले म्हणून होय; ह्या डच लोकांचीं जहाजें १६ व्या

शतकाच्या शेवटीं हिंदुस्थानच्या समुद्रांतून प्रथम झळकूं लागलीं. शिवाय, ह्या सुमारास ( १५८०–१६४० ) स्पेन व पोर्तुगाल मिळून एक राज्य बनलें, व स्पानिश लोक पोर्तुगीज लोकांच्या पूर्वेकडील (एशिया खंडांतील) मुलखाची हयगय करूं लागले. पुढें मराठ्यांचा उदय झाला तेव्हां तर ह्या उतरत्या कळेस जास्तच वेग आला, व शेवटीं १७३९ त मराठ्यांनीं जेव्हां वसई घेतली, तेव्हां पोर्तुगीज लोकांच्या सत्तेस असा कांहीं धक्का बसला कीं, त्यांतून त्यांचें डोकें वर कधींच निघालें नाहीं. हिंदुस्थानांत गोवा, दमण, व दीव हीं अद्यापि पोर्तुगीज लोकांकडे असून एकंदर १२०० चौरस मैल मुलूख जरी त्यांजकडे आहे, तरी त्यांची ही सद्यःस्थिति त्यांच्या पूर्व वैभवाची केवळ छाया आहे असें म्हटलें तरी चालेल; व जें गोवें शहर पूर्वी एवढें प्रबळ होतें त्यांत हल्लीं केवळ वीस हजार वस्ती आहे आहे नाहीं नाहीं.

११०. **डच लोकांचा हिंदुस्थानाशीं संबंध**— डच लोक प्रथम १५९५ सालीं हिंदुस्थानांत आले. ते व्यापाराच्या कामांत फारच दक्ष असत, व पोर्तुगीज, इंग्लिश व फ्रेंच लोक ह्यांच्याशीं व्यापाराच्या बाबतींत इतकी प्रतिस्पर्धा करीत कीं, त्यांच्या त्यांच्यांत वारंवार लढाईचे प्रसंग येत. इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्या प्रमाणें डच लोकांचीहि सुरतेस वखार होती; तरी हिंदुस्थानांत मुलूख जिंकून घेण्याची सांगण्यासारखी खटपट त्यांनीं कधींच केली नाहीं. त्यांनीं तशी खटपट केली तीं ह्याच्यापेक्षांहि दूरवरच्या प्राच्य प्रदेशांत केली, व सुमात्रा

आणि जावा हीं बेटें काबीज करून घेतलीं. हल्लीं त्यांच्याकडे हिंदुस्थानांत मुळींच मुलूख नाहीं, व हिंदुस्थानाशीं त्यांचा व्यापारहि अगदींच थोडा चालत असेल.

**१११. हिंदुस्थानांत इंग्लिशांच्या पहिल्या वसाहती**—इंग्लिश लोकांची पहिली ईस्त इंदिया कंपनी ( पूर्वेकडील हिंदुस्थानांत व्यापार करणारी मंडळी ) इलिजाबेथ राणीच्या कारकीर्दीच्या अखेरीस १६०० त स्थापन झाली. इंग्रजांचें पहिलें जहाज जें हिंदुस्थानांतील बंदरांत नांगरून राहिलें त्याचें नांव हेक्टर असें असून त्यावरचा मुख्य अधिकारी क्यापटिन् हॉकिन्स हा होता; हें तारूं १६०९ त सुरतेस निघून गेलें. हाकिन्स साहेब आग्र्यास बादशाहाकडे गेला, पण स्वदेशबांधवांसाठीं व्यापाराचे कोणतेच विशेष हक्क त्यानें संपादिले नाहींत. पुढें (१६१५-१६१८) सैर टॉमस रो इंग्रजांचा वकील ह्मणून आला, पण त्याच्या येण्यापासूनहि फारसा फायदा झाला नाहीं. १६३७ सालीं ईस्त इंदिया कंपनीच्या एका जहाजावरील डाक्टर ब्रौटन नामक शस्त्रवैद्यानें शहाजहानच्या दरबारीं औषधोपचार करून त्याजबद्दल बक्षिसादाखल इंग्लंदासाठीं व्यापाराचे कित्येक विशेष हक्क मागितले व बादशाहानें ते दिले. हुगळी नदीवर वसाहत करण्यासाठीं इंग्लिशांस जमीन जी मिळाली ती याच स्वदेशाभिमानी इंग्रजाच्या खटपटीनें होय. ह्याच सुमारास हल्लींचें मद्रास शहर जेथें वसलेलें आहे त्याच ठिकाणीं एका एतद्देशीय राजाच्या आश्रयाखालीं एक नवीन वखार इंग्लिशांनीं स्थापिली. इंग्लंदचा संरक्षक जो ऑलिव्हर क्रॉमवेल त्याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांतील इंग्रजी वसाहतीचे दोन इलाखे केले होते. एका इलाख्याची

सुरत ही राजधानी होती, व दुसऱ्या इलाख्याची ( ह्या इलाख्यांत हुबळी नदीवरील वखारी येत ) मद्रास ही होती. १६६१ सालीं इंग्लंदच्या राजा दुसरा चार्लस ह्यानें एतद्देशीय राजांशीं तह व युद्ध करण्याचा हक्क कंपनीस दिला. ह्याच राजाच्या कारकीर्दीच्या आरंभीं ( १६६२ ) पोर्तुगाल देशाच्या राजानें आपली मुलगी इन्‌फन्टा हिचें राजाशीं लग्न करून देऊन त्यासमयीं देणगी म्हणून मुंबई बेट दिलें. अशा रीतीनें तें शहर इंग्रजांच्या हातांत आलें, व १६८७ सालीं पश्चिम इलाख्याचें सुरते ऐवजीं तें राजधानीचें शहर बनलें.

**११२. इंग्लिश लोक जास्त धिटाईनें वागूं लागतात**—१६८९ त इंग्लंदांत मोठी राज्यक्रांति घडून आली; त्याच्या सुमारास इंग्लिश लोक एतद्देशीय राजांशीं पूर्वीपेक्षां जास्त धिटाईनें व्यवहार करूं लागले, व आपण केलेल्या मागण्या त्या राजांनीं कबूल कराव्या एतदर्थ लढाया देखील करूं लागले. १६८६ सालीं इंग्लिशांचें एक आरमार बंगालच्या सुभेदाराशीं युद्ध करण्यासाठीं गंगानदींतून वर गेलें व त्यानें चितागांग शहरावर हल्ला केला; पण त्यास मागें पिटाळून लाविलें. ह्याच वेळीं सर जॉन चाइल्ड यानें मोगलांचें एक आरमार मुंबईच्या बंदरांत हल्ला करून घेतलें. ह्या हल्ल्यांनीं चिडून जाऊन औरंगजेबानें सुरतेस व बंगाल्यांत इंग्लिशांच्या ज्या वखारी होत्या त्या सर्व आपल्या ताब्यांत घेतल्या. १६९० सालीं इंग्लिश लोक बादशाहास शरण गेले, आणि १,५०,००० रुपये देऊन त्यांनीं आपल्या वखारी परत मिळविल्या. अशा रीतीनें बंगाल्यांत परत आल्यानंतर जॉब चारनक ह्या साहेबाच्या

धोरणानें वागून त्यांनीं हुगळी नदीच्या डाव्या तीरावर जमीन संपादन केली, व त्या ठिकाणीं फोर्ट विलियम नामक किल्ल्यांत तोफा लावून ठेवून त्यांच्या जोरावर, हिंदुस्थानांतील ब्रिटिश बादशाईची जी कलकत्ता नामक भावी राजधानी तिची स्थापना केली; ती भराभर वसत चालली.

**११३. इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्या मधील कलहास सुरवात**–ज्यावेळीं इंग्लिशांनीं कलकत्ता शहर बांधण्यास सुरवात केली त्याच सुमारास फ्रेंच लोकांनीं मद्रासच्या दक्षिणेस १०० मैलांवर कर्नाटक प्रांताच्या किनाऱ्यावर पांदिचरी शहर बांधण्यास सुरवात केली. हें नवें शहर जलद वाढत चाललें. १७४४ त जेव्हां फ्रान्स व इंग्लंद ह्या दोन राष्ट्रांमध्यें युद्ध सुरू झालें तेव्हां दुप्ली नामक एक हुशार फ्रेंच गृहस्थ पांदिचरीचा गव्हर्नर होता; त्याची इच्छा हिंदुस्थानांत फ्रेंचाचें राज्य स्थापन करावें अशी होती. १७४६ सालीं लाबूरडाने नामक एका फ्रेंच आरमाराधिपतीनें मद्रास शहर घेतलें. त्यावेळीं इंग्लिशांनीं तें शहर त्याच्या स्वाधीन अशा अटीवर केलें होतें कीं, खंडणी दिली म्हणजे तें त्यांस परत मिळावें, व कैद केलेल्या फौजेस पाहिजे तिकडे जाण्यास मुभा मिळावी. ह्या अटी दुप्लीस पसंत पडल्या नाहींत; म्हणून कैद केलेल्या लोकांस त्यानें पांदिचरीस नेलें, व मद्रासशहर परत देण्याचें नाकारिलें. नंतर त्यानें फोर्ट सेंट डेव्हिड नामक किल्ल्यावर हल्ला केला; ह्या वेळीं इंग्लिशांची कर्नाटकांत शिल्लक राहिलेली मुख्य वसाहत हीच होती. पण बोस्कावेन नामक एका इंग्लिश नौकाधिपतीनें त्या किल्ल्याचा बचाव करून उलट पांदिचरीस वेढा घातला, पण त्यांत

त्यांस यश आलें नाहीं, (१७४७). पुढें १७४८ सालीं आक्टोबर महिन्यांत इंग्लिश व फ्रेंच ह्यांच्या मध्यें यूरोपांत एक्स् ला शापेल मुक्कामीं तह होऊन त्याच्या अन्वयें मद्रास शहर इंग्लिशांस परत मिळालें.

११४. **दुप्लीच्या मसलती**—अशा रीतीनें ह्या दोन राष्ट्रांतील तंटा मिटल्यावर दुप्लीनें असा बेत केला कीं, एतद्देशीय राजांशीं लढाया व तहनामे करून फ्रेंचांची सत्ता वृद्धिंगत करावयाची. ह्या वेळीं असफजाह ह्याचा पुत्र नासिरजंग हा दक्षिणचा निजाम होता, व अनवरुद्दिन नामक कोणी कर्नाटकचा नबाब होता. असफजाहचा नातू मुजफरजंग व चंदासाहेब नामक कोणी असे ह्या दोन गाद्यांस अनुक्रमें हक्क सांगत होते, व त्यांस दुप्लीचें साहाय्य मिळालें. तेव्हां अंबुर मुक्कामीं लढाई होऊन फ्रेंचांच्या सैन्यानें अनवरुदिनाचा पराभव करून त्यास ठार मारिलें, (१७४९). त्याचा पुत्र महमदअल्ली इंग्लिशांचें साहाय्य मागण्यासाठीं त्रिचनापल्लीस पळून गेला, व इकडे विजयी फ्रेंच लोक त्याची राजधानी अर्काट हीस वेढा घालण्यास निघून गेले. बुसी नामक एका हुशार फ्रेंच सेनापतीनें प्रथम मच्छलीपट्टण काबीज केलें, नंतर फोर्ट सेंट डेव्हिडहून १९ मैलांवर त्रवाडी एथील देवालय घेतलें, व शेवटीं जिंजीचा बळकट किल्ला सर केला. ह्या किल्ल्याच्या खडकाळ तटबंदी खालीं नासिरजंग तळ देऊन राहिला होता, त्याजवर ८०० फ्रेंच व ३,२०० एतद्देशीय शिपाई एकट्यांनीं छापा घातला, व नासिरजंग गोळी लागून मेला. तेव्हां त्याचा पुतण्या मुजफरजंग ह्यास एकदम निजाम ह्मणून जाहीर केलें. दुप्लीयास कृष्णेच्या दक्षिणेकडील सर्व मोगल मुलखाचा अधि-

पति केलें, व चंदासाहेब ह्यास कर्नाटकचा नबाब करून त्यास दुप्लेचा मांडलिक राजा ठरवून टाकिलें; व मच्छलीपट्टण शहर फ्रेंचांस दिलें. नंतर लवकरच मुजफरजंग लढाईत मारला गेला, व त्याचा चुलता, व असफजाहाचा तृतीय पुत्र, सलाबतजंग, ह्याच्या नांवाची निजाम म्हणून द्वाही फिरविली.

११९. **क्लैव साहेब अर्काट घेतो**—आपल्या अचाट युद्धकौशल्यानें दुप्लीच्या सर्व मसलती निष्फळ करणारा जो क्लैव साहेब तो प्रथम १७४४ त कारकून म्हणून हिंदुस्थानांत आला; व १७४७ सालीं लेखणी खालीं ठेवून त्यानें तरवार उचलिली, व कंपनीच्या सैन्यांत बावटा धरणाराची नोकरी पत्करिली. त्रिचनापल्ली मुक्कामीं महमदअल्लीस चंदासाहेबानें वेढा दिला होता तो उठविण्यास इंग्लिशांनीं दोनदां स्वाऱ्या केल्या, पण फुकट गेल्या, तेव्हां क्लैव साहेब आतां बढती होऊन कप्तान झाला होता त्याच्या सल्ल्यानें वेढा उठविण्याची नवीनच मसलत ठरविली. ती अशी कीं चंदासाहेबाची राजधानी अर्काट हिजवर स्वारी करून त्रिचनापल्लीच्या वेढ्यावरून त्याचें लक्ष्य उडवावयाचें. त्या स्वारीचा मुख्य क्लैव यासच नेमिलें. त्याप्रमाणें मोठ्या वादळांतून व पावसांतून इंग्लिशांचें सैन्य जेव्हां अर्काटवर चालून गेलें तेव्हां तेथील रखवालदार लोकांनीं घाबरून जाऊन किल्ला सोडून दिला, (१७५१). क्लैव साहेबानें ते मोठें शहर आपल्या ताब्यांत घेतलें. पण इतक्यांत त्याचे २०० इंग्रज शिपाई व ३०० एतद्देशीय शिपाई एवढ्या चिमुकल्या सैन्यास चंदासाहेबाचा पुत्र राजासाहेब ह्यानें १०,००० लोकांनिशीं वेढा दिला; त्यांच्यांत १५० फ्रेंच

शिपाई होते. त्यांनीं तटबंदींत भगदाडें पाडून त्यांतून शिरून मोहरमच्या दिवशीं क्लैव साहेबावर हल्ला केला, पण त्यांचे ५०० लोक मारून त्यानें त्यांस माघारें लाविलें. दुसरे दिवशीं सकाळीं मोठ्या उंचाइतींत पडलेल्या क्लैवच्या रखवालदार फौजेच्या कानीं असें आलें कीं शत्रू तोफा व दारूगोळा टाकून रात्रीच्या रात्रीं पळून गेले. इतक्यांत मद्रासेहून कुमक आल्यामुळें, व मुरारीराव नामक सरदार ६०० मराठ्यांनिशीं साहाय्यास आल्यामुळें क्लैव साहेबास जोर येऊन तो शत्रूचा पाठलाग करीत निघाला. हा मुरारीराव अर्काटचें एवढ्या शौर्यानें रक्षण केलेलें पाहून आश्चर्यभरित होऊन कौतुकानें इंग्लिशांच्या मदतीस आला होता. शत्रूच्या फौजेस आर्नी एथें गांठून क्लैव साहेबानें त्यांची अशी कांहीं दाणादाण करून सोडिली कीं, ते आपला लष्करी खजिना सोडून चालते झाले, व त्यांच्या पैकीं ६०० शिपाई कंटाळून नोकरी सोडून गेले. ह्या जयानंतर क्लैव साहेबानें कांजीवरमचें देवालय काबीज केलें, व एवढा मोठा जय मिळाला म्हणून मोठ्या थाटानें तो फोर्ट सेंट डेव्हिड येथें परत आला.

**११६. कावेरीपाक येथील लढाई. क्लैव साहेब इंग्लंदास परत जातो**–पुढल्या वर्षाच्या आरंभीं ४०० फ्रेंच व ४,५०० एतद्देशीय शिपाई अशा सैन्यानें इंग्लिशांच्या मुलखावर हल्ला केला. क्लैव साहेबास पुनः त्यांजवर पाठविलें, व मद्रास येथून ६० मैलांवर कावेरीपाक मुक्कामीं त्याची व शत्रूंची गांठ पडली. लढाईंत शत्रूंचा पराजय होऊन त्यांजपैकीं ५० फ्रेंच व ३०० एतद्देशीय शिपाई मारले गेले. हें वर्ष संपावयाच्या अगोदरच चंदा साहे-

बाच्या सैन्याची वाताहत होऊन तो स्वतः तंजावरच्या सैन्याच्या हातीं आला, व तंजावरचें व इंग्लिशांचें त्यावेळीं सख्य असल्यामुळें त्या सैन्यानें त्याचा शिरच्छेद करून टाकिला. पुढल्या सालीं क्लैव साहेब प्रकृति सुधारण्यासाठीं इंग्लंदास परत गेला, तेथें त्यास ईस्ट इंडिया कंपनीनें हिऱ्यांच्या मुठीची तरवार बक्षीस दिली.

११७. **त्रिचनापल्लीचा वेढा. नार्दर्न सर्कार्स्. दुप्लीस परत बोलावून नेतात**—क्लैव साहेबानें स्वदेशीं प्रयाण केल्यावर फ्रेंचांनीं त्रिचनापल्ली घेण्याचा पुनः प्रयत्न केला; पण नऊ महिनेपर्यंत वेढा ठेवूनहि त्यांस तें स्थळ घेतां आलें नाहीं. इकडे हैदराबाद येथें बुसीनें मराठ्यांपासून सलाबतजंगाचें रक्षण करून त्यास संभाळून धरिलें होतें; व त्यानें बजाविलेल्या ह्या मोठ्या कामगिरीबद्दल सलाबतजंगानें नार्दर्न सर्कार्स् ( उत्तरसरकारें ) नामक प्रांत फ्रेंचांस लावून दिला; ह्याच्यांत कर्नाटकच्या ईशान्येच्या किनाऱ्यावरील ६०० मैल लांबीचा मुलूख मोडत असे. १७५४ त दुप्लीची नेमणूक रद्द करून फ्रेंच सरकारानें त्यास परत बोलाविलें. त्याच्यामागून नेमलेल्या गव्हर्नरानें मद्रास येथें इंग्लिशांशीं तह करून असा करार केला कीं, फ्रेंचांनीं आपली फौज कर्नाटकांतून काढून न्यावी, व तेथील नबाब महमदअल्ली यास त्रिचनापल्ली येथें स्वस्थ राहूं द्यावें.

११८. **घेरियाचा पाडाव**—१७५५ सालीं क्लैव साहेब कर्नेल ही पदवी मिळवून हिंदुस्थानांत परत आला. आल्यानंतर लवकरच नौकाधिपति वाट्सन ह्यास घेरिया किल्ल्यावर हल्ला करण्याच्या कामीं मदत करण्यासाठीं तो

जाऊन मिळाला. हा किल्ला चांचेपणाचा धंदा करणारा जो आंग्र्या त्याचा असून मुंबईच्या दक्षिणेस १६० मैलांवर एका खडकाळ भूशिरावर बांधिलेला होता. त्या दोघांनीं मिळून आंग्र्यांचीं जहाजें जाळून टाकिलीं व शहर काबीज केलें. आणि अशा रीतीनें हा जो चांचे लोकांचा अड्डा हिंदीमहासागरांतून जहाजें नेणाऱ्या व्यापाऱ्यांस पुष्कळ दिवस मोठा दाऊच होऊन बसला होता त्याच्या त्रासांतून हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यास मुक्त केलें.

११९. **सुराजउद्दवला, व ब्लॅक होल (अंधार कोठडी)**—ज्या अलीवर्दीखान नामक बंगालच्या सुभेदारानें यूरोपियन लोकांस व्यापार करण्यास उत्तेजन दिलें होतें तो १७५६ सालीं निवर्तला, व त्याच्यामागून त्याचा नातू सुराज-उद्दवला हा बंगालचा सुभेदार झाला. ह्या सुभेदारानें इंग्लिशांवर अशी मागणी केली कीं, त्यांनीं कलकत्त्यासभोंवती उभा-रिलेली तटबंदी मोडून टाकावी, व त्याच्या राज्यांतून एकजण इकडे पळून आला होता त्यास स्वाधीन करावें. कलकत्त्याचे इंग्रज ह्या दोन्ही गोष्टींस नाकबूल आहेत असें पाहून तो त्यांजवर ५०,००० फौजेनिशीं चालून गेला. तेथील रखवालदार फौज दुर्बल असल्यामुळें व तटबंदी अपुरी राहि-लेली असल्यामुळें, थोडासा वेळ प्रतीकार केल्यावर इंग्लिशांनीं शहर सोडून जाण्याचा निश्चय केला. जूनच्या १९ व २० तारखेस त्यांच्यापैकीं बहुतेक लोक होड्यांतून बसून पळून गेले; त्यांत त्यांच्यापैकीं थोडेजण मेले. दुर्दैवानें असें घडलें कीं, पळण्याच्या गोंधळांत बरेच लष्करी व दिवाणी अमलदार मागें राहिले, व त्यांस लवकरच शत्रूच्या स्वाधीन व्हावें लागलें. अशा रीतीनें जे १४६ लोक

(पैकीं एक स्त्री होती) कैदी झाले, त्यांस ब्लॉक होल नामक एका तुरुंगांत लोटून दिलें. ही अंधार कोठडी केवळ २० फूट औरसचौरस असून तीस दोन ल्हानशा खिडक्या होत्या. ते दिवस ऐन उन्हाळ्याचे असल्यामुळें उष्णतेनें पिसावून जाऊन ते लोक त्या दोन खिडक्यांतून येणाऱ्या ल्हानशा वाऱ्याच्या झुळकेसाठीं, व तुरंगावरचे रखवालेदार जें थोडेसें पाणी देतील त्याच्यासाठीं झगडा करूं लागले. ह्या भयंकर तुरुंगांतून आम्हास बाहेर काढा अशी त्यांनीं प्रार्थना करतां, त्यांस असा जबाब मिळाला कीं, सुभेदार साहेब निजले आहेत, त्यांची झोंपमोड करण्याची सोय नाहीं. सरतेशेवटीं त्यानें उठल्यावर जेव्हां तुरुंगाचा दरवाजा उघडण्यास परवानगी दिली तेव्हां त्यांच्यापैकीं कायते २३ असामी जीवंत सांपडले.

१२०. **बंगाल्यांतील युद्ध**—ब्लॉक होलच्या ह्या अनर्थाचें वर्तमान जेव्हां मद्रास येथें जाऊन पोहोंचलें तेव्हां क्लैव यास बरोबर लहानसें सैन्य देऊन सुराजउद्दवल्यावर सूड उगविण्यास पाठवून दिलें. १७५७ सालच्या प्रारंभीं इंग्लिश फौज कलकत्यापुढें येऊन उभी राहिली, तेव्हां शत्रू लवकरच शहर सोडून चालते झाले. फेब्रुवारीच्या प्रारंभीं सुराजउद्दवला मोठी फौज बरोबर घेऊन चालून आला, व कलकत्याच्या सीमेवर तळ देऊन राहिला. ह्या ठिकाणीं एके दिवशीं पहांटेस धुकें पडलें असतां क्लैव साहेबानें येऊन त्याजवर छापा घातला, त्याच्या छावणींत शिरला, व त्याचे सुमारें १००० शिपाई ठार केले. तेव्हां तो इतका भेदरून गेला कीं त्यानें तह करण्याबद्दल विनंती केली, व इंग्लिशांशीं सख्य केलें.

१२१. **चंद्रनगरचा पाडाव**—इकडे फ्रान्स व इंग्लंद ह्यांजमध्यें पुनः लढाई सुरू झाली होती. म्हणून १७५७ च्या मार्च महिन्यांत क्लैव्ह व वाट्सन हे दोघे हुगळी नदीवर चंद्रनगर नामक फ्रेंचांची एक वसाहत होती तिजवर चालून गेले. तेथील रखवालदार फौजेनें शौर्यानें शहराचें संरक्षण करण्याचा यत्न केला, पण त्यांत त्यांचे पुष्कळ लोक मारले जाऊन शेवटीं मार्चच्या २५ व्या तारखेस त्यांस इंग्लिशांच्या स्वाधीन होणें भाग पडलें.

१२२. **प्लासीची लढाई ( १७५७ )**—चंद्रनगरास इंग्लिशांनीं वेढा घातला असतां सुराजउद्दवला ह्यानें क्लैव्ह साहेबास मदत न करतां उलट आपल्या फौजेचा एक भाग फ्रेंचांच्या मदतीस पाठविला होता. पुढें तें शहर इंग्लिशांच्या हातीं आलेलें पाहून त्यानें त्यांच्याशीं लढाई करण्यासाठीं ५०,००० पायदळ, व २०,००० घोडेस्वार एवढें प्रचंड सैन्य गोळा केलें. क्लैव्ह साहेबाजवळ कायतें १००० गोरे व २००० काळे शिपाई एवढीच फौज होती. दोन्ही सैन्यें जेव्हां एकमेकांच्या संनिध आलीं, तेव्हां क्लैव्ह व दुसरे मुख्य मुख्य लष्करी अंमलदार ह्यांनीं आतां काय करावयाचें हें ठरविण्यासाठीं सभा भरविली. पुष्कळांचें मत असें पडलें कीं लढाई करण्याचें टाळावें, व क्लैव्ह साहेबासहि हेंच मत प्रथम बरोबर वाटलें. पण पुढें त्याचें मन बदललें, व तो शत्रूच्या छावणीपासून एक मैलाच्या आंत एक आंबराई होती तेथपर्यंत आपल्या सैन्यानिशीं पुढें चालून गेला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ( २२ जून १७५७ ) लढाई सुरू झाली. तींत क्लैव्ह साहेबाच्या सैन्यास आंबराईतून हांकलून लावण्यास सुराजउद्दवल्याच्या सैन्यानें पुष्कळ

तास खटपट केली. शेवटीं सुराजउद्दवल्याचा मुख्य सेनापति मीरजाफर ह्यानें आपण आतां परतावें अशी त्यास मसलत दिली. हा मीरजाफर सुराजउद्दवल्यास पदच्युत करून आपण त्याची सुभेदारी पटकावण्यासाठीं गुप्त बेत करीत होता, व लढाईच्या कामांत त्यानें मुळींच मदत केली नव्हती. त्याची मसलत सुराजउद्दवल्यास पसंत पडली, व त्यानें आपल्या सैन्यास परतण्यास सांगितलें; तेव्हां व्यवस्थेनें परत जाण्याच्या ऐवजीं त्याचे लोक अगदीं सैरावैरा पळून गेले. त्याच्या तोफखान्यावर फ्रेंच लोक होते त्यांनीं ह्या पळपुट्या लोकांस पुनः एकत्र जमविण्यास खटपट केली; पण ती फुकट जाऊन उलट त्यांसुद्धां गर्दीच्या लोटाबरोबर ढकलत जावें लागलें. अशा रीतीनें फारच अल्प नुकसान होऊन इंग्लिशांनीं प्लासीची लढाई जिंकिली. त्यांच्या बाजूस केवळ ८ गोरे व १६ काळे शिपाई ठार झाले, व ८ गोरे व ३६ काळे जखमी झाले.

**१२३. प्लासीच्या लढाईचे परिणाम**—मीरजाफरानें ह्या लढाईत आपल्या धन्याचा जो विश्वासघात केला त्याबद्दल बक्षीसादाखल क्लैव साहेबानें त्यास बंगाल, बहार, व ओरिसा ह्या प्रांतांचा सुभेदार म्हणून जाहीर केलें. सुराजउद्दवला समरांगणांतून पळाला होता त्यास पाटणा येथें पकडिलें, व पुढें मीरजाफराचा पुत्र मीरन ह्यानें त्यास मुर्शिदाबादेस तरवार भोसकून ठार मारिलें. क्लैवसाहेबानें मीरजाफरास जें एवढ्या ऐश्वर्यास चढविलें त्याबद्दल मीरजाफरास फार मोठी किंमत पडली. त्याला कंपनीस एक कोटी रुपये द्यावे लागले; व शिवाय क्लैव व दुसरे लोक ह्यांस अनेक मोलवान् देणग्या द्याव्या लागल्या. खेरीज मराठा डिच

( मराठ्यांचा खंदक ) ह्याच्या आंतील सर्व कलकत्ता शहराची व शिवाय त्याच्या बाहेरील सहाशें यार्ड रुंदीच्या एका जमिनीच्या पट्ट्याची कंपनीस पूर्ण मालकी मिळाली.

१२४. **डच लोकांचा पराजय**—प्लासीच्या लढाईची बातमी इंग्लंदांत जाऊन पोहोंचतांच क्लैव्ह साहेबास बंगालचा गव्हर्नर नेमिलें. तो ह्या हुद्यावर असतां डच लोकांचीं सात जहाजें १,१०० लोक बरोबर घेऊन बटेव्हिया एथून निघून १७५९ च्या आक्टोबरांत हुगळी नदींतून वर आलीं, व इंग्लिश आणि डच ह्यांच्यामध्यें कांहीं एक तंटा नसतां त्यांनीं इंग्लिशांचीं कांहीं तारवें पकडिलीं. तेव्हां त्यांजवर क्लैव्ह साहेबानें लागलाच हल्ला केला व त्यांचा पूर्ण पराजय करून टाकिला. पुढें त्यांनीं १,००,००० पौंड इंग्लिशांस दिले, तेव्हां त्यांचीं जहाजें त्यांस परत दिलीं व तह करून त्यांत असें ठरविलें कीं, त्यांनीं आपल्या हुगळी नदीवरील वखारींचें रक्षण करण्यास १२५ पेक्षां जास्त युरोपियन शिपाई कधीं ठेवूं नये. ह्या तहावर सही केल्यावर क्लैव्ह लागलाच इंग्लंदास जावयास निघाला ( फेब्रुवारी १७६१ ), व तेथें त्यानें बजाविलेल्या कामगिऱ्यांबद्दल त्याचें नांव वडे लोकांच्या वर्गांत घालून त्यास लार्ड क्लैव ऑव् प्लासी ( प्लासीचा सरदार क्लैव ) ही पदवी दिली.

१२५. **कौंत दि लाली हा फोर्ट सेंट डेव्हिड व तंजावर ह्यांजवर हल्ला करितो**—१७५८ च्या एप्रिल महिन्यांत कौंत दि लाली नामक एका फार शूर अंमलदारास हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या सर्व वसाहतींचा नाश करण्यासाठीं व त्यांस या देशांतून हांकलून देण्यासाठीं फ्रेंच सरकारानें पाठवून दिलें. २५,०० युरोपियन व तित-

केच काळे शिपाई एवढ्या प्रबळ सैन्यानिशीं त्यानें फोर्ट सेंट डेव्हिड किल्ला घेऊन त्याच्या भिंती पाडून टाकिल्या. पुढें त्यानें तंजावराकडे स्वारी केली; पण तींत त्यास इतकें यश आलें नाहीं. त्याच्या सैन्यानें मोठ्या कष्टानें व पुष्कळ धोके सोसून, त्या शहरापर्यंत एकदांची मजल मारिली, व त्याच्या तटबंदींत एक भगदाड पाडिलें; पण इतक्यांत इंग्लिशांचें एक सैन्य तेथें येऊन पोहोंचल्यामुळें त्यास तो किल्ला घेतां आला नाहीं; उलट आपल्या जड तोफा तेथेंच ठेवून समुद्रकिनाऱ्याकडे त्यांस परतून जावें लागलें.

१२६. **मद्रासचा वेढा**—पांदिचेरीस परत आल्यावर लालीनें अर्काट शहरावर हल्ला करून तें घेतलें. नंतर दक्षिणेंत बुसी हा मागें सांगितल्याप्रमाणें फ्रेंचांची इतकी सुंदर कामगिरी बजावीत असतां त्यास मद्रासेस वेढा घालण्याच्या कामीं साहाय्य करण्यासाठीं त्यानें परत बोलाविलें. एकंदर ७,००० हजार सैन्य गोळा केलें, व त्याच्यानिशीं दिजंबरच्या बाराव्या तारखेस तो मद्रासेसमोर येऊन थडकला. त्या शहराचे रक्षणास ४,००० गोरे व काळे शिपाई असून त्यांचा मुख्य कर्नल लारेन्स हा होता. त्यांनीं मोठ्या शौर्यानें शहराचें संरक्षण केलें, व इकडे लाली आणि बुसी ह्यांच्यांत तंटे उत्पन्न होऊन वेढा घालणाऱ्या सैन्याचा तितका जोर कमी झाला. तेव्हां दिजंबरच्या १४ व्या तारखेस इंग्लिशांची फौज त्यांजवर छापा घालण्यासाठीं शहराबाहेर आली; व तीस जरी फ्रेंचांनीं परत पिटाळून लाविलें, तरी त्या कामांत त्यांचे ४०० लोक मारले गेले. बरें, तटबंदींत भगदा पाडाव्या तर तसें करण्यास, फ्रेंचांपाशीं तितक्या मोठ्या तोफा नव्हत्या. तेव्हां त्यांचा कांहींच

उपाय चालेना. शेवटीं १७५९ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १६ व्या तारखेस आडमिरल ( आरमाराधिपति ) पोकाक् हा ६०० गोरे शिपाई घेऊन मदतीस आला, व तेणेंकरून शहराचा बचाव झाला. कारण दुसऱ्या दिवशीं लाली वेढा उठवून पांदिचरीस निघून गेला.

**१२७. इंग्लिश लोक मच्छलीपट्टण व सुरत काबीज करितात**—वर सांगितल्याप्रमाणें बुसी दक्षिणेंतून निघून गेल्यावर मागें कर्नेल फोर्द ह्यानें तेथें असलेल्या कानूफ्लान्स नामक फ्रेंच सरदाराचा पराजय केला, व १७५९ च्या एप्रिल महिन्यांत मच्छलीपट्टण बंदरावर छापा घातला. ह्याच्या योगानें दक्षिणेंतील फ्रेंचांच्या सत्तेस अखेरचाच धक्का बसला. निजाम सलाबतजंग ह्यानें इंग्लिशांशीं तह केला; त्यांत त्यानें सर्व फ्रेंच लोकांस आपल्या नोकरींतून काढून टाकण्याचें, आणि इंग्लिश कंपनीस मच्छलीपट्टण शहर व ४,००,००० रुपये उत्पन्नाचा किनाऱ्यावरचा ८० मैलांचा पट्टा देण्याचें कबूल केलें. ह्याच सालाच्या आरंभीं मुंबईहून एक फौज सुरतेवर चाल करून गेली, कारण तेथील अधिकारी इंग्लिश व्यापाऱ्यांपासून कर फार घेत, व त्यांस इतर भीति फार असे. वरील फौजेनें या बंदराचें संरक्षणार्थ तापी नदीच्या पात्रांवर आडवा ताणलेला सांखळदंड तोडून टाकिला, व चार तास मोठ्या झटापटीची लढाई झाल्यावर शहर हातीं आलें. इंग्लिशांनीं त्या शहराचा ताबा जो आपल्या हातीं घेतला तो मोगल बादशहाच्या नांवानें घेतला; व त्यानें लवकरच कंपनीस सुरतच्या गव्हर्नराचा किताब देऊन टाकिला.

**१२८. वांदिवाशची लढाई**—१७५९ च्या अखेरीस

अखेरीस इंग्लिशांच्या जहाजांनीं हिंदुस्थानांतील फ्रेंच लोकांना यूरोपांतून फौजफांटा किंवा इतर सामग्री आणूं देण्याचें बंद करून टाकिलें. त्याच वर्षाच्या नवंबर महिन्यांत कर्नेल कूट ह्यानें वांदिवाश शहरावर छापा घंतला, आणि ९०० लोक व ४९ तोफा हस्तगत केल्या. पुढच्या वर्षाच्या प्रारंभीं लालीनें वांदिवाश किल्ला परत घेण्याची खटपट केली. पण त्याच्या मोडक्या तटबंदीवर तो हल्ला करावयास येणार तों अगोदरच कूट साहेब तेथें येऊन पोहोंचला, व त्यानें त्यास युद्धास निमंत्रण केलें; तें अर्थात् लालीसारख्या अभिमानी माणसाच्यानें नाकारवेना. दोन्ही बाजूंचीं सैन्यें सरासरी सारख्याच तोडीचीं होतीं; व त्यांनीं एकमेकांशीं मोठ्या हट्टानें लढाई चालविली. शेवटीं इंग्लिशांनीं जय मिळविला; व पराजित झालेलें फ्रेंच सैन्य जेव्हां परत जाऊं लागलें तेव्हां त्याचें मोठ्या शौर्यानें संरक्षण करून लालीच्या सैन्यांतील ऐरिश पलटणीनें विलक्षण कीर्ति संपादन केली.

१२९. **पांदिचरीचा पाडाव, व फ्रेंचांच्या सत्तेचा मोड**—वांदिवाश मुक्कामीं जय मिळविल्यावर कूट साहेबानें फ्रेंचांच्या ताब्यांतील अर्काट व दुसरीं पुष्कळ शहरें व किल्ले काबीज केले. पुढें सपटंबर महिन्यांत त्यानें पांदिचरीस वेढा घातला. त्या शहराचें रक्षण करण्यास १५०० फ्रेंच व ९०० काळे शिपाई इतकी फौज होती. तिच्यापाशीं अन्नाची वगैरे सामग्री नसल्यामुळें ती फार संकटांत पडली; व इंग्लिशांचीं जहाजें सभोंवतालचा समुद्र व्यापून बसलेलीं असल्यामुळें बाहेरून सामग्री किंवा माणसांची मदत मिळण्याची आशा त्यांस मुळींच नव्हती. तरी ते शहराच्या संरक्षणार्थ मोठ्या शौर्यानें लढले. पण शेवटीं १७६१ त

जानेवारीच्या १९ व्या तारखेस इंग्लिशांच्या तोफा जेव्हां शहराच्या तटाजवळ येऊन भिडल्या, तेव्हां लालीस त्यांच्या स्वाधीन होणें भाग पडलें. अशा रीतीनें हिंदुस्थानांतील फ्रेंचांच्या मुलखाची राजधानी इंग्लिशांच्या हातीं आली, व ह्या देशांत राज्य स्थापन करण्याची जी फ्रेंच लोकांची उमेद ती समूळ नाहींशी झाली. ह्या ठिकाणीं एक गोष्ट ध्यानांत आणण्यासारखी आहे. ती ही कीं, मराठ्यांचा पराजय १७६१ च्या जानेवारींतच, ह्मणजे ज्या वर्षीं व ज्या महिन्यांत पांदिचरीचा पाडाव झाला त्या वर्षीं व त्या महिन्यांतच, पानिपत मुक्कामीं होऊन गेला. ह्या ज्या दोन मोठ्या गोष्टी एके समयीं घडून आल्या, तेणेंकरून इंग्लिशांच्या एका मोठ्या प्रतिस्पर्ध्याची शक्ति कायमची क्षीण होऊन, व दुसऱ्या मोठ्या प्रतिस्पर्ध्याची सत्ता तर समूळ नष्ट होऊन, हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारचें राज्य स्थापन होण्याचा मार्ग खुला झाला.

---

## भाग ७ वा.

## हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्याची वाढ.

१३०. **१७६० ते १७६४ या अवधींत घडून आलेल्या गोष्टींची गोळाबेरीज**—क्लैव साहेब इंग्लंदास परत गेल्यावर बंगाल्यांत कदाया व राज्याच्या घडामोडी बहुतेक सारख्या सुरू होत्या. कलकत्ता येथील अधिकारी-लोक कंपनीच्या कामाची व्यवस्था जरी बरोबर ठेवीत नव्हते, तरी बंगालच्या एतद्देशीय राजाच्या शिपायांपेक्षां

कंपनीचे गोरे व काळे शिपाई इतके श्रेष्ठ होते कीं, शत्रूचीं सैन्यें संख्येनें मोठीं असलीं तरी ते त्यांच्यावर लढाई मागून लढाई जिंकीतच होते. असें होतां होतां शेवटीं बक्सार मुक्कामीं जो त्यांस जय मिळाला तेणेंकरून बंगाल प्रांत, अयोध्या प्रांत, व खुद्द दिल्लीच्या बादशाहाचें तक्त, हीं सर्व कंपनीच्या पायांपाशीं येऊन दाखल झालीं.

१३१. **मीरजाफर पदच्युत होतो**—मीरजाफरास बंगालचा कारभार चांगल्या रीतीनें करतां आला नाहीं. त्यानें मराठ्यांस आपला सर्व मुलूख आक्रांत करूं दिला, त्याची फौज बंडें करावयास लागली, व त्याच्या खजिन्यांत पैसा नाहींसा झाला. बंगाल्यांतील ब्रिटिश सरकारालाहि पैशाची फार वाण होती. ह्मणून त्यांनीं मीरजाफरास पदच्युत करून त्याचा जांवई मीरकासीम यास त्याच्या गादीवर बसविण्याचा निश्चय केला. तो राज्याची व्यवस्था सासऱ्यापेक्षां अधिक चांगली ठेवील, व कलकत्ता येथील कंपनीच्या तिजोरीस पैशाचा पुरवठा करील, अशी त्यांस आशा होती. ह्मणून मीरकासिमाशीं तह करून असें ठरविलें कीं, त्यानें सुभेदार झाल्याबरोबर पांच लाख रुपये आणि चितागांग, बरद्वान, व मिदनापूर हे सुपीक प्रांत, कंपनीस द्यावे. मीरजाफराची त्याला स्वतःला पदच्युत करण्याच्या कामीं संमति त्याची मनवळणी करून किंवा जबरीनें कशी तरी घेतली, व तो अधिकार सोडून कलकत्यास जाऊन राहिला.

१३२. **मीरकासीम व कंपनी ह्यांजमधील भांडण. पाटणा येथील कत्तल**—मीरकासीमानें कलकत्यास जरी सात लाख रुपये पाठविले तरी लवकरच कंपनीशीं

त्याचें भांडण सुरू झालें; कारण पाटणा, कासीमबाजार व डाका येथील कंपनीच्या वखारींतील कामगार मीरकासिमानें नेमिलेल्या माजिस्त्रेटांच्या व कर गोळा करणारांच्या कामांत हात घालूं लागले. ह्मणून त्यानें १७६३ च्या जून महिन्यांत आपल्या राज्यांतील सर्व इंग्लिश लोकांस पकडण्याचा हुकूम सोडिला. ह्या हुकमाचा परिणाम असा झाला कीं, कंपनीचे पुष्कळ कामगार मारले गेले, व पाटणा येथें २०० कामगार कैदी झाले. तेव्हां कलकत्ता येथील कौन्सिलानें मीरजाफरास पुनः गादीवर बसविण्याचा निश्चय केला; कारण तसें केल्यास तो पाहिजे तितका पैसा देण्यास कबूल होता. मीरकासिमाच्या फौजेस सुम्रू नामक एका स्विस ( स्विसर्लंदांतील ) गृहस्थानें शिकवून तयार केलें होतें, तरी ब्रिटिश सैन्यानें तिचा तीनदां पराभव करून टाकिला. तिसऱ्यानें पराजय झाल्यावर मीरकासीम पाटणा येथें पळून गेला, व कैद करून ठेवलेल्या इंग्रज लोकांची कत्तल करण्याचा त्यानें हुकूम केला. त्याचा हुकूम सुम्रू यानें अमलांत आणिला. त्यानें एका मेजवानीचे समयीं त्या सर्व २०० कैद्यांस स्वतःच छाटून टाकिलें; कारण हें खुनाचें काम त्यानें ज्या शिपायांवर लादिलें होतें त्यांना किळस येऊन तें त्यांनीं नाकारिलें.

**१३३. बक्सार येथील लढाई. १७६४**—ह्याप्रमाणें पाटणा येथें कत्तल उडविल्यावर मीरकासीम व सुम्रू हे अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला ह्याजकडे आश्रयार्थ निघून गेले. सुजाउद्दवला हा हल्लीं शाहाअलमाचा वजीर झाला असून, तो तरुण बादशाह या समयीं त्याच्याच छावणींत रहात होता. पाटणा येथील ब्रिटिश सैन्य इतकें बिघडलें

होतें कीं त्यांच्यांपैकीं कांहीं शिपाई शत्रूकडे निघून जाण्यास तयार झाले; ह्मणून मेजर मनरो यास चिठ्या टाकून त्यांच्यापैकीं चोवीस असामींस देहांत शिक्षा द्यावी लागली. पावसाळ्यानंतर सुजाउद्दवला व मीरकासीम यांस लढाई देण्यासाठीं तो चाल करून निघाला; ते बक्सार नजीक तळ देऊन राहिले होते तेथें त्यानें त्यांस गांठिलें. तेथें त्याची त्यांची लढाई झाली, व तींत वरील दंगेखोर शिपाई चांगल्या रीतीनें लढले. शत्रूंचा पराभव होऊन त्यांचे ६,००० लोक मारले गेले, व १३० तोफा इंग्लिशांच्या हातीं आल्या. ह्या जयाचा परिणाम असा झाला कीं, सुजा उद्दवला लखनौ येथें पळून गेला, व बादशाहानें इंग्लिशांशीं सख्य करण्याचें बोलणें लाविलें. सुजाउद्दवला मीरकासीम व सुम्रू ह्यांस इंग्लिशांच्या स्वाधीन करीना; उलट, त्यानें मल्हारराव होळकर याचे सैन्यास मदतीस बोलाविलें; पण मेजर कार्नाक यानें मराठ्यांचा पराभव करून त्यांस यमुनेच्या पलीकडे हांकून लाविलें, (मे १७६५). नंतर लवकरच मल्हारराव मृत्यु पावला, व त्याच्या राज्याची व्यवस्था त्याची विधवा सून अहल्याबाई हिजकडे आली; तिनें शहाणपणानें राज्य चालविलें, व इंदूर शहराची स्थापना केली. ह्याच वर्षाच्या आरंभीं मीरजाफर मरून गेला होता, व त्याचा मुलगा नुजाम उद्दवला ह्याची कंपनीनें त्याच्यामागें बंगालच्या सुभेदारीवर योजना केली होती.

**१३४. क्लैव साहेब हिंदुस्थानांत परत येतो—** अशी एकंदर हालहवाल असतां क्लैव साहेब १७६५ च्या एप्रिल महिन्यांत या देशांत परत आला. इंग्लंदांत असतां प्रधानमंडळ, व कंपनीचे डिरेक्टर्स् (व्यवस्थापक), हे

त्याच्या बरेच विरुद्ध झालेले होते. पण पाटणा येथील कत्तलीची हकीकत जेव्हां तेथें जाऊन पोहोंचली, तेव्हां, बंगाल्याचा बचाव करील तर हा एकटाच करील, असें सर्वांच्या लक्षांत येऊन चुकलें. ह्मणून त्यास गव्हर्नर व कमांडर-इन्-चीफ् (मुख्य सेनापति) अशी जोड पदवी देऊन हिंदुस्थानांत पाठविलें.

**१३९. क्लैव साहेब बंगाल्यांतील कामाची व्यवस्था करितो**—सुजा उद्दवला याचा युद्धांत पराभव अगोदरच केलेला असल्यामुळें, बंगाल व अयोध्या येथील कामांची व्यवस्था लावून शांतता स्थापन करणें एवढेंच काम क्लैव साहेबास करावयाचें होतें. १७६५ च्या आगस्ट महिन्याच्या १६ व्या तारखेस त्यानें तह केला; त्याच्या अन्वयें शाहाअलमास कोरा व अलाहाबाद हे प्रांत मिळाले; व अयोध्या प्रांताचा बाकीचा भाग नबाब सुजाउद्दवला यास परत दिला. बादशाहानें बंगाल, बहार व ओरिसा ह्या प्रांतांची 'दिवाणी,' ह्मणजे तेथील सरकारी उत्पन्न गोळा करण्याचा हक्क, कंपनीस दिला; व वसूलापैकीं २६ लाख रुपये बादशाहाच्या तिजोरींत कंपनीनें भरावे असें ठरलें. नुजामउद्दवला यानें बंगालचें रक्षण करण्याचें काम कंपनीकडे अगोदरच देऊन टाकिलें होतें. ह्मणून त्यास वसूलापैकीं ५० लाखाचें वर्षासन करून देऊन त्याजकडे त्या प्रांताचा नबाब हा पोकळ किताब तसाच राहू दिला, पण त्याच्या हातीं वास्तविक सत्ता राहिली असल्यास फारच अल्प राहिली होती. अशा रीतीनें बंगाल्याचा खरा अधिकार कंपनीकडे आला, व स्वतः बादशाह त्यांचा आश्रित होऊन बसला.

१३६. **मुलकी खात्याची सुधारणा**—क्लैव साहेबास मुलकी खात्याचीहि सुधारणा करावी लागली. कंपनीच्या नोकरांस बेकायदेशीर रीतीनें—व विशेषतः खाजगी रीतीनें व्यापार करून, व एतद्देशीय राजे व इतर लोक ह्यांजपासून मोठाली बक्षिसें घेऊन—पैसे मिळविण्याची संवय लागली होती. आपण बंगालचे नवाब व्हावें अशा उद्देशानें जे लोक खटपट करीत ते अशा प्रकारची बक्षिसें फारच देत असत. ह्यामुळें बंगालचे नबाब वरचेवर बदलावे ह्या गोष्टीस वरिष्ठ कामदार नेहमीं अनुकूल असत; कारण प्रत्येक नवा नबाब अधिकारापन्न झाल्याबरोबर या कामदारांस मोठालीं बक्षिसें देई. जरी स्वतः क्लैव यानें याच रीतीनें थोडक्या वेळांत पुष्कळ द्रव्य संपादन केलेलें होतें, तरी ह्या बाबतींत सुधारणा करण्याच्या कामीं तो मुळींच कचरला नाहीं. त्यानें ह्या कामदारांपासून असे नवे करार लिहून घेतले कीं, आह्मास ४,००० रुपयांहून ज्यास्त मोलाचें मिळालेलें प्रत्येक बक्षीस आह्मी कंपनीच्या हवालीं करूं. शिवाय, यापुढें कंपनीच्या लोकांस लांच खाण्याचा मोह पडूं नये ह्मणून त्यानें त्यांचे पगार वाढविले. या देशांतील मुलकी खात्याची प्रामाणिकपणा बद्दल जी हल्लीं कीर्ति आहे ती त्या खात्यास ह्या वेळापासूनच प्राप्त होऊं लागली.

१३७. **लष्करी खर्चाची छाटाछाट**—क्लैव साहेबास आणखी एक बिकट काम करावयाचें होतें; तें हें कीं लष्करी खर्च कमी करावयाचा होता. जी फौज लढाईवर गेलेली असेल तीस कांहीं विशेष वेतन मिळत असे, त्यास 'भत्ता' ह्मणून ह्मणत. प्लासीच्या लढाईनंतर मीरजा-

फरानें इंग्लिश फौजेस खुष करण्यासाठीं ह्मणून दुप्पट भत्ता दिला होता; व तेव्हांपासून दुप्पट भत्ता हा आपला हक्काचाच आहे असें सोजिरांस वाटूं लागलें होतें; ह्मणून १७६६ सालानंतर तुह्मांस तो मिळावयाचा नाहीं असें जेव्हां त्यांस सांगितलें, तेव्हां त्यांस फार राग आला. कांहीं लष्करी कामदारांनीं असा निश्चय केला कीं दुप्पट भत्ता देण्याची चाल पुनः सुरू केली नाहीं तर आपण नोकरी सोडून जाणार. हें पाहून क्लैव साहेबानें नवे कामदार मद्रासेहून बोलाविले, व ह्या दंगेखोर कामदारांस कलकत्त्यास पाठविलें. ह्या प्रसंगीं काळे शिपायांनीं आपली राजनिष्ठा कायम ठेविली होती; ह्मणून प्रसंग पडल्यास, गोऱ्या शिपायांचें बंड मोडण्यास त्यांस लावावयाचें अशी योजना केली होती. अशा रीतीनें क्लैव साहेबानें, स्वतःच्या हिमतीनें व दृढ निश्चयानें फौजेच्या मनांत उत्पन्न होणारा बंडाचा अंकुर जेथच्या तेथें दाबून टाकिला, व तीस पुनः ताळ्यावर आणिलें.

**१३८. क्लैव साहेबाच्या कारकीर्दीची अखेर**—१७६७च्या आरंभीं क्लैव साहेबानें हिंदुस्थानास शेवटचा रामराम ठोकिला. आतांपर्यंत त्यानें जें आपलें आयुष्य स्वदेशाचें वैभव व सत्ता हीं वृद्धिंगत करण्याच्या कामीं खर्चिलें होतें, त्याचा शेवट सुखानें व्हावा असा ईश्वरी संकेत नव्हता. त्याची प्रकृति बिघडली होती; व त्याला पुष्कळ शत्रू उत्पन्न झालेले होते; ते त्यास स्वस्थपणानें राहूं देईनात. क्रूरपणानें वागल्याचे व लुटालूट केल्याचे आरोप त्यांनीं त्याजवर आणिले. शिवाय, हिंदुस्थानांत त्याचें सर्व आयुष्य मोठ्या धामधुमींत एकसारखें गेलेलें

असल्यामुळें, मोठ्या हिंमतीनें कांहीं तरी काम केल्याविना नुसते दिवस काढणें ह्मणजे एक दुःसह ओझेंच वाहणें होय असें त्यास वाटे. ह्मणून तो दिवसेंदिवस ज्यास्त ज्यास्त निराश होत चालला, व शेवटीं वयाच्या ५९ व्या वर्षी त्यानें आत्महत्या करून घेतली, ( १७७९. )

१३९. **निजाम अल्ली व नार्दर्न् सर्कार्स् ( उत्तर सरकारें )**–१७६५ सालीं क्लैव साहेब विलायतेहून येऊन कलकत्त्यास जात असतां मार्गीत जेव्हां मद्रास येथें उतरला, तेव्हां बादशहानें नार्दर्न सर्कार्स् हा मुलूख इंग्लिशांस दिला. तो मुलूख पूर्वीपासून निजामाच्या ताब्यांत होता, व मध्यें थोडे दिवस बुसीनें निजामाकडून फ्रेंचांना मिळवून दिलेला होता. पण आतां तो मुलूख बादशहानें इंग्लिशांस दिल्यावरून ते जेव्हां तो आपल्या ताब्यांत घेऊं लागले तेव्हां निजाम अल्लीस राग येऊन तो कर्नाटकावर स्वारी करण्याची तयारी करूं लागला. ह्याच निजाम अल्लीनें १७६३ त आपला भाऊ सलाबतजंग यास पदच्युत करून ठार मारिलें होतें. असो, पण हा तंटा दोघांनीं एकमेकांचें बोलणें थोडथोडें मान्य करून मिटवून टाकिला. ह्या तडजोडीप्रमाणें नार्दर्न सर्कार्स् हा मुलूख इंग्लिशांकडेसच राहिला; पण त्याच्या वसुलांतून कांहीं भाग निजामास खंडणी ह्मणून देण्याचें त्यांस कबूल करावें लागलें. याच वेळीं इंग्लिश, निजाम, व मराठे यांनीं हैदरअल्लीविरुद्ध एकमेकांशीं सख्य केलें. कारण त्याची सत्ता ह्या वेळीं प्रबळ असल्यामुळें त्याच्या चोहों बाजूंच्या शेजाऱ्यांच्या मनांत त्याच्याबद्दल मत्सर उत्पन्न झाला होता.

१४०. **हैदरअल्लीचा उदय**–हैदरअल्लीचा जन्म एका

गरीब कुळांत झाला होता. लोकांचें पुढारीपण करण्याच्या कामांत तो हुशार व धीट असल्यामुळें त्याच्यापाशीं लवकरच पुष्कळ लोक जमले, व त्याचें प्राबल्य भराभर वाढत चाललें. शेवटीं म्हैसूरच्या हिंदु राजानें त्यास आपल्या सैन्याचा अधिपति नेमिलें. १७६१ सालीं त्यानें राजास पेन्शन करून देऊन राज्याचा मुलकी व लष्करी कारभार आपल्या हातांत घेतला. १७६३ त त्यानें बेदनूर शहर घेतलें, तेथें त्यास एक कोटी वीस लाख पौंड किंमतीची लूट सांपडली. १७६५ त माधवराव पेशव्यानें त्याचा पराभव करून त्याचें फारच नुकसान केलें. तेव्हां त्यास जिंकलेल्या मुलखा-पैकीं कांहीं मुलूख मराठ्यांस द्यावा लागला, व बत्तीस लाख रुपये रोख द्यावे लागले. असें झालें तरी, पुढच्या वर्षी, मलबारप्रांत जिंकून टाकून त्यानें नैर्ऋत्यदिशेस आपलें राज्य वृद्धिंगत केलें. त्याच्या कारकीर्दीची जेव्हां एथवर मजल येऊन पोहोंचली, तेव्हां त्याची व इंग्लिशांची झटापट उडण्याचा प्रसंग पहिल्यानें आला.

**१४१. हैदरअल्ली व निजाम ह्यांचें इंग्लिशांशीं युद्ध**—हैदरअल्लीनें मराठ्यांस लांच देऊन वरील कटांतून फोडिलें, व इंग्लिशांस सोडून स्वतःशीं सख्य करण्याकडे निजामाचें मन वळविलें. अशा रीतीनें ह्या दोघांचीं सैन्यें एकत्र झालीं तेव्हां एकंदर ४३,००० घोडेस्वार व २८,००० पायदळ इतकी फौज जमली. तेव्हां इंग्लिशांचा सेनापति कर्नल स्मिथ ह्यास एवढ्या फौजेपुढें मागें हटावें लागलें. त्यावरून शत्रूचे घोडेस्वार घांटावरून पाण्याच्या लोंढ्यासारखे झपाट्यानें खालीं लोटले, व खालचा सपाटीवरचा मुलूख त्यांनीं फस्त केला. त्यांच्यापैकीं पांच हजार लोक खुद्द

मद्रासपर्यंत चाल करून आले. त्यांनीं तें शहर लुटलें, व तेथील युरोपियन रहिवासी स्वरक्षणार्थ फोर्ट सेंट जार्ज किल्ल्यांत पळून गेले. अशा रीतीनें गेलेली अब्रू पुढें १७६७ च्या सप्तंबर महिन्यांत कर्नल स्मिथ ह्यानें जेव्हां शत्रूच्या विशाळ फौजेस एकूर मुक्कामीं गांठिलें, तेव्हां भरून आली. त्या प्रसंगीं शत्रूचें सैन्य संख्येनें जरी फार मोठें होतें, तरी ब्रिटिश फौजेस लष्करी शिक्षण उत्तम तऱ्हेचें मिळालेलें असल्यामुळें तिनें त्या सैन्यावर जय मिळविला. हैदरअल्लीच्या फौजेचा मोड होऊन ती जेव्हां मागें परतली, तेव्हां जर त्यानें कांहीं निवडक स्वारांनिशीं पुढें येऊन मार्गरक्षण केलें नसतें, तर त्याचे लोक मेले त्यापेक्षांहि जास्त मेले असते. पुढच्या वर्षीं निजामानें आपल्या दोस्तास सोडून देऊन इंग्लिशांशीं स्वतंत्र तह केला.

**१४२. हैदरअल्ली व इंग्लिश यांजमधील युद्ध**—हैदरअल्लीनें आपला पुत्र टिपू ह्याच्या मदतीनें युद्ध चालू ठेविलें, व त्यांत त्यास कमीज्यास्ती यश येत गेलें. त्यानें इंग्लिशांच्या फौजेसमोर उभें राहून लढाई करण्याचें टाळावें, व आपले घोडेस्वार पुष्कळ असल्यामुळें इंग्लिशांना अन्नाचा वगैरे पुरवठा होऊं देऊं नये, असा क्रम चालू ठेविला. सरतेशेवटीं १७६९ च्या प्रारंभीं, समोर उभे असलेल्या इंग्लिशांच्या सैन्यास झुकांडी देऊन तो निसटला, व एकाएकीं ६,००० घोडेस्वारांनिशीं मद्रासेनजीक सेंट टामस नामक डोंगरावर येऊन थडकला. मद्रास शहर ह्या डोंगराच्या अगदीं माऱ्यांत आहे; यामुळें फोर्ट सेंट जार्ज खेरीजकरून बाकी सर्व शहर, तेथील संपत्ति व युरोपियन रहिवाशांचे बंगले, हीं सर्व त्याच्या हातीं अचूक येण्यासारखीं होतीं.

अशी स्थिति असल्यामुळें, हैदर जेव्हां तहाचें बोलणें करण्यास तयार झाला तेव्हां मद्राससरकाराला तें नाकारण्याची सोय मुळींच उरली नव्हती. तेव्हां तह होऊन असें ठरलें कीं, प्रस्तुत युद्धांत दोघांनीं एकमेकांचे घेतलेले मुलूख एकमेकांस परत द्यावे, व एकमेकांचें एकमेकांनीं शत्रूपासून संरक्षण करावें. अशा रीतीनें, फोर्ट सेंट जार्ज किल्ल्याच्या तटासमोर उभें राहून आपण सांगूं तीं तहाचीं कलमें इंग्लिशांकडून कबूल करवावयाचीं, अशा प्रकारचा विजयश्रीचा तोरा मिरवून हैदर म्हैसुरास परत गेला. ह्या तहास मद्रासचा तह म्हणतात, ( १७६९. )

१४३. **हैदरअल्ली व मराठे**—ह्या वरील तहानंतर लवकरच हैदराचें मराठ्यांशीं युद्ध सुरू झालें; त्यांत त्यास वरच्यापेक्षां फारच कमी यश आलें. माधवराव पेशव्यानें स्वारांची मोठी सेना बरोबर घेऊन म्हैसुरावर १७७० सालीं स्वारी केली, व सर्व मुलूख आक्रांत करून टाकिला. पुढें प्रकृति बिघडल्यामुळें माधवरावास जेव्हां समरांगण सोडून जावें लागलें, तेव्हां त्रिंबकराव यानें मराठ्यांचें आधिपत्य पत्करून तसेंच जय मिळविले. सरतेशेवटीं हैदरास हार खावी लागली, व मराठ्यांस रोख पैसा व म्हैसूरच्या उत्तरेकडील मुलूख तोडून देऊन त्यांच्याशीं तह करावा लागला, ( १७७१. ).

१४४. **मराठ्यांचे ( उत्तर ) हिंदुस्थानांत पराक्रम**—ह्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत देखील मराठ्यांची धलाखी व हिंमत हीं दिसून येत होतीं. १७६९ सालीं विसाजी कृष्ण ह्यास सेनापति करून ते चंबळानदी उतरून पलीकडे गेले, व रोहिल्यांचा मुलूख त्यांनीं आक्रांत करून

टाकिला. दिल्लीचा बादशाह इंग्लिशांस सोडून मराठ्यांकडे आश्रयास आला, व महादजी शिंद्यानें त्यास दिल्ली येथें त्याच्या पूर्वजांच्या गादीवर एकदांचें नेऊन बसविलें; त्या गादीला तेव्हांपर्यंत त्याचे पाय लागले नव्हते.

१४५. **माधवरावाचा मृत्यु**—माधवराव क्षय लागून १७७१ सालीं मृत्यु पावला. त्या वेळीं त्याचें वय केवळ २८ वर्षांचें होतें. मराठ्यांचा इतिहासकार ( ग्रांट डफ ) असें ह्मणतो कीं, " ह्या उत्कृष्ट राजाच्या अकालिक मृत्यूनें मराठ्यांच्या विस्तृत राज्याची जेवढी कायमची हानि झाली, त्यापेक्षां जास्त हानि पानिपतच्या मैदानांत झाली नव्हती." तो युद्धाचे वेळीं सेनापतीचें काम करण्याच्या कामांत हुशार होता, इतकेंच नाहीं, तर "जुलमी माणसापासून दुर्बलाचें व श्रीमंतापासून गरीबाचें नेटानें संरक्षण करावयाचें, आणि न्यायसमता सर्वांशींच ठेवावयाची, ह्याबद्दलहि त्याची कीर्ति होती, व तीस तो पात्र होता." त्याच्यामागून त्याचा भाऊ नारायणराव हा पेशवाईचें काम करूं लागला; त्यानें मराठ्यांस हिंदुस्थानांतून परत बोलाविलें.

१४६. **तंजावराशीं युद्ध**—१७७१ त मद्रास सरकारानें तंजावरच्या राजाशीं युद्ध सुरू केलें, कारण इंग्लिशांचा दोस्त व कर्नाटकचा नबाब जो अहमदअल्ली त्याच्या मुलुखावर त्यानें स्वारी केली होती. जेव्हां इंग्लिशांनीं त्याच्या राजधानीच्या तटाच्या भिंतींत भगदाड पाडिलें तेव्हां तो बेतावर आला, व मदुराच्या शेजारचा मुलूख तोडून देऊन त्यानें इंग्लिशांशीं तह केला; पण तो फार दिवस टिकला नाहीं; कारण महमदअल्लीच्या सूचनेवरून १७७३ त मद्रास सरकारानें त्याच्याशीं पुनः युद्ध आरंभिलें. त्या युद्धांत तंजा-

वर शहर काबीज केलें, व त्या ठिकाणीं इंग्लिशांस इतकी लूट सांपडली कीं, प्रत्येक सब् आल्टर्नाच्या* वांट्यास चारशें चारशें पौंड आले. मद्रास सरकारानें पराजित राजास कैदेंत ठेवण्याची परवानगी महमदअल्लीस दिली; पण कंपनीच्या डायरेक्टरांचें मत असें पडलें कीं, तंजावरच्या राजाशीं मद्रास सरकारचें हें वर्तन अन्यायाचें झालें. ह्मणून त्यांच्या हुकमावरून मद्रासचा नवा गव्हर्नर लॉर्ड पिगट ह्यानें राजास त्याची गादी परत दिली; पण ती अशा शर्तीवर कीं, त्यानें आपल्या मुलुखाच्या संरक्षणाचें काम ब्रिटिश सैन्याकडे द्यावें, व त्याच्या खर्चासाठीं १,६०,००० पौंड वर्षास द्यावे.

१४७. **वॉरन हेस्टिंग्स्**—हा साहेब कंपनीच्या नोकरींत कारकून ह्मणून शिरून १७५० त इकडे आला, तो १७७२ त बंगालचा गव्हर्नर व प्रेसिडेंट ह्या पदवीस चढला. तो जेव्हां ह्याप्रमाणें बंगालच्या राज्यकारभाराचा मुख्य झाला तेव्हांची वेळ फार बिकट होती. त्या प्रांतांत भयंकर दुष्काळ पडलेला होता, व कंपनीचे डायरेक्टर्स हिंदुस्थानांतून ज्यास्त ज्यास्त पैक्याची मागणी करीत होते. बंगालचा नबाब लहान असून महमद रेझाखान हा त्याच्या नांवानें कारभार चालवीत होता, व कंपनीकरितां जमाबंदीची वसुलात तोच करीत असे (१३९ कलम पहा). नंदकुमार नामक एका ब्राह्मणाच्या मनांत त्याची संपत्ति व सत्ता ह्यांजबद्दल हेवा उत्पन्न होऊन त्यानें त्याच्याविरुद्ध डायरेक्टरांकडे कागाळी नेली. त्यावरून त्यास पकडून त्याची चवकशी करण्याचा त्यांनीं हेस्टिंग्स्

---

* क्याप्टनच्या खालच्या दर्जाचा लष्करी अंमलदार.

यास हुकूम केला. चवकशीअंतीं जरी तो दोषमुक्त ठरला, तरी त्यास त्याचे कामावर प्रत नेमिलें नाहीं. तेव्हांपासून कलकत्ता एथील ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं बंगाल-प्रांताची सर्व व्यवस्था आपल्याच हातीं घेतली व निरनिराळ्या जिल्ह्यांतून जमाबंदी गोळा करण्यासाठीं कलेक्टर्स (वसूल गोळा करणारे अंमलदार) नेमिले. बंगालच्या तरुण नबाबाचें वर्षासन ३२ लाखांचें होतें तें कमी करून १६ लाखांवर आणिलें.

**१४८. बनारसचा तह**—शाहाअलम बादशाहाच्या मनांत अलाहाबाद व कोरा हे प्रांत त्याचे दोस्त मराठे यांस द्यावे असें आहे हें वर्तमान जेव्हां कलकत्त्यास येऊन पोहोंचलें, तेव्हां त्यास तसें करूं द्यावयाचें नाहीं असा हेस्टिंग्स् ह्यानें निश्चय केला. त्यानें अलाहाबादचे रखवालीस कांहीं ब्रिटिश फौज नेऊन ठेविली, व १७७३ च्या आगष्ट महिन्यांत सुजाउद्दवला यास तो बनारस ( काशी ) येथें जाऊन भेटला. तेथें दोघांचा एक तह झाला; त्यांत असें ठरलें कीं, नबाबानें अलाहाबाद व कोरा प्रांतांबद्दल ५० लाख रुपये कंपनीस द्यावे, व अयोध्या प्रांताच्या उत्तरेस रोहिले म्हणून एक अफगाण जात वस्ती करून राहिली होती तिला जिंकण्यासाठीं ब्रिटिश फौजेनें त्यास मदत करावी, व तिच्या खर्चासाठीं त्यानें आणखी कांहीं रकम निराळी द्यावी.

**१४९. रोहिल्यांशीं युद्ध**—वरील तहाप्रमाणें रोहिलखंड जिंकण्यासाठीं जी फौज नबाबास त्यानें मदतीस देण्याचें वचन दिलें होतें, ती १७७४ सालीं कर्नल चांपियन ह्याच्या हातीं देऊन पाठविली. रोहिले लोक फार हिंमतीनें लढले तरी शेवटीं कर्नल चांपियन यानें त्यांचा पराभव केला.

नबाब व त्याचें सैन्य, ह्यांनीं लढाईच्या कामीं बहुतेक अंशीं कांहींच साहाय्य केलें नव्हतें, पण जेव्हां लढाईत जय आला, तेव्हां त्यांनीं तो देश फार क्रूरपणानें उध्वस्त करून टाकिला. असो, अशा रीतीनें हेस्टिंग्स् यानें एका एतद्देशीय राजास ब्रिटिश सैन्य जणू काय भाड्यानें दिलें ह्याबद्दल कित्येकांनीं त्याला अतिशय कडक दोष लाविला आहे. ह्याच्यावर त्याच्या वतीनें बोलणारे कित्येक लोक असें उत्तर देतात कीं, रोहिले लोक गुप्त रीतीनें मराठ्यांशीं सख्य करीत होते, व ह्या भयंकर शत्रूंस पूर्वेकडे बंगाल्यांत पुढें येण्यास प्रतिबंध व्हावा एतदर्थ रोहिल्यांचा पाडाव करून, व साधेल त्या इतर सर्व मार्गांनीं, अयोध्येच्या राज्यास बळकटी आणणें ही गोष्ट शहाणपणाचीच होती.

१५०. **रेग्युलेटिंग आक्ट. हेस्टिंग्स् गव्हर्नर जनरल होतो**—ह्या वेळीं रेग्युलेटिंग आक्ट ह्या नांवाचा एक कायदा ब्रिटिश पार्लमेंटानें पसार केला. त्या कायद्यानें हिंदुस्थान सरकारच्या घटनेंत फेरबदल झाले व तें सरकार विलायत सरकारच्या कह्यांत पूर्वींपेक्षां जास्त आलें. त्या कायद्यावरून असें ठरलें कीं, ह्यापुढें बंगाल्याकरितां एक गव्हर्नर जनरल नेमावयाचा, त्यास वर्षाचा पगार २५,००० पौंड द्यावयाचा, व त्याच्या मदतीस चार कौन्सिलर (मसलत देणारे) द्यावयाचे, आणि ह्या बंगालच्या गव्हर्नर जनरलाचा अधिकार अर्थात् मद्रास आणि मुंबई येथील गव्हर्नरांवर चालावयाचा. पहिला गव्हर्नर जनरल व त्याचे कौन्सिलर ह्यांची नेमणूक पार्लमेंटानें करावयाची. पुढें या सर्वांची निवड कोर्ट आफ् डायरेक्टर्स ह्यांनीं करावयाची, व ती निवड पसंत नापसंत करण्याचा अधिकार गादीकडे रहा-

वयाचा. पहिला गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्स यास नेमिलें, आणि जनरल क्लाव्हरिंग, कर्नल मॉन्सन, मिस्तर बारवेल, व मिस्तर फ्रान्सिस ह्यांस त्याचे कौन्सिलर नेमिलें. मिस्तर बारवेल खेरीजकरून सर्व सभासद वॉरन हेस्टिंग्सच्या विरुद्ध होते, व त्या अर्थी कौन्सिलांत बहुमत त्यांचेंच होतें; ह्मणून तो जी जी म्हणून योजना करील ती ती त्यांस हाणून पाडतां येत असे.

१५१. **साष्टीचा पाडाव**–१७७४ त मुंबईस असें वर्तमान येऊन पोहोंचलें कीं, वसई व साष्टी मराठ्यांपासून परत घेण्यासाठीं पोर्तुगीज लोकांचें एक सैन्य स्वारी करून येत आहे. साष्टीबेट उत्पन्नाचें असून, शिवाय तें बेट असल्यामुळें हिंदुस्थानांतील शत्रूपासून त्याचें रक्षण सहज करतां येण्यासारखें होतें, व शत्रूंच्या ताब्यांत राहिल्यास मुंबईस त्याजपासून फारच भय होतें. ह्यामुळें मुंबई सरकारास त्याचा फार दिवसांपासून लोभ सुटला होता. ह्मणून पोर्तुगीज येऊन पोहोंचण्याच्या अगोदर तें आपल्या ताब्यांत घेण्याचा त्यांनीं निश्चय केला. त्या वर्षाच्या अखेरीस मुंबईहून एक फौज जाऊन तिनें साष्टीबेटांतील मुख्य शहर ठाणें याजवर छापा घातला, व त्याचें रक्षण करणारे जे दुसरे किल्ले होते ते घेतले. ह्या वेळीं ज्या अर्थी इंग्लिशांचें मराठ्यांशीं वैर नव्हतें त्या अर्थी साष्टीवरच्या ह्या हल्ल्यांत न्यायापेक्षां सोय ज्यास्त होती असेंच मानावें लागतें.

१५२. **मराठ्यांशीं पहिलें युद्ध**–ह्या वेळीं आपसांत युद्धें होऊन मराठे दुर्बल झाले होते. माधवरावाच्या मागून पेशवाईवर आलेला त्याचा भाऊ जो नारायणराव त्यानें पेशवाईचें काम नऊ महिने केल्यानंतर त्याचा वध

झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा चुलता रघुनाथराव, ज्याची सामान्यतः राघोबा या नांवानें प्रसिद्धि आहे, तो आपला हक्क पेशवाईवर सांगूं लागला. नाना फडणीस त्याच्या ह्या म्हणण्यास विरुद्ध होता; म्हणून मारलेल्या पेशव्याचा माधवराव नारायण नांवाचा तान्हा पुत्र होता, त्याचा पक्ष त्यानें उचलिला. १७७५ च्या प्रारंभीं मुंबई सरकारास वसई, साष्टी, व कांहीं इतर प्रांत देऊं करून राघोबानें त्या सरकारचें साहाय्य मिळविलें. ह्या तहास सुरतेचा तह म्हणतात. त्या तहाच्या अन्वयें कर्नल कीटिंग ह्याच्या हाताखालीं एक ब्रिटिश फौज देऊन राघोबास पेशवाई मिळविण्याच्या खटपटींत साहाय्य करण्यास तिस सुरतेस पाठविलें. ह्या फौजेनें मेच्या १८ व्या तारखेस मराठ्यांस आरासच्या मैदानांत गांठिलें. मराठ्यांकडील घोडेस्वारांनीं जोराचे हल्ले करून ब्रिटिश फौजेची रांग फोडिली. कारण, ह्या फौजेस राघोबाच्या अव्यवस्थित सैन्यापासून बहुतेक मुळींच मदत झाली नाहीं. तथापि शेवटीं कीटिंग ह्यानें आपली फौज पुनः एकत्र जमवून लढाई जिंकिली. पण या जयानें राघोबास पेशवाईचा अधिकार मिळाला नाहीं. कारण, बंगाल सरकारानें कर्नल अप्टन यास पुण्यास पाठविलें, आणि राघोबाचे प्रतिपक्षी पुरंदरच्या तहानें वसई व साष्टी हीं देण्यास जेव्हां कबूल झाले, तेव्हां राघोबाचा पक्ष सोडून दिला.

१९२. **नंदकुमारास देहांतशिक्षा**–इकडे बंगाल सरकारांत भांडणें फारच माजलीं. ह्या वेळीं लांचाचे अनेक आरोप हेस्टिंग्सवर आणिले होते, व कौन्सिलांतील त्याच्या विरुद्ध असलेल्या प्रबल पक्षाची अशी इच्छा होती कीं, ह्या आरोपांची चवकशी कौन्सिलापुढें व्हावी. हेस्टिंग्स असा

आग्रह धरून बसला कीं, रेग्युलेटिंग आक्टाप्रमाणें कलक-त्यास जें न्यायाचें वरिष्ठ कोर्ट स्थापन झालेलें आहे त्याच्याच हातीं असल्या आरोपांची चवकशी करण्याचा अधिकार आहे. हेस्टिंग्सवर आरोप आणणारांमध्यें नंदकुमार मुख्य होता; त्याजवर हेस्टिंग्सनें भयंकर सूड उगविला. कल-कत्त्याचा चीफ् जस्टिस ( मुख्य न्यायाधीश ) व हेस्टिंग्सचा शाळासोबती, सर एलिजा इम्पे, याजपुढें त्याज्यावर ६ वर्षां-पूर्वीं खोटा रोखा केल्याची तोहमत आणिली, व गुन्ह्याची शाबिती झाली. त्या वेळच्या इंग्लिश कायद्याप्रमाणें बनावट कागद करणारांस देहांतशिक्षा होती; ह्मणन त्या श्रीमान् व प्रबल ब्राह्मणास फांशीं दिलें. ह्यानंतर हेस्टिंग्सवर आरोप कमी येऊं लागले.

१९४. **बंगालच्या कौन्सिलांत फेरबदल**–१७७६ त मॉन्सनच्या मृत्यूमुळें, व पुढील सालीं क्लाव्हरिंगच्या मृत्यू-मुळें, हेस्टिंग्स यास बंगालच्या कौन्सिलांत बहुमत प्राप्त झालें. १७८० त त्याचा हाडवैरी जो फ्रान्सिस यास द्वंद्वयुद्धांत त्यानें जखमी केलें. जखम बरी झाल्यावर फ्रान्सिस इंग्लंदास निघून गेला; तेव्हां बंगाल व ब्रिटिश इंडिया ह्या प्रांतांचा सर्व कारभार हेस्टिंग्सच्या ताब्यांत निर्विवाद रीतीनें आला.

१९५. **फ्रान्साशीं युद्ध**–सुरतेच्या तहाअन्वयें इंग्लि-शांचें मराठ्यांशीं जें युद्ध सुरू झालें होतें त्यांत पुरंदरच्या तहानें थोडकेच दिवस काय तो खळ पडला होता; ह्मणून पुनः तें चालू झालें. तेव्हां त्या युद्धांत मदत करण्यासाठीं मधील सर्व हिंदुस्थान वलांडून बंगाल्यांतून दक्षिणेंत सैन्य पाठवावयाचें असा मोठ्या धिटाईचा बेत हेस्टिंग्सनें १७७८

त केला. पुढें जेव्हां फ्रान्स व इंग्लंद ह्यांच्यामध्यें युद्ध सुरू झाल्याची बातमी कलकत्त्यास येऊन पोहोंचली, तेव्हां फ्रेंच लोक कदाचित् कलकत्त्यावर हल्ला करितील, ह्मणून दक्षिणेंत पाठविलेलें सैन्य परत बोलावण्याविषयीं त्यास सूचना झाली, पण त्यानें ती ऐकिली नाहीं. पूर्वीं १७६३ साली पारीस येथें तह होऊन त्याच्या अन्वयें चंद्रनगर व पांदिचरी हीं फ्रेंचांस परत मिळालीं होतीं. पैकीं चंद्रनगरास तटबंदी मुळींच नसल्यामुळें तें आतां इंग्लिशांच्या हातीं सहज आलें. पण पांदिचरीस वेढा घातला असतां त्या शहरानें दोन महिने दहा दिवस टिकाव धरिला; नंतर तें सर हेक्टर मनरो याच्या स्वाधीन झालें, (आक्टोबर १७७८).

१९६. वडगांवचा करार—१७७९ च्या जानेवारींत मुंबईची सरासरी ४,००० फौज राघोबास बरोबर घेऊन पुण्यापासून १६ मैलांच्या टप्यांत चाल करून गेली. या फौजेची व्यवस्था ठेवण्यास मुलकी व लष्करी अंमलदारांची एक मिश्र कमिटी ( मंडळी ) नेमिलेली होती, व शिवाय मि. कार्नाक नामक मुंबईच्या कौन्सिलाचा एक सभासद तिचे बरोबर दिला होता. इंग्लिशांसमोर लढाईस उभें राहण्याचें धैर्य मराठ्यांनीं आजपर्यंत कधींहि केलेलें नव्हतें. असें असतांहि या स्थळीं त्यांच्या पुष्कळ घोडेस्वारांनीं आपल्यास घेरलेलें पाहून, त्यांस भिऊन परत जाण्याचा या साहेबानें निश्चय केला. त्याप्रमाणें तें सैन्य परतलें, तेव्हां विजयी मराठ्यांनीं त्याजवर हल्ला केला, व त्यापैकीं ४०० लोक मारिले. तेव्हां बाकीच्या फौजेचा संहार होऊं नये ह्मणून वर सांगितलेल्या कमिटीनें वडगांव मुक्कामीं मराठ्यांशीं तह केला. त्या अन्वयें राघोबा महादजी

शिंद्याच्या स्वाधीन झाला; व १७७३ सालापासून जिंकून घेतलेला मराठ्यांचा सर्व मुलूख त्यांस परत द्यावा, व बंगाल्यांतून येत असलेल्या सैन्यास कलकत्त्यास परत जाण्याचा हुकूम करावा, असें ठरलें. ह्या शर्तीवर मुंबईच्या फौजेस अपकीर्ति पदरीं घेऊन मुंबईस परत जाण्याची मोकळीक मिळाली. या करारास वडगांवचा करार असें ह्मणतात. पण या सैन्यावरील अधिकाऱ्यांस असा तह करण्याचा अधिकार मुळींच नसल्यामुळें मुंबई सरकार व कलकत्ता सरकार ह्या दोघांनींहि तो नाकबूल केला.

**१९७. गोदर्द पश्चिम हिंदुस्थानांत येऊन पोहोंचतो**—बंगालच्या फौजेचा अधिपति कर्नल गोदर्द ह्यानें वडगांवच्या कराराप्रमाणें वागण्याचें नाकारून सुरतेकडे तो सरसावला; व त्या ठिकाणीं १७७९ च्या फेब्रुवारींत दाखल झाला. अशा रीतीनें कलकत्त्यापासून सुरतेपर्यंत जी त्यानें मोठ्या धारिष्टानें चाल केली तिचें वर्तमान ज्यानें ज्यानें ह्मणून ऐकिलें त्या प्रत्येकास फारच अचंबा वाटला. सुरतेस आल्यावर मराठ्यांशीं समाधानकारक रीतीनें तह करण्याची त्यानें प्रथम खटपट केली; पण ती निष्फळ झालीसें पाहून त्यानें गुजराथेवर स्वारी करण्याचा निश्चय केला. बडोद्याचा गायकवाड फत्तेसिंग ह्यानें इंग्लिशांशीं सख्य केलें; व ह्मणून, अमदाबाद हें संपत्तिमान् व मजबूत शहर इंग्लिशांनीं १७८० च्या फेब्रुवारींत छापा घालून घेतलें होतें, तें त्यास परत दिलें.

**१९८. ग्वाल्हेर व वसई यांचा पाडाव**—याच महिन्यांत क्याप्टन पोफाम ह्यानें बंगालच्या बाजूनें यमुना नदी वलांडिली, व लाहोरचा मजबूत किल्ला छापा घालून

घेतला. त्या कामांत त्याचे १२० लोक गमावले. आगष्टच्या प्रारंभीं बळकटीच्या संबंधानें ह्याच्यापेक्षांहि ज्यास्त प्रसिद्ध जो ग्वाल्हेरचा किल्ला तो क्यापटन ब्रूस ह्यानें आपलें एकहि माणूस न गमावतां सर केला. पश्चिम किनाऱ्यावर गोदर्द ह्यानें नवंबर महिन्यांत वसईस वेढा दिला. तो उठविण्यासाठीं एक मराठ्यांची फौज खटपट करूं लागली, पण तिचा कर्नल हार्टले यानें लागोपाठ तीन दिवस पराभव करून टाकिला, ( दिजंबर, १०, ११, १२, ). इकडे वसईचा किल्ला ११ व्या तारखेस हस्तगत झाला होता. १७८१ च्या प्रारंभीं गोदर्द साहेबानें घांट चढून पुण्यावर स्वारी केली, पण त्यास वरच्या इतकें यश आलें नाहीं. कारण नाना फडणिसानें मोठ्या शहाणपणानें मराठ्यांचा पुनः एकोपा बनवून आणिला होता; त्यामुळें त्यांनीं गोदर्देच्या सैन्याला इतक्या धिटाईनें प्रतिरोध केला कीं, त्यास मागें परतावें लागलें; व पुढें मराठ्यांनीं त्याजवर उलटून केलेले हल्ले जरी त्यानें मागें हटविले, तरी मुंबईबंदराच्या समोरच्या बाजूस जें पनवेलचें बंदर तेथपर्यंत येईतोंपर्यंत त्याचे ४६० लोक गमावले.

१९९. **सालपीचा तह**—इकडे मद्रास इलाख्यांत हैदराशीं पुनः युद्ध सुरू झालें होतें; तेव्हां त्याजवर आपलें सर्व बळ चालवतां यावें एतदर्थ मराठ्यांशीं तह करावा असें इंग्लिशांच्या मनांत आलें. शिंद्याचीहि इच्छा तशीच होती; कारण प्रस्तुत युद्धांत पूर्वभागाकडील त्याच्या मुलखास चांगलाच धक्का बसला होता. म्हणून १७८२ च्या महिन्यांत सगळ्या मराठ्यांचा प्रतिनिधि ह्या नात्यानें महादजी शिंद्याशीं इंग्लिशांनीं साल्पी मुक्कामीं तह केला. ह्या तहान्वयें अहम-

दाबाद व वसई हीं पेशव्यास परत दिलीं, व शिंद्यास ग्वाल्हेर परत मिळालें. साष्टी इंग्लिशांकडे कायम राहिली व वडगांवच्या करारानंतर जे लोक इंग्लिशांनीं ओलीस दिले होते त्यांस शिंद्यानें दयाळूपणानें वागविलें याबद्दल कृतज्ञताबुद्धीनें त्यास भडोचशहर दिलें.

**१६०. हैदरअल्लीशीं दुसऱ्या युद्धाची सुरवात**—इकडे कित्येक वर्षेपर्यंत हैदरअल्ली इंग्लिशांशीं युद्ध करण्याची तयारी करीत होता. ह्या उद्देशानें आपल्या प्रजेपैकीं अत्यंत श्रीमान् लोकांपासून द्रव्याच्या मोठाल्या रकमा त्यानें जबरीनें काढिल्या होत्या, व त्या खर्च करून आपल्या सैन्यास बळकटी आणिली होती. १७७९ च्या अखेरीस उघड रीतीनें युद्धास सुरवात करण्याचा त्यानें निश्चय केला, व कवाईत वगैरे शिकून चांगली तयार झालेली अदमासें १,००,००० एवढी मोठी फौज घेऊन तो म्हैसूरच्या घांटमाथ्यावरून कर्नाटकाच्या सखल मैदानांत उतरला, (१७८०). तो देश त्यानें चौरसचौरस फार दूरपावेतों उध्वस्त करून टाकिला. त्या वेळीं मद्रास इलाख्यांत ब्रिटिश फौज फार थोडी असून ती लांबलांब पडलेली होती; त्यामुळें हैदराच्या प्रचंड सैन्याला प्रतिरोध करण्याची तिला मुळींच शक्ति नव्हती. म्हणून वरिष्ठ सरकाराकडे मदत मागण्यासाठीं कलकत्त्यास एक जलद चालणारें जहाज पाठवून दिलें.

**१६१. बेलीच्या सैन्याचा विध्वंस**—पण कलकत्त्याहून मदतीस सैन्य येण्याच्या अगोदर मद्रासेंतील ब्रिटिश फौजेवर एक मोठा अनर्थ गुदरून गेला होता. कर्नल ब्रेली हा ४,००० लोकांनिशीं कांजिवरमवर चालून जात

होता. त्याला मार्गांत पालिलोर मुक्कामीं हैदराचें सगळें सैन्य आडवें आलें; तें तत्पूर्वी त्याच्या मार्गांत, समोर व दोन्ही बाजूंस तोफा लपवून ठेवून स्वतः छपून टपत बसलें होतें. ह्या प्रचंड सैन्याशीं बेलीच्या फौजेनें जीवावर उदार होऊन टक्कर दिली. ह्याचा परिणाम असा झाला कीं, त्या फौजेपैकीं सर्व काळे शिपाई कापले गेले; तेव्हां ४०० गोरे अद्यापि एकत्र टिकाव धरून राहिले होते, ते लढाई बंद करण्याचें निशाण उभारून हैदराच्या स्वाधीन झाले. तथापि हैदराच्या सैन्यांत असलेले फ्रेंच अंमलदार जर मध्यस्थी पडले नसते, तर त्याचीहि हैदराच्या विजयी सैन्यानें कत्तल उडविली असती. मद्रासच्या फौजेचा मुख्य भाग घेऊन सर हेक्टर मनरो हा जवळच थोड्या मैलांवर होता; त्यास ह्या अनर्थाचें वर्तमान ऐकून, आपल्या जड तोफा एका खोल तळ्याच्या तळीं ठेवून, मद्रासेस परतून जावें लागलें.

**१६२. सर आयर कूट ह्यानें मिळविलेले जय—** १७८० च्या नवंबर महिन्यांत सर्व सैन्याचें आधिपत्य स्वीकारण्याकरितां सर आयर कूट कलकत्त्याहून येऊन पोहोंचला, आणि १७८१ च्या जानेवारींत ९,८०० काळे व १७,०० गोरे एवढ्या सैन्यानिशीं शत्रूवर चालून गेला. पुष्कळ दिवसपर्यंत हैदरानें लढाई करण्याचें टाळिलें. शेवटीं जून महिन्यांत विरुद्ध सैन्यांची पोर्टोनोव्हो ह्या ठिकाणीं गांठ पडली. हैदराच्या स्वारांनीं व पायदळानें पुढून व मागून केलेले हल्ले सर आयर कूटनें नेटानें परत लाविले. शेवटीं अर्काट येथें पळून जाऊन, आपण हरलों ही गोष्ट हैदरास कबूल करावी लागली. ब्रिटिश सेनापतीनें आगष्ट

व सप्टंबर ह्या दोन महिन्यांत आणखी दोन लढाया जिंकल्या, व दोन्हींतहि शत्रूचे पुष्कळ लोक मारिले.

१६३. हैदरच्या मृत्यूपर्यंत युद्ध चालू.–म्हैसूरच्या एका सैन्यानें पुष्कळ दिवसपर्यंत मलबार किनाऱ्यावर तेलिचरीस वेढा दिला होता. त्या किल्ल्याचें रक्षण मेजर आबिंग्डन हा कांहीं फौजेनिशीं करीत होता. त्यानें १७८२ च्या जानेवारींत तो वेढा उठविला, व त्या प्रसंगीं शत्रूचे पुष्कळ लोक मारिले. नंतर त्यानें कालिकत शहर घेतलें. पुढच्या महिन्यांत, तंजावर येथें कर्नल ब्रेथवेटच्या हाताखालीं २,००० लोक होते, त्यांस टिपूसुलतानानें एका मोठ्या फौजेनिशीं घेरून टाकून जेरीस आणिलें. इकडे संफ्रेन नामक एका फ्रेंच अधिकाऱ्याच्या हाताखालीं एक फ्रेंच आरमार हैदरास मदत करण्याकरितां सैन्य घेऊन आलें. त्यांच्या इंग्लिशांशीं चार अनिश्चयात्मक झटापटी झाल्या, व चारही प्रसंगीं आपला जय झाला असें इंग्लिशांचें ह्मणणें पडलें. जून महिन्यांत फ्रेंचांचें व हैदराचें सैन्य ह्या दोघांना आरनीच्या लढाईंत सर आयर कूट ह्यानें पळवून लाविलें. याच वर्षाच्या शेवटीं शेवटीं कर्नल मॅक्लिऑड ह्यानें टिपूचा मलबारकिनाऱ्यावर पराभव करून त्याचे पुष्कळ लोक मारिले. तेव्हां पुनः हल्ला करण्याच्या उद्देशानें टिपू किनाऱ्यावरून परतून आला. पण दिजंबर महिन्यांत बाप वारल्याचें वर्तमान त्याच्या कानीं आल्यामुळें, मागें गादी आपलीशी करून घ्यावी ह्मणून सैन्यानिशीं तो श्रीरंगपट्टणकडे मागेंच वळला.

१६४. हैदरअल्लीचा स्वभाव–हैदरअल्ली १७८२ च्या दिजंबरांत ७ व्या तारखेस मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ८० वर्षांचें होतें. इंग्लिशांना हिंदुस्थानांत जे

जे शत्रु भेटले त्या सर्वांत तो अतिशय हुशार व यशस्वी शत्रु होता. पुष्कळ बाबतींत त्याच्या व शिवाजीच्या कारकीर्दींत साम्य आढळून येतें. दोघांनींहि लुटारू लोकांच्या टोळ्यांचें पुढारीपण घेऊन आपापल्या कारकीर्दीस सुरुवात केली, व दोघांनींहि आपल्या चातुर्यानें व साहसानें राजा या पदवीस आपणांस चढवून घेतलें. हाताखालीं पुष्कळ सैन्य असलें तरी शत्रूसमोर लढाईस उभें राहण्याचें होईल तितकें टाळावयाचें, व आपल्या शत्रूंना अन्नसामग्रीचा वगैरे पुरवठा होत असेल तो मार्ग साधेल तितका बंद करावयाचा, हा दोघांचाहि क्रम असे. पण इंग्लिश लोकांशीं प्रसंग आला म्हणजे अशा प्रकारचा युद्धक्रम चालू ठेवण्याच्या कामीं हैदरास एक मोठी अडचण येई: ती ही कीं, इंग्लिशांचा पुरवठा पुष्कळ अंशीं समुद्रांतून येत असे; त्यामुळें हैदराच्या असंख्य स्वारांनीं एरवीं जी नासधूस करावयाची ती समुद्राच्या लाटांपुढें अगदीं बंद पडे. हैदर व शिवाजी दोघेहि आपला उद्देश साधण्यासाठीं कोणत्या साधनांचा उपयोग करावयाचा याबद्दल दिक्कत करीत नसत; पण हैदराच्या अंगीं एक जातीचा कठोर क्रूरपणा वसत होता, व त्याच्या अंतःकरणांत मायेचा अंकुर नव्हता; शिवाजीचें तसें नव्हतें; तो पराजित शत्रूवर बहुधा दया करी. हैदराच्या अंगीं एकच कोमल मनोवृत्ति दिसत होती, ती ही कीं, आपला पुत्र जो टिपू त्याजवर तो माया करी. तथापि त्या मायेमुळें त्याच्या स्वभावांतील व्यंगें व दोष त्यास दिसत नव्हते असें नाहीं, आणि त्यानें असें भविष्य करून ठेविलें होतें कीं, टिपू गादीवर बसला म्हणजे अखेरीस राज्याचा विध्वंस होईल.

१६५. **टिपू गादीवर बसतो**—बाप मेल्यावर टिपू गादीवर बसला, तेव्हां त्याचें सैन्य मोठें असून सर्व गोष्टींनीं लढण्याच्या कामास तयार असें होतें, व तिजोरींत पैसा पुष्कळ होता. शिवाय त्याचें व फ्रेंचांचें सख्य असल्यामुळें, त्यांची एकादी फौज आपणास जमिनीवर मदतीस पाहिजे तर मिळेल, व आपल्या शत्रूंकडे इंग्लंदाहून माणसें व सामग्री येत असल्यास समुद्रावर त्यांस अडवून धरण्यास त्यांचें आरमारहि आपल्या उपयोगी पडेल, असाहि त्यास आधार होता. ही टिपूची गोष्ट झाली. इकडे इंग्लिशांनीं साल्पीचा तह नुक्ताच केलेला असल्यामुळें तिन्ही इलाख्यांतील सर्व सैन्यें एकट्या टिपूवरच घालण्यास त्यांचेहि हात मोकळे झाले होते.

१६६. **टिपू व फ्रेंच यांचें युद्ध**—मराठ्यांशीं चाललेलें युद्ध बंद झाल्याबरोबर जनरल माथ्यूस ह्याच्या हाताखालीं मुंबईची एक फौज कानडा प्रांतावर स्वारी करण्यास निघाली. जनरल माथ्यूस ह्यानें त्या प्रांताचें मुख्य शहर बेदनूर हें काबीज केलें; पण इतक्यांत टिपूनें त्याला त्याच शहरांत वेढून टाकिलें. कारण इंग्लिशांपासून आपल्या ह्या पश्चिमेकडील मुलखाचा बचाव करण्यासाठीं कर्नाटक वलांडून टिपू तेव्हांच तेथें आला होता. अखेरीस मे महिन्याच्या तिसऱ्या तारखेस म्याथ्यूसाला टिपूच्या स्वाधीन होणें भाग पडलें. त्यावेळीं तुह्मां सर्वांस समुद्र किनाऱ्यापर्यंत सुखरूप जाऊं देईन असें टिपूनें माथ्यूसाच्या लोकांस वचन दिलें होतें, तथापि त्यानें त्यांच्या पायांत बिड्या घालून त्यांस श्रीरंगपट्टण येथें नेलें, व तेथील अंधारकोठड्यांत कोंडून ठेवून त्यांना फारच क्रूर रीतीनें वागविलें. पुढें जुलई महिन्यांत इंग्लंद व फ्रान्स यांच्यामध्यें तह झाल्याची बातमी

आली. अशा रीतीनें फ्रेंचांचें साहाय्य जरी नाहींसें झालें तरी टिपू तह करण्यास तयार होईना. तर उलट मंगळोरास त्यानें कित्येक महिने वेढा घातला होता, व तेथील रखवालदार फौज शौर्यानें किल्ल्याचें संरक्षण करीत होती, त्या वेढ्याचें काम पूर्वींपेक्षां जास्त जोरानें चालविलें. ह्मणून इकडे कर्नल फुलर्टन ह्यानें दक्षिणेकडून ह्मैसूरवर स्वारी करून कोइमतुर शहर घेतलें, व श्रीरंगपट्टणावर चालून जाण्याची तयारी केली. पण मद्रास सरकार आतां टिपूशीं तह करण्याच्या अगदीं बेतावर आलें असल्यामुळें, त्यांनीं त्यास पुढें जाण्यास प्रतिबंध केला. हा तह १७८४ च्या मार्चांत झाला, व त्या अन्वयें प्रस्तुत युद्धांत एकमेकांनीं एकमेकांचे जिंकून घेतलेले सर्व मुलूख एकमेकांस परत दिले, व ब्रिटिश कैदी श्रीरंगपट्टणच्या अंधारकोठड्यांतून मुक्त झाले.

१६७. **हेस्टिंग्सचें काशीस प्रयाण**—मराठे व ह्मैसूर ह्यांच्यांशीं केलेल्या युद्धांत कंपनीचा पैसा फार खर्च झाला. तेव्हां अशा रीतीनें रिकामी झालेली कंपनीची तिजोरी जे एतद्देशीय राजे कंपनीच्या आश्रयाखालीं असतील त्यांच्याकडून द्रव्य घेऊन पुनः भरून काढावयाची, असा हेस्टिंग्स साहेबानें निश्चय केला. चेतसिंग ह्यास बनारसचा जमीनदार केलेला असून त्याबद्दल त्यानें इंग्लिशांस खंडणी देण्याचें कबूल केलेलें होतें. म्हणून वरील निश्चयाप्रमाणें ह्या खंडणीशिवाय त्यानें पांच लाख रुपये द्यावे अशी त्याजवर १७७८ त मागणी केली, व १७८० त त्याच्यापाशीं १,००० स्वार मदतीस मागितले. त्यावरून चेतसिंग बहुधा बंड करील असा रंग दिसून आला, ह्मणून वारन हेस्टिंग्स काशीस गेला, व त्यानें त्यास त्याच्या वाड्यांत कैद केलें, (१७८१).

हें ऐकून त्या राजाचे शिपाई व शहरचे लोक ह्यांनीं एकत्र होऊन वारन हेस्टिंग्सबरोबर संरक्षणार्थ असलेल्या थोड्याशा शिपायांवर हल्ला केला; तेव्हां गव्हर्नर जनरलास जीव रक्षण करण्यास शहराबाहेर पळून जावें लागलें. पण तो लवकरच ज्यास्त लोक बरोबर घेऊन परत आला, व चेतसिंगास पदच्युत करून त्याच्या पुतण्यास गादीवर बसविलें; आणि ह्याबद्दल त्याजकडून वर्षास चाळीस लाख रुपये देण्याचा करार करून घेतला.

१६८. **अयोध्येच्या बेगमा**—अयोध्येच्या बेगमा ह्या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या, अयोध्येच्या नबाबाच्या आई व आजी, ह्यांजवर चेतसिंगाच्या बंडांत सामील असल्याचा त्यानें आरोप आणिला. ह्यावेळीं नबाबाला कंपनीचें पुष्कळ कर्ज द्यावयाचें होतें. करितां, वरील आरोपावरून, त्यांजपासून जबरीनें पैसे घेऊन कंपनीस द्यावे, अशाबद्दल हेस्टिंग्सनें नबाबास परवानगी दिली. हे पैसे त्यांच्यापासून जुलमाशिवाय निघाले नाहींत. पण कसेंहि करून नबाबानें १० लाखांची रकम कंपनी सरकारच्या स्वाधीन केली.

१६९. **वारन हेस्टिंग्सच्या कारकीर्दीची अखेर**—चेतसिंग व अयोध्येच्या बेगमा ह्यांच्याशीं हेस्टिंग्स ह्यानें जें वर्तन केलें, त्याजबद्दल इंग्लंदांत त्यास इतका कडक दोष लावूं लागले कीं, १७८३ त तो आपल्या उच्च अधिकाराचा राजीनामा देण्यास तयार झाला. तथापि १७८५ सालाच्या आरंभापर्यंत त्याच्यामागून नेमलेला जो म्याकफर्सन साहेब त्याच्या हातीं त्यानें त्या जाग्याचा अधिकार दिला नाहीं. नंतर तो इंग्लंदास निघून गेला; त्या समयीं युरोपियन व एतद्देशीय दोन्ही लोकांस वाईट वाटलें.

तेथें गेल्यानंतर कामन्संसभेनें त्याजवर आरोप ठेवून लार्डांच्या सभेपुढें त्याच्यावर फिर्याद आणिली. इंग्लिश वक्त्यांपैकीं पहिल्या प्रतीचे बर्क व शेरिडन हे जे दोन वक्ते त्यांनीं तो दोषी ठरावा म्हणून आपलें सर्व वक्तृत्व खर्च केलें. त्यांच्या संभाषणांवरून असें दिसून आलें कीं, अनेक प्रसंगीं हेस्टिंग्सचें वर्तन अन्यायाचें व जुलमाचें देखील होतें. पण त्याच्या ह्या जुलमी कृत्यांनीं नुकसान जें झालें तें काय तें विशिष्ट व्यक्तींचेंच झालें, आणि त्याच्या शहाणपणाच्या कारभारानें ब्रिटिश लोकांच्या ह्या देशांतील सगळ्या राज्याला ज्या अडचणींनीं व भयांनीं घेरिलें होतें त्यांतून त्याचा बचाव झाला. शिवाय, त्याचा कारभार एतद्देशीय लोकांसहि पसंत पडलेला होता. असो. वरील चवकशीचा निंकाल १७९५ च्या एप्रिलांत होऊन त्यांत तो दोषमुक्त झाला. पण त्याच्यापाशीं जी बेताचीच पुंजी होती ती सर्व ह्या खटल्याच्या पायीं संपून गेल्यामुळें कोर्ट आव् डायरेक्टर्स ह्या मंडळीनें त्यास ४,००० पौंडांचें वर्षासन करून दिलें.

**१७०. हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत आणखी फेरफार**—१७८४ सालीं पिट साहेबाचा हिंदुस्थानच्या संबंधाचा कायदा पसार झाला. ह्या कायद्याच्या योगानें असें ठरलें कीं, (१) ह्यापुढें हिंदुस्थानच्या मुलकी व लष्करी कारभारावर देखरेख ठेवण्यासाठीं एक बोर्ड आव् कंट्रोल ( देखरेख करणारें मंडळ ) नेमावें व त्यांत राजानें निवडलेले प्रिव्ही कौन्सिलचे सहा सभासद असावे; (२) हिंदुस्थानांतील सैन्याचा मुख्य सेनापति निवडण्याचा अधिकार गादीकडे असावा; (३) गव्हर्नर जनरल, आणि तिन्ही इलाख्यांतील कौन्सिलांचे अध्यक्ष व सभासद ह्यांची नेमणूक कंपनीच्या

डायरेक्टर्स लोकांनीं करावी; पण असली नेमणूक पसंत किंवा नापसंत करण्याचा व नेमलेल्या माणसांस कामावरून दूर करून परत बोलावण्याचा, अखत्यार राजाकडे असावा. रेग्युलेटिंग आक्टाप्रमाणें ह्या कायद्याचाहि उद्देश हिंदुस्थानच्या कारभारावर विलायत सरकारचा ताबा जास्त करावा हा होता.

१७१. **लॉर्ड कॉर्नवॉलिस गव्हर्नर जनरल होतो-** लार्ड कार्नवालिस हा, गव्हर्नर जनरल व कमांडर इन् चीफ ही पदवी धारण करून, १७८६ सालीं इकडे आला. पुढें तीन वर्षेंपर्यंत त्यास शांतता कायम राखतां आली; तेवढ्या अवकाशांत त्यानें लष्करी व मुलकी खात्यांतील दोष काढून टाकण्याकडे आपलें लक्ष्य पुरविलें. पण टिपूची महत्वाकांक्षा त्याला स्वस्थ बसूं देत नसल्यामुळें ही शांतता पुष्कळ काळ कायम ठेवणें अशक्य होतें. टिपूनें मदत मागण्यासाठीं फ्रान्सदेशीं आपले वकील पाठविले, व त्रावणकोरचा राजा इंग्लिशांचा दोस्त होता त्याच्याशीं एकदम युद्धास सुरवात केली. त्रावणकोरच्या राज्याच्या रक्षणार्थ भिंतीच्या दोन रांगा केलेल्या होत्या, त्यांस "त्रावणकोर लाइन्स" (त्रावणकोरच्या संरक्षक भिंती) अशी संज्ञा होती. त्या घेण्यास १७८८ च्या अखेरीस तो गेला असतां त्याला तेथून परतून लाविलें, व त्याचे पुष्कळ लोक मेले. पुढें त्याच्या सैन्यानें त्या रांगा फोडून जेव्हां आंत प्रवेश केला, तेव्हां नायर लोकांनीं त्याजवर भयंकर रीतीचा हल्ला करून त्याची दाणादाण करून त्यास बाहेर हांकून लाविलें.

१७२. **टिपूशीं दुसरें युद्ध. पहिली मोहीम**—टिपूनें त्रावणकोरवर हल्ला केला, ह्याचा अर्थ त्यानें आपणाशींच युद्ध

सुरू केलें असा होय असें लार्ड कार्नवालीस घेऊन चालला. १७९० च्या जुलई महिन्यांत त्यानें पेशवा व निजाम यांच्याशीं सख्य केलें, व जिंकून घेतलेला मुलख तिघांनीं सारखा वांटून घ्यावयाचा ह्या अटीवर ह्या दोघांनीं इंग्लिशांस स्वारांची मदत देण्याचें कबूल केलें. ह्याच वर्षांत प्रारंभीं टिपूनें त्रावणकोरच्या रांगांतून जबरीनें मार्ग करून आपलें सैन्य नेलें होतें, व तो देश उध्वस्त करून टाकिला होता. पुढें दिजंबरांत कर्नल हार्ट्ले यानें त्याचा कालिकतनजीक पराजय केला, व त्याच्यामागून जनरल आबरक्रोम्बी यानें येऊन सर्व मलबार प्रांत जिंकून टाकिला. अशा रीतीनें, ह्या पहिल्या मोहिमींत जरी इंग्लिशांस मोठा असा जय मुळींच मिळाला नाहीं, तरी एकंदरींत तींत त्यांस यश प्राप्त झालें.

१७३. **दुसरी मोहीम**—दुसऱ्या मोहिमींत लार्ड कार्नवालिस ह्यानें सैन्याचें आधिपत्य स्वतःच पत्करिलें. १७९१ च्या फेब्रुवारींत घांट चढून जाऊन, टिपूची सेना पुढें असतांहि, बंगलोरवर छापा घालून त्यानें तें घेतलें. श्रीरंगपट्टणनजीक आरिकेरा येथें टिपूचा त्यानें पुनः पराजय केला; तेव्हां टिपूस त्या बेटरूपी किल्ल्यांत स्वसंरक्षणासाठीं पळून जावें लागलें. जनरल आबरक्रोम्बी, ८,००० लोक व वेढा घालण्याच्या तोफा ह्यांसमवेत नजीकच होता. तथापि, पावसाळा आतां विलक्षण जोरानें सुरू झाला असल्यामुळें, तो संपे तोंपर्यंत श्रीरंगपट्टणावर हल्ला करावयाचा नाहीं, असा लार्ड कार्नवालिस ह्यानें निश्चय केला. याप्रमाणें दोघांहि सेनापतींनीं आपल्या जड तोफा व युद्धाचें सर्व जड सामान ह्यांची फोडतोड करून टाकून मार्गे

मोर्चा फिरविला. आबरक्रोम्बी मलबारांस गेला, व कार्नवालिस बंगलोरास आला.

१७४. **तिसरी मोहिम**—ह्या वर्षाच्या अखेरपावेतों ब्रिटिश सैन्य, नंदीदुर्ग, सुवर्णदुर्ग, व श्रीरंगपट्टणच्या रस्त्यावरले दुसरे किल्ले, काबीज करण्यांत गुंतलें होतें. इकडे टिपूनें दक्षिणदिशेस एक फौज पाठविली, तिनें कोईमतूर शहर घेतलें. १७९९ च्या जानेवारींत श्रीरंगपट्टणवर अखेरचा हल्ला करण्याची सर्व तयारी झाली. अगोदरच कूर्गच्या राजाशीं तह केलेला असल्यामुळें जनरल आबरक्रोम्बी यास मुंबईच्या फौजेसहित चालून पुढें येण्यास सोपें पडलें. फेब्रुवारीच्या ५ व्या तारखेस ब्रिटिश लोकांची मुख्य फौज व मराठे आणि निजाम यांनीं पाठविलेले मदतनीस लोक सर्व श्रीरंगपट्टणवर चालून गेले. टिपूस मागें परतून किल्ल्याच्या भिंतींच्या आंत जाणें भाग पडलें, व तो आंत गेल्याबरोबर इंग्लिशांनीं त्या किल्ल्यास वेढा घातला. फेब्रुवारीच्या ९ व्या तारखेस आबरक्रोम्बी वेढा घालण्याच्या कामीं मदत करण्यास अगदीं वेळेवर हजर झाला. इकडे टिपूच्या पुष्कळ एतद्देशीय व युरोपियन शिपायांनीं त्याची नोकरी परवानगीविना सोडिली असल्यामुळें तहाचें बोलणें लावण्याइतका तो वळणीस आला होता.

१७५. **तहाचीं कलमें**—कार्नवालिसनें सांगितल्याप्रमाणें टिपू ज्या कलमांस कबूल झाला तीं हीं:—( १ ) त्यानें आपलें अर्धे राज्य इंग्लिश व त्यांचे दोन दोस्त ह्यांस द्यावें; ( २ ) तीन कोटी तीस लाख रुपये रोख द्यावे; ( ३ ) सर्व कैद्यांस परत द्यावें; ( ४ ) आपले दोन वडील मुलगे इंग्लिशांच्या छावणींत ओलीस पाठवून द्यावे. उलट

पश्चीं बंगलोर शहर टिपूस परत दिलें. अशा रीतीनें या युद्धांत यश आल्यामुळें इंग्लिशांच्या राज्यास कूर्ग, मलबार व बारामहाल ह्या प्रांतांची भर पडली. मराठे व निजाम ह्यांनाहि त्यांच्या त्यांच्या राज्यांच्या सीमेवरचे म्हैसूरच्या राज्यापैकीं मोठाले प्रांत मिळाले.

१७६. **फ्रान्सदेशाशीं युद्ध**–१७९३ सालीं इंग्लंद व फ्रान्स यांजमध्यें पुनः युद्ध सुरू झालें. या वेळीं मोठी राज्यक्रान्ति होऊन तें राष्ट्र प्रजासत्ताक बनलें होतें. पांदिचरी, चंद्रनगर वगैरे जीं ठिकाणें फ्रेंचांस १७८३ च्या तहानें परत दिलीं होतीं तीं आतां इंग्लिशांनीं पुन्हा घेतलीं, व त्या कामीं त्यांस बहुतेक मुळींच अडथळा झाला नाहीं.

१७७. **बंगाल्यांत जमिनीचा सारा कायमचा ठरतो**–हिंदुस्थानांत जमिनीवरचा कर ही पुरातन कालापासूनच वसुलाची मुख्य बाब आहे; व तीच इंग्लिशांनीं कायम ठेविली होती. लार्ड कार्नवालिस ह्याच्या कारकीर्दीच्या अगोदर वसूल गोळा करणारे अंमलदार लागवड करणारांपासून जमिनीचा कर प्रत्येक वर्षीं योग्य वाटेल तितका घेत असत; व तो किती घ्यावयाचा हें त्या त्या जमिनीच्या स्थितीवरून, व मागील वर्षीच्या वहिवाटीवरून ठरवीत असत. कोर्ट आव् डायरेक्टर्स ह्यांनीं कार्नवालिस ह्यास अशी शिफारस केली कीं, आपण पहिल्यानें हा कर दहा वर्षांपुरता ठरवून टाकावा, व नंतर तो निरंतरचा ठरवून टाकावा. त्याप्रमाणें, शोअरसाहेबाच्या मदतीनें, निरनिराळ्या प्रांतांतून किती वसूल घेतां येईल ह्याचा अंदाज त्यानें करविला; व ह्या अंदाजाप्रमाणें जी रक्कम ठरेल ती जमीनदार लोकांनीं सरकारास द्यावी असें ठरविलें. हे

जमीनदार पूर्वी केवळ कर गोळा करणारे होते; पण त्यांस आतां जमिनीचे मालक बनवून त्यांनीं रयतेपासून फाळा घ्यावा अशी व्यवस्था केली. अशा रीतीनें ह्या वेळीं ठरवलेली साऱ्याची जमाबंदी १७९३ साली शोअरसाहेबाच्या सल्ल्याविरुद्ध निरंतरची केली; आणि अशा रीतीनें बंगालची जमाबंदी कायमची करून टाकिली; ती अद्यापि तशीच आहे.

**१७८. सारा कायमचा ठरविल्यापासून फायदे व तोटे**-ह्या गोष्टीपासून सरकारास असा फायदा झाला कीं, फाळीचा वसूल कायमचा ठरला जाऊन तो सोप्या रीतीनें गोळा करतां येऊं लागला. पण जमिनीची किंमत वाढल्यापासून सरकारचा व्हावयाचा जो फायदा तो सर्व नाहींसा झाला; आणि ज्या अर्थी वसुलाची रक्कम रुपयांत ठरलेली होती, त्या अर्थी सरकारचें उलट फार नुकसान झालेलें आहे; कारण रुप्याची किंमत हल्लीं उतरलेली आहे. सारा कायम करण्याच्या ह्या ठरावाविरुद्ध दुसरा एक आक्षेप असा आणितात कीं, रयतेचे जमिनीवर काय हक्क आहेत, ही गोष्ट त्यांत मुळींच ठरलेली नाहीं; किंवा त्यांच्या हक्कांचें रक्षण करण्याचीहि व्यवस्था त्याच्यांत मुळींच नाहीं.

**१७९. सर जॉन शोअर गव्हर्नर जनरल होतो**—सर जॉन शोअर ह्यानें कायमचा सारा ठरविण्याच्या कामीं कार्नवालिस ह्यास मदत केली होती ह्मणून वर सांगितलेंच. तोच त्याच्यामागून गव्हर्नर जनरल झाला. विलायतेहून त्याला हुकूम आला त्याच्या अन्वयें त्यानें शांतता कायम ठेवण्याची नीति अमलांत आणिली; व तो एतद्देशीय राजांच्या कारभारांत साधेल तितका कमी हात घालीत असे.

**१८०. महादजी शिंद्याची कारकीर्द**—१७९४ च्या फेब्रुवारींत महादजी शिंदे पुण्यानजीक मरण पावला; त्या वेळीं त्यानें एवढी कीर्ति व सत्ता संपादन केली होती कीं, मराठ्यांमध्यें थोर शिवाजी खेरीजकरून तितकी सत्ता व कीर्ति दुसऱ्या कोणत्याच राजानें मिळविली नाहीं. त्याची महत्त्वाकांक्षा अशी होती कीं, मराठे व मोगल बादशाईचा राहिलेला अवशेष, ह्या दोघांचें वास्तविक प्रभुत्व आपल्या हातीं घ्यावें, व नांवाचें प्रभुत्व पेशवा व नामधारी बादशाह ह्यांजकडे राहूं द्यावें. पुण्यामध्यें नाना फडणिसानें हुशारीनें वागून त्याचे हे बेत मुळींच चालूं दिले नाहींत; पण (उत्तर) हिंदुस्थानांत ह्या बाबतींत त्यास अधिक यश आलें. १७८४ पासून दिल्लीच्या दरबारांत त्याचें वर्चस्व सुरू झालें. त्यास बादशाहाच्या सैन्याचा मुख्य अधिपति नेमिलें, व दिल्ली आणि आग्रा ह्या प्रांतांचा अधिकार त्याजकडे आला. त्याचा नांवाचा यजमान जो पेशवा त्याला त्यानें 'वकील-इ-मुतलक' (गव्हर्नर जनरल) हा किताब बादशाहापासून मिळवून दिला. इतकें केल्यावर तो पुण्यास आला, व दिल्लीस बादशाहास त्यानें जितका मुठींत आणिला होता, तितकाच तेथें माधवराव पेशव्यास आपल्या मुठींत आणिला. पण या ठिकाणीं मृत्यूमुळें त्याचे पुढचे बेत जागच्याजागीं राहिले. तो पुण्यानजीक १७९४ च्या फेब्रुवारींत मरण पावला; व त्याच्यामागून त्याचा चुलतनातू दौलतराव हा त्याच्या विस्तीर्ण राज्याचा व मोठ्या लष्कराचा मालक झाला. त्या लष्करांत त्या वेळीं जंगी तोफखान्याचा व फ्रेंच सरदार डी बॉईन ह्याच्या हाताखालीं चांगल्या रीतीनें कवाईत शिकलेल्या १८,००० शिपायांचा समावेश होत होता.

१८१. **खर्ड्याची लढाई**—चौथाईसंबंधानें निजामीवर पेशव्यांनीं मोठें मागणें केलें होतें. त्यांचें तें मागणें चालूं नये ह्मणून सर् जॉन शोअर ह्याजपाशीं त्यानें मदत मागितली, पण ती तो देईना; तेंव्हां त्यानें एकट्यानेंच युद्धाची तयारी केली. १७९५ च्या जानेवारींत निजामाचे १,१०,००० लोक, व मराठ्यांची १,३०,००० फौज, ह्या दोघांची गांठ हैदराबादच्या मुलुखाच्या सीमेवर खर्डे मुक्कामीं पडली. निजामाचें पायदळ फ्रेंच जनरल रेमंड ह्याच्या हाताखालीं लढत असून त्यानें मराठ्यांचें मुळींच चालूं दिलें नाहीं. पण स्वतः निजाम समरांगणांतून पळून गेला. तेंव्हां त्याचे सैन्याचें जरी सांगण्यासारखें नुकसान मुळींच झालेलें नव्हतें, तरी त्यास त्याच्यामागून जावें लागलें, व मराठे त्यांच्या पाठीस लागले. अशा रीतीनें निजामाचा पराजय झाल्यामुळें मराठ्यांस तीन कोटी रुपये देण्यास तो कबूल झाला, व शिवाय आपल्या राज्याच्या हद्दीवरचा कांहीं मुलूख त्याला त्यांस द्यावा लागला.

१८२. **खर्ड्याच्या लढाईचे परिणाम**—खर्डे मुक्कामीं हा जो जय मिळाला तो सगळ्या मराठाराष्ट्रास व विशेषतः मराठ्यांच्या सर्व कारभाराचा त्या वेळचा मुख्य चालक जो नाना फडणीस त्यास, मोठी धन्यता वाटण्यासारखी होता. पण १७९५ त माधवराव नारायण ह्याच्या मृत्यूमुळें मराठ्यांचा एकोपा होण्याची सर्व आशा नष्ट झाली; कारण तेणेंकरून मराठे सरदारांत नवीं भांडणें उद्भवलीं. इकडे सर जॉन शोअर ह्यानें मदत करण्याचें नाकारिल्यामुळें निजामास राग येऊन त्यानें हैदराबाद येथें ठेविलेलीं दोन ब्रिटिश पलटणें काढून लाविलीं, आणि रेमंड व त्याच्याबरो-

बरचे लोक ह्यांस तो आपल्या मर्जीत ज्यास्त ज्यास्त घेऊं लागला.

१८३. **अयोध्येंतील हालहवाल**–१७९७ सालीं अयोध्येचा नवाब असफउद्दवला मरण पावला; व त्याच्यामागून त्याचा मानीव पुत्र वजीर अल्ली' हा गादीवर बसला. पण त्याचा राज्यकारभार वाईट असल्यामुळें, व गादीवर बसण्याला त्याला हक्क आहे किंवा नाहीं ही गोष्ट संशयित असल्यामुळें, सर जॉन शोअर ह्यानें त्यास पदच्युत केलें, व त्याच्या ऐवजीं माजी नवाबाचा भाऊ सादतअल्ली ह्यास गादीवर बसविलें. ह्या नव्या नवाबानें इंग्लिशांस अलाहाबाद शहर दिलें, व कंपनीच्या फौजेपैकीं १०,००० लोकांस ठेवून घेऊन, त्यांच्या खर्चासाठीं ७६ लाख रुपये देण्याचें कबूल केलें.

१८४. **अर्ल ऑव् मार्निंग्टन हा गव्हर्नर जनरल होतो**–१७९८ च्या एप्रिल महिन्यांत मार्निंग्टनचा अर्ल रिचर्ड वेलस्ली, हा सर जॉन शोअरच्या मागें गव्हर्नर जनरल होऊन हिंदुस्थानांत आला. सर जॉन शोअर ह्याची शांतता कायम राखण्याची जी राजनीति तिचें अनुसरण न करतां, एतद्देशीय राजांच्या कारभारांत हात घालणें हेंच हिंदुस्थानांतील ब्रिटिश लोकांची सत्ता सुरक्षित ठेवण्यास, तिस बळकटी आणण्यास, व ती वृद्धिंगत करण्यास, उत्तम साधन होय असें समजून, त्याच धिटाईच्या राजनीतीनें त्यानें अवलंबन केलें. हिंदुस्थानांत टिपू हाच ब्रिटिश लोकांचा अद्यापि मुख्य शत्रु होता. त्याचे बेत मोडून काढण्यासाठीं, हैदराबादच्या दरबारांतून इंग्लिशांचें गेलेलें वजन पुनः स्थापन करण्याचा त्यानें निश्चय केला. त्यांत त्याचें असें धोरण

होतें कीं, टिपूबरोबर लवकरच होणाऱ्या युद्धांत निजामाची चांगलीच मदत आपणास मिळावी. इकडे, रेमंड साहेबाच्या मृत्यूमुळें निजामाच्या दरबारांत फ्रेंचांचें वजन कमी झालें होतें. म्हणून १७९८ च्या सप्टेंबर महिन्यांत ब्रिटिश लोकांचें ६,००० सैन्य ठेवण्यास, व त्याच्या खर्चासाठीं वर्षाची २४ लाख १७ हजार रुपयांची कुमक करण्यास निजाम कबूल झाला. त्यानें फ्रेंच अंमलदारांस घालवून दिलें, व हाताखालच्या लष्करास फांटा दिला.

१८५. **टिपूशीं तिसरें व अखेरचें युद्ध**—ह्या वेळीं इंग्लिश व फ्रेंच ह्यांचें युद्ध चाललेलें असून मी तुमचा दोस्त होण्यास तयार आहें असें ज्या अर्थीं टिपूनें फ्रेंचांस कळविलें होतें, त्या अर्थीं त्याच्याबरोबर युद्ध सुरू करणें ही गोष्ट अगदीं न्यायाचीच होती. ह्या हेतूनें मद्रास येथें जनरल हारीस ह्याच्या हाताखालीं जमविलेली फौज एकंदर २०,००० होती. निजामानें वरील कबुलीप्रमाणें ठेविलेल्या ब्रिटिश लष्करापैकीं ६,००० लोक देऊन, शिवाय, आपले २०,००० स्वार व १०,००० पायदळ युद्धासाठीं पाठवून दिलें. मुंबईची ६,००० फौज मलबारकिनाऱ्यावरून चाल करून यावयाची होती; तिजवर टिपूनें हल्ला केला, आणि त्याजपैकीं तीन काळ्या रेजिमेंटांचा बहुतेक फन्ना उडवून दिला. नंतर तो पूर्वेकडे वळला, व आपल्या राजधानीपासून तीस मैलांवर मालवेली मुक्कामीं त्यानें तळ दिला. तेथें जनरल हारीस ह्यानें त्याचा पराभव करून त्याचे ७०० शें लोक मारिले.

१८६. **श्रीरंगपट्टणचा वेढा**—एप्रिलच्या १४ व्या तारखेस मुंबईचें सैन्य श्रीरंगपट्टण शहरासमोर लार्ड हारीसच्या

सैन्यास येऊन मिळालें, व युद्धास सुरवात झाली. इंग्लिशांजवळचा सामग्रीचा पुरवठा कमी व्हावयास लागला होता, ह्मणून तें शहर लवकर काबीज करणें जरूर होतें. मेच्या २८ व्या तारखेपर्यंत शत्रूचीं बाहेरचीं सर्व ठाणीं घेऊन झालीं, व तटाच्या भिंतींवर भडिमार करून त्या पाडण्यासाठीं मोरचे तयार झाले. इकडे टिपू खिन्न व निराश होऊन जोशांस बोलावून त्यांस प्रश्न करीत बसला होता, आणि असें ह्मणतात कीं, आपल्या भरभराटीच्या दिवसांत ज्या हिंदूंच्या देवांचा अपमान करण्यास त्यानें सोडिलें नव्हतें त्या देवांचीहि मला सहाय्य व्हा ह्मणून तो प्रार्थना करीत होता. त्यानें जनरल हारीसबरोबर तहाचें बोलणें सुरू करण्याचा यत्न केला, पण तो फुकट गेला. अखेरीस मेच्या तिसऱ्या तारखेस श्रीरंगपट्टणच्या तटबंदींत बरेंच मोठें भगदाड पडलें; व दुसऱ्या दिवशीं त्या किल्ल्यावर छापा घालण्याचें ठरविलें.

१८७. **श्रीरंगपट्टणचा छापा व टिपूचा मृत्यु** ( १७९९ )—मे महिन्याच्या ४ थ्या तारखेस दोनप्रहरीं एक वाजतां जनरल बेयर्डच्या हाताखालची छापा घालणारी टोळी ज्या खंदकांत लपली होती तेथून ती एकदम जोरानें पुढें सरसावली, व कावेरीनदीचें पात्र वलांडून भगदाडाच्या माथ्यावर सरासरी ७ मिनिटांत जाऊन पोहोंचली; व तेथील रखवालदार फौजेवर तिनें एकदम छापा घातला. टिपूचें दोनप्रहरचें भोजन चाललें होतें; तो एकदम दचकून उठला, व बरोबर शिपाई लोक घेऊन तटाचें संरक्षण करण्यास निघाला; पण तटबंदी इंग्लिशांच्या ताब्यांत अगोदरच आली होती. सर्व लढाई आटो-

पल्यावर पाहतात तों टिपूचें प्रेत किल्ल्याच्या दरवाज्यांत पडलेलें सांपडलें.

१८८. ह्मैसूरची व्यवस्था—ह्याप्रमाणें टिपूचा पाडाव झाल्यावर कानडा, श्रीरंगपट्टण, वगैरे एकंदर वीस हजार चौरस मैलांचा मुलूख ब्रिटिश लोकांनीं आपल्या ताब्यांत घेतला व तेवढ्याच किमतीचा मुलूख निजामास दिला. मराठ्यांनीं पुणें येथें स्वसंरक्षणाकरितां आपल्या खर्चानें ब्रिटिश सैन्य ठेवावें ह्या अटीवर ह्मैसूरच्या वायव्येकडील मुलूख त्यांस देऊं केला, पण ती अट त्यांस कबूल न झाल्यामुळें तोहि मुलूख इंग्लिश व निजाम ह्यांनीं आपसांत वांटून घेतला. पण निजामानें स्वसंरक्षणासाठीं जास्त ब्रिटिश सैन्य अगोदरच ठेविलें होतें ह्मणून १८०० सालीं त्यानें नवा तह करून, त्याचा खर्च भागविण्याकरितां ह्मैसूरापैकीं मिळालेला हा मुलूख इंग्लिशांच्या स्वाधीन केला. त्या मुलखास अद्यापि 'सीडेड डिस्ट्रिक्ट' ह्मणजे 'तहान्वयें स्वाधीन केलेला मुलूख' असें ह्मणतात. वांटण्या केल्यावर ह्मैसूरचा जो भाग शिल्लक राहिला होता, तो तेथील पूर्वीच्या हिंदु-राजाच्या घरांतील एक अर्भक मुलगा होता त्यास दिला. पण त्या मुलखाचा ताबा इंग्लिशांनीं आपल्याकडे ठेविला; व गव्हर्नर जनरलचा भाऊ (हाच पुढें ड्यूक ऑव् वेलिंग्टन ह्या पदवीस चढला) कर्नल वेलस्ली, याच्या हातीं त्या राज्यांतील मुलकी व लष्करी अधिकार दिला. पुढें ह्मैसूर जिंकून घेण्याच्या कामीं यश मिळविल्याबद्दल खुद्द गव्हर्नर जनरलास 'मार्किस' ही बड्या लोकांतील वरच्या प्रतीची पदवी मिळाली.

१८९. सबसिडियरी पद्धति—जितकें साधेल तितकें

करून एतद्देशीय राज्यांस ब्रिटिश व्यवस्थेखालीं आणाव-याचें, ह्या तत्त्वावर मार्क्विस ऑव् वेलस्ली नेहमीं आपलें वर्तन ठेवीत असे. म्हैसूरची व्यवस्था व निजामाशीं तह ह्या गोष्टी त्यानें त्याच तत्त्वाच्या धोरणावर केल्या होत्या हें अगो-दर सांगितलेंच आहे. त्याच धोरणावर त्यानें १७९९ सालीं तंजावरच्या राजाशीं तह केला; तेणेंकरून तो राजा सर्वथैव कंपनीच्या ताब्यांत आला. पुढें १८०१ सालीं जेव्हां कर्ना-टकचा नबाब मेला, तेव्हां त्याच्यामागून असा एक वारस निघाला कीं, तो उत्पन्नाचा एक पंचमांश घेऊन आपल्या राज्याची सर्व व्यवस्था कंपनीच्या हातीं देण्यास तयार झाला. त्याच वर्षी अयोध्याप्रांताच्या संरक्षणार्थ ठेविलेल्या ब्रिटिश फौजेच्या खर्चासाठीं, तेथील नबाबास आपला अर्ध्याहून अधिक मुलूख तहान्वयें स्वाधीन करण्यास भाग पाडिलें. अशा रीतीनें वेलस्लीनें सुरू केलेली जी ही सबसिडि-यरी सिस्टिम किंवा पद्धति ती एक चतुराईची राजनीति होती; कारण तेणेंकरून असें होई कीं, एतद्देशीय राजे स्वतःच्या खर्चानें कांहीं ब्रिटिश फौज ठेवण्यास तयार होत; व ती फौज त्याच राजांस कंपनीच्या कह्यांत ठेवण्यास साधन होई. अशा रीतीनें ते जे आपला अधिकार कंपनीच्या स्वाधीन करीत त्याच्या मोबदला कंपनी त्यांच्या राज्यांत शांतता ठेवण्याची, व परशत्रूंपासून त्यांचा बचाव करण्याची हमी घेई.

१९०. **ईजिप्त देशावर स्वारी**—१८०१ त १,६०० काळे व ३,४०० गोरे असें एक सैन्य सर डेव्हिड बेयर्ड ह्याच्या हाताखालीं ईजिप्त देशास जाण्यास निघालें. श्रीरंग-पट्टणावर छापा घालावयास गेलेल्या तुकडीचा जो मुख्य तोच हा बेयर्ड होय. ईजिप्त देशांतून फ्रेंच लोकांस हांकून

लावावयाचें, ह्या कामीं मदत करण्यासाठीं ह्या सैन्यास पाठविलें होतें, पण तें वेळेवर पोहोंचलें नाहीं. एशिया-खंडाच्या चतुःसीमांच्या बाहेर, ब्रिटिश लोकांच्या झेंड्या-खालीं हिंदुस्थानांतील शिपाई लढण्यासाठीं गेले, असा हा पहिलाच प्रसंग होय.

१९१. **फोर्ट विलियम येथील पाठशाळा**–१८०० सालीं मार्किस आव् वेलस्लीनें फोर्ट विलियम येथें कंपनीच्या तरुण मुलकी कामदारांस हिंदुस्थानांतील भाषा, कायदे, व रूढी ह्यांचें ज्ञान करून देण्यासाठीं एक पाठशाळा स्थापन केली. पण १८०२ सालीं, ह्या पाठशाळेस विनाकारण फार खर्च होतो असें समजून कोर्ट आव् डायरेक्टर्स ह्यांनीं ती बंद करून टाकिली. तरी मुलकीकडील तरुण कामदारांस प्राच्य भाषा शिकविण्याची व्यवस्था, केवळ कलकत्त्यासच नव्हे तर मद्रास व मुंबई येथेंही, करण्याची परवानगी त्यांनीं दिली.

१९२. **वसईचा तह**–टिपूचा पाडाव झाल्यावर ब्रिटिश सत्तेचे अत्यंत भयंकर शत्रु म्हटले म्हणजे मराठे हे राहिले होते. दौलतराव शिंद्यानें आपल्या पदरीं पुष्कळ फ्रेंच अंमलदार बाळगिले होते; व इंग्लिशांस अशी भीति पडली होती कीं, फ्रेंचांनीं जर हिंदुस्थानांवर स्वारी केली, तर शिंदे व इतर मराठे राजे त्यांस मिळून ब्रिटिशसत्तेचा पाडाव करण्याची मोठी खटपट करितील. अशी स्थिति असल्या-मुळें पुणें येथें इंग्लिशांचें वजन पाडण्याची जी पहिली संधि येईल ती साधावयाची, असा वेलस्लीचा निश्चय होता. १८०२ सालीं शेवटचा पेशवा दुसरा बाजीराव, ह्यास यशवंतराव होळकरानें पुण्यांतून हांकून लाविल्यामुळें, तो ब्रिटिश लोकां-कडे आश्रय मागूं लागला. हा आश्रय ह्या वर्षाच्या अखे-

त्या दिवशीं त्याच्याबरोबर वसईचा तह करून त्यांनीं त्यास दिला. ह्या तहान्वयें स्वसंरक्षणार्थ ब्रिटिश फौज ठेवून घेण्यास, व २६ लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख तोडून देण्यास तो कबूल झाला.

**१९३. मराठ्यांशीं दुसऱ्या युद्धाची सुरवात**–अशा रीतीचा तह करून जनरल वेलस्ली पुण्यास जावयास निघाला, व त्या ठिकाणीं वाटेंत प्रतिबंध न होतां एप्रिलच्या २० व्या तारखेस जाऊन पोहोंचला. मेच्या १३ वीस पेशवा बरोबरच्या थोड्या लोकांसहित वसईहून तेथें येऊन पोहोंचला, व त्यास वेलस्लीनें पुनः गादीवर बसविलें. इकडे शिंदेहि इंग्लिशांविरुद्ध जूट करण्याकरितां वऱ्हाडच्या रघोजी भोंसल्याशीं गुप्त मसलत करीत होता. होळकरानें त्यांच्या जुटींत मिळण्याचें नाकारून परत माळवाप्रांतांत प्रयाण केलें. पण हे दोघे दोस्त हैदराबादच्या सीमेपर्यंत पुढें चालून आले. तेव्हां इंग्लिशांनीं त्यांस परत जाण्याचा हुकूम केला. तो त्यांनीं अमान्य केल्यावरून युद्धास प्रारंभ झाला.

**१९४. असईची लढाई (१८०३.)**–मराठ्यांनीं सप्टेंबरच्या २३ व्या तारखेपर्यंत लढाई करण्याचें टाळिलें, पण त्या दिवशीं जनरल वेलस्लीनें ४,५०० लोकांसहित त्यांच्या २०,००० फौजेवर हल्ला केला. ती फौज त्या वेळीं कैटना-नदीच्या उत्तर तीरावर छावणी देऊन राहिलेली होती. त्या प्रसंगीं शिंद्याच्या फौजेचे १०,००० लोक तेथें असून ते फ्रेंच अंमलदारांच्या हाताखालीं कवाईत शिकलेले असल्या-मुळें त्यांनीं शौर्यानें इंग्लिश सैन्यास प्रतिबंध केला, पण त्यांस मराठे स्वारांनीं चांगला पाठिंबा दिला नाहीं. त्यामुळें

अखेरीस सगळ्या मराठे सैन्यास जुधानदीच्या पलीकडे हांकलून लाविलें, व ब्रिटिश स्वारांनीं पलीकडच्या तीरावर जाऊनहि त्यांचा पाठलाग केला. हा तेजस्वी जय मिळविण्याच्या कामीं ब्रिटिश सैन्यांतील सरासरी एक तृतीयांश लोक मेले व जखमी झाले.

१९९. **दिल्ली व लासवारी येथें लेकसाहेबानें मिळविलेले जय**—शिंद्यांशीं आणखी (उत्तर) हिंदुस्थानांत युद्ध चालविलें होतें, तेथेंहि इंग्लिशांस असेंच यश आलें. जनरल लेक दिल्लीवर चाल करून गेला, व तेथें फ्रेंच सेनापति बोरकिन १९,००० लोक व १०० तोफा बरोबर घेऊन शहरा समोर मजबूत बैठक मारून बसला होता, त्याचा त्यानें पराजय करून टाकिला. पुढें तें विजयी सैन्य जेव्हां दिल्लींत शिरलें, तेव्हां लेक साहेब वृद्ध व अंध झालेल्या शाहाअलम बादशाहास जाऊन भेटला. बादशाह आपले धनी मराठे यांच्या हातांतून सुटण्यास आनंदानें तयार झाला. नंतर आक्टोबरच्या पंधरावीच्या सुमारास आग्रा शहर काबीज करून घेतलें; व त्या महिन्याच्या अखेरीस लेक साहेब १०,००० फौजेचा पाठलाग करीत निघाला. ही फौज फ्रेंचांनीं कवाईत शिकविलेलें जें शिंद्याचें पायदळ होतें त्याचा अवशेष होता. त्यानें तीस कासवारी येथें नवंबरच्या पहिलीस गांठिलें. इंग्लिशांशीं शिंद्याच्या पायदळानें आजपर्यंत ज्या लढाया केल्या होत्या त्यांपैकीं कोणत्याही लढाईंत आजच्यासारखें त्यांनीं आपलें शौर्य दाखविलें नव्हतें; व त्यांच्यावर जरी मागून व पुढून दोन्ही बाजूंनीं हल्ले केले, तरी ते हार जाईनात. शेवटीं लेक यास जय मिळाला, पण त्यांत त्याचे १,००० लोक गमावले. पण रक्तस्राव फारच झालेल्या अशा हृय

समरांगणांत पराजित सैन्यापैकीं ह्याच्या सातपट लोक मरून पडले.

१९६. आरगांवची लढाई—कलकत्त्याच्या दक्षिणेस समुद्रकिनाऱ्यावर कटक म्हणून वऱ्हाडच्या राजाचा अगदीं पूर्वेकडील प्रांत होता, तो सपटंबर व आक्टोबर ह्या महिन्यांत जिंकून टाकिला. त्या राजाचें सैन्य जनरल वेलस्लीनें नवंबरच्या २९ वीस आरगांव मुक्कामीं पराजित करून टाकिलें; व त्या सैन्याच्या मदतीस शिंद्याचे स्वार आले होते, त्यांस व त्यास दोघांसहि, त्यांचे पुष्कळ लोक मारून, समरांगणांतून हांकून काविलें. दिजंबरच्या १५ वीस कर्नल स्टिव्हेन्सन यानें गाविलगडचा बळकट किल्ला जिंकून घेतला.

१९७. भोंसले व शिंदे यांशीं तह—१८०३ सालच्या अखेरीस रघुजी भोंसले व शिंदे यांच्याशीं तह केला; त्याचीं कलमें अशीं होतीं; भोंसले यानें कटक प्रांत व आपल्या राज्याच्या पश्चिम सीमेवरील वर्धानदीच्या पलीकडील मुलूख हे द्यावे. शिंद्यानें (१) गंगा व यमुना ह्यांच्यामधील आपला मुलूख द्यावा; (२) अजिंटा घांट व गोदावरीनदी ह्यांच्या मधील मुलूख द्यावा, (३) रजपुतान्याच्या उत्तरेकडील मुलूख द्यावा; आणि (४) अहमदनगर व भडोच हीं शहरें द्यावीं. ह्याशिवाय, बादशाह, निजाम, पेशवे व गायकवाड, ह्यांच्यावरचे आपले सर्व हक्क सोडून द्यावे. अशा रीतीनें जिकडे तिकडे ब्रिटिश फौज व ब्रिटिश राजनीति हीं विजयी झालीं; आणि थोड्याच वेळापूर्वीं जी शिंद्याची सत्ता गंगानदी पासून तों तहत पश्चिम किनाऱ्यापर्यंत पसरलेली होती, तिचा चार महिन्यांत चुराडा होऊन गेला.

**१९८. होळकराशीं युद्ध**—१८०४ च्या प्रारंभीं होळकर इंग्लिशांविरुद्ध सख्य बनवूं लागला, व तह मोडून आपल्यास येऊन मिळण्यास शिंद्यास त्यानें निमंत्रण केलें. एप्रिल महिन्यांत कर्नल मॉनसन त्याजवर हल्ला करण्यास जयपुरास निघून गेला; पण होळकरानें त्याच्याशीं समोर उभें राहून लढाई करण्याचें टाळून, चंबळनदी वलांडिली व आपल्या मुलखांत परत प्रयाण केलें. मॉनसन साहेबानें त्याचा पाठलाग केला, पण शेवटीं असंख्य शत्रूंनीं त्यास घेरून त्याला पुरवठा होण्याचा बंद केला; पण त्याच्याशीं लढाईस ते उभे राहीनात. पुढें पावसाळा आला; म्हणून मॉनसन ह्यास अव्यवस्थेनें आग्र्यास परतून जावें लागलें, व होळकराचे स्वार त्याच्या मागोमाग त्याचा पागलाग करीत गेले.

**१९९. दिल्लीवर हल्ला, व दीगची लढाई**—नंतर बादशाहास आपल्या स्वाधीन करून घ्यावा ह्या आशेनें आक्टोबरच्या आठव्या तारखेस होळकरानें दिल्लीवर हल्ला करण्याचें साहस केलें. हा त्याचा यत्न तेथील रेसिडेंट कर्नल आक्टर्लोनी ह्यानें त्या शहराच्या तटांचें संरक्षण करून निष्फळ करून टाकिला. शेवटीं लेक साहेब येत आहे असें ऐकून वेढा घालणारें सैन्य भरतपुराकडे पळून गेलें. नवंबर महिन्यांत जनरल फ्रेजरनें मराठा पायदळ दीगच्या किल्ल्यानजीक मजबूत ठाणें देऊन बसलें होतें त्यास गांठिलें. तेव्हां मोठ्या कडाक्याचा संग्राम होऊन त्यांत जनरल साहेब मारला गेला, पण ब्रिटिश सैन्यानें जय मिळविला, व शत्रूच्या ८७ तोफा हस्तगत केल्या. पुढें चार दिवसांनीं लेक यानें होळकराच्या घोडेस्वारांवर फरकाबाद एथें अक-

स्मात् छापा घातला, व त्यांच्यापैकीं ३,००० लोक ठार केले.

२००. **भरतपुरचा वेढा**–१८०५ च्या प्रारंभीं लेक ह्यानें भरतपुरास वेढा घातला, कारण तेथील राजा होळकरास मिळाला होता. शहराच्या रक्षणार्थ त्याच्या सभोंवतीं एक मातीचा तट बांधलेला होता, व त्याच्या सभोंवतीं एक खोल खंदक खणिला होता. इकडे इंग्लिशांच्या तोफांत जीव नव्हता. म्हणून त्यांनीं चारदां हल्ले केलेले किल्ल्यांतील लोकांनीं चाऱ्ही वेळां परतून लाविले, व त्यांत इंग्लिशांचे ३,००० लोक गमावले. पुढें एप्रिलची १० वी तारीख आली तेव्हां तेथील राजा वश झाला, तेव्हां त्यास २० लाख रुपये द्यावयास व होळकरांशीं केलेला स्नेह तोडण्यास इंग्लिशांनीं भाग पाडिलें.

२०१. **होळकर व शिंदे ह्यांशीं तह**–आतां मराठ्यांची सत्ता जरी पूर्णपणें जेरीस आली होती, तरी ह्या युद्धांत जो खर्च झाला तो पाहून डायरक्टर्स व प्रधानमंडळ दोन्ही घाबरून गेलीं होतीं. म्हणून त्यांनीं वेलस्लीच्या जागीं गव्हर्नर जनरलाचें काम करण्यास व जिकडे तिकडे शांतता करण्यास, कार्नवालीस ह्यास पाठवून दिलें. पण तो १८०५ च्या आक्टोबरांत कलकत्ता येथें मरण पावला; तेव्हां कौन्सिलांतील सर्वांत वरच्या पदवीचा सभासद जो सर जार्ज बार्लो तो त्याच्या मागून गव्हर्नर जनरलाचें काम पाहूं लागला, व त्यानें जिकडे तिकडे शांतता करण्याची जो विलायतेहून फर्माविलेली राजनीति ती अमलांत आणिली. शिंद्याशीं एक नवा तह केला, व त्या अन्वयें स्नेहाची खूण म्हणून त्यास ग्वाल्हेर शहर दिलें, व चंबळनदी ही त्याच्या

राज्याची उत्तरसीमा ठरवून टाकिली. होळकरास सतलज-नदीच्या पलीकडे हांकून काविलें; तेथें त्यानें शीक लोकांचें साहाय्य मिळविण्याविषयीं खटपट केली, पण ती साधली नाहीं. अशा रीतीनें तो जेंव्हां निराश्रित झाला, तेंव्हां त्याजबरोबर इंग्लिशांनीं असें बोलणें काविलें कीं तूं जर बुंदेलखंड व चंबळनदीच्या उत्तरेकडील ठिकाणें, ह्यांजवरील आपले सर्व हक्क सोडून देशील, तर प्रस्तुत युद्धांत तुझा गेलेला सर्व मुलूख तुला आम्ही देऊं. तहाच्या ह्या अनुकूल अटी होळकरानें आनंदानें कबूल केल्या (२४ डिसेंबर, १८०५).

२०२. **वेलोर एथील फौजेचें बंड**—१८०६ त वेलोर मुकामीं काळ्या पलटणींनीं बंड केलें. शिपायांनीं दाढी मिशा अमुकच रीतीनें कातरल्या पाहिजेत, त्यांनीं कानांत चौकडे घालूं नये, व कपाळीं गंध लावूं नये, अशा प्रकारचे नवीन नियम केले होते. त्यावरून त्यांस असें वाटलें कीं, सरकार आपणांस जुलमानें बाटवून ख्रिस्ती करणार आहे. ह्मणून एकाएकीं १,५०० काळे शिपाई बंड करून उठले, व त्यांनीं २०० गोऱ्या शिपायांस ठार मारिलें किंवा जखमी केलें. हें शिपायांचें बंड कर्नल गिलेस्पीच्या बंदुकस्वार रेजिमेंटानें अर्काट येथून येऊन सहज मोडून टाकिलें.

२०३. **लार्ड मिंटो**—हा नवा गव्हर्नर जनरल १८०७ त कलकत्त्यास येऊन पोहोंचला. याचें वारन हेस्टिंग्सवर खटला चालविण्याच्या कामीं बरेंच अंग होतें; व शांतता राखण्याची जी राजनीति तिला अनुसरून वागावयाचें असा निश्चय करून तो आला होता. पण बुंदेलखंडांत शांतता

पुनः स्थापन करण्याच्या कामीं, व १८०९ त अमीरखान नामक अफगाण जातीचा एक सरदार बरोबर लुटारू लोकांचें मोठें सैन्य घेऊन वऱ्हाड प्रांतावर स्वारी करीत होता त्याचा बंदोबस्त करण्याच्या कामीं त्यास बळाचाच उपयोग करावा लागला.

२०४. **परराष्ट्रांकडे वकील, व त्यांशीं तह**— उत्तरेकडून फ्रेंच लोक हिंदुस्थानावर स्वारी करितील अशी भीति उत्पन्न झाल्यामुळें अफगाणिस्थान व इराण या राष्ट्रांकडे आपले वकील पाठवावे असें लॉर्ड मिंटोच्या मनांत आलें. कर्नेल माल्कम (हा पुढें सर जान माल्कम ह्या पदवीस चढला) यास प्रथम १८०८ त, व पुनः १८१० त, इराणच्या शाहाकडे पाठविलें. १८०९ त मॉनस्टुअर्ट एल्फिन्स्टन ह्याची अफगाणिस्थानचा अमीर शहासुजा ह्याच्याशीं पेशावर मुक्कामीं मुलाखत झाली; त्या ठिकाणीं अमीरानें त्याचें मनःपूर्वक स्वागत केलें. त्याच सालीं सिंधच्या अमीरांशीं तह केला; त्यांत त्यांनीं असें वचन दिलें कीं, "ब्रिटिश लोकांच्या कोणत्याहि शत्रूस आम्ही आपल्या राज्यांच्या सीमा ओलांडूं देणार नाहीं."

२०५. **रणजितसिंग**—तिकडे पंजाबांत एक पराक्रमी राजा आज कित्येक दिवस एक बलिष्ठ राष्ट्र बनवण्याच्या कामांत गुंतलेला होता; रणजितसिंग ह्यानें सतलजनदीच्या पश्चिमेकडील सर्व शीक लोकांस आपल्या अमलाखालीं एकत्र करून अफगाण लोकांस सिंधुनदीपलीकडे हांकून लाविलें. नंतर १८०६ त सतलज नदीउतरून तो अलीकडे आला, व पूर्वेकडे आपलें राज्य वृद्धिंगत करूं लागला. तें पाहून लार्ड मिंटोनें त्यास असें सांगून पाठ-

विलें कीं, आपणास लढाया वगैरे करावयाच्या त्या सतलज-नदीच्या पश्चिमेसच कराव्या. त्यावरून दोघांचा तह झाला; त्यांत असें ठरलें कीं, ब्रिटिश लोकांनीं सतलज-नदीच्या पलीकडे शीक लोकांच्या कारभारांत हात घालूं नये; व रणजितसिंगानें असें कबूल केलें कीं, त्या नदीच्या आलीकडील मुलखावर आपण स्वारी करणार नाहीं. हा तह रणजितसिंगानें पुढें वृद्ध होऊन मरेतोंपर्यंत मनःपूर्वक पाळिला.

२०६. **मद्रास येथील कंपनीच्या लष्करी अमलदारांचें बंड**–१८०९ त मद्रासचा गव्हर्नर सर जॉर्ज बार्लो ह्यानें पैशाची काटकसर करण्याचा यत्न केला. त्यावरून कंपनीच्या लष्करी अम्मलदारांस चीड येऊन ते बंड करून उठले. परंतु काळे व गोरे शिपाई यांनीं आपली राजनिष्ठा सोडिली नाहीं; ह्मणून त्यांच्या मदतीनें ह्या भयंकर बंडाचें उपशमन करून टाकिलें. लार्ड मिंटो हा वर्षाच्या अखेरीस मोडकेली व्यवस्था पुनः लावण्यासाठीं व अपराध्यांस शिक्षा करण्यासाठीं, मद्रासेस गेला; व हें कर्तव्य त्यानें निग्रहानें परंतु बेताबाहेर कडकपणा न करतां बजाविलें.

२०७. **मॉरिशसचा पाडाव**–इंग्लिशांचें व फ्रेंचांचें आज पुष्कळ वर्षेपर्यंत यूरोपांत युद्ध चाललेलें होतें; तें चालू असतां फ्रेंचांच्या सरकारी व खासगी लढाऊ गलबतांस मारिशस बेटाचा आश्रय नेहमी मिळत असे. तेथून ते इंग्लिशांच्या मालाच्या गलबतांची लुटालूट करीत; व अशा रीतीनें त्यांनीं कंपनीचें कोट्यावधि रुपयांचें नुकसान केलें होतें. ह्मणून ब्रिटिश लोकांचें ११,००० सैन्य १८१० च्या नवंबरांत त्या बेटावर जाऊन उतरलें, व त्यांनीं तें सहज-

सीत्या हस्तगत करून घेतलें. तेव्हांपासून तों आजपर्यंत तें इंग्लिशांचीच वसाहत होऊन राहिलेलें आहे.

२०८. **जावा बेटाचा पाडाव**—जावा बेटांतील पुरातन इमारती व ग्रंथ ह्यांजकडे पाहतां त्यावरून असें सिद्ध होतें कीं, हिंदुस्थानांतील लोकांनीं चंद्रगुप्ताच्या कारकीर्दीच्या सुमारास तें जिंकून टाकिलें होतें. १ त्यानंतर आतां दोनहजारांपेक्षां जास्त वर्षांनीं हिंदुस्थानांतून स्वारी होऊन त्याचा पुनः पाडाव होण्याचा योग आला. यावेळीं तें बेट डच लोकांच्या ताब्यांत असून ते इंग्लिशांचे वैरी बनलेले होते; कारण हालंड देश नेपोलियनानें नुक्ताच जिंकून घेतलेला होता. १८११ च्या आगस्ट महिन्यांत जनरल आचमूटी यानें ५,००० गोरे, व तितकेच काळें, असें १०,००० सैन्य घेऊन बटेवियाच्या उपसागरांत प्रवेश केला. ह्या मोहिमींत त्यास पूर्णपणें यश आलें. सप्टेंबर महिन्यांत जावा बेट इंग्लिशांच्या स्वाधीन झालें, व तेथील डच सैन्यास कैद केलें. नंतर १८१६ पर्यंत ब्रिटिश अमलाखालीं जावा बेटाची सारखी भरभराटच होत गेली; पण त्या वर्षीं तें डच लोकांस परत दिलें.

२०९. **लार्ड मिंटोच्या कारकीर्दीचा शेवट**—लार्ड मिंटोनें प्राच्यविद्येस उत्तेजन दिलें, व फोर्टविलियम येथें वेलस्लीनें स्थापिलेल्या पाठशाळेची हयगय केली नाहीं. फ्रान्स देशाशीं युद्ध चाललें असतांहि, व पुष्कळ स्वाऱ्या कराव्या लागल्यातरी, त्यानें जमावंदीची व्यवस्था अशी कांहीं उत्तम ठेविली कीं, त्याच्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षीं सरकारी तिजोरींत सरासरी २० लाख पौंडांची शिल्लक होती. त्यानें १८१३ च्या अखेरीस हिंदुस्थान सोडिलें.

**२१०. नेपाळाशीं युद्ध, पहिली मोहीम–(१८१४)** लार्ड मिंटोच्या मागून लार्ड मोइरा हा गव्हर्नर जनरल होऊन आला. नेपाळ देशाशीं सीमेच्या संबंधानें तंटा उत्पन्न होऊन तो अत्यन्त महत्वाचा प्रश्न त्यांच्यापुढें प्रथम आला; व त्या त्यांच्यामुळें त्या देशाशीं युद्ध सुरू झालें. नेपाळ देशावरची पहिली मोहीम अगदींच फसली. त्या देशांतील डोंगराळ मुलूख व शूर लढवय्ये ह्यांना पाहून कंपनीचे शिपाई घाबरून गेले. कलिंग किल्ल्याच्या रक्षणार्थ ६०० गुरखे होते; त्यांनीं त्या किल्ल्याचें संरक्षण इतक्या शौर्यानें केलें कीं, त्यांच्यांतले ७० लोक शिल्लक राहीतोंपर्यंत ते लढले व त्यांत त्यांनीं इंग्लिशांचे ९०० लोक मारले; नंतर ते ७० लोक मागें हटले. तथापि ह्या (१८१४) वर्षाच्या अखेरीस गुरखे लोकांचा मुख्य सेनापति जो अमरसिंग त्याचा जनरल ऑक्टर्लोनी ह्यानें पराभव करून त्याचे फार लोक मारिले, व त्यास मलूनच्या किल्ल्यावर परतून जाण्यास भाग पाडिलें.

**२११. दुसरी मोहीम** (१८१५) अमरसिंग मलूनच्या डोंगरी किल्ल्यावर मजबूत ठाणें देऊन राहिला होता, तेथें त्याजवर हल्ला करण्याकरितां आक्टर्लोनी १८१५ च्या एप्रिलांत निघाला. त्या महिन्याच्या १६ व्या तारखेस ब्रिटिश छावणीवर गुरखे लोकांनीं भयंकर हल्ला केला, पण त्यांस ब्रिटिश सैन्यानें मागें हटवून लाविलें. मेच्या १० व्या तारखेस अमरसिंगास असें आढळून आलें कीं आपल्या हातून आतां मलूनचें संरक्षण होत नाहीं, तेव्हां तो हार गेला. ह्यावर्षाच्या शेवटीं तहाचीं कलमें तयार केलीं, त्यांत अशी योजना केली होती कीं, इंग्लिशांस बराच मोठा मुलूख

द्यावा. पण अगदीं आयत्या वेळेस नेपाळ सरकारनें ह्या तहावर सही करण्याचें नाकारिलें. त्यामुळें तिसऱ्या मोहीमीची तयारी करणें भाग पडलें.

२१२. **तिसरी मोहीम**—( १८१६ ). १८१६ च्या फब्रुवारींत आक्टलोनी १७,००० लोक बरोबर घेऊन नेपाळचा दक्षिणेकडून बचाव करणारें तराईनामक एक विशाल रोगट अरण्य आहे त्यांतून शिरला, व नेपाळच्या राजधानीपासून ५० मैलांवर मक्कानपुर मुक्कामीं त्यानें शत्रूंस गांठून त्यांचा पराजय करून टाकिला. ह्या लढाईंत त्याचे फारच थोडे लोक पडले. ह्या पराजयानंतर गुरखे सरकारचे वकील तह करण्याविषयीं विनंती करण्यासाठीं आले. तह ठरून त्याच्या अन्वयें तराईचें मैदान, गरवाल आणि कमाउन हे प्रांत, व देहेरेदून, हीं इंग्लिशांस मिळालीं. अशा रीतीनें त्यांच्या राज्याची सीमा हिमालयास जाऊन भिडली. तेव्हांपासून गुरखे लोक ब्रिटिश राज्याचे चांगले स्नेही बनून राहिले आहेत.

२१३. **पेंढारी लोक**—पुष्कळ वर्षेंपावेतों पेंढारी नांवाच्या लुटारू लोकांच्या टोळ्यांनीं मध्यहिंदुस्थानास भिवडावून सोडिलें होतें. पेंढारी हे पूर्वीं पगारा ऐवजीं लुटीचा वांटा घेऊन एतद्देशीय राजांच्या सैन्यांतून राहत असत. मागें सांगितल्याप्रमाणें मराठ्यांशीं झालेल्या युद्धाच्या शेवटीं त्यांच्या फौजेंतून फांटा मिळालेले पुष्कळ लोक त्यांस मिळाले; नंतर त्यांनीं आपल्या पुढाऱ्यांच्या धोरणानें वागून पेशवा, निजाम, वऱ्हाडचा राजा ह्यांच्या मुलखाची नासधूस मांडिली; व ते ब्रिटिश मुलखांतहि स्वाऱ्या करूं लागले. १८१६ त त्यांचा बखेडा मोडण्यासाठीं ताबडतोब योग्य तजवीज कर-

ण्याची लार्ड मोइरा यास विलायत सरकाराकडून परवानगी मिळाली. १८१७ त १,१९,००० ब्रिटिश फौज समरांगणांत जाण्यास सिद्ध झाली, व ह्या लुटारू लोकांच्या मुलुखांनीं मांडिलेली नासधूस बंद करून टाकण्याच्या कामीं मदतीसाठीं लार्ड मोइरानें एतद्देशीय राजांस निमंत्रण केलें.

२१४. मराठ्यांची हालहवाल—कांहीं मराठे राजांचा कल, पेंढाऱ्यांस जाऊन मिळावें, किंवा निदान ब्रिटिश फौज लढाईत अगदीं गुंतली आहे ही संधि साधून घ्यावी, अशा प्रकारचा होता. वऱ्हाडचा राजा आप्पासाहेब ह्यास जरी इंग्लिशांनींच गादीवर बसविलें होतें, तरी त्यानें होळकर, शिंदे व पेशवा ह्यांस इंग्लिशांविरुद्ध जूट करूं या ह्मणून निमंत्रण केलें. मराठ्यांनीं इंग्लिशांवर एकदम उठावें व त्या कामांत आपण त्यांचें पुढारीपण करावें, अशी पेशव्यास उत्कंठा होती. ह्मणून त्यानें आपल्या मेहरबानींतला जो त्रिंबकजी डेंगळे त्याच्या मसलतीनें पेंढाऱ्यांविरुद्ध होणाऱ्या युद्धास मदत करण्याच्या मिषानें सैन्य गोळा केलें. गायकवाडाचा वकील गंगाधर शास्त्री ब्रिटिश सरकारच्या रक्षणाखालीं पुण्यास गेला होता; त्याचा १८१५ च्या जुलईत त्रिंबकजी डेंगळ्यानें मारेकऱ्यांकडून वध करविला. ह्यावरून त्रिंबकजीस बाजीरावानें इंग्लिशांच्या स्वाधीन केलें, पण तो ठाण्याच्या तुरुंगांत होता तेथून पळून गेला. १८१७ च्या जून महिन्यांत पुण्याचा रेसिडेंट एलफिन्स्टन यानें बाजीरावाकडून एक तह करून घेतला; त्या तहान्वयें त्यानें अमदाबाद शहर इंग्लिशांस दिलें, व ३४ लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख तोडून दिला.

२१५. **मराठ्यांशीं शेवटचें युद्ध. खडकीची लढाई ( १८१७ )**—ह्या तहावर सही केल्यावर बाजीरावानें पुणें सोडिलें, व आपली युद्धाची तयारी चालू ठेविली. सप्टेंबर महिन्यांत तो परत आला, आणि मुंबईहून एक युरोंपियन रेजिमेंट येत होतें, तें पुणें येथील ब्रिटिश सैन्यास येऊन मिळण्याच्या पूर्वीं त्या सैन्यावर हल्ला करावा असा त्यानें बेत केला. पण विलंब केल्यामुळें, त्याचा तो बेत फसला, व आक्टोबरच्या शेवटच्या तारखेस मुंबईचें रेजिमेंट पुण्यास दाखल झालें. नवंबरच्या पहिलीस एलफिन्स्टन ह्यानें २,८०० ब्रिटिश सैन्यास पुण्यांतून काढून तेथून ६ मैलांवर खडकी येथें नेऊन ठेविलें. नंतर सरासरी २५,००० मराठे सैन्य त्यांच्यावर हल्ला करण्यास ५ व्या तारखेस पुढें चाल करून आलें. तें पाहून ब्रिटिश सैन्याची टोळी शत्रूचा हल्ला अंगावर घेण्यास जागच्याजागीं न थांबतां, त्यास तोंड देण्यासाठीं पुढें सरसावून निघाली. संग्राम व्हावा तसा कडाक्याचा झाला नाहीं. बाजीराव आपल्या पूर्वजांसारखा शूर नव्हता; ह्मणून समरांगणापासून पांच मैलांवर पर्वतीच्या डोंगरीवर तो सुरक्षित ठिकाणीं जाऊन बसला, व आपले सैन्यापैकीं ५०० लोकांस मारून बाकीच्यांस इंग्लिशांनीं अस्ताव्यस्त रीतीनें मागें पळावयास लाविलें आहे, ही सर्व गोष्ट त्यानें तेथूनच अवलोकन केली. ह्या प्रसिद्ध लढाईत इंग्लिशांचे फक्त ८६ लोक मेले किंवा जखमी झाले.

२१६. **कोरेगांवचा बचाव**—लढाई नंतर पेशवा आपल्या सैन्यासहित साताऱ्याकडे निघून गेला, व त्याच्या पाठीस जनरलस्मिथ लागला. रस्त्यांत कोरेगांव येथें त्याची व ब्रिटिश सैन्याच्या एका टोळीची गांठ पडली. त्या

टोळींत ८२४ लोक असून ते क्याप्टिन स्टॉटनच्या हाताखालीं शिरूराहून पुण्यास चालले होते. ह्या शूर अशा लहान टोळीनें सगळें मराठा सैन्य अंगावर आलें तरी सगळा दिवस (जानेवारी १ सन १८१८) कोरेगांवशहर हातांतून जाऊं दिलें नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं तें शहर क्याप्टिन स्टॉटनच्याच ताब्यांत राहूं देऊन मराठे लोक निघून गेले.

२१७. **नागपूरची हालहवाल**—ज्या महिन्यांत खडकीची लढाई झाली त्याच महिन्यांत (नवंबर १८१७) वऱ्हाडचा राजा आप्पासाहेब ह्यानें नागपुरास १,४८० ब्रिटिश सैन्यावर हल्ला केला. ते लोक रेसिडेन्सी व नागपूर यांच्यामध्यें शिताबळदीचे डोंगरांवर ठाणें करून राहिले होते. आप्पासाहेबाच्या सैन्यांत आरब होते, त्यांनीं ह्या ठाण्यावर भयंकर हल्ले केले, व कांहीं वेळपर्यंत त्या डोंगरांपैकीं एक डोंगर त्यांनीं आपल्या ताब्यांत देखील घेतला. पण शेवटीं निराश होऊन आप्पासाहेबाच्या सैन्यास तो यत्न सोडून देणें भाग पडलें. नंतर जनरल डव्हूटन हा दिजंबरच्या प्रारंभीं तेथें येऊन पोहोंचला; आणि त्याच महिन्याच्या १६ वीस त्यानें नागपूरची लढाई जिंकिली. त्या लढाईत ब्रिटिश सैन्यांतील १४२ लोक मारले गेले, पण त्या सैन्यानें शत्रूचे ४० हत्ती व ७५ तोफा हस्तगत करून घेतल्या. खुद्द नागपूरचा किल्ला २४ व्या तारखेस स्वाधीन झाला.

२१८. **महिदपूरची लढाई**—यशवंतराव होळकर १८११ त मरण पावला. त्याच्या मागें त्याची आवडती बायको तुळशीबाई ही, त्याचा पुत्र मल्हारराव हा अद्यापि लहान असल्यामुळें त्याच्या नांवानें राज्यकारभार पाहू

लागली. तिची इच्छा ब्रिटिश लोकांशीं स्नेहभावानें रहावें अशी होती. पण मराठे सरदारांनीं १८१७ त डिसेंबरच्या २० व्या तारखेस तिचा वध केला, व लागलेंच त्या लहान राजास पकडून आपल्या ताब्यांत घेतलें. दुसऱ्या दिवशीं सर टॉमस हिस्लॉप व सर जॉन माल्कम ह्यांच्या हातांखालील दोन ब्रिटिश टोळ्यांची व त्यांची क्षिप्रानदीवर महिदपूर येथें गांठ पडली; व ह्यांचा त्यांचा मोठ्या नेटाचा संग्राम होऊन, त्यांत मराठ्यांचे बरेच लोक पडून, ते पराजित झाले. ह्या लढाईचा परिणाम असा झाला कीं, होळकराचा व इंग्लिशांचा तह होऊन होळकर इंग्लिशांच्या आश्रयांतला संस्थानिक बनला.

२१९. **पेंढाऱ्यांचा पाडाव**—पेशवा, आप्पासाहेब व होळकर यांच्या सैन्यांचा याप्रमाणें पराभव होऊन गेलेला असल्यामुळें ज्या चोरांच्या टोळ्यांचा मोड करण्यासाठीं एवढी जंगी ब्रिटिश फौज जमा झालेली होती, त्यांच्यावर आपला सगळा जोर खर्च करून हल्ला करण्यास ती मोकळी झाली. पेंढाऱ्यांस एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं व दुसऱ्या ठिकाणाहून तिसऱ्या ठिकाणीं, ह्याप्रमाणें जिकडून तिकडून हांकून लाविलें; त्यांस अल्पस्वल्पहि आश्रय देण्यास एतद्देशीय राजांस धीर झाला नाहीं. त्यांचे मुख्य पुढारी वासिल महंमद, करीमखान व छट्टू हे होते. वासिल महंमदानें विष खाऊन आत्महत्या केली. करीमखान सर जॉन माल्कमच्या स्वाधीन झाला, व शांततेनें राहून शेतीभाती करूं लागला. छट्टूला माफी देत होते, पण त्यानें ती पत्करिली नाहीं; तो तसाच भटकत राहिला. शेवटीं १८१९ च्या एप्रिलांत एका वाघाच्या जंगलांत

छिन्नविच्छिन्न केलेलें त्यांचें प्रेत सांपडलें. अशा रीतीनें जे लुटारूंचे नाईक आज पुष्कळ वर्षेंपर्यंत शांततेनें राहणाऱ्या प्रजेस लुटून खात होते, त्यांच्या त्रासांतून ब्रिटिश सरकारानें तीस मुक्त केलें.

२२०. **सातारचा जाहीरनामा व पेशव्याचें स्वाधीन होणें**—१८१८ च्या फेब्रुवारींत सातारा शहर हस्तगत झालें, व एल्फिन्स्टनसाहेबानें ब्रिटिश सरकारच्या वतीनें असा जाहीरनामा लाविला कीं, पेशव्याचा मुलूख ब्रिटिश राज्यास आम्ही निरंतरचा जोडून टाकणार. मात्र, शिवाजीचा वंशज जो सातारचा राजा त्याच्या हातीं सातारा शहर व सभोंवतालचा मुलूख एवढें आम्ही राहूं देऊं. जूनच्या प्रारंभीं पेशवा सर जॉन माल्कमच्या स्वाधीन झाला; त्यानें त्यास आठ लाखांचें पेन्शन करून देण्याचें अभिवचन दिलें. नंतर कानपुरानजीक ब्रह्मावर्त शहर त्याचें राहण्याचें ठिकाण ह्मणून ठरविलें होतें, तेथें त्यास नेलें.

२२१. **मराठा मुलुखाची व्यवस्था**—हें काम मॉन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यानें मोठ्या हुशारीनें पार पाडिलें; व त्याबद्दल त्यास १८१९ त मुंबईचा गव्हर्नर नेमिलें. नंतर डोंगरी किल्ले भराभर हस्तगत करून घेतले; व ब्रिटिश सरकारच्या शत्रूंस व मित्रांस त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुरूप बक्षिसें दिलीं. नागपूरचा आप्पासाहेब पेंढाऱ्यांचा नायक छट्टू यास मिळाला होता, ह्मणून त्यास पदच्युत करून तेथील राजघराण्यांतील एका लहान मुलास वऱ्हाडच्या गादीवर बसविलें. कोल्हापुरच्या राजानें ब्रिटिश सरकारचा पक्ष घेतला होता, म्हणून त्यास बक्षिसादाखल कांहीं ज्यास्त मुलूख दिला. एल्फिन्स्टनचा मुख्य उद्देश लोकांचीं अंतः-

करणें आपल्याकडे ओढून घ्यावीं हा होता. म्हणून मराठ्यांचीं शस्त्रें एकदम त्यांच्याकडून काढून घेतलीं नाहींत; मात्र, सशस्त्र लोकांच्या मोठमोठ्या टोळ्यांस देशांतून इकडे तिकडे फिरण्याची मनाई केली. शिक्षण देण्याच्या कर्तव्याची हयगय केली नाहीं. मराठा सरकारच्या अमदानींत जो दक्षिणाफंड विद्वान् ब्राह्मणांस देण्याच्या कामीं खर्च होत असे, त्याचा विनियोग पुण्यास हिंदुपाठशाळा स्थापन करण्याच्या कामीं केला. ह्याचेंच पुढें डेक्कन कॉलेज बनलें. एल्फिन्स्टन स्कूल व एल्फिन्स्टन कॉलेज हीं नांवें एल्फिन्स्टनसाहेबांस शिक्षणाबद्दल जी आस्था होती तिचीं स्मारकेंच होत.

२२२. **मध्यहिंदुस्थानची व्यवस्था**—मध्यहिंदुस्थानांत सर जॉन माल्कम ह्यानें वरच्यासारखीच चांगली व्यवस्था केली. हा सर्व भाग आज इतकीं वर्षे पेंढारी लोक लुटून फस्त करीत असल्यामुळें तेथील जमिनींची हयगय होत गेलेली होती; तिची पुनः लागवड होऊं लागली. अशी सुधारणा होत गेल्यामुळें, होळकरास माळवा व नेमाड ह्या प्रांतांपासून आजपर्यंत वसूल येत होता, तो त्याच्या सैन्याचा महिदपूर मुक्कामीं पराजय झाल्यापासून दोन वर्षांच्या आंत तिप्पट वाढला. सर्वांत उत्तम गोष्ट ही कीं, बंगाल व मुंबई ह्यांच्यामधील जो विस्तीर्ण मुलूख आहे त्याच्यांत बळाचा उपयोग बहुतेक मुळींच करावा न लागतां सर्वत्र व्यवस्था लावतां आली.

२२३. **लार्ड आम्हर्स्ट व ब्रह्मदेशाशीं युद्ध**—लार्ड मोइरा ह्यास नेपाळच्या युद्धाची समाप्ति झाल्यावर मार्किस आव् हेस्टिंग्स अशी पदवी दिली होती. तो १८२२ त

हिंदुस्थान सोडून चालतां झाला. त्याच्या मागून नेमलेला गव्हर्नर जनरल लार्ड आह्मर्स्ट हा १८२३ च्या आगस्टांत कलकत्त्यास येऊन दाखल झाला. त्या वेळीं ब्रह्मी लोकांशीं राज्याच्या सीमेच्या संबंधानें कांहीं तंटा उद्भवला होता. त्याच्या संबंधानें तडजोड करण्यास ते लोक, गर्वानें फुगून जाऊन कबूल होतना. ह्मणून १८२४ च्या मे महिन्यांत ११,४७५ लोकांचें एक ब्रिटिश सैन्य सर आर्चिबाल्ड क्यांबेल ह्याच्या हाताखालीं इरावतीनदीच्या मुखासमोर आलें, व रंगूनशहरचे रखवालदार व रहिवाशी दोघेहि शहर सोडून गेले असल्यामुळें तें त्यांनीं घेतलें. पण ताप व आमांश या रोगांनीं या सैन्याचे फारच हालहाल केले. युद्धाचें काम फारच मंद रीतीनें चाललें होतें; व ब्रह्मी लोक मेढेकोट तयार करून त्यांच्या मागून लढत असल्यामुळें ते इंग्लिशांच्या काळ्या फौजेस वरचेवर पुरून उरत. दिजंबर महिना येई तोंपर्यंत मोठा असा जय एकहि मिळाला नाहीं. त्या महिन्यांत महाबंदुला नामक एक ब्रह्मीसरदार, ज्यानें पूर्वीं मे महिन्यांत चितागांगच्या सीमेवर ब्रिटिश सैन्याचा पराजय केला होता, तो रंगूननजीक आला; तेव्हां त्याचा कोकिम येथें पराजय करून त्याचे फार लोक मारिले.

२२४. **बराकपूर येथील फौजेचें बंड**–१८२४ च्या नवंबर महिन्याच्या आरंभीं कलकत्त्यापासून १६ मैलांवर बराकपूर येथें फौजेचें एक भयंकर बंड उद्भवलें. तीन काळ्या रेजिमेंटांतून असंतुष्टतेचीं चिन्हें दिसूं लागलीं, व ४७ वे रेजिमेंटानें आराकान येथें चाल करून जाण्याचें नाकारिलें. त्यांना शस्त्रें खालीं ठेवण्याचा हुकूम झाला, पण तो हुकूम मान्य करावयास लावण्यास तेथें एक इंग्लिश

रेजिमेंट व कांहीं लहान तोफा घेऊन घोडेस्वार हजर असतांहि, त्यांनीं तो मान्य केला नाहीं. तेव्हां त्या तोफांतून कुलपी गोळ्यांचा वर्षाव त्यांच्या रांगांवर केला; त्याबरोबर त्या बंडखोर शिपायांनीं शस्त्रें फेंकून देऊन वाट सांपडेल तिकडे पळ काढिला, व स्वारांची एक टोळी त्यांच्या पाठीस लागली.

२२५. **ब्रह्मदेशाशीं युद्ध, (१८२५)**–१८२५ सालीं इंग्लिशांनीं ब्रह्मदेशावर जलमार्गानें व खुष्कीवरून दोन्हीं बाजूंनीं हल्ला केला. जानेवारींत आसामप्रांत जिंकून घेतला, व आराकान मार्चअखेर घेतला. इकडे ब्रिटिश सैन्याचा मुख्य भाग क्यांबेलच्या हाताखालीं इरावतीनदींतून प्रोमवर चालून गेला, व त्यांत त्यांनीं एप्रिलच्या अखेरीस प्रवेश केला. दिजंबरच्या पहिलीस प्रोमनजीक लढाई झाली, तींत ब्रह्मी सैन्यांत मुख्यत्वेंकरून शानलोक असून, त्यांचा पराभव होऊन त्यांचे बरेच लोक मेले.

२२६. **ब्रह्मदेशाशीं चाललेल्या युद्धाचा शेवट, (१८२६)**–इतकें झालें तरी ब्रह्मी लोक ब्रिटिश लोकांच्या मागण्या कबूल करीनात, म्हणून क्यांबेलसाहेब इरावतीनदींतून आणखी वर चढून गेला. फेब्रुवारीच्या ८ वीस रंगूनच्या वर २६० मैलांवर पाघमपर्यंत तो चालून गेला. तेथें १६,००० ब्रह्मी फौज त्याला आडवी आली. ह्या शहराच्या तटाखालीं जी लढाई झाली, तिनें प्रस्तुत युद्धाचा निकाल लाविला. तेथें जय मिळवून ब्रिटिश सेनापति आवापासून ६३ मैलांवर यंदाबू म्हणून शहर आहे त्याजवर चाल करून गेला. ह्या ठिकाणीं ब्रह्मी राजाचे प्रधान त्यास भेटावयास आले, व त्यांनीं तहाबद्दल विनंती केली.

पुढें तेथें तह होऊन त्याच्याअन्वयें ब्रह्मी लोक एक कोट रुपये व आसाम, आराकान आणि तेनासरीम हे प्रांत, द्यावयास कबूल झाले.

२२७. **भरतपूरचा पाडाव, ( १८२६ )**—भरतपूरच्या किल्ल्यानें लेक यास १८०६ त दाद दिली नव्हती, त्याजवर इंग्लिशांनीं १८२५ त पुनः छापा घातला. तेथील राजा लहान असल्यामुळें त्याचा चुलतभाऊ दुर्जनसाल ह्यानें त्याची गादी बळकावून त्यास कैद केलें होतें. ह्मणून त्याचा पाडाव करण्यासाठीं १८२५ च्या दिजंबरांत ३०,००० सैन्य लार्ड कॉंबरमीर ह्याच्या हाताखालीं त्या शहरावर चालून गेलें. त्याच्या सभोंवतालच्या मातीच्या भिंतींवर तोफांचा कांहींच प्रयोग चालेना, म्हणून त्याच्या तळीं खंदक खणून सुरुंग काढून त्या उडविल्या. अशा रीतीनें भगदाडें पाडल्यावर त्याजवर १८२६ च्या जानेवारींत हल्ला केला, तेव्हां थोडा वेळ निकरानें प्रतिरोध करून अखेरीस शहर हस्तगत झालें.

२२८. **लार्ड बेंटिंक**—हा लार्ड आह्मर्स्टच्या मागून गव्हर्नर जनरल होऊन १८२८ च्या जुलई महिन्यांत कलकत्त्यास येऊन पोहोंचला. त्यानें आपलें सर्व लक्ष्य देशांतल्या देशांत सुधारणा करण्याच्या कामीं व शांतता राखून भरभराट करण्याच्या कामीं लाविलें. ठगलोक व लुटारूलोक ह्यांचीं बंडें मोडणें व विशेषतः सतीची चाल बंद करणें, ह्या गोष्टी त्याच्या कारकीर्दींत घडून आल्यामुळें तीस फार भूषण आलेलें आहे. त्यानें जमाबंदीच्या संबंधानें केलेली व्यवस्था फारच फलद्रूप झाली व तेणेंकरून खर्च भागून सरकारी तिजोरींत पुष्कळ शिल्लक राहूं लागली. धर्म किंवा जात

ह्याजवरून कोणासही सरकारी नोकरींत शिरण्यास प्रतिबंध करावयाचा नाहीं, असें एक तत्त्व त्यानें जाहीर केलें व तेणेंकरून एतद्देशीय लोकांच्या एकंदर भावी पिढ्यांचे उपकार त्यानें विशेषतः संपादन केले. ह्या तत्त्वास अनुसरून डेप्युटीकलेक्टर व न्यायाधीश या जागा एतद्देशीय लोकांस त्याच्या कारकीर्दींत मिळूं लागल्या. प्रसिद्ध इतिहासकार मेकॉले हा त्याच्या कौन्सिलांचा कायदेसभासद होऊन १८३४ त आला होता, त्याच्या सल्ल्यानें बेंटिक ह्यानें पाश्चात्य शिक्षणाचे फायदे एतद्देशीय लोकांस करून देण्याचा निश्चय केला, व हल्लीं या देशांतील शाळांतून जी शिक्षणपद्धति चालू आहे, तिचा पाया ह्यानेंच घालून दिला.

**२२९. त्याची परराष्ट्रांशीं वागण्याची नीति**—परराष्ट्रांशीं व्यवहाराच्या संबंधानें पाहतां, लार्ड बेंटिकच्या कारकीर्दींतील मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे, त्याची व रणजितसिंगाची सतलजनदीच्या कांठीं मोठ्या थाटाची मुलाखत झाली ती होय. त्या वेळीं शीक लोक व ब्रिटिश लोक ह्यांच्यामध्यें स्नेहसंबंधाचा एक तह झाला. लार्ड बेंटिक हा एतद्देशीय राजांच्या कारभारांत बहुधा हात घालीत नसे. पण कुर्गचा राजा आपल्या प्रजेवर असा कांहीं क्रूर जुलूम करूं लागला कीं, त्याच्या कारभारांत हात घालणें जरूर झालें. तो जेव्हां गव्हर्नर जनरलाचा हुकूम मानीनासा झाला, तेव्हां त्याच्या देशावर स्वारी करून त्यास पदच्युत केलें. त्याला पदच्युत केल्यावर त्याचें राज्य 'त्याच्या सर्व प्रजेच्या इच्छेवरून' खालसा केलें ही गोष्ट त्या वेळीं फिरविलेल्या जाहीरनाम्यांत नमूद केलेली आढळते.

**२३०. कंपनीच्या सनदेंत फेरफार**–१८३३ सालीं कंपनीस आणखी २० वर्षांची सनद मिळाली. ह्या वर्षापासून कंपनीनें व्यापार करण्याचें बंद करून टाकिलें; पण हिंदुस्थानचें राज्य तिच्याच ताब्यांत राहूं दिलें.

**२३१. सर चार्लस मेट्काफ**–लार्ड बेंटिंकच्या मागून मुलकीखात्यापैकीं सर चार्लस मेट्काफ हा हुशार कामगार गव्हर्नर जनरल झाला, व त्यानें हिंदुस्थानचा कारभार एक वर्षपावेतों पाहिला. त्याच्या कारकीर्दींतील मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे, असा एक कायदा पसार झाला कीं, तेणेंकरून हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांस इंग्लंदांतील वर्तमानपत्रांइतकें स्वातंत्र्य प्राप्त झालें.

**२३२. लार्ड आक्लंड**–हा १८३६ त गव्हर्नर जनरल होऊन हिंदुस्थानास आला, त्या वेळीं लार्ड बेंटिंकची शांततेची राजनीति बरोबर गिरवावयाची असा त्याचा पूर्ण निश्चय होता. त्याच्या कारकीर्दींत जे कायदे अगदीं प्रथम पसार झाले, त्यांपैकीं एकास ब्ल्याक आक्ट ( काळा कायदा )असें नांव मिळालेलें आहे. कारण प्रांतांतील कोर्टाच्या निकालावर अपील करण्याचा आजपर्यंत यूरोपियन लोकांस जो विशेष हक्क होता, तो ह्या कायद्यानें काढून घेतला. ह्या कायद्याचा मसुदा कौन्सिलापुढें मेकॉलेसाहेबानें आणिला होता, व थोडे वर्षांपूर्वीं इलबर्टसाहेबानें तयार केलेल्या अशाच प्रकारच्या कायद्याच्या मसुद्यास कलकत्त्याच्या यूरोपियन लोकांनीं जसा जबरीचा प्रतिरोध केला होता, तसाच ह्या मसुद्यासहि केला.

**२३३. परराष्ट्रांपासून भय**–१८३७ सालीं पर्शियन लोकांनीं रशियन लोकांच्या मदतीनें हिरातेस वेढा घातला. त्या वेळीं रशियन लोकांनीं पर्शियाचे उत्तरेकडील प्रांत का

बीज केलेले असल्यामुळें इकडे अशी भीति उत्पन्न झाली कीं, रशिया कदाचित् पर्शिया किंवा अफगाणिस्थान ह्या देशांतून हिंदुस्थानावर स्वारी करण्यास येईल. ह्मणून क्यापूटिन बर्न्स ह्यास अफगाण लोकांचा स्नेह संपादन करण्यासाठीं काबुलास पाठविलें. ह्या साहेबानें मध्यएशियेंतून प्रवास करून आपणास प्रसिद्ध करून घेतलें होतें. त्या वेळीं बराकझाई टोळीपैकीं पराक्रमी पुरुष दोस्त महंमद हा अफगाणिस्थानचा राजा होता. त्यानें त्याचें ममतापूर्वक स्वागत केलें, व माझ्यापासून शीक लोकांनीं पेशावरप्रांत घेतला आहे, तो जर इंग्लिश मला परत देववितील तर मी त्यांच्यांशीं सख्य करण्यास तयार आहें, असें अभिवचन दिलें. आतां वरील अट कबूल केल्यास रणजितसिंगास राग यावयाचाच, अशी स्थिति असल्यामुळें, बर्न्ससाहेबांच्या हातून कांहींएक काम न होतां तो १८३८ त परत आला.

२३४. **तिघांचा मिळून तह**—दोस्त महंमद आपल्या इच्छेनुरूप वागत नाहीं, असें पाहून लार्ड आक्लंड व त्याचे मंत्री ह्यांनीं त्यास पदच्युत करून शहासुजास गादीवर बसविण्याचा निश्चय केला. ह्या शहासुजास बराकझाई टोळीच्य मुख्यांनीं अफगाणिस्थानांतून पुष्कळ वर्षांमागें हांकून लाविलेलें होतें, व ह्या वेळीं तो हिंदुस्थानांत राहत होता. वरील निश्चयाच्या अनुरोधानें हिंदुस्थान सरकारचा सेक्रेटरी मि म्याकनॉटन ह्यानें रणजितसिंग व शहासुजा ह्यांच्यांशीं मिळू तह केला, व त्यामध्यें असें ठरविलें कीं, शहासुजास त्याच पूर्वजांच्या गादीवर पुनः नेऊन बसावावयाचें. हा तह हो आहे, तों इकडे पर्शियन लोक हिरात सोडून मार्गें गेले हो तरी वरील निश्चय तसाच कायम ठेविला.

२३५. **अफगाणिस्थानावर स्वारी**–१४,५०० लोकांची एक जंगी फौज सर जॉन कीन ह्याच्या हाताखालीं बोलनच्या खिंडींतून अफगाणिस्थानांत शिरली, व कांहींएक प्रतिबंध न होतां तिनें १८३९ च्या मे महिन्यांत कंदाहार शहर घेतलें. जूनअखेर हे लोक काबुलास जाण्याकरितां निघाले, व मार्गांत रात्रीचा हल्ला करून त्यांनीं गिझ्नीचा प्रसिद्ध किल्ला हस्तगत केला. आगस्टच्या ७ वीस ते काबुलास जाऊन पोहोंचले; तेथून दोस्तमहंमद आधींच निघून गेलेला होता, ह्मणून त्यांनीं शहासुजास त्याच्या गादीवर स्थापन केलें.

२३६. **अफगाणिस्थानावर ताबा**–ह्या वेळीं असें वाटलें कीं, अफगाणिस्थान जिंकणें व शहासुजास त्याची गादी पुनः मिळवून देणें ह्या गोष्टी उत्तम रीतीनें तडीस गेल्या आहेत. ह्मणून ब्रिटिश फौजेपैकीं बऱ्याच लोकांस हिंदुस्थानांत परत पाठवून दिलें; व शहासुजास आपली गादी संभाळतां यावी, एतदर्थ बंगालच्या सैन्यास काबुलांतच ठेवून दिलें. सारांश, प्रत्येक गोष्टीची व्यवस्था इतक्या शांततेनें झालेली भासली कीं, ब्रिटिश अंमलदारांच्या बायका आपल्या नवऱ्यांबरोबर राहण्याकरितां काबुलास आल्या. १८४० च्या नवंबरांत दोस्तमहंमदानें काबूल येथें आपली तरवार म्याकनॉटनच्या स्वाधीन केली; तेव्हां त्यास राजकीय कैदी या नात्यानें हिंदुस्थानांत पाठवून दिलें. इकडे म्याकनॉटन यास मुंबईचा गव्हर्नर नेमिलें होतें, व त्याच्या मागून बर्न्स ह्यास अफगाणिस्थानांत इंग्लिशांचा वकील नेमिलें होतें. ह्मणून १८४१ च्या पावसाळ्यांत म्याकनॉटन जेव्हां काबुलाहून निघाला,

तेव्हां अफगाणिस्थानांत इतकी शांतता आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय, असें त्यानें बर्न्स ह्याचें अभिनंदन केलें.

२३७. **काबुलांतील दंगा**—पुरीं दोन वर्षेंपर्यंत अफगाणिस्थानावर इंग्लिशांचा ताबा होता, पण १८४१ च्या नवंबरांत कांहीं अफगाण लोकांनीं बर्न्स ह्याचा त्याच्याच बंगल्यावर वध केला; तेव्हां इंग्लिशास तेथपर्यंत जो सुरक्षितपणा वाटत होता त्याचा एकाएकीं भंग झाला. ही गोष्ट घडून आल्याबरोबर बहुतेक सर्वच अफगाण लोक उठले. शहराबाहेर ब्रिटिश लोकांची जी छावणी होती ती आंतील लोकांस स्वसंरक्षण करून राहण्यास सोईची नव्हती; व शिवाय तेथील अधिकारी जनरल एल्फिन्स्टन हा वृद्ध व अशक्त झालेला होता. इकडे हिंवाळ्यांतील बर्फ पडूं लागल्यामुळें जलालाबाद व कंदाहार येथील संरक्षक सैन्यांस काबुलास मदत पाठविण्याची सोय नव्हती. तेव्हां झपाट्यानें अनर्थामागून अनर्थ कोसळूं लागले. लवकरच त्या लोकांची स्थिति इतकी निराशेची झाली कीं, विजयी अफगाण लोकांबरोबर तह करण्याचा त्यांनीं यत्न केला. अफगाण लोकांच्या पुढाऱ्यांबरोबर बोलणें करण्यास म्याकनॉटन गेला; तेव्हां दोस्तमहंमदाचा पुत्र अकबरखान ह्यानें त्यास गोळी घालून ठार मारिलें. असें झालें तेव्हां अफगाण लोकांचें प्रत्येक मागणें बाकीचे लोक कबूल करूं लागले. त्यांनीं सहा तोफा शिल्लक ठेवून बाकीच्या सर्व त्यांस देऊन टाकिल्या, आणि १८४२ च्या जानेवारीच्या ६ व्या तारखेस ब्रिटिश सैन्य आपल्या छावणींतून बाहेर निघालें.

२३८. **ब्रिटिश सैन्याचा संहार**—नंतर तिसऱ्या दिवशीं हें परत निघालेलें सैन्य पुष्कळ बाजारबुणग्यासमवेत खूर्द काबूलच्या खिंडींत येऊन पोहोंचलें. तेव्हां गिलझाई लोक दोन्ही बाजूंच्या कड्यांवरून गोळ्या घालूं लागले, व अशा रीतीनें त्यांनीं त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक ठार केले. शेवटीं १३ व्या तारखेस थोडेच लोक गंडमक येथें जीवंत जाऊन पोहोंचले, तेथें शत्रु व बर्फ यांच्या तडाक्यांतून जे ह्मणून बचावून आले होते त्या सर्वांचा अखेरीस संहार झाला. सर्व फौजेपैकीं डाक्टर ब्रायडन नांवाचा एकच इंग्रज कैद व मरण यांतून निभावला. त्यानें जलालाबादेस सर रॉबर्ट सेल याजकडे या अनर्थापाताचें वर्तमान नेऊन पोंचविलें.

२३९. **सुडाची मोहीम**—काबूलच्या सैन्याचा याप्रमाणें संहार झाल्यावर अफगाण लोकांनीं कंदाहार, जलालाबाद, गिझनी, वगैरे ठिकाणांहून इंग्लिशांस हांकून देण्याचा प्रयत्न केला. पण पहिलीं दोन ठिकाणें अनुक्रमें जनरल सेल व जनरल नॉट ह्यांनीं बरोबर रीतीनें संभाळून धरिलीं; मात्र गिझनी येथील संरक्षणफौज शत्रूस हार गेली. शाहासुजास काबूल येथें एप्रिलच्या ९ व्या तारखेस अफगाण लोकांनीं गोळी घालून ठार केलें. त्या (१८४२) वर्षाच्या आरंभीं लार्ड एलेनबरो हा गव्हर्नर जनरल होऊन आला होता. त्यानें कांहीं दिवस कांकूं करून नंतर ह्या अत्यानंद पावलेल्या शत्रूवर सूड उगविण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें जनरल पॉलॉक खैबरच्या खिंडींतून बळजबरीनें रस्ता काढून जलालाबादेस जाऊन पोहोंचला; तेथें पाहतो तों अकबरखानच्या हाताखालीं अफगाण लोकांनीं त्या

किल्ल्यास घातलेला वेढा जनरल सेल यानें उठवून लाविलेला आहे. तेव्हां आगस्ट महिन्यांत तेथून निघून तो काबुलावर चाल करून गेला, व रस्त्यांत जेथें जेथें अफगाण लोक त्याला आड आले तेथें तेथें त्यानें त्यांस पराजित करून टाकिलें. ह्या ठिकाणीं सप्टंबरच्या १७ वीस जनरल नॉट कंदाहारेहून येऊन त्यास मिळाला. अशा रीतीनें अफगाण लोक आपणांस समरांगणांत विरोध करूं शकत नाहींत असें सिद्ध केल्यावर, हीं विजयी सैन्यें काबूलचा बाजार जाळून टाकून हिंदुस्थानांत परत आलीं. नंतर दोस्त महंमदास काबुलास परत पाठविलें व तेथें त्यानें मरेतोंपर्यंत ( १८६३ ) राज्य केलें. अफगाणिस्थानांत जे लोक व जें द्रव्य गमाविलें होतें त्या सगळ्याचा मुख्य परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानच्या कर्जांत मोठी भर पडली.

२४०. **सिंधप्रांताचा पाडाव**—अफगाण लोकांशीं चालविलेल्या युद्धाचा शेवट झाल्यावर सिंधच्या अमीरांवर विश्वासघाताचा आरोप आणिला; आणि १८४२ च्या सप्टंबर महिन्यांत सर चार्लस नेपियर त्यांच्या वर्तनाबद्दल चौकशी करण्यासाठीं तेथें गेला. त्यानें त्यांस अपराधी ठरविलें, व त्यांस एका तहावर सही करण्यास भाग पाडिलें ( फेब्रुवारी १८४३ ). ही सही झाल्यावर थोड्या दिवसांनीं तेथील रेसिडेंट ह्याजवर त्याच्या राहण्याच्या स्थळीं हल्ला झाला; त्या प्रसंगीं मोठ्या शौर्यानें त्यानें आपला बचाव केला, व तेथून निसटण्यास त्याला फार प्रयास पडले. हें वर्तमान ऐकून बळजबरीच्या हल्ल्याबद्दल सूड घेण्यासाठीं नेपियरसाहेब २,००० सैन्यानिशीं लागलाच

निघाला; व हैदराबादेनजीक मियानी येथें अमीरांच्या २०,००० फौजेवर तेवढ्या लोकांनिशीं त्यानें तेजस्वी जय मिळविला. नंतर हैदराबाद हस्तगत झालें, व दाभा ह्या ठिकाणीं आणखी जय मिळविल्यामुळें तो सर्व देश हातीं आला. तेव्हांपासून सिंधप्रांत मुंबईइलाख्याचा एक भाग बनून राहिला आहे; व तेथें नेहमीं शांतता असून त्याची सारखी भरभराट होत गेली आहे.

२४१. **ग्वाल्हेरची हालहवाल**—१८४३ च्या प्रारंभीं ग्वाल्हेरच्या राज्यांत दंगे उद्भवले, व तेथील सैन्याची संख्या ४०,००० असून तें कवाईत वगैरे चांगलें शिकलें असल्या-मुळें कदाचित् शीक लोकांशीं मिळून इंग्लिशांवर उठेल अशी भीति उत्पन्न झाली. सामोपचारानें त्या गोष्टीचा बंदोबस्त करणें शक्य नाहीं असें पाहून लार्ड एलेनबरो, सर ह्यू गॉफ् ह्याच्या हाताखालीं ८,००० फौज देऊन दिजंबर महिन्यांत ग्वाल्हेरवर चालून गेला. नंतर महाराज-पूर मुक्कामीं लढाई होऊन तींत मराठा सैन्यानें मोठ्या निकरानें प्रतिरोध केला, तरी त्याचा अखेरीस पराजय झाला. नंतर लार्ड एलेनबरो यास ग्वाल्हेरची स्वेच्छेप्रमाणें व्यवस्था करतां आली. तेथील सैन्य कमी करून तें ९,००० वर आणिलें; आणि सब्सिडियरी पद्धतीच्या अन्वयें शिंद्यानें इंग्लिशांचें १०,००० सैन्य ठेवून त्यांच्या खर्चासाठीं आपल्या राज्याचा एक भाग लावून दिला.

२४२. **एलेनबरोच्या मागून हार्डिंग गव्हर्नर जनरल होतो**—लार्ड एलेनबरो ह्यास १८४४ च्या एप्रि-लांत परत बोलाविलें. व त्यांच्या मागून त्याचा मेहुणा सर हेन्री हार्डिंग ह्याची नेमणूक केली. हा नवा गव्ह-

नेर.जनरल तांबड्या समुद्राच्या रस्त्यानें आला पी. अॅण्ड ओ. कंपनीच्या आगबोटी विलायतची डांक घेऊन ह्या मार्गानें आदल्याच वर्षापासून येऊं लागल्या होत्या.

२४३. **पंजाबांतील अव्यवस्था**—रणजितसिंग १८३९ त मरण पावला; तेव्हांपासून पंजाबांत सारखी अव्यवस्था चालू होती. राज्यांतील मुख्य सत्ता तेथील मोठ्या फौजेच्या हातीं असून तिला 'दल खालसा' किंवा 'देव व राष्ट्र ह्यांची सेना' असें नांव असे, व तिचें लष्करी शिक्षण व धर्मोत्सुक्य हीं इंग्लंदांतील प्रसिद्ध ऑलिव्हर क्रॉमवेल ह्याचे जे 'आयर्न साइड्स' (लोहकुक्षी) नामक शिपाई त्यांच्यासारखीं होतीं. ही जी अत्यन्त बलिष्ठ फौज तिची लाहोरच्या दरबाराला नेहमीं भीति वाटे. ह्मणून तेथील अर्भक राजा जो धुलीपसिंग त्याच्या आईनें १८४५ च्या दिजंबरांत तीस सतलजनदी उतरून ब्रिटिश मुलखावर स्वारी करण्यास लाविलें. तेव्हां अर्थात् इंग्लिशांचें व त्यांचें युद्ध सुरू झालें.

२४४. **मुडकी व फिरोजशाह**—ह्या युद्धांतील पहिली लढाई दिजंबरच्या १८ वीस मुडकी एथें झाली. त्या ठिकाणीं शीक लोकांचा सेनापति लालसिंग ह्यानें २०,००० शीक फौजसहित सर ह्यू गॉफ् ह्याजवर हल्ला केला. त्याजपाशीं ११,००० लोक असून ते अंबाल्याहून सगळा दिवस चालून आलेले असल्यामुळें थकून गेलेले होते. लढाई सुरू होऊन रात्रीचा काळोख पडला तरी ती चालूच होती; अखेरीस शीक लोकांस इंग्लिशांनीं त्यांच्या स्थानापासून हांकून लाविलें. नंतर २१ व्या तारखेस गॉफ्साहेब फिरोजशाह एथें शीक लोकांची मोठी छावणी होती

तिजवर हल्ला करण्यास निघाला. शीक लोकांच्या तोफांच्या माऱ्याखालीं काळी फौज प्रथम कचरूं लागली, व नंतर पळून गेली. गोरीं रेजिमेंटें देखील बहुतेक मागें हटल्यासारखीं झालीं. पण सरतेशेवटीं त्यांनीं जोर करून शत्रूच्या छावणींत प्रवेश केला; व तेथें तें व शीक लोक दोघेहि रात्रींच्यारात्रीं तसेच राहिले. सकाळीं लढाई पुनः सुरू झाली, व तींत त्यांनीं शीक लोकांस बाहेर हांकून लाविलें. हा जय मिळविण्याच्या कामीं इंग्लिशांचे एकंदर २,४१५ लोक मेले व जखमी झाले.

२४५. **युद्धाचा शेवट**–१८४६ च्या जानेवारीच्या अखेरीस शीक लोक पुनः लढाई करण्यास तयार झाले. त्यांच्या सैन्यांपैकीं १९,००० लोकांच्या एका सैन्याला सर हेन्री स्मिथ ह्यानें अलिवाल एथें गांठिलें, व सतलजनदींत हांकून लाविलें. नंतर ह्या युद्धाचा निकाल करणारी लढाई सोब्रान येथें झाली. तेथील शीक लोकांच्या छावणीचें संरक्षण करण्यास ३०,००० शूर शिपाई व ७० तोफा होत्या; तरी इंग्लिश फौजेनें आपल्या बागूनेटांच्या जोरावर तिजवर छापा घालून त्यांचा पराजय केला. ह्या लढाईंत शीक सैन्यापैकीं सरासरी ८,००० लोक ठार झाले, व त्यांस इंग्लिशांना हार जाणें भाग पडलें.

२४६. **लाहोरचा तह (१८४६)**–नंतर १८४६ च्या मार्च महिन्यांत लाहोर एथें तह होऊन त्याच्या अन्वयें शीक लोकांस सतलजनदीच्या पूर्वेचा सर्व मुलूख इंग्लिशांस देणें भाग पडलें. शीक सरदार गुलाबसिंग ह्यानें लढाईचा खर्च भरून देण्याच्या कामीं १०,००० पौंडांची मदत केल्यामुळें त्याबद्दल त्यास काश्मीरप्रांत दिला. शीक सैन्य

कमी करून बत्तीस हजारांवर आणिलें, व तोंपर्यंत इंग्लिशांचें एक संरक्षक सैन्य लाहोर एथें ठेविलें.

२४७. **हार्डिंगच्या मागून डलहौसी येतो**--येणे-प्रमाणें हार्डिंग यानें शांतता व संग्राम या दोन्ही गोष्टींत आपली हुशारी गाजवून १८४८ च्या प्रारंभीं हिंदुस्थान सोडिलें. त्याच्या मागून लार्ड डलहौसी हा गव्हर्नर जनरल होऊन आला. त्या वेळीं त्याचें वय केवळ ३६ वर्षांचें होतें.

२४८. **शीक लोकांशीं दुसरें युद्ध व मुलतानचा वेढा**—एप्रिलच्या १८ व्या तारखेस मुलतान मुक्कामीं मि. व्हान्स आग्न्यू व लेफ्टेनंट अण्डर्सन ह्यांचा वध झाला, व तेणेंकरून पंजाबांतील शांततेचा भंग झाला. हे खून होण्यास मुलतानचा सुभेदार मूळराज याचें विश्वासघाताचें वर्तन कारण झालेलें होतें. ह्मणून लेफ्टेनंट एड्वर्ड्स ह्यानें इकडचे तिकडचे कांहीं लोक जमा करून त्यांच्या साह्यानें मूळराजास मुलतानच्या किल्ल्यांत पळवून लाविलें. नंतर सप्टंबरच्या प्रारंभीं मुलतान स्वाधीन करण्यास जनरल व्हिश ह्यानें मूळराजास हुकूम केला; परंतु १८४९ च्या जानेवारीपर्यंत तें हातीं आलें नाहीं.

२४९. **चिलियनवाला व गुजराथ**—इकडे सर्व पंजाबप्रांत इंग्लिशांवर उठला होता. शीक लोकांनीं अफगाण लोकांस पेशावरप्रांत परत देण्याचें अभिवचन देऊन त्यांची मदत मिळविली. शिकंदर बादशहानें पोरस ह्याजवर ज्या ठिकाणीं पूर्वीं जय मिळविला होता, त्याच्या जवळच चिलियनवाला येथें पहिली मोठी लढाई झाली. ह्या ठिकाणीं १८४९ च्या जानेवारीच्या १३ व्या तारखेस दोन प्रहरीं गॉफ् ह्याला शेरसिंगाच्या हाताखालीं शीक लोकांचें सैन्य लढाईस सज्ज झालेलें आढळून आलें. पुष्कळ

मैल चालून आल्यामुळें इंग्लिशांचें सैन्य जरी दमून गेलेलें होतें, तरी रात्र होईतोंपर्यंत कडाक्यानें लढून त्यानें शीक फौजेचा पराभव केला, व ती फौज व्यवस्थेनें झेलमनदीपर्यंत मागें हटली. त्या युद्धाचा निकाल लावणारी लढाई म्हटली म्हणजे, चिनाबनदीवर गुजराथ नांवाच्या एका खेड्यानजीक झाली. त्या ठिकाणीं शीक व त्यांचे स्नेही अफगाण लोक ह्या दोघांचे मिळून ६०,००० शिपाई छावणी करून राहिलेले होते. ह्या प्रसंगीं शीक लोकांच्या पायदळाची दाणादाण करून त्यांस समरांगणांतून हांकून लाविलें, व त्यांचे मागें ब्रिटिश स्वार लागले.

२६०. **पंजाबची अखेरची व्यवस्था**—ह्या मोठ्या जयानें प्रस्तुत युद्धाचा निकाल लागला. खालसाची फौज सरतेशेवटीं जेरीस आली. सर्व पंजाबप्रांत ब्रिटिश राज्यास जोडून टाकिला. धुलीपसिंगास ५ लाखांचें पेन्शन दिलें; तें घेऊन तो इंग्लंदांत गेला व तेथें शहराबाहेर खेडेगांवांतून राहणाऱ्या सभ्य गृहस्थाच्या धर्तीवर राहूं लागला. जॉन लॉरेन्स व हेन्री लॉरेन्स ह्यांच्या शहाणपणाच्या कारभारामुळें पंजाबप्रांतांत व्यवस्था व भरभराट हीं पूर्ववत् दिसूं लागलीं, व हिंदुस्थानांतील एकंदर ब्रिटिश राज्यामध्यें जे अत्यन्त राजनिष्ठ व अत्यन्त भरभराटीचे प्रांत आहेत त्यांमध्यें ह्याची गणना होऊं लागली.

२६१. **ब्रह्मदेशाशीं दुसरें युद्ध**—ब्रह्मी राजानें रंगून येथील ब्रिटिश व्यापाऱ्यांचें नुकसान केल्यावरून, १८५१ सालीं त्या देशाशीं युद्ध सुरू झालें. तेथील पहिल्या युद्धाइतका ह्या युद्धांत त्रास झाला नाहीं. रंगुनांतील तटबंदीचें मोठें देवालय एप्रिलांत हातीं आलें; व आक्टोबरांत

प्रोम ताब्यांत आलें. इतकें केल्यावर देखील जरी ब्रह्मी राजा शरण आला नाहीं, तरी त्या देशांतील अंतर्भागांत ज्यास्त शिरावयाचें नाहीं असा इंग्लिशांनीं निश्चय केला. पण पेगूप्रांत त्याच्याजवळून त्यांनीं घेतला, व हें पाहून तेथील बहुतेक रहिवाशांस आनंद झाला. तेव्हांपासून ब्रिटिश अमलाखालीं तेथील लोकांची भरभराट होत आहे.

२५२. **सातारा खालसा होतो**—१८४८ त साताऱ्याचा राजा मरण पावला; त्यास औरस पुत्र नव्हता. मरतेसमयीं त्यानें एका दूरच्या नातलगास ब्रिटिश सरकारच्या संमतीशिवाय मांडीवर घेतलें होतें; पण त्यास डलहौसीसाहेबानें गादीवर बसूं दिलें नाहीं, व तो प्रांत ब्रिटिश राज्यास जोडून टाकिला.

२५३. **हैदराबाद येथील हालहवाल**—हैदराबादच्या राज्यास ब्रिटिश सरकारचें फारच देणें झालें होतें. हें कर्ज फेडण्यासाठीं निजामानें १८५३ त एक तह करून दिला. ह्या तहान्वयें त्यानें वऱ्हाड व इतर प्रांत ब्रिटिश सरकारास लावून दिले; व असें ठरविलें कीं त्या सरकारानें त्या मुलखाच्या वसुलांतून हैदराबादच्या संरक्षणार्थ ठेविलेल्या ब्रिटिश फौजेचा खर्च घ्यावा, व बाकी वसूल राहील तो निजामाच्या हवालीं करावा. हा तह झाल्यावर थोड्याच दिवसांनीं तरुण पण हुशार असा जो सालरजंग तो निजामाचा प्रधान झाला, व त्याच्या कारकीर्दींत तें संस्थान पुनः भरभराटीस येऊं लागलें.

२५४. **बाजीरावाचा मृत्यु**—आपल्यामागें आपला दत्तक पुत्र यास वारस ह्मणून ठेवून १८५३ त शेवटचा पेशवा मरण पावला. हाच दत्तक पुत्र पुढें नानासाहेब

या नांवानें कुप्रसिद्धीस आला. बाजीरावाच्या मागून त्याची खाजगी दौलत व ब्रह्मावर्तांचें लहानसें संस्थान हीं त्यास प्राप्त झालीं. पण एवढ्यानें तृप्त न होऊन, बाजीराव हस्तगत झाला तेव्हां त्यास जें ८ लाखांचें पेन्शन दिलें होतें तें तो मागूं लागला. पण त्याचें हें मागणें ब्रिटिश सरकारानें कबूल केलें नाहीं. त्यामुळें त्याच्या मनांत असंतोष उत्पन्न होऊन त्यापासून पुढें भयंकर परिणाम उद्भवते झाले.

**२५५. झांशी, नागपूर व अयोध्या हीं खालसा होतात**—१८५३ सालीं झांशी व नागपूर एथीलहि राजे मरण पावले. नागपूरच्या राजास संतान नसल्यामुळें, व त्यानें दत्तक पुत्र घेण्याचें नाकारिल्यामुळें, त्या संस्थानचा विस्तीर्ण मुलूख ब्रिटिश राज्यांत सामील केला. झांशीच्या राजानें मरणापूर्वीं जरी आपल्या नातलगांपैकीं एकास दत्तक घेतलें होतें, तरी तेंहि राज्य खालसा केलें. अखेरीस १८५६ च्या फेब्रुवारींत अयोध्येचेंहि समृद्धराज्य खालसा केलें; कारण तेथील राहिवाशांस जो जुलूम सोसावा लागत होता त्यांतून त्यांस मुक्त करण्यास एवढाच मार्ग उरलेला होता.

**२५६. डलहौसीची राज्यांतील अंतर्व्यवस्था ठेवण्याची नीति**—अयोध्यासंस्थान खालसा केल्याचा जाहीरनामा काढिल्यानंतर थोड्या आठवड्यांनीं डलहौसीनें हिंदुस्थानांतून प्रयाण केलें; कारण फारच श्रम केल्यामुळें तो अगदीं थकून गेला होता. इंग्रजी शाळा, देशी शाळा, इलाख्यांतील मुख्य ठिकाणच्या पाठशाळा, इत्यादि सरकारी विद्याखात्याची जी व्यवस्था हल्लीं आपण पाहतों,

तिची स्थापना डलहौसीच्या कारकीर्दीत प्रथम झाली. तद्वतच पंजाबांत कालवे बांधून पाणी पुरवण्याची व्यवस्था तेव्हांच अमलांत आली; व एकंदर जगांतील मोठ्या काल-व्यांमध्यें गणला जाणारा असा जो गंगानदीचा कालवा तोहि ह्याच्याच कारकीर्दीत पुरा झाला. शिवाय ह्याच्या अमदानींत मोठमोठाले रस्ते तयार झाले, व आगगाडी आणि तारायंत्र हीं हिंदुस्थानांत प्रथम आलीं.

२५७. **पर्शियाशीं युद्ध**–डलहौसीच्या मागून १८५६ सालीं लॉर्ड क्यानिंग हा गव्हर्नर जनरल होऊन आला. त्याच्या आदल्या वर्षीं ब्रिटिश सरकारच्या वकिलाचा तेहेरान एथें अपमान झाला होता, व या सालीं इराणच्या राजानें दिलेलें वचन मोडून हिरात शहर घेतलें होतें. ह्या कारणांवरून मुंबईहून ६,००० लोकांची एक फौज इराणच्या अखातांत गेली, व तिनें बुशायर बंदर काबीज केलें. १८५७ च्या जानेवारींत औट्रम यानें खुशाब या स्थळीं एका इराणी फौजेचा पराजय केला. तेव्हां पुढें मार्च महिन्यांत इराणचा शाह हार आला, व ब्रिटिश व्यापाराचें संरक्षण करण्यास व हिरात शहर सोडून देण्यास कबूल झाला.

---

## भाग ८ वा.

### फौजेचें मोठें बंड.

२५८. **फौजेच्या मोठ्या बंडाचीं कारणें**–हें मोठें बंड होण्यास अनेक कारणें एकत्र झालीं. अफगाणिस्थानांत जो मोठा अनर्थ ओढवला तेणेंकरून, ब्रिटिश लोक दैववान् आहेत असा जो काळ्या फौजेस आजपावतों विश्वास होता, तो डळमळीत झाला. पंजाब व सिंध हे

प्रांत जेव्हां खालसा केले, तेव्हां ह्या दूरच्या प्रांतांत ज्यास्त पगार न मिळतां आपणांस नोकरी करावी लागते, याबद्दल त्या फौजेस फार राग आला. शिवाय राज्यें खालसा करण्याची जी डलहौसीची राजनीति तिच्या योगानें ज्या एतद्देशीय राजांचीं राज्यें गेलीं होतीं, ते एखाद्या बंडांत प्रमुखत्व पत्करण्यास तयार होते. आगगाडी व तारयंत्र हीं हिंदुस्थानांत सुरू झाल्यामुळें, व १८५७ सालीं, ह्मणजे प्लासीच्या लढाईनंतर बरोबर एका शतकानें, ब्रिटिश राज्य लयास जाणार असें भविष्य केलें होतें त्यामुळें, लोकांचीं मनें अस्वस्थ झालीं होतीं. शिवाय, रशियाशीं युद्ध चाललेलें असल्यामुळें हिंदुस्थानांतील ब्रिटिश रेजिमेंटांची संख्या कमी झालेली होती. ह्मणजे, २,३०,००० काळ्या शिपायांशीं टक्कर देण्यास हिंदुस्थानांत त्या वेळीं काय ते ३०,००० गोरे सोजीर होते.

२५९. **मिरत व दिल्ली**—ह्या बंडाचा उद्भव होण्यास अखेरीस जें कारण झालें तें एन्फीट्ड नामक नव्या बंदुका हिंदुस्थानांत वापरण्यास आणिल्या हें होय. कारण ह्या बंदुकांच्या काडतुसांस गाई व डुकरें ह्यांची चरबी लावलेली आहे, अशी कल्पना झाली होती. ह्मणून हिंदु व मुसलमान शिपायांस जेव्हां हीं काडतुसें दातांनीं तोडणें भाग पडूं लागलें, तेव्हां त्यांस असें वाटलें कीं, आपल्या इंग्रज सरकारची इच्छा आपणांस भ्रष्ट करून ख्रिस्ती होण्यास लावावें अशी आहे. प्रथम १८५७ च्या मे महिन्याच्या १० व्या तारखेस मिरत मुक्कामीं तीन काळ्या रेजिमेंटांनीं उठून आपल्या वरिष्ठ अंमलदारांपैकीं कांहींस व जे जे यूरोपियन भेटले त्या सर्वांस ठार केलें. नंतर तें शहर

लुटून फस्त करून, व तेथील तुरुंग फोडून खुला करून टाकून, ते दिल्लीस निघून गेले. त्या ठिकाणीं तेथील तीन काळीं रेजिमेंटें त्यांस येऊन मिळालीं. नंतर ह्या सगळ्या बंडवाल्यांनीं तेथील वृद्ध मोंगल बादशाहाचें मन वळवून त्याच्याकडून आपल्या वाड्यावर बंडाचें निशाण उभें करविलें. नंतर त्यांनीं दिल्लींतील बहुतेक यूरोपियनांचे खून पाडिले. शिवाय, तेथील लढाईची सामग्री ठेवण्याची जागा त्यांच्या हातीं जाऊं नये ह्मणून त्याजवरील रखवालदार फौजेनें मोठ्या शौर्यानें यत्न केला; पण तो फुकट गेला. अशा रीतीनें दिल्लीशहर लढाईच्या सर्व सामग्रीसहित बंडवाल्यांच्या हातीं आलें.

२६०. **बंडाचा फैलाव**—अशा प्रकारचे दंगे बंगाल्यांत सर्वत्र झाले. बंगालच्या पायदळाचीं एकंदर चोवीस रेजिमेंटें होतीं, त्यांपैकीं सहा काय तीं राजनिष्ठ राहिलीं. कानपुरास नानासाहेबानें बंडवाल्या शिपायांचें पुढारीपण स्वतः पत्करिलें, व सभोंवतीं एक निर्बल असा खंदक खणून मध्यें चारशें गोरे शिपाई आपलें संरक्षण करीत होते, त्यांस वेढा घातला. दुसरी एक अशीच रखवालदार फौज लखनौच्या रेसिडेन्सींत वेढली गेली. दक्षिण हिंदुस्थानांत मद्रासची फौज राजनिष्ठ राहिली, व मुंबई आणि पंजाब ह्या दोन इलाख्यांत इंग्लिश सरकारचा अधिकार कायम राहिला.

२६१. **दिल्लीचा वेढा**—इंग्लिशांनीं बंडवाल्यांस दिल्लीवर आपला निर्विवाद ताबा फार वेळपर्यंत चालवूं दिला नाहीं. जूनच्या ८ व्या तारखेस एका लहानशा ब्रिटिश फौजेनें दिल्लीसमोरच्या उंचवट्यावर जाऊन बैठक मारिली. ह्या फौजेंत जॉन

कॉरेन्स यानें पंजाबांतून पाठविलेल्या फौजेची भर पडली, व अशा रीतीनें तिची संख्या वाढली; व शिवाय आगस्टच्या १४ वीस जनरल निकल्सन २,५०० लोकांसहित तेथें येऊन दाखल झाला. पुढें सप्टेंबरच्या ६ वीस मोठाल्या तोफा येऊन पोहोंचल्या, आणि नंतर त्याच महिन्याच्या १४ वीस ८,००० लोकांनीं ज्याच्या रक्षणास ३०,००० फौज सज्ज आहे अशा त्या मोठ्या शहराच्या भिंतींवर छापा घातला. पुढें इंग्लिश फौजेनें शहरांत प्रवेश केला; तरी त्यांतील रस्त्यांतून सहा दिवस लढणें चाललेंच होतें. पण अशा रीतीनें इंग्लिशांनीं जो हा मोठा बाहुपराक्रम केला, त्यांत त्यांचे वेढा घातला त्या दिवसापासून आतांपर्यंत सरासरी चार हजार लोक गमावले; त्यांजमध्यें रणशूर निकल्सन हा एक होता. तो दिल्लीच्या रस्त्यांतून आपल्या शिपायांस उत्तेजन देत असतां गोळी लागून ठार झाला. इकडे बादशहास क्याप्टिन हॉड्सन ह्यानें सप्टेंबरच्या २१ वीस पकडलें; व दुसऱ्या दिवशीं त्याच्या दोन मुलांस घेऊन तो चालला असतां त्याच्या सभोंवतीं गर्दी जमली; ती कदाचित् त्यांस सोडविण्याचा प्रयत्न करील अशी त्यास भीति उत्पन्न होऊन त्यानें आपल्या हातानें गोळी घालून त्या दोघांस ठार केलें.

२६२. **कानपूर व लखनौ**—इकडे ह्यवलॉकसाहेब कानपूर व लखनौ येथील संरक्षकफौजांचा बचाव करण्याची खटपट करीत होता. तो जसजसा पुढें चालून गेला, तसतशा त्यानें पुष्कळ लढाया जिंकल्या; पण त्याजपाशीं लोक फार थोडे होते, व त्यांस उन्हापासून भयंकर बाधा झाली. पुढें जुलईच्या १६ वीस तो कानपुरास जाऊन पोहोंचला; पण कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण

तेथील संरक्षकफौज जून महिना संपण्याच्या पूर्वीच शरण गेली होती, व नानासाहेबाच्या हुकमावरून तिची कत्तलहि उडून गेली होती. हावलॉकसाहेबानें जाऊन कानपुर घेतलें, त्याच्या आदल्या दिवशींच इंग्लिश स्त्रियांस व मुलांस क्रूर रीतीनें कापून काढिलें होतें. ह्मणून ह्या गोष्टीचा भयंकर रीतीनें सूड उगवून मग हावलॉकसाहेब लखनौकडे चालता झाला. पुढें सप्टंबरची २५ वी तारीख येऊन पोहोंचली; तेव्हां त्याचें सैन्य लखनौच्या रस्त्यांतून लढत जाऊन मार्ग काढून, अगदीं चेपून गेलेल्या तेथील रखवालदार फौजेस एकदांचें जाऊन मिळालें.

**२६३. लखनौची दुसऱ्यानें सुटका**—१८५७ च्या आगस्टांत सर कॉलिन क्यांबेल हा सेनेचा मुख्य अधिपति होऊन हिंदुस्थानांत आला. नवंबरच्या १७ वीस त्यानें बंडवाल्यांचा लखनौ येथें पराजय करून रेसिडेन्सींत प्रवेश केला. तेव्हां ४॥ महिनेपर्यंत सारखा पडलेला मोठा वेढा अखेरीस उठला. नंतर तेथील संरक्षकफौजेस व ज्या बायकांमुलांचें तिनें इतके दिवस इतक्या चांगल्या रीतीनें संरक्षण केलें होतें त्यांस, दोघांसहि तेथून काढून दुसरीकडे नेलें. नंतर सर जेम्स औट्रम यास अलमबागेंत ठेवून, सेनाधिपति परतून जनरल विंडहाम याचा बचाव करण्यासाठीं कानपुरास अगदीं वेळेवर येऊन पोहोंचला; कारण नानासाहेबाचा सेनापति तात्या टोपे ह्यानें त्याचा तेथें पराभव करून टाकून त्यास मोठ्या संकटांत घातलें होतें.

**२६४. लखनौचा अखेरचा पाडाव**—१८५८ च्या मार्चांत सर कॉलिन क्यांबेल ह्यानें ३१,००० शिपाई व १८० तोफा एवढें बलिष्ठ सैन्य बरोबर घेऊन लखनौवर

जाऊन तात्या टोपे व झांशीची राणी ह्यांस ग्वाल्हेरींत घेतलें. तें पाहून सर ह्यू रोज ह्यानें एकदम ग्वाल्हेरीवर हल्ला केला, व तो किल्ला जूनच्या २० वीस हातीं आला. झांशीची राणी किल्ल्यासमोर घोडेस्वारांनीं चाल केली असतां त्यांत ठार झाली. तात्या टोपे कांहीं वेळपर्यंत बचावला; पण शेवटीं त्यास पकडिलें, व कानपुरच्या कत्तलींत त्याचें अंग होतें म्हणून त्याबद्दल त्यास फांशीं दिलें. त्याचा यजमान नानासाहेब ह्याचें अखेरीस काय झालें, हें निश्चितपणें समजलेलें नाहीं, पण तो नेपाळच्या जंगलांत मरून गेला असावा असें दिसतें.

---

## भाग ९ वा.

## गादीकडून हिंदुस्थानचा राज्यकारभार.

२६६. **हिंदुस्थानची व्यवस्था**–१८५९ च्या जूनच्या सुमारास हिंदुस्थानांत पुनः शांतता झाली. त्याच्या अगोदरच्या वर्षी हिंदुस्थानचा राज्यकारभार कंपनीकडून काढून गादीकडे घेतला होता. राणीचा हिंदुस्थानांतील पहिला प्रतिनिधि लॉर्ड क्यानिंग ह्यानें काढिलेल्या एका गंभीर जाहिरनाम्याच्या द्वारा, "हिंदुस्थानच्या जुन्या हक्कांस, चालींस व रूढींस" पूर्ण मान देण्याचें, आणि जात किंवा धर्म हा भेद न करतां, "ज्या सरकारी हुद्यांचीं कामें करण्यास शिक्षणानें, सामर्थ्यानें, व प्रामाणिकपणानें" एतद्देशीय लोक पात्र झालेले असतील त्या हुद्यांवर त्या सर्वांस येऊं देण्याचें, राणीनें अभिवचन दिलें. या वेळींच कंपनीची या देशांत

जी स्थानिक फौज होती तीस फांटा दिला. बंडाच्या वेळीं पुष्कळ एतद्देशीय राजे इमानानें वागले होते, त्या सर्वांस मानाच्या पदव्या व मुलखाच्या देणग्या मोकळ्या हातानें देण्यांत आल्या. हैदराबाद संस्थानास सालरजंगानें ह्या भयंकर वेळीं चांगल्या रीतीनें संभाळून ठेविलें होतें, ह्मणून वऱ्हाड खेरीजकरून १८५३ त त्या संस्थानानें लावून दिलेला सर्व मुलूख त्याचा त्यास परत दिला, व ब्रिटिश सरकारचें जें देणें अद्यापि त्यानें द्यावयाचें राहिलें होतें तें त्यास माफ केलें. अशाच प्रकारचीं इनामें शिंदे, नेपाळचा राजा, व इतर संस्थानिक ह्यांस दिलीं. दत्तकाचा हक्क कबूल केल्यामुळें हिंदुस्थानांतील एकंदर राजांस फार संतोष झाला; कारण औरस पुत्र नसतां आपण मेलों तर आपलीं राज्यें खालसा होतील ही जी त्यांची भीति ती यामुळें नाहींशी झाली. पुनः व्यवस्थितपणा स्थापन करण्याचें काम जलद रीतीनें चाललें, आणि लॉर्ड क्यानिंग ह्यानें १८६२ त हिंदुस्थान सोडिलें त्यापूर्वी रस्ते, आगगाडीचे मार्ग, व कालवे हें बांधण्याचें काम पुनः जारीनें सुरू झालेलें होतें.

२६७. **लॉर्ड एल्गिन**—क्यानिंगच्या मागून लॉर्ड एल्गिन हा आला, पण तो १८६३ च्या नवंबरांत मरण पावला. त्याच्या कारकीर्दींत अफगाणिस्थानच्या सीमेवर कांहीं डोंगरी लोकांच्या टोळ्यांशीं एक ल्हानसें त्रासदायक युद्ध झालें. जनरल चेंबरलेन ह्यास त्यांजवर पाठविलें; पण त्याच्या सैन्यावर अंबेला नामक खिंडींत असा कांहीं दांडगा हल्ला झाला कीं, त्याचा संहारच होतो कीं काय अशी मोठी भीति उत्पन्न झाली. नंतर

फडाक्याच्या लढाया होऊन त्या डोंगरी लोकांचें बळ कमी झालें, व त्यांचें मुख्य शहर माल्का हें हातीं आलें.

२६८. **सर जॉन लॉरेन्स**—ह्याची लॉर्ड एल्गिनच्या मागून नेमणूक केली होती. तो १८६४ च्या प्रारंभीं कलकत्त्यास येऊन पोहोंचला. पंजाबांत चीफ् कमिशनर ह्या हुद्यावर असतां दिल्लीच्या वेढ्यास कुमक सैन्य पाठवून त्यानें सुंदर कामगिरी बजाविली होती. आतां राणीचा प्रतिनिधि या नात्यानें काम करीत असतां, त्यानें मोठ्या अक्लेनें वागून, व लोकांच्या कल्याणाकडे मनःपूर्वक लक्ष्य पोहोंचवून आपणास प्रसिद्ध करून घेतलें. परराष्ट्रव्यवहाराच्या संबंधानें पाहतां, त्याच्या प्रस्तुत कारकीर्दींतील मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे भूतानच्या राज्याशीं लढाई ही होय. त्या युद्धांत ब्रिटिश सैन्याचा पराजय झाला, व दोन तोफा गेल्या. दोस्त महंमदाच्या मरणानंतर शेरअलीनें रिकाम्या झालेल्या गादीवर हक्क सांगणाऱ्या इतर प्रतिस्पर्ध्यांस जेव्हां जिंकून टाकिलें, तेव्हां लॉरेन्स ह्यानें त्यास अफगाणिस्थानच्या गादीवर ज्यास्त बळकट रीतीनें बसतां यावें एतदर्थ स्नेहभावानें मदत केली.

२६९. **ओरिसाप्रांतांतील दुष्काळ**—१८६५ त पाऊस कमी पडल्यामुळें, व १८६६ त अतिवृष्टि होऊन पूर आल्यामुळें; ओरिसाप्रांतांत मोठा दुष्काळ पडला. ह्या दुष्काळांत हाल सोसणाऱ्या लोकांच्या दुःखनिवारणार्थ धान्य पाठवून देण्यास रस्त्यांच्या उणीवांमुळें अत्यन्त अडचण पडली. पण ह्या अनर्थापातामुळें, हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतून दळणवळणाचीं जीं साधनें त्यांत सुधारणा करणें किती अवश्य आहे, तें दिसून आलें.

कारण अशीं साधनें असल्यास एका प्रांतांत दुष्काळ पडला व इतर प्रांतांतून ज्यास्त विपुल पीक आलेलें असलें, तर तेथून त्यास धान्याचा पुरवठा करतां येतो.

२७०. **लॉर्ड मेयो व शेरअल्ली**–जॉन लॉरेन्स ह्याची हिंदुस्थानांतील सन्मान्य कारकीर्द १८६९ च्या जानेवारींत खलास झाली; कारण त्या वेळीं त्यानें हिंदुस्थानच्या राज्याचें काम लॉर्ड मेयो ह्याच्या हवालीं केलें. राणीचा हा नवा प्रतिनिधि अगदीं तरुण होता, व त्याच्या अंगीं काम करण्याची कुवत पूर्ण भरलेली होती. अफगाण लोकांचा स्नेह संपादण्याकरितां त्यानें अमीर शेरअल्ली यास या देशीं बोलाविलें, व अंबालामुक्कामीं त्याचें मोठ्या थाटानें आगतस्वागत केलें. या भेटीपासून असा फायदा झाला कीं, तेंव्हांपासून शेरअल्ली इंग्लिशांशीं ज्यास्त स्नेहबुद्धीनें वागूं लागला. नंतर लवकरच रशियन लोकांनीं असें वचन दिलें कीं, आह्मी अफगाणिस्थानच्या कारभारांत हात घालणार नाहीं. येणेंकरून शेरअल्लीस फार समाधान वाटलें; कारण ते लोक आपल्या देशावर कदाचित् हल्ला करितील अशी त्यास भीति होती.

२७१. **जमाबंदीच्या बाबतींत सुधारणा**–लॉर्ड लॉरेन्स याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानचें कर्ज बरेंच वाढलें होतें. ह्मणून लॉर्ड मेयोनें खर्च कमी केला, आणि मिठावरील कर वाढवून व प्राप्तीवर नवाच कर बसवून, जमा वाढविली. पण प्राप्तीवरील कर यूरोपियन लोक व एतद्देशीय लोक ह्या दोघांसहि आवडला नाहीं; व मरावयाच्या पूर्वीं लॉर्ड मेयोनें तो कर काढून टाकण्याचा आपला संकल्प व्यक्त केला होता.

**२७२. लॉर्ड मेयोच्या कारकीर्दीचा शेवट**— १८७२ च्या जानेवारींत आंदमानबेटांतील गुन्हेगार लोकांची वसाहत पाहण्याकरितां लॉर्ड मेयो कलकत्त्याहून तेथें गेला. ती पाहून सूर्यास्ताचे समयीं आगबोटीकडे तो परत येत असतां, एक पठाण मागून त्याच्या अंगावर चालून आला, व त्यानें त्यास पाठींत भोसकिलें. तेणेंकरून तो मरण पावला. लॉर्ड मेयोच्या मरणाची वार्ता ऐकून त्याच्या देशबांधवांसच केवळ नव्हे, तर हिंदुस्थानांतील राजांस व इतर लोकांस देखील मनापासून वाईट वाटलें; कारण त्यांच्यापैकीं पुष्कळ जण ह्या लोकप्रिय राजप्रतिनिधीस आपला खासगी मित्र म्हणून मानीत असत.

**२७३. लॉर्ड नॉर्थब्रूक व बंगाल्यांतील दुष्काळ**— लॉर्ड मेयोच्या मागून लॉर्ड नॉर्थब्रूक हा आला; तो १८७२ च्या मे महिन्यांत कलकत्त्यास येऊन पोहोंचला. त्यानें हिंदुस्थानच्या जमाबंदीची व्यवस्था अशी कांहीं ठेविली कीं, तेणेंकरून तो ( बेरिंग नामक ) ज्या पेढीवाल्यांच्या कुळांत जन्मला होता, त्यास शोभेल असा आहे ही गोष्ट व्यक्त झाली. प्राप्तीवरील कर जरी अजीबाद काढून टाकिला होता, व दुसरे कर कमी केले होते, तरी १८७४ साल खेरीजकरून इतर सालीं त्याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानच्या जमाबंदीची भरभराटच होती. त्या सालीं एक मोठा दुष्काळ बहार व बंगाल ह्या प्रांतांवर येऊन पडला, आणि उपासमार चाललेल्या प्रजेस अन्न पुरविण्याच्या कामीं सरकारास साठ लाखांवर पौंड खर्च करावे लागले. त्या वेळीं जलमार्ग, स्थलमार्ग, व लोहमार्ग ह्या तीन मार्गांनीं धान्य पाठविलें. सशक्त माणसांसाठीं रिलीफ

वर्क्स ( मदतकामें ) सुरू केलीं, व ज्यांस काम करण्याची शक्ति नव्हती, अशांस अन्न फुकट पुरविलें. ह्याप्रमाणें लॉर्ड नॉर्थब्रूक ह्यानें फार उत्साहपूर्वक काम केल्यामुळें, एरवीं जे उपासमार होऊन खचीत मेले असते असे हजारों लोक बचावले.

२७४. **प्रिन्स ऑव् वेल्स ( युवराज ) याचें हिंदुस्थानांत आगमन**—राणीचा दुसरा पुत्र डयूक ऑव् एडिंबरो हा लॉर्ड मेयोच्या वेळीं हिंदुस्थान पहावयास आला होता, व त्या वेळीं हिंदुस्थानच्या राजांनीं व इतर लोकांनीं त्याचें मोठ्या आनंदानें आगतस्वागत केलें होतें; पण १८७५ त गादीचा वारस प्रिन्स ऑव् वेल्स हा जेव्हां त्यांस भेटावयास आला तेव्हां त्यांस अधिकच आनंद झाला. एतद्देशीय राजांपैकीं जे सर्वांत मोठे होते, त्यांनीं राजघराण्यांतील पाहुण्याचा मोठ्या थाटमाटानें पाहुणचार करण्याच्या कामीं एकमेकांवर ताण करण्याचीच खटपट केली; त्यामुळें ह्या देशांतून त्याचा जो प्रवास झाला तो विजय मिळवून आलेल्या एकाद्या स्वारीचा जसा व्हावा तशा थाटाचा अगदीं झाला. प्रिन्स ऑव् वेल्स गेल्याच्या मागून राणीचा तिसरा मुलगा डयूक ऑव् कॉनॉट ह्याची स्वारी हिंदुस्थानांत येऊन राहून गेल्यामुळें इंग्लंदच्या राजघराण्याचा हिंदुस्थानाशीं जो संबंध तो ज्यास्तच निकट झालेला आहे. हा राजपुत्र १८८६ पासून १८९० पर्यंत मुंबईच्या सैन्याचा मुख्य अधिपति होता.

२७५. **मल्हारराव पदच्युत होतो**—मल्हारराव हा १८७० त बडोद्याचा गायकवाड झाला, व आपल्या गैरशिस्त राज्यकारभारानें व उधळेपणानें त्यानें आपलें इतकें

बद्नाम करून घेतलें कीं, लॉर्ड नॉर्थब्रूक ह्यानें त्यास पदच्युत करण्याची भीति घातली. पुढें १८७५ सालीं, बडोद्याचा रेसिडेंट कर्नल फेयर ह्याच्या सरबतांत हिऱ्याची बुकी घालून त्यास विष घालण्याचा यत्न झाला होता, त्यांत ह्याचें अंग असावें असा संशय आला. म्हणून यूरोपियन व एतद्देशीय ह्यांच्या एका मिश्र कमिशनापुढें त्याची चवकशी झाली. पण कमिशनांतील एतद्देशीय सभासदांस त्याच्या अपराधीपणाविषयीं शंका राहिल्यामुळें, किंवा तो निरपराधी आहे असें वाटल्यामुळें, त्या आरोपावर तो गुन्हेगार ठरला नाहीं. तथापि त्याच्या पूर्वीच्या गैरशिस्त कारभारावरून त्यास पदच्युत केलें आणि हल्लींचा गायकवाड तेव्हां लहान होता म्हणून त्याच्या नांवानें राज्यकारभार चालविण्याकरितां सर टी. माधवराव यास नेमिलें.

२७६. **लॉर्ड लिटन व शेरअल्ली**—लॉर्ड नॉर्थब्रूक ह्यानें १८७६ त राजीनामा दिला, व कान्सर्व्हेटिव्ह पक्षाच्या प्रधानमंडळानें त्याच्या जागीं लॉर्ड लिटन यास नेमिलें. तो इकडे आला तेव्हां त्यास असा हुकूम झाला कीं, शेरअल्ली आपल्या राज्यांत ब्रिटिश अंमलदारांस येऊं देईल अशी खटपट करून तसें करण्यास त्यास भाग पाडावें. ह्या सूचनेस शेरअल्ली अगदीं प्रतिकूळ झाला; व त्यानें असें स्पष्ट सांगितलें कीं, असले अंमलदार आपल्या देशीं आलेले पाहून अफगाण लोक चिडून जातील, व त्यांच्या सुरक्षितपणाबद्दल आपणास हमी देतां येणार नाहीं. त्यावरून १८७७ च्या जानेवारींत लॉर्ड लिटन यानें त्यास असें सांगितलें कीं, ह्याच्यापुढें ब्रिटिश सरकाराकडून आश्रय मिळण्याची आशा आपण करूं नये.

२७७. **थाटमाट व दुष्काळ**—१८७७ च्या पहिल्यां दिवशीं, महाराणी व्हिक्टोरिया ह्यांनीं हिंदुस्थानची बादशाहीण हा किताब धारण केला आहे, ही गोष्ट दिल्ली येथें मोठ्या समारंभानें जाहीर केली. त्याच्या आदल्या वर्षीं आक्टोबरच्या शेवटच्या तारखेस गंगा व ब्रह्मपुत्रा ह्यांच्या मुखांपाशीं जो सखल प्रदेश आहे त्याजवरून दोन मोठ्या वादळी लाटा झपाट्यानें गेल्या होत्या, व सरासरी एका क्षणांत पिकें व १,००,००० माणसें एवढ्यांचा संहार झाला होता. त्याच वर्षाच्या (१८७६ च्या) अखेरीस असें स्पष्ट दिसूं लागलें कीं, पाऊस कमी पडल्यामुळें दक्षिण व पश्चिम हिंदुस्थानांत दुष्काळ पडणार. पुढें राणीसाहेबांनीं बादशाहीण हा किताब धारण केल्याचें जाहीर झालें, व त्या समयीं हजारों लोक रिलीफ वर्क्सवर लागलेले होते. एका विस्तीर्ण प्रदेशावर दुष्काळानें कहर उसळिला, आणि लोकांचा उपासमारीपासून बचाव करण्यासाठीं सरकारानें जरी मोठे प्रयत्न केले, तरी मद्रास व मुंबई इलाख्यांत मिळून ५०,००,००० वर पुरुष, बायका, व मुलें मृत्युमुखीं पडलीं.

२७८. **अफगाणिस्थानाशीं युद्ध**—१८७७ सालीं शेरअलीनें रशियाच्या वकिलाचें काबूल येथें स्वागत केलें, त्यावरून लॉर्ड लिटन ह्यानें त्यास असें कळविलें कीं, इंग्लिशांचा वकील आपल्याकडे लवकरच पाठविला जाईल. पण अली मशीद हा किल्ल्यावरचा अफगाण सेनापति इंग्लिश वकिलास सीमा वलांडूं देईना. तेव्हां शेरअलीस असें सांगून पाठविलें कीं, आपण इंग्लिशांचा कायमचा वकील घेतला पाहिजे, व ह्या मागणीच्या संबंधानें जेव्हां कांहींच उत्तर आलें

नाहीं तेव्हां त्याच्याशीं युद्ध सुरू केल्याचें जाहीर केलें. तीन इंग्लिश सैन्यें आडव्या आलेल्या अफगाण सैन्यास सहज जिंकून टाकून अफगाणिस्थानांत शिरलीं. तेव्हां शेरअली त्या देशाच्या उत्तरेस पळून गेला, व तेथें १८७९ च्या फेब्रुवारींत मरण पावला. नंतर त्याचा पुत्र याकूबखान यानें इंग्लिशांशीं तह केला, व काबूल येथें ब्रिटिश रेसिडेंट ठेवून घेण्याचें कबूल केलें.

२७९. **अफगाणिस्थानाशीं युद्धाची पुनः सुरवात**—पुढें १८७९ च्या सप्टेंबर महिन्यांत काबूल येथील ब्रिटिश रेसिडेंट सर लुई क्याव्हगनारी व त्याच्या बरोबरचे लोक यांची अफगाण शिपायांनीं बंड करून उठून त्या शहरीं कत्तल उडविली. अशा गुन्ह्याबद्दल एकदम सूड उगविणें अगदीं जरूर होतें; ह्मणून जनरल रॉबर्ट्स् हा एकदम काबुलावर चालून गेला आणि आक्टोबरच्या ६ व्या तारखेस त्या बंडखोर अफगाण शिपायांचा व त्यांच्या मित्रांचा पराजय करून शहर त्यानें आपल्या ताब्यांत घेतलें. नंतर तेथें लष्करी कायदा सुरू केल्याचें जाहीर केलें, व रेसिडेन्सीवर हल्ला करण्याच्या कामीं अंग असलेल्या पुष्कळ अफगाण लोकांस फांशीं दिलें. याकूबखानास हिंदुस्थानांत पाठविलें, व जनरल रॉबर्ट्स् हा सर्व हिंवाळाभर काबुलावर ताबा ठेवून राहिला. दिजंबर महिन्यांत अफगाण लोकांनीं त्यांजवर भयंकर हल्ला केला, पण शेवटीं त्यानें पुनः शांतता स्थापन केली. नंतर १८८० च्या वसंतऋतूंत सर डोनाल्ड स्टुअर्ट हा कंदाहार येथून निघून काबूलपर्यंत चाल करून गेला, व मार्गांत अहमदखेल ह्या ठिकाणीं एका अफगाण सैन्याचा त्यानें पराजय केला.

२८०. **मेवंडची लढाई व अवदुल रहिमान याचें गादीवर बसणें**—१८८० च्या जुलई महिन्यांत शेरअल्लीचा भाऊ आयुबखान हा हिरात येथून चाल करून आला, व त्याच्यावर जनरल बरोज ह्यास थोड्याशा ब्रिटिश सैन्यानिशीं पाठविलें होतें, त्याचा त्यानें बहुतेक सर्वस्वीं संहार करून टाकिला; व अशा रीतीनें विजयी होऊन नंतर त्यानें कंदाहारास वेढा घातला; तो आगस्ट महिन्यापर्यंत राहिला. त्या वेळीं जनरल रॉबर्ट्स् यानें १०,००० निवडक लोकांनिशीं काबुलाहून जलदीनें चाल करून येऊन वेढा घालणारांचा सहज पराजय करून टाकिला. दुसऱ्या अफगाण युद्धांतील ही शेवटची लढाई होय. कारण इकडे इंग्लंदांत लिबरल-पक्षाच्या हातीं राज्यकारभार येऊन लॉर्ड लिटन यानें राजीनामा दिला होता; त्यामुळें त्याच्या मागून आलेला जो लॉर्ड रिपन त्याच्या कारकीर्दीत अफगाणिस्थानची व्यवस्था पूर्णपणें लागली. दोस्तमहंमदाचा नातू अबदुल रहिमान यास अमीर केलें, व ब्रिटिश सैन्यानें अफगाणिस्थान सोडिलें.

२८१. **मार्किस ऑव् रिपन, १८८०–१८८४**—लॉर्ड रिपन ह्यानें एतद्देशीय लोकांच्या हक्कांकडे लक्ष्य पुरविल्यामुळें त्यांच्यामध्यें तो फार लोकप्रिय झाला. आज ५० वर्षे म्हैसूरचे राज्याचा कारभार ब्रिटिश अंमलदारांच्या हातीं होता; पण १८८१ च्या मार्चांत तें संस्थान तेथील तरुण राजाच्या व एका एतद्देशीय प्रधानमंडळाच्या हातीं परत दिलें. १८८२ त स्थानिक स्वराज्याची एक नवीन व्यवस्था अंमलांत आणिली. शिवाय, १८७८ सालीं लॉर्ड लिटन ह्यानें एतद्देशीय वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्यास कांहीं

बंधनें घालून दिलीं होतीं तीं १८८२ सालीं काढून टाकिलीं. त्यामुळें सुशिक्षित एतद्देशीय लोकांस ज्यास्तच संतोष झाला. लॉर्ड रिपनच्या लोकप्रिय कृत्यांपैकीं शेवटचें व अत्यंत प्रसिद्ध कृत्य म्हटलें म्हणजे इल्बर्ट बिल नांवाचा जो कायदा या सुमारास पसार झाला तो होय. ह्या कायद्यानें असें ठरावयाचें होतें कीं, बाहेरगांवीं यूरोपियन लोकांचे खटले एतद्देशीय न्यायाधिशांपुढें चालावे. ह्या बिलास यूरोपियन लोक, व विशेषतः कलकत्त्याचे यूरोपियन लोक फारच प्रतिकूल होते. दुसऱ्या पक्षीं, एतद्देशीय लोकांचें म्हणणें असें पडलें कीं, हा कायदा न्यायास अगदीं अनुसरून आहे. शेवटीं असें ठरलें कीं, या देशांतील यूरोपियनांस त्यांच्या जातीचे अर्धे लोक जूरर आहेत अशा जूरीपुढें त्यांचे खटले चालण्याचा विशेष हक्क द्यावा. पुढें १८८४ सालीं लॉर्ड रिपन हा जेव्हां हिंदुस्थान सोडून निघाला, तेव्हां ह्या देशांतील लोकांच्या मनांमध्यें त्याच्याविषयीं जें प्रेम उत्पन्न झालेलें होतें, त्याचें प्रदर्शन कलकत्त्यापासून तों मुंबईपर्यंत त्यांनीं फार चांगल्या रीतीनें करून दाखविलें.

२८२. **ईजिप्त देशीं हिंदुस्थानांतील एका मदतनीस सैन्याचें गमन**—लॉर्ड रिपनच्या कारकीर्दीतील हिंदुस्थानच्या परकीय इतिहासांतील मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे, १८८२ सालीं, ईजिप्तशीं चाललेल्या लढाईत मदत करण्याकरितां हिंदुस्थानांतून मुख्यत्वेंकरून काळ्या शिपायांची एक फौज पाठविली होती ती होय. ही हिंदुस्थानीय फौज टेलेलकेबिरच्या लढाईनंतर लागलीच कैरोशहराकडे त्वरेनें गेली; तिनें तें शहर व्यापिलें, व वरील लढाईच्या दुसऱ्या दिवशीं, ह्मणजे सपटेंबरच्या १४ वीस, आरबी पाच्छास कैद केलें.

**२८३. लॉर्ड डफरिन व रशिया**—लॉर्ड रिपनच्या मागून १८८४ च्या दिजंबरांत लॉर्ड डफरिन याची नेमणूक झाली. रशियन लोक हिंदुस्थानच्या सीमेच्या जवळ जवळ यावयास लागले असल्यामुळें, व १८८४ सालीं त्यांनीं मर्व्हशहर कबजांत घेतल्यामुळें, कांहीं संकट कदाचित् उत्पन्न होईल त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं त्यास मुद्दाम इकडे पाठविलें होतें. पण तो येऊन पोहोंचण्याच्या पूर्वींच रशियाचें राज्य व अफगाणिस्थान ह्यांजमधील सीमा निश्चित करण्यासाठीं कमिशनें पाठविण्याचें रशिया व इंग्लंद ह्यांनीं एकमतानें ठरविलें होतें. पण रशियानें नेमलेल्या वेळीं आपलें कमिशन पाठविलें नाहीं; व १८८५ च्या मार्च महिन्यांत जनरल कोमेरॉफ यानें पेंजडे हें गांव अफगाण लोक आपलें ह्मणून ह्मणत असतां, बळजबरीनें घेतलें. तेव्हां युद्ध लवकरच सुरू होणार असा रंग दिसूं लागला. त्या प्रसंगीं एतद्देशीय राजे राजनिष्ठपणानें मदत करण्यासाठीं पुढें आले. अमीर व्हाइसरायसाहेब यांस रावळपिंडी येथें भेटला, व आपल्या ब्रिटिश दोस्तांच्या बाजूला उभें राहून आपण लढणार असा त्यानें आपला दृढ निश्चय प्रदर्शित केला. पण ह्या वेळच्या सुमारास रशियन लोक शांतता कायम राहील अशा रीतीनें वागण्यास ज्यास्त अनुकूळ झालेले होते; ह्मणून नवंबर महिन्यांत त्यांनीं आपलें कमिशन सीमेवर पाठविलें. नंतर त्या दोन राज्यांमधील हद्द रेखाटून टाकिली; व दोन्ही पक्षांनीं एकमेकांचें ह्मणणें कांहीं कांहीं कबूल करून लढाईचा प्रसंग टाळिला.

**२८४. उत्तर ब्रह्मदेशाचा पाडाव**—ब्रह्मदेशाचा जो भाग अद्यापि स्वतंत्र होता त्याचा राजा जो थीबा त्याचा कार-

भार जुलमी असल्यामुळें, तो फ्रेंच लोकांशीं चोरून मसलती करीत असल्यामुळें, व ब्रिटिश लोकांच्या व्यापाराचा तो द्वेष करीत असल्यामुळें, आज पुष्कळ दिवसपर्यंत त्याच्या कारभारांत हात घालावा असें ब्रिटिश सरकारास चीड येऊन वाटावयास कारण झालेलें होतें. शेवटीं १८८५ च्या आक्टोबर महिन्यांत त्याच्या शिपायांनीं 'बॉंबे ऍण्ड बर्मा ट्रेडिंग कंपनी' नांवाच्या एका व्यापारी मंडळीच्या नोकरांवर गोळीबार केले तेव्हां त्यास असें सांगितलें कीं, मण्डाले येथें आपण एक इंग्लिश सरकारचा रेसिडेंट ठेवून घेतला पाहिजे. पण ही मागणी त्यानें कबूल केली नाहीं, ह्मणून नवंबरच्या १४ वीस एक ब्रिटिश सैन्य सीमा वलांडून त्याच्या देशीं गेलें. त्यास बहुतेक मुळींच अडथळा झाला नाहीं. नंतर २९ वीस त्यांनीं मण्डाले शहर काबीज केलें, व थीबा यास कैद करून रंगून मुक्कामीं पाठविलें. पुढें १८८६ च्या जानेवारीच्या पहिलीस असा एक जाहीरनामा लाविला कीं, त्याचें राज्य राणीसरकारच्या मुलखास जोडिलें आहे.

२८९. **ब्रह्मदेशांत शांततेची स्थापना**—उत्तर ब्रह्मदेश जिंकून टाकण्याच्या कामापेक्षां त्या ठिकाणीं कायदा व व्यवस्था ह्यांची स्थापना करण्याचें काम बरेंच जास्त अवघड गेलें. लुटारू दंगेखोरांच्या मोठमोठ्या टोळ्या बहुतेक रंगून शहरापर्यंत सर्व देश लुटूं लागल्या. त्यामुळें ब्रह्मदेशाच्या जिंकलेल्या भागांत ३०,००० ब्रिटिश सैन्य नेऊन ठेवणें भाग पडलें. कित्येक इंग्लिश लोक ठार मेले गेले, काळ्या शिपायांच्या तुकड्यांवरून छापे पडूं लागले, व शहरें आणि खेडीं ह्यांजवर हल्ले होऊं लागले.

पण शेवटीं पुनः जिकडे तिकडे व्यवस्थितपणा उत्पन्न झाला. नंतर व्यापार पुनः आपलें डोकें वर काढूं लागला, आणि नवे रस्ते, नवीं घरें, व नवे कारखाने उठूं लागले. प्रथम ह्या उत्तर ब्रह्मदेशांत सरकारास खर्च फार होत असे, पण हल्लीं रस्ते व आगगाड्या ह्यांच्या योगानें त्या देशांत व्यापाराचीं द्वारें खुलीं झाल्यामुळें, व सुधारलेल्या सरकारच्या नियमित राज्यकारभाराची तेथें स्थापना झाल्यामुळें, त्याजपासून ब्रिटिश राज्यांत एक मोलवान् भर खचीत पडणार आहे.

**२८६. लॉर्ड डफरिनच्या कारकीर्दीचा शेवट.**— लॉर्ड डफरिनच्या हिंदुस्थानांतील कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षीं हद्दीवर दोन लहानशीं युद्धें होऊन गेलीं; एक सिकिमप्रांतांत तिबेटांतील लोकांबरोबर, व दुसरें, ब्लाक मौंटिन येथील डोंगरी लोकांच्या टोळ्यांबरोबर. त्यानें या (१८८८) वर्षाच्या शेवटच्या महिन्यांत राजीनामा दिला. रशियन लोकांशीं युद्ध होण्याचें जें टळलें, त्याबद्दलची शाबासकी मुख्यत्वेंकरून ह्यासच दिली पाहिजे. हिंदुस्थानच्या उत्तर सीमेवर परराष्ट्रांना हल्ला चालूं नये एतदर्थ ती मजबूत करण्याच्या कामीं त्याच्या कारकीर्दींत पुष्कळ पैसा खर्च केला. देशसंरक्षणासाठीं त्याच्या कारकीर्दींत ज्या इतर गोष्टी झाल्या, त्यांपैकीं मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे ही कीं, इम्पीरियल सर्व्हिस ट्रुप्स् (साम्राज्याच्या नोकरीकरितां शिपाई) ह्या नांवाच्या कांहीं फौजा एतद्देशीय संस्थानिकांनीं तयार केल्या; व त्यांजविषयीं असें ठरविलें कीं, त्यांना कवाईत वगैरे इंग्लिश अंमलदारांनीं शिकवावी, व अशा रीतीनें हिंदुस्थानच्या हद्दीचें संरक्षण करण्याच्या कामीं हातभार लावण्यास त्यांस तयार करावें.

**२८७. लॉर्ड लॅण्ड्सडौन**—हा लॉर्ड डफरिनच्या मागून आला; व १८८८ च्या दिजंबरच्या ८ वीस तो कलकत्त्यास येऊन दाखल झाला. १८८९ त प्रिन्स ऑव् वेल्स ह्याचा ज्येष्ठपुत्र प्रिन्स आल्बर्ट व्हिक्टर हा हिंदुस्थान पहावयास आला; व त्याच्या पुढल्या वर्षी रशियन बादशाईचा वारस झारविच हा आला. मणिपूर म्हणून आसामच्या सीमेवर एक लहान संस्थान आहे तेथें १८९१ च्या मार्चांत मुलकी व लष्करी इंग्लिश अंमलदारांचा खून झालेला ऐकून सर्व हिंदुस्थान दचकून गेलें. ह्या विश्वासघाताच्या कृत्याबद्दल मुन्हेगारांस देहान्त व काळ्या पाण्याच्या शिक्षा दिल्या. पुढें १८९३ च्या सप्टंबर महिन्यांत सर मार्टिमर डयूरंड ह्यास वकील म्हणून काबुलास पाठविलें, व तेथें अमीरानें त्याचा चांगला सत्कार केला. एका पक्षीं हद्दीवरचीं कांहीं लहानसान युद्धें खेरीज करतां, लॉर्ड लॅण्ड्स्डौन ह्याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत बाह्यशत्रूपासून त्रास झाला नाहीं; पण दुसऱ्या पक्षीं, १८९३ सालीं हिंदु व मुसलमान ह्यांजमध्यें दंगे होऊन, देशाच्या अंतःशांततेचा भंग झाला. या दंग्यांपैकीं अत्यंत भयंकर दंगे म्हटले म्हणजे मुंबईमध्यें ऑगस्टच्या ११ व्या तारखेस जे सुरू झाले ते होत. दोन किंवा तीन दिवसपर्यंत दंगेखोर लोक हातांत काठ्या व दगड घेऊन सर्व शहरभर सारखे लढत होते; व पुष्कळ प्रसंगीं लष्करी शिपायांस दंगेखोरांवर बंदुका सोडण्याचा प्रसंग आला.

**२८८. शेट दादाभाई नौरोजी आणि राष्ट्रीय सभा**—१८९२ सालीं शेट दादाभाई नौरोजी यांस फिन्स्बरीच्या मतदारांनीं निवडल्यामुळें ते पार्लमेंटाचे सभासद झाले.

ह्या गोष्टीपासून हिंदुस्थानच्या लोकांस फार संतोष झाला. त्यांच्या निवडणुकीनंतर ते जेव्हां हिंदुस्थानांत आले. तेव्हां त्यांचें फार उत्साहपूर्वक आगतस्वागत केलें, व नंतर ते राष्ट्रीय सभेच्या नवव्या बैठकीचे अध्यक्ष झाले. पुढें १८९५ च्या निवडणुकीच्या वेळीं दादाभाई नौरोजी हे पुनः निवडून आले नाहींत; तथापि पार्लमेंतांत अद्यापिहि हिंदुस्थानांतील एक गृहस्थ आहेत; कारण त्या वेळीं शेट एम्. एम्. भावनगरी (यांस हल्लीं सर मंचरजी भावनगरी असा किताब मिळाला आहे) ह्यांस लंदनच्या एका भागांतील मतदारांनीं सभासद ह्मणून निवडून दिलें.

२८९. **कायदेकानू**–इंडियन कौन्सिल आक्ट (हिंदुस्थानांतील कायदे करणाऱ्या सभांच्या संबंधाचा कायदा) नामक कायदा ब्रिटिश पार्लमेंतानें १८९२ सालीं पसार केल्यामुळें या देशांतील कायदेकौन्सिलांत आपण निवडलेले प्रतिनिधि असावे अशी जी हिंदुस्थानवासी लोकांची इच्छा ती तृप्त झाली; हा कायदा १८९३ सालीं हिंदुस्थानांत अंमलांत आला. या कायद्यान्वयें इलाख्याच्या व हिंदुस्थानसरकारच्या कायदेकौन्सिलांत सरकारी सभासदांखेरीज, म्युनिसिपालिट्या, युनिव्हर्सिट्या, व चेम्बर्स ऑव् कॉमर्स (व्यापाऱ्यांच्या सभा) ह्यांनीं निवडलेले सभासद येऊं लागले आहेत. आणखी एक महत्त्वाचा कायदा १८९३ च्या जून महिन्याच्या २६ व्या तारखेस पसार झाला. त्याचा उद्देश रुपयाची किंमत पौंडाच्या मानानें उतरत होती त्यास कांहीं उपाय करावा हा होता. कारण रुपया उतरल्यामुळें आज पुष्कळ वर्षें सरकारी जमाबंदीची किंमत कमी होत चालली होती. ह्या कायद्यापासून

रुपयाची किंमत एक शिलिंग चार पेन्स किंवा ह्याच्यापेक्षांहि ज्यास्त वाढेल अशी आशा होती. पण ही आशा निष्फळ झाली; कारण तो कायदा पसार झाल्यानंतर रुपयाची किंमत एक शिलिंग एक पेन्स ह्याच्याहि खालीं एकदां गेलेली होती. तथापि प्रस्तुत ( १८९६ वर्षाच्या प्रारंभापासून ) ती एक शिलिंग दोन पेन्सांच्या वर चढली आहे; पण पुनः ती उतरणार नाहीं अशी कोणासहि खात्री नाहीं.

२९०. **उपसंहार**—सध्याचे राणीचे प्रतिनिधि लॉर्ड एलिगन हे १८९४ च्या जानेवारींत लॉर्ड लॅण्ड्स्डौन ह्याच्या मागून आले. तेव्हांपासून आतांपर्यंत ( १८९६ ) अत्यन्त महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे चित्रळ संस्थान काबीज केलें ही होय. लॉर्ड लॅण्ड्स्डौनच्या चलनी नाण्याच्या कायद्यापासून इष्ट फलोत्पत्ति न झाल्यामुळें आयात मालावर कर बसविणें जरूर पडलें. रुप्याची किंमत उतरून त्यामुळें जे वाईट परिणाम झाले आहेत ते वजा करतां बाकी हिंदुस्थानची सध्या साधारणपणें बरीच भरभराट आहे असें ह्मणतां येईल. बंडापासून तों आजपर्यंत सरहद्दीवर खेरीजकरून इतरत्र आपणांस बहुतेक सारखा शांततेचा उपभोग मिळत आला आहे. ह्या शांततेच्या अवधींत कालवे, यांत्रिक कारखाने, व ज्यास्त ज्यास्त आगगाडीचे रस्ते, ह्यांच्या योगानें देशाच्या उत्पन्नशक्ति बऱ्याच वृद्धिंगत झाल्या आहेत. मनुष्यगणतीवरून पाहतां हिंदुस्थानांत लोकसंख्या जलद वाढत आहे असें दिसून येतें; तरी हिंदुस्थानांत मोठा दुष्काळ पडल्यास आज सरासरी वीस वर्षें होऊन गेलीं. पण हिंदुस्थानची प्रगति केवळ अर्थसंपत्तीच्याच दृष्टीनें झाली आहे असें नाहीं, तर शिक्षणाचाहि देशांत प्रसार होत गेला आहे; व त्यामुळें

चढाओढ करणाऱ्या एतद्देशीय लोकांस ज्यास्त ज्यास्त सरकारी नोकऱ्या मिळवितां याव्या अशा सवलती देण्यास सरकारास सवड झाली आहे. हिंदुस्थानावर कंपनीचा अंमल जेव्हां प्रथम सुरू झाला, तेव्हां इंग्लिश अंमलदारांचा मुख्य उद्देश असा असे कीं, देशांतून जितका पैसा निघेल तितका काढावयाचा; पण हल्लीं हिंदुस्थानचा राज्यकारभार ह्यापेक्षां ज्यास्त उदार तत्त्वांवर चाललेला आहे. जसजसा ज्यास्त काल निघून जात चालला, तसतशी, आपल्या हातीं जो हा देश दिला आहे त्याचा कारभार परोपकार व न्याय यांच्या तत्त्वांस अनुसरून चालविला पाहिजे, ही गोष्ट हिंदुस्थानच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांस ज्यास्त ज्यास्त स्पष्टपणें समजूं लागली.

---

# हिंदुस्थानच्या इतिहासांतील मुख्य मुख्य गोष्टी.

खिस्ती शकापूर्वी.

| | |
|---|---|
| २००० | ऋग्वेदास आरंभ. |
| ५१५ | डरायस पंजाबप्रांत जिंकून घेतो. |
| ३२७ | शिकंदराची हिंदुस्थानावर स्वारी. |
| ३०५ | सेल्यूकस आणि चंद्रगुप्त ह्यांजमधील तह. |
| २६० | अशोकराजा बौद्धधर्माचा स्वीकार करितो. |
| ५७ | विक्रमादित्य गादीवर बसतो. |

खिस्ती शकाप्रमाणें.

| | |
|---|---|
| ४० | कनिष्काच्या कारकीर्दींत बौद्धधर्माची परिषद् भरते. |
| ६३०–६४० | ह्यूएनशांग याचें हिंदुस्थानांत आगमन. |
| ७११ | कासीम सिंधप्रांतावर स्वारी करितो. |
| ९९७ | सुलतान महमूद गादीवर बसतो. |
| १००१ | महमुदाची हिंदुस्थानावर पहिली स्वारी. |
| १०२४ | महमूद सोमनाथ घेतो. |
| ११८६–१२०६ | गोरघराण्याची कारकीर्द. |
| ११९१ | थानेश्वरची लढाई. |
| ११९९ | बहारप्रांताचा पाडाव. |
| १२०३ | बंगालप्रांताचा पाडाव. |
| १२०६–१२९० | गुलामघराण्याची कारकीर्द. |
| १२९०–१३२० | खिलजीघराण्याची कारकीर्द. |
| १२९७ | गुजराथप्रांताचा पाडाव. |
| १३१० | कर्नाटकप्रांताचा पाडाव. |
| १३२०–१४१४ | तघलकघराण्याची कारकीर्द. |
| १३५० | विजयनगरच्या राज्याची स्थापना. |

ख्रिस्ती शकाप्रमाणें.

१३९८ तैमूरलंगाची स्वारी.
१४१४–१४५० सय्यदघराण्याची कारकीर्द.
१४५०–१५२६ लोदीघराण्याची कारकीर्द.
१४९८ वास्को दि गामा कालिकत बंदरीं उतरतो.
१५१० आलबूकर्क याच्या कारकीर्दीस आरंभ.
१५२६ पानिपतची पहिली लढाई.
१५२७ शिक्रीची लढाई.
१५३० बाबराचा मृत्यु.
१५४० हुमायुनाचें हिंदुस्थानांतून पलायन.
१५४५ शीरशाहाचा मृत्यु.
१५५६ पानिपतची दुसरी लढाई.
१५७० गोव्याचा वेढा.
१५७६ बंगालप्रांताचा पाडाव.
१५८७ काश्मीरप्रांताचा पाडाव.
१५९५ डच लोकांचें हिंदुस्थानांत आगमन.
१६०५ जहांगीर गादीवर बसतो.
१६०९ हाकिन्स साहेब सुरतेस येतो.
१६१५–१६१८ सर टामस रो इंग्लिशांचा वकील.
१६२७ शहाजहान गादीवर बसतो.
१६३७ अहमदनगरचें राज्य खालसा होतें.
१६५८ शहाजहान पदच्युत होतो.
१६५९ अफझुलखानाचा मृत्यु.
१६६० इंग्रजांस मुंबईबेट मिळतें.
१६६४ शिवाजी आपणास राजा म्हणवूं लागतो.
१६७० तो सिंहगड सर करितो.
१६७७ जेझिया कर पुनः बसतो.
१६८० { राजकुमार अकबर याचें बंड.
शिवाजीचा मृत्यु. }

ख्रिस्ती शकाप्रमाणें.

| | |
|---|---|
| १६८६ | विजापुरचें राज्य ल्यास जातें. |
| १६८९ | संभाजीचा मृत्यु. |
| १६९० | कलकत्ताशहराची स्थापना. |
| १७०७ | औरंगजेबाचा मृत्यु. |
| १७२० | बाजीरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळतात. |
| १७३४ | मराठे माळवाप्रांत घेतात. |
| १७३८ | नादीरशाह दिल्लीशहर लुटतो. |
| १७३९ | मराठे वसई घेतात. |
| १७४६ | फ्रेंच लोक मद्रास घेतात. |
| १७५१ | क्लैवसाहेब अर्काट काबीज करितो. |
| १७५२ | कातेरीपाकची लढाई. |
| १७५४ | दुप्लीस परत बोलावितात. |
| १७५७ | प्लासीची लढाई. |
| १७६१ | पानिपतची तिसरी लढाई.<br>पांदीचरीचा पाडाव. |
| १७६४ | बक्सारची लढाई. |
| १७६७ | क्लैवसाहेबाचें हिंदुस्थानांतून प्रयाण. |
| १७६७–१७६९ | म्हैसुरचें पहिलें युद्ध. |
| १७७१ | माधवरावाचा मृत्यु. |
| १७७३ | बनारसचा तह. |
| १७७४ | वारन हेस्टिंग्स पहिला गव्हर्नर जनरल होतो. |
| १७७५–१७८२ | मराठ्यांशीं पहिलें युद्ध. |
| १७७९ | वडगांवचा करार. |
| १७८०–१७८४ | म्हैसुरचें दुसरें युद्ध. |
| १७८० | बेलीच्या सैन्याचा संहार. |
| १७८२ | सालपीचा तह.<br>हैदर अल्लीचा मृत्यु. |
| १७८४ | पिटचें ईस्ट इंडिया बिल. |